॥ ॐ गं गणपतये नमः ॥

त्रिवार जयजयकार

आम्ही मराठी

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे

९५वे मराठी
नाट्य संमेलन

बाळासाहेब ठाकरे नाट्य - नगरी
स्मिता तळवलकर रंगमंच
सी.पी.एड. ग्राऊंड, बेळगाव

प्रकाशक :
अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद
शाखा-बेळगांव
लोकमान्य ग्रंथालय, खानापूर रोड, बेळगांव

मुख्य संपादक :
अशोक याळगी

संपादन सहाय्य :
लता कित्तूर, शोभा लोकूर, मेधा मराठे

मुखपृष्ठ :
महेश होनुले, चित्रकार
राजहंस गड, यळ्ळूर, बेळगाव

संकल्पना :
संपादकीय मंडळ

अक्षरजुळवणी :
इंप्रेशन्स, बेळगांव

मुद्रक :
इंप्रेशन्स,
गोंधळी गल्ली, बेळगांव-५९० ००२

केवळ खाजगी वितरणासाठी

स्मरणिकेतील लेखात, छायाचित्रात व्यक्त केलेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

९५व्या नाट्य संमेलनाचे उद्घाटक

मा. ना. श्री. शरदचंद्र पवारसाहेब

बेळगाव येथे होणाऱ्या अ.भा.मराठी नाट्य परिषदेच्या ९५व्या नाट्यसंमेलनास मनःपूर्वक शुभेच्छा देताना मला अत्यंत आनंद होत आहे. बेळगावची संपन्न व समृद्ध सांस्कृतिक परंपरा व नाट्य परिषदेची रंगभूमीची चळवळ दूरपर्यंत पोहोचविण्याची आस यांचा अजोड संगम बेळगाव येथे होईल याची मला खात्री आहे. या संमेलनास उपस्थित राहाणाऱ्या सर्व रंगकर्मी व रसिकांना माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा...

– शरद पवार

९५व्या नाट्य संमेलनाचे उद्घाटक

मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस

मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

संमेलनास शुभेच्छा....

सन्माननीय प्रमुख पाहुणे

मा. ना. श्री. विनोद तावडे

शालेय शिक्षण, क्रीडा

आणि सांस्कृतिक कार्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

संमेलनास शुभेच्छा....

९५व्या नाट्य संमेलनाचे सन्माननीय प्रमुख पाहुणे



मा. श्री. उद्धव ठाकरे

संमेलनास शुभेच्छा....

९५व्या नाट्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष



मा. डॉ. अशोक साठे

संमेलनास शुभेच्छा....

९५व्या नाट्य संमेलनासाठी सन्माननीय उपस्थिती



मा. श्री. किरण ठाकूर

संमेलनास शुभेच्छा....

मा. श्री. मोहन जोशी

अध्यक्ष

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबई



मा. श्री. दीपक करंजीकर

प्रमुख कार्यवाह

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबई

माजी संमेलनाध्यक्ष



मा. श्री. अरूण काकडे

ज्येष्ठ रंगकर्मी (९४व्या संमेलनाचे अध्यक्ष)

संमेलनास शुभेच्छा....

९५व्या नाट्य संमेलनाच्या अध्यक्षा



मा. श्रीमती फैय्याज

ज्येष्ठ रंगकर्मी

संमेलनास शुभेच्छा....

९५व्या नाट्य संमेलनासाठी सन्माननीय उपस्थिती

मा. श्री. हेमंत पाटील

मा. श्री. उदय सामंत

संमेलनास शुभेच्छा....

९५ व्या अ.भा. मराठी नाट्यसंमेलनाच्या स्वागत समितीचे सदस्य

स्वागताध्यक्ष : श्री. अशोक साठे

१ किरण ठाकूर
२ अनंत मनोहर
३ गणेश गाडगीळ (सांगली)
४ विजय पुसाळकर
५ डॉ. नितिन खोत
६ प्रकाश पंडित
७ दिलीप चिटणीस
८ अरविंद गोगटे
९ धनंजय पटेल
१० विनय जठार
११ अजित लोकूर
१२ यदुनाथ सोमण
१३ संजीव देशपांडे
१४ राम भंडारे
१५ सुधीर दरेकर
१६ डॉ. एम. डी. दीक्षित
१७ श्री मध्वाचारी
१८ सतीश नेतलकर
१९ आमदार शशिकला जोल्ले, निपाणी
२० डॉ. सी. टी. श्रावगे
२१ विजय बांदेकर
२२ संदिप नाईक
२३ आनंद देशपांडे
२४ आनंद मेणसे
२५ प्रदिप कुलकर्णी
२६ प्रमोद हेगडे
२७ गोविंद फडके
२८ अनुताई कित्तूर
२९ राजश्री हलगेकर
३० रोहिणी गोगटे
३१ अप्पासाहेब गुरव
३२ डॉ. राजेश पोवार
३३ अरुणा नाईक
३४ मिलिंद भातकांडे
३५ अशोक पोतदार
३६ संजय चव्हाण
३७ दिपक नलवडे
३८ लक्ष्मण सामंत
३९ जगन्नाथ मन्नोळकर
४० डॉ. विजय देसाई
४१ डॉ. शिल्पा कोडकिणी
४२ विजय पाटील
४३ अनिरुद्ध हुन्नरगीकर
४४ सचिन बिच्चू
४५ माधुरी शानभाग
४६ आनंद कुलकर्णी
४७ वसंतराव पाटील
४८ नागेश सातेरी
४९ मंगल गोगटे
५० गोविंद राऊत
५१ सुबोध टेंबे
५२ संजय कुलकर्णी (फार्मा)
५३ विनायक प्रभू (फार्मा)
५४ अनिल कवळेकर
५५ आर. डी. शानभाग

९५ व्या अ.भा. मराठी नाट्यसंमेलनाला आमच्या शुभेच्छा

१) डॉ. नितीन खोत
२) प्रकाश पंडीत
३) हायलॉक हायड्रोटेक्नीक्स
४) शांती केमिकल्स
५) विनय जठार
६) हायड्रोपॅक (दरेकर)
७) एम.डी. दीक्षीत
८) अभिषेक ॲलॉईज
९) मॅनसन इंजिनिअरींग
१०) डॉ. सी.टी. श्रावगे
११) डॉ. विजय देसाई
१२) डॉ. शिल्पा कोडकीणी
१३) अनिरुद्ध हुन्नरगीकर
१४) आनंद कुलकर्णी
१५) पुष्पा पी बिच्चू
१६) अनंत मनोहर
१७) डॉ. राजेंद्र भांडणकर
१८) रत्नाकर देसाई
१९) जोल्ले उद्योग समुह
२०) अनिल कवळेकर
२१) वेणुग्राम इन्फ्राव्हेंचर
२२) डॉ. व्ही.एन. देसाई
२३) शुभलाभ डेव्हलपर्स
२४) दामोदर इंजिनिअरींग वर्क्स
२५) अशोक आयर्न वर्क्स
२६) प्रकाश आयर्न वर्क्स

अ.भा. मराठी नाट्य परिषद, मुंबई
मानसेवी सदस्य

धनंजय साळगांवकर

दिगंबर आगाशे

गीता सोमण

प्रफुल कारेकर

कृष्णा जाधव

सुनीता गोरे

विजय सुर्यवंशी

अ.भा. मराठी नाट्य परिषद, मुंबई कार्यकारिणी, नियामक मंडळ

श्री. मोहन जोशी
अध्यक्ष

श्री. प्रमोद भुसारी
उपाध्यक्ष

श्री. दीपक करंजीकर
प्रमुख कार्यवाह

श्रीमती लता नार्वेकर
कोषाध्यक्षा

श्री. भाऊसाहेब भोईर
सह कार्यवाहक

श्री. सुनील वणजु
सहकार्यवाह

श्री. नवनाथ कांबळी
कार्यकारिणी सदस्य

श्री. दिलीप देवरणकर
कार्यकारिणी सदस्य

श्री. सतीश लोटके
कार्यकारिणी सदस्य

श्री. प्रफुल्ल महाजन
कार्यकारिणी सदस्य

श्री. सुनील ढगे
कार्यकारिणी सदस्य

श्री. श्रीपाद जोशी
कार्यकारिणी सदस्य

श्री. किशोर आयलवार
कार्यकारिणी सदस्य

श्रीमती वीणा लोकूर
कार्यकारिणी सदस्य

श्री. दिलीप कोरके
कार्यकारिणी सदस्य

श्री. विजय केंकरे
कार्यकारिणी सदस्य

श्रीमती नीना कुलकर्णी
नियामक मंडळ सदस्य

श्रीमती सुकन्या मोने
नियामक मंडळ सदस्य

श्री. भरत लोळगे
नियामक मंडळ सदस्य

श्री. गिरीश ओक
नियामक मंडळ सदस्य

अ.भा. मराठी नाट्य परिषद, मुंबई कार्यकारिणी, नियामक मंडळ

श्री. अरुण नलावडे
नियामक मंडळ सदस्य

श्रीमती वंदना गुप्ते
नियामक मंडळ सदस्य

श्री. चंद्रकांत कुलकर्णी
नियामक मंडळ सदस्य

श्री. अशोक हांडे
नियामक मंडळ सदस्य

श्री. राजन भिसे
नियामक मंडळ सदस्य

श्री. समीर हंपी
नियामक मंडळ सदस्य

श्री. सुनील महाजन
नियामक मंडळ सदस्य

श्री. शफी नायकवडी
नियामक मंडळ सदस्य

श्री. राजेंद्र जाधव
नियामक मंडळ सदस्य

श्री. उदय सामंत
नियामक मंडळ सदस्य

श्री. श्रीकृष्ण दळी
नियामक मंडळ सदस्य

श्रीमती आसावरी शेटये
नियामक मंडळ सदस्य

श्री. जनार्दन चितळे
नियामक मंडळ सदस्य

श्री. अशोक ढेरे
नियामक मंडळ सदस्य

श्री. ॲड. पराग लुले
नियामक मंडळ सदस्य

श्री. सुशांत शेलार
नियामक मंडळ सदस्य

श्री. किरण कामेरकर
नियामक मंडळ सदस्य

श्री. शशिकांत मोरे
नियामक मंडळ सदस्य

श्री. रत्नकांत जगताप
नियामक मंडळ सदस्य

श्री. प्रभाकर सावंत
नियामक मंडळ सदस्य

अ.भा. मराठी नाट्य परिषद, मुंबई कार्यकारिणी, नियामक मंडळ

श्री. विजय कदम
नियामक मंडळ सदस्य

श्री. दिलीप दळवी
नियामक मंडळ सदस्य

श्री. शिवाजी शिंदे
नियामक मंडळ सदस्य

रामतीर्थ मंदिर, हलशी-बेळगाव

संमेलनास शुभेच्छा....

मा. श्री. महेश नाईक

महापौर, बेळगाव

मा. श्री. संभाजी पाटील

मा. अरविंद पाटील

Z मराठी

मी मराठी. झी मराठी.

नक्षत्र

माध्यम प्रायोजक

झी टी.व्ही

९५ वे नाट्य संमेलन, बेळगाव

संयोजक संस्थांचे पदाधिकारी

प्रमुख कार्यकारीणी

अध्यक्ष - वीणा लोकूर, उपाध्यक्ष - श्री राजू सुतार,
सचिव - नीना जठार, कोषाध्यक्ष, कीर्ती टेंबे, सहसचिव - गीता कित्तूर

सुकाणु समिती

डॉ. राजेंद्र भांडणकर, बिंबा नाडकर्णी, राम भांडारे, डॉ. नीता देशपांडे,
विजय मोरे, अनंत जांगळे, नितीन खोत, राजेंद्र बेळगांवकर,
उदय कालकुंद्रीकर, विनय जठार

स्मरणिका समिती

अशोक याळगी, लता कित्तूर, शोभा लोकूर, मेधा मराठे

सांस्कृतिक समिती

संध्या देशपांडे, नीता कुलकर्णी, आसावरी भोकरे,
एकनाथ पाटील, स्वाती कुलकर्णी

भोजन समिती

पल्लवी कराडकर, प्राजक्ता बेडेकर, प्राजक्ता शहापूरकर,
संदीप भिडे, व्यंकटेश शिंहे, सागर दळवी

प्रमोशन आणि जनसंपर्क समिती

नताशा आजगावकर, सुनिता पाटणकर, सुरश्री जोशी, अक्षता आळतेकर,
दिनकर गवस, सई आजगावकर, उदय किंजवडेकर, जितेंद्र रेडकर

९५ वे नाट्य संमेलन, बेळगाव

संयोजक संस्थांचे पदाधिकारी

संयोजन समिती

नीलम शेवडे, संध्या शानभाग, हेमांगी प्रभू,
आनंद पाटील, प्रशांत भातकांडे

स्टॉल समिती आणि आसन व्यवस्था समिती

नरेश पाटील, स्वाती फडके, उर्मिला (संध्या) पाटणकर,
गणेश दड्डीकर, धनराज काविलकर, सम्राट गोडसे

निवास समिती

दिपा देशपांडे, निता देशपांडे, मेधा कानगो,
गिरीष असोदेकर, राधिका तेंडुलकर, संजय नाईक

वाहतूक समिती

हेमंत कित्तूर, अजित लोकूर, सुधीर जठार,
चंद्रशेखर बसुरतेकर, सुबोध टेंबे

दिंडी समिती

शिवाजी हंडे, अनिल चौधरी, नितीन कपिलेश्वरकर,
किरण गावडे, विनायक जाधव, जगदीश कुंटे

कार्यालयीन समिती

रिटा गुप्ते, सुरेखा हेरेकर,
उषाताई कुलकर्णी, डी.पी. शिंदे, शलाका दत्ता पाटील

९५ वे नाट्य संमेलन, बेळगाव

संयोजक संस्थांचे पदाधिकारी

हिशोब आणि ताळेबंद

अध्यक्ष - पुष्कर ओगले, राजेश शिवलकर, संजीव अध्यापक,

सुरक्षा - कर्नल किशोर गुप्ते (नि.), कर्नल रामकृष्ण जाधव (नि.), उमेश आपटेकर

सुकाणु लीगल, पर्मीशन, अकौंट-ओडिट समिती

डॉ. राजेंद्र भांडणक संजीव अध्यापक (सी.ए.),

सुधीर चव्हाण (वकील),

विकास कलघटगी, सुनिल नाईक (क. मेंबर),

सर्टीफीकेट आणि दृक श्राव्य समिती

अशोक संजय मोरे, श्रीकांत शानभाग, दिलीप नाईक, उमेश कलघटगी

अमेय पाटणकर, दीपक ओऊळकर, रोहिणी ओऊळकर

त्रैगुण्योद्भवमत्र लोकचरितं नानारसं दृश्यते ।

नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधाप्येकं समाराधनम्।

नाट्यात सत्व, रज आणि तम या तीन गुणांतून उद्भवणारे आणि नाना रसांनी युक्त असे लोक व्यवहार दिसतात. त्यामुळे नाट्य हे वेगवेगळ्या आवडी असणाऱ्या लोकांचे एकमेव मनोरंजनाचे साधन आहे.

- महाकवि कालिदास

बेळगावचे वैभव

भुईकोट किल्ला

कमल बस्ती

सार्वजनिक वाचनालय

रामकृष्ण आश्रम

हिडकल जलाशय

काँग्रेस विहीर

मराठा लाइट इंफन्ट्री

किल्ला तलाव

हलशीचे नृसिंह मंदिर

तळेवाडी, भीमगडचे जंगल



गोकाक धबधबा

कर्दंट

नाजुक कशिदा

काजू

कुंदा

आंबा

मांडे

With Best Compliments from.....

M/s Indo Schöttle Auto Parts Pvt. Ltd.

INDO SCHÖTTLE

SFS intec

A Pusalkar SFS Enterprise

अनुक्रमणिका

१. नाट्य-संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ. अशोक साठे यांचे मनोगत १

२. नाट्य परिषद बेळगाव शाखा, अध्यक्षा – वीणा लोकूर यांचे मनोगत २

३. संपादकीय ३

४. संगीत रंगभूमीचे नवीन पिढीसमोर आव्हान – विष्णू सुर्या वाघ ५

५. माझी रंगभूमीवरची ५० वर्षांची वाटचाल – फैय्याज – शब्दांकन शोभा लोकूर १४

६. कविता :

स्वप्नपूर्ती – मृदुला दामले १८

आमच्या फैय्याजताई – ज्योती पाध्ये गाडगीळ १८

७. प्रकाशयोजना – कशासाठी करावा हा अट्टाहास ? – प्रदीप वैद्य १९

८. बालगंधर्व मुलाखत – शब्दांकन शोभा लोकूर २३

९. काकडेकाका – एक नाट्यप्रवास – डॉ. प्रभुणे २७

१०. बेळगावातील मराठी साहित्यिक परंपरा – प्रा. डॉ. शोभा नाईक ४७

११. डॉ. अशोक साठे यांच्याशी संवाद – मेधा मराठे ५१

१२. बॉडवे म्युझिकल्स : अमेरिकन संगीत नाटके! – डॉ. प्रियदर्शन मनोहर ५५

१३. हौशी रंगभूमी ते व्यावसायिक रंगभूमी – डॉ. अनिल बांदिवडेकर ५८

१४. धारवाडच्या मराठी नाटकांचा इतिहास – डॉ. अमृत यार्दी ६०

१५. १९५६ च्या नाट्यसंमेलनाची पत्रिका ६३

१६. प्रा. अनंत मनोहर – मुलखत – सुनीता पाटणकर ७७

१७. कविता : बेळगावची मराठी माती – सुनील आपटे ७८

१८. नाट्यस्मृती – डॉ. इंदिराबाई जोशी ७९

१९. मैत्र जीवाचे – सौ. मृदुला दामले ८०

२०. इतिहासाच्या सुवर्णपानातील बेळगाव – डॉ. संध्या देशपांडे, डॉ. स्मिता सुरेबानकर ८२

२१. ग्रिप्स – बालरंगभूमी – शुभांगी दामले ८६

२२. अभिजात संगीत नाटकाची दक्षिणकाशी – बेळगाव – आसावरी भोकरे ८९

२३. बेळगावातील नाट्यरसिक व ठेकेदार – अनंत जांगळे ९२

२४. फुलोरा व अखिल भारतीय नाट्य परिषद बेळगाव शाखा ९३

२५. वरेरकर नाट्यसंघ – अजित इंगळे ९४

२६. बेळगावची नाट्यसंपदा – नीता कुलकर्णी ९६

२७. वाङ्मय चर्चा मंडळ – प्रा. इनास फर्नांडिस ९९

२८. बेळगावचे नाट्यलेखक आणि नाटके १००

२९. संमेलनातील सत्कारमूर्ती १०१

३०. बेळगावातील साहित्यिक १०३

३१. बेळगावचा शैक्षणिक प्रवास १०८

३२. स्वातंत्र्योत्तर काळातील बेळगावातील हौशी नाटक मंडळी – अर्जुनराव गौंडाडकर १०९

३३. माझे ऐश्वर्य – मंदाकिनी दप्तरदार १०९

३४. बेळगावच्या कार्यरत नाट्यसंस्था ११०

३५. ९५वा अ.भा.म. नाट्य संमेलनाचे पदाधिकारी व कार्यकारिणी मंडळ ११५

३६. हिंदवाडी महिला मंडळ ११७

३७. संमलनाची कार्यक्रम पत्रिका ११८

३८. १९०५-२०१५ संमेलन पूर्वाध्यक्षांची यादी १२६

९५ वे अ.भा.नाट्य संमेलन
स्वागताध्यक्ष डॉ. अशोक साठे यांचे मनोगत

९५ व्या अखिल भारतीय नाट्य संमेलनाच्या निमित्ताने बाहेर गावाहून आलेल्या सर्व नाट्य महर्षींचे व नाट्यरसिक प्रतिनिधींचे बेळगावच्या नाट्यवेड्या जनतेतर्फे त्यांचाच प्रतिनिधी या संमेलनाचा स्वागताध्यक्ष, या नात्याने मी मनापासून व आदरपूर्वक स्वागत करतो. बेळगावच्या सांस्कृतिक जनतेने मी त्यांच्या व्यथा, माझ्या गेल्या पन्नास वर्षाचा रंगभूमीवरील डोळस वावरामुळे मी योग्य रीतीनें मांडेन या विश्वासामुळं मला ही जबाबदारी सोपविली आहे हे मी जाणतो.

खरं म्हणजे ज्या संगीत रंगभूमीनं मराठी नाटक भारतभर नेलं आणि गाजवलं त्याची सुरुवात बेळगावात झाली. संगीत नाटकाची मुहूर्तमेढ उभी करणारे श्री. अण्णासाहेब किर्लोस्कर इथलेच. बेळगाव सरदार्स हायस्कूलमध्ये ते शिक्षक होते व त्याच वेळी दुसरे मोठे नाटककार श्री गोविंद बल्लाळ देवल हे त्याच शाळेत त्यांचे शिष्य व पुढे नाट्य शास्त्रातलेही शिष्य होते. या उभयतांच्या विचारातून अनेक नाट्यकल्पना त्यांच्या मनात आल्या. त्यातील संगीत शाकुंतल की ज्याचे प्रायोगिक व रंगीत तालमीचे प्रयोग बेळगावात झाल्याच्या नोंदी आहेत. 'ललितकलादर्श' नाटक कंपनीच्या अनेक नाट्यपदांच्या योग्य चाली देणारे व संगीत शिक्षक श्री रामकृष्णबुवा हे इथलेच व आमचेच. या संगीत रंगभूमीनं सुवर्णयुग पाहिलं. पण तिच्या पडत्या काळात तिला जिवंत ठेवणारे श्री जयराम शिलेदार व त्यांच्या पत्नी जयमाला हे दोघेही इथलेच व आमचेच. पुढे गीत नाटकांना अनेक सुंदर चाली देऊन गाजवणारे जितेंद्र अभिषेकी, कॉलेज शिक्षणावेळी काही काळ बेळगावातच होते. अनेक कंपन्या २/२ महिने बेळगावात वास्तव्य करत व त्यावेळी नाटकासाठी अत्यंत सुयोग्य असलेल्या येथील शिवानंद थिएटरमध्ये प्रयोग होत. बालगंधर्वांची नाटकं मी लहानपणापासून या थिएटरात पाहिली आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात स्कूल ऑफ कल्चरच्या खुल्या रंगमंचावर आठवड्यातून ३/३ वेळा थंडीत मुंबई पुण्याच्या व्यवसायिक रंगभूमीवरील गाजलेली नाटकं अंगावर गरम कपडे पांघरून हौसेनं हाऊसफुल्ल पाहिली आहेत. विच्छा माझी, तो मी नव्हेच इत्यादि नाटकांचे २५ वर प्रयोग इथं हाऊसफुल्ल झाले आहेत. बेळगावातील कन्नड भाषिक ही मराठी नाटकांना गर्दी करत व आनंद घेत. धारवाड हुबळीहून बरीच मंडळी बेळगावला येत.

पण काय व का झालं कोण जाणे. गेल्या २० वर्षात महाराष्ट्रातून येणारी नाटकं बंद झाली. येथील मराठी भाषा व संस्कृतीविरुद्ध वादळ व पूर आले व दमून नाहीसे झाले. लव्हाळ्यासारखी मराठी माणसं पुन्हा ताठ उभी राहू लागली. मराठी लोकांची नाटकाची भूक भागवण्याचे प्रयत्न हौशी मराठी संस्थांनी केले. वाङ्मय चर्चा मंडळ, वरेरकर नाट्य संघ, कलाकार संघ, शारदोत्सव महिला मंडळ, नाट्यांकुर, आर्ट्स् सर्कल, लोकमान्य इत्यादी संस्थांनी अनेक गद्य व संगीत नाटके स्वतःच्या जिद्दीवर उभी केली. व अनेक स्पर्धांतून बक्षिसं मिळविली. पण हौशी संस्थांना स्वतःच्या मर्यादा आहेत. अनेक अडचणी आहेत. या संमेलनामुळे बेळगावच्या नाट्यप्रेमींची भूक बऱ्याच अंशी भागली आहे व आपल्या अडचणी दिग्गजांच्या समोर मांडण्याची संधी मिळाली आहे. त्यातील काही अडचणी-

१) तालमीला योग्य जागा मिळत नाहीत.
२) तालमीचा, नेपथ्य, रंगभूषा, लाईट इफेक्ट्स इत्यादि सर्व खर्च स्वतःच्या खिशातूनच करावा लागतो. मराठी कार्यक्रमाला बँकांची, को-ऑप. सोसायट्यांची, सरकारची मदत मिळत नाही.
३) पैशाअभावी स्पर्धेसाठी बाहेर गावचे दौरे अशक्य होतात.
४) तरुण मंडळींना नाट्य कलेचे आकर्षण वाटण्यासाठी नवीन तंत्र, सुधारणा, नवीन विषय इत्यादींसाठी नाट्यशिबिरे भरवावी लागणार आहेत. त्यासाठी नाट्य परिषदेकडून मदत हवी.
५) २/३ प्रयोगांपलीकडे प्रयोग होत नाहीत. त्यासाठी आमची नाटकं बाहेरगावी व तेथील नाटकं बेळगावात दाखवण्याची सोय व्हायला हवी.
६) नाटकांची नवीन पुस्तकं व एकांकिकांची पुस्तकं बेळगावातील लायब्ररीतून व दुकानातून मिळत नाहीत. ती पुरवावी.

वरील विषयावर महाराष्ट्रातील दिग्गज कलाकारांबरोबर संवाद या संमेलनाच्या निमित्ताने व्हावा व अडचणी दूर करण्याची व पुन्हा नाटकांचा ओघ बेळगावला सुरू होईल असे प्रयत्न होतील अशी दोन्ही प्रांतांच्या राज्यकर्त्यांना सुबुद्धी निर्माण होवो ही नटराजाच्या चरणी प्रार्थना. सर्व भाषा आपल्या परीने समृद्ध असतातच. त्या एकाने दुसऱ्यास दाबण्याऐवजी त्या जास्त सुसंस्कृत व्हाव्यात याकडे यापुढे लक्ष दिले जावे अशी अपेक्षा.

नाट्य संमेलनामागची माझी भूमिका

नटराजाच्या कृपेने एकेकाळी आमच्या बेळगावमध्ये अनेक नाटकांची निर्मिती होत होती. कालांतराने कलावंत आणि प्रेक्षक काही कारणास्तव नाट्य क्षेत्रापासून दूर जाऊ लागले. पण कलेचे माहेरघर असणाऱ्या बेळगावमध्ये इतर सांस्कृतिक कार्यक्रम, अनेक संस्था सातत्याने करतच आहेत. तरीही नाटकाची प्रत्यक्ष अनुभूती घेणे ही एक सहज सुंदर घटना आहे. रंगमंचीय अविष्कार हा तर जीवनातील एक अनमोल अनुभव आहे. असा अनुभव, अशी अनुभूती परत परत आणि परत बेळगावच्या नागरीकांना घेता यावी. ह्याचसाठी ह्या ९५व्या नाट्य संमेलनाचा अट्टाहास होता.

आज आमच्या आमंत्रणाला मान देऊन संमेलन बेळगाव येथे संपन्न होत आहे, ह्याचा आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. सर्वांचे सहकार्य आणि शुभेच्छा पाठीशी घेऊन बेळगाव नगरी संमेलनासाठी सज्ज झाली आहे. डॉ. अशोक काका साठेंसारखे अष्टपैलू व्यक्तीमत्व आपल्याला स्वागताध्यक्ष म्हणून लाभणे हा एक दुग्धशर्करा योग आहे. बेळगावचे नाट्य संमेलन डोळे भरून पहावे अशी आस मनी बाळगून इथे जमलेल्या सर्व नाट्यप्रेमी रसिकांचे मी बेळगावकरांच्या वतीने सन्मानपूर्वक स्वागत करते. तीन दिवस चालणाऱ्या या अनुपम, नियोजनबद्ध दिमाखदार आणि ऐतिहासीक सोहळ्याचे आपण सारे साक्षीदार होऊया. सर्वांच्या अनमोल सहकार्याबद्दल धन्यवाद.

वीणा लोकूर
अध्यक्षा
अखिल भारतीय मराठी नाट्य
परिषद, बेळगाव शाखा.

संपादकीय

'वंशकुसुम' हा भावशब्द वेणुग्रामातील ज्येष्ठ कवयित्री कै. इंदिरा संत यांनी मायमराठीला चढविलेला सुंदर अलंकार आहे. एके काळी वेणुग्रामात-बेळगावात वंश-वेळू उदंड होता. वेळूचं बन आल्हाद देणारं, गरीब-श्रीमंताना, पाखरांना आनंद देणारं.. सुंदर हेतूंच... खोड तर मानवी जातीचा आसरा.. वाऱ्यातून शीळ काढणारी त्याची बासरी मंजुळ स्वराची. वेळूची मंजिरीसारखी फुलं... बी फुलांची लवलवती फूलछडीच. ''धुंद वेळूवर झुलणारा फुलोरा वंशकुसुमांच्या लवलवत्या मंजिरा.''

१९५६ साली बेळगावला पहिलं नाट्य संमेलन भरलं होतं. आचार्य अत्रे त्याचे अध्यक्ष होते. आता २०१५ला होणाऱ्या ९५व्या अखिल भारतीय नाट्य संमेलनाच्या निमित्ताने प्रकाशित होत असलेली ही स्मरणिका 'वंशकुसुम' म्हणजे क्वचितच फुलणारं वेळूचं - बासाचं फूलच म्हणता येईल. १९५६ पासून मराठी भाषेची-मनाची गळचेपी होत असताना चिवट पणे जगून फुलणारं हे अपूर्वाईचं फूल.

अण्णासाहेब किर्लोस्करांनी संगीत शाकुंतलाच्या रूपाने मराठी नाटकाची मुहूर्तमेढ या वेणुग्रामात रोवली. त्या नाट्याच्या वृक्ष महाराष्ट्रात वाढला, जोपासला तरी मूळ जन्मस्थानी त्याला खतपाणी मिळतंच राहिलं. महाराष्ट्रातून येणाऱ्या मराठी नाटक कंपन्या हुबळी-गदग पर्यंत जाऊन मराठी नाटकांचे उदंड प्रतिसादात प्रयोग करत होत्या... भाषेचा अडसर न येता. डॉ. अमृत यादींचा या संबंधीचा लेख याची साक्ष आहे. कलोपासना, वाङ्मय चर्चा मंडळ, वरेरकर नाट्य संघ सारख्या अनेक संस्था तेव्हापासून उत्कृष्ट नाटकं करत होत्या आणि आहेत.

या 'वंशकुसुमा'च्या माध्यमातून आम्ही मराठी बेळगावकर अन्य मराठी मनांशी संवाद साधतो आहोत. काहीशा अलग पडलेल्या आम्हाला बेळगावच्या अण्णासाहेब किर्लोस्करांपासून सुरू झालेला नाट्य इतिहास सांगताना अभिमान वाटतो. तसेच प्रत्येक प्रतिकूल परिस्थितीत नाट्याची चळवळ सुरू ठेवणाऱ्या इथल्या संस्थांच्या कार्याचा आढावा घेताना महाराष्ट्राच्या सहकार्याची अपेक्षा करतो. बेळगावला नाट्याबरोबरच कथा, कादंबऱ्या, काव्य, ललित, इतर गद्य ही फुलत गेलं. बाबा पद्मनजींपासून सुरू होणारी लेखक, कवींची परंपरा सांगणारा शोभा नाईक यांचा विशेष लेख या स्मरणिकेत आहे. नाट्यातील नवीन प्रवाहांविषयी आत्मीयतेने विचार करताना नाट्य प्रकाशयोजने विषयी प्रदीप वैद्य, थ्रिल्स चळवळी विषयी शुभांगी दामले, व्यावसायिक नाटकांविषयी डॉ. अनिल बांदिवडेकर, अनंत जांगळे यांचे विशेष लेख आहेत. बेळगावातील ऐतिहासिक घटनास्थळे तसेच अद्वितीय सृष्टिवैभव दाखविणारे प्रा. संध्या देशपांडे व प्रा. स्मिता सुरेबानकर यांचा सुंदर लेख व छायाचित्रांवरून बेळगावचा इतिहास डोळ्यांसमोर उभा राहतो. छबिलदास चळवळी विषयी श्री अरुण काकडे, स्वागताध्यक्ष डॉ. अशोक साठे, सुप्रसिद्ध लेखक प्रा. अनंत मनोहर यांच्याशी डॉ. अरुण प्रभुणे, मेधा मराठे, सुनीता पाटणकर यांनी केलेले संवाद तसेच बालगंधर्व आणि संमेलनाध्यक्षा फैय्याज यांचे शोभा लोकूर यांनी लेख स्वरूपात केलेले संवाद यात आहेत. डॉ. प्रियदर्शन मनोहर, यु.एस.ए, यांचा ब्रॉडवेवरील नाट्यसंगीतावरील लेख अप्रतिम आहे. डॉ. विष्णु सूर्या वाघ यांनी लिहिलेला 'संगीत रंगभूमीचे नवीन पिढीसमोर आव्हान' हा अभ्यासपूर्ण लेख विचार करायला लावतो. रंगभूमीशी संलग्न घटकांचा या स्मरणिकेत जास्तीत जास्त विचार करण्याचा प्रयत्न केला आहे.

५ ते ८ जानेवारी १९५६ ला ३८ वे महाराष्ट्र नाट्य संमेलन बेळगाव येथे संपन्न झाले होते. त्या वेळी कलोपासना मंडळ, बेळगावच्या विद्यमाने एक पत्रिका छापण्यात आली होती. तिची दुर्मिळ प्रत डॉ. अशोक साठे यांनी जपून ठेवली होती. ती या स्मरणिकेत समाविष्ट केली आहे. महाराष्ट्रातील सर्व नाट्य संस्था एका ध्वजाखाली आल्या तर संमेलन संस्था बलशाली होईल, नाट्य कले संबंधी केवढे तरी कार्य तिला करता येईल असा आशावाद त्यात व्यक्त केला आहे. १९०५ पासून २०१५ पर्यंत झालेल्या नाट्य संमेलना विषयीची सर्व माहिती या स्मरणिकेत प्रथमच प्रकाशित होत आहे.

बेळगावात अनेक नाट्य संस्था कार्यरत आहेत. या संस्था येथील सांस्कृतिक जीवनात महत्वाचं कार्य करतात. या संस्थांमधून बाहेर पडलेले अनेक कलावंत मराठी, हिंदी, कन्नड नाट्य व चित्रपटात आपल्या गुणांच्या जोरावर यशस्वी होत आहेत.

या स्मरणिकेच्या निर्मितीत महत्वाचे योगदान ठरलेले लेखक, वाचक, रसिक, रंगकर्मी आणि जाहिरातदार या सर्वांचे मनःपूर्वक आभार. हे संमेलन आणि स्मरणिका पूर्णत्वाला नेण्यासाठी अनेकांचे हातभार लागलेले आहेत. अनवधानाने कोणाचाही उल्लेख राहिल्यास क्षमस्व. इंप्रेशन्स बेळगावने सुंदर, नीटनेटकी छपाई वेळेच्या मर्यादित करून दिल्या बद्दल त्यांचे आभार.

-संपादक

सूज्ञांस अधिक सांगणे न लगे !

९५ वे अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन, बेळगाव २०१५

Yarbal®

National Awards Winner &
"Mudranshree" Award of M. M. P.
For Excellence in Printing

With Best Compliments from :

Yarbal Print-Pack
PRIVATE LIMITED

Printing & Packaging

Regd. Office & Works :
UNIT-I C-88, UNIT-II D-79, KSSIDC Industrial Estate, Near Channamma Nagar, BELGAUM - 590 008.
Phone : 0831-2440952, 2441950, **E-mail :** yarbal@gmail.com
Follow Us @ www.yarbal.com

संगीत रंगभूमीचे नवीन पिढीसमोर आव्हान

विष्णू सुर्या वाघ हे मराठीच नव्हे, तर एकूणच भारतीय रंगमंचावरील एक महत्वाचं नाव. तीसहून अधिक मराठी नाटके, वीसपेक्षा जास्त कोकणी नाटके व पंचवीसेक एकांकिका असं मौलिक योगदान श्री वाघ यानी रंगभूमीसाठी केलय. तुका अभंग, अभंग, आदित्यचक्षु, कृष्णद्वैपायन, शिवगोमंतक, धर्मश्री, समुद्रपक्षी, भगव्या मातीचा माणूस, वैराग्यमठ, घर थकलेले एकाकी अशी विविधरंगी नाटके वाघ यांच्या नावावर आहेत. अभिजात नाट्य परंपरेपासून प्रायोगिक नाटकापर्यंत रंगभूमीचा सर्वांगीण अभ्यास त्यांनी केलेला आहे. गेल्या वर्षी त्यांनी लिहिलेल्या 'बाई मी दगूड फोडते' या नाटकाला पंढरपूरच्या महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत पहिला क्रमांक मिळाला होता. संगीत रंगभूमीचं पुनरुज्जीवन करण्याच्या उद्देशानं श्री वाघ यानी नाट्याचार्य खाडिलकरांच्या 'सं. स्वयंवर'च पुनर्लेखन करून ते रंगभूमीवर आणलं. त्यानंतर गेल्याच वर्षी 'सं. अलख निरंजन' आणि 'सं. बुद्ध नको, मज बुद्ध हवा' आणि 'सं. वसंतसेना' या तीन नव्या संगीत नाटकांची निर्मिती केली. 'एंटरटेनमेंट एक्स्प्लोजन'च्या आजच्या झंझावातात संगीत रंगभूमी टिकेल काय? मुळात ही रंगभूमी कशी आकाराला आली? कालपरत्वे तिच्यावर कोणकोणती संकटे ओढवली? नव्या जमान्यात संगीत नाटक कसं टिकेल? आदी प्रश्नांची सांगोपांग चर्चा करणारा हा खास लेख.

विष्णू सुर्या वाघ

- आधुनिक मराठी रंगभूमीची उभारणी पाश्चात्य नाट्यसृष्टीकडून घेतलेल्या प्रेरणांच्या आधारानं झाली आहे, हे आता सर्व मान्य झालंय. रंगभूमीवर आज जी विविध प्रकारची नाटक पाहतो त्यांच्या आकृतीबंधाचा मूलस्त्रोत हा पश्चिमेकडूनच आला आहे. अपवाद केवळ मराठी संगीत रंगभूमीचा.
- संगीत नाटक हे खऱ्या अर्थानं 'आपलं' म्हणता येईल असं नाटक! जागतिक रंगभूमीला मराठीनं दिलेली अपूर्व अशी देणगी! शंभर टक्के देशी म्हणता येईल असा अभिजात आविष्कार! दुर्दैवानं या नाट्यकला प्रकाराच्या जतनासाठी जेवढं लक्ष आपण द्यायला हवं होतं तेवढं देण्यात आलं नाही. आपल्या या औदासिन्यामुळेच संगीत रंगभूमी मरणशय्येवर पडून शेवटचे आचके देताना दिसत आहे.
- जगातील प्रत्येक मानवसमूहाला आपल्या मातीचा गंध घेऊन येणाऱ्या कलेबद्दल एकप्रकारचा अतूट जिव्हाळा व आत्मीयता वाटत असते. अशा कला त्याला आपल्या सांस्कृतिक संचिताचा भाग वाटतात. त्याचं जतन हा त्याला आपल्या कर्तव्याचा भाग वाटतो. त्यासाठी प्रसंगी संघर्ष करण्यासाठी हौतात्म्य पत्करण्यासाठीही या समाजातले लोक तयार असतात.

मराठी माणूस कर्तव्यपराङ्मुख झाला !

- मराठी संगीत नाटकाबद्दल बोलायचं झालं तर आपला समाज या कर्तव्यापासून पराङ्मुख झालाय असं दुर्दैवानं म्हणाव लागेल. मराठी माणसालाच आज संगीत नाटकाबद्दल आस्था राहिलेली नाही. यात केवळ प्रेक्षकच आहेत असं नव्हे तर लेखक, दिग्दर्शक, कलावंत व निर्मातेही संगीत रंगभूमीच्या आजच्या अधोगतीला कारणीभूत आहेत. नाटककाराच्या कल्पनेतून, कलावंतांच्या प्रयोगशीलतेतून आणि संगीत दिग्दर्शकांच्या योजनेतून जे मराठी नाटक पुनः पुनः नवनव्या स्वरूपात प्रवाहित होत राहिलं, ते मराठी संगीत नाटक आज कुठं आहे असा प्रश्न विचारायची वेळ आली आहे. आपल्या रसिकतेचा टेंभा जागोगागी मिरवणाऱ्या मराठी माणसासाठी ही गोष्ट नक्कीच भूषणावह नाही.

नाट्य संगीत म्हणजे काय ?

- नाट्य संगीत म्हणजे रंगभूमीवरील नाट्याच्या अनुषंगाने वापरले गेलेले संगीत. या संगीताचं आपलं स्वतंत्र रूप आहे. सर्व साधारणपणे आपण ज्याला शास्त्रीय संगीत म्हणतो त्याहून मराठी नाटकातलं संगीत वेगळं आहे. तसंच ज्याला आपण काव्यपठण (Recitation) म्हणतो त्याहूनही ते भिन्न आहे. ज्याला 'ललित संगीत' म्हणता येईल आणि सांगीतिकदृष्ट्या जे शास्त्रीय संगीत व काव्यपठण यांच्या मध्ये बसेल आणि नाट्याच्या दृष्टीनं भावपोषक व रंगमंचावरील घटनांना उपयुक्त ठरेल, अशा प्रकारचं आपलं नाट्यसंगीत आहे. 'नाट्यसंगीत म्हणजे रंगभूमीला उपयुक्त ललित संगीत' एवढी व्याख्या ढोबळ मनाने या संगीताचा गुणविशेष स्पष्ट करायला पुरेशी आहे.
- मराठी संगीत रंगभूमीला आपण 'देशी' म्हणतो तेव्हा आपलं संगीत नाटक हे संस्कृत नाटकांचं अनुकरण करून सिद्ध झालेलं नाही, हे लक्षात ठेवलं पाहिजे. ती एक सर्वथा वेगळी नवनिर्मिती होती. उर्दू व पारशी रंगभूमीवरील नाटक पाहून आपल्या पूर्वसुरींनी संगीत नाटकाची निर्मिती केली असं म्हटलं जातं. पण त्यातही पूर्ण तथ्य नाही. उर्दू/पारशी थिएट्रिकल कंपनीच्या नाटकातून आपल्या आद्य संगीत नाटककारांनी काही घेतलंच असेल तर फक्त 'फॉर्म'ची प्रेरणा. त्यांच्या नाटकातील धंदेवाईक अतिरंजन आपल्या संगीत रंगभूमीनं संपूर्णतया त्याज्य ठरवलं. या रंगभूमीनं दीर्घकाळ आपला स्वतंत्र प्रवाह विकसित केला व गद्य रंगभूमीपेक्षा आपला वेगळा चेहरा प्रेक्षकांसमोर ठेवला. या

नाट्यसंगीताचीही खासियत अशी की या गायन प्रकाराला खानदानी संगीताचा स्वरसाज चढवण्यासाठी शास्त्रीय संगीताच्या विविध घराण्यातून अनेक दिग्गज पुढे आले व त्यांचा रंगमंचीय आविष्कार घडवण्यासाठी तितक्याच तोलामोलाचे गायकनट त्यांना लाभले. त्यामुळे या नाट्यसंगीतानं प्रदीर्घ काळ मराठी मनाला वेड लावलं.

हरीदासी कीर्तनपरंपरेचा प्रभाव

- गोमंतकातील संतकवी कृष्णभट्ट बांदकर यांच्या 'सं. अहिल्योद्धार', 'सं.शुकरंभा संवाद' आदी नाटकांपासून प्रेरणा घेऊन अण्णासाहेब किर्लोस्करांनी 'सं.शाकुंतल', या पहिल्या आधुनिक मराठी संगीत नाटकाची निर्मिती केली. ही गोष्ट १८८० सालची. त्यापूर्वी कर्नाटकी शैलीच्या यक्षगानापासून प्रेरणा घेऊन विष्णुदास भावे यानी १८४३ साली 'सीतास्वयंवर' या नाटकाद्वारे मराठी रंगभूमीची मुहूर्तमेढ रोवली होती. भाव्यांची नाटके ही आख्यानवजा स्वरूपाची होती व त्यातही संगीताचा वापर होता. मात्र या नाटकातला सूत्रधार तेवढा गात असे. विष्णुदासी नाटकांच्या या काळात महाराष्ट्रात अभिजात ध्रुपद गायकी अस्तित्वात होती तसेच सर्वसाधारण संगीतप्रेमी लोकांचं मनोरंजन करण्यासाठी कीर्तनकारांचा फार मोठा वर्ग उपलब्ध होता. लावणीसारखे संगीत प्रकार त्याकाळी रूढ होतेच, पण राजरोसपणे लावण्या ऐकू जाण्याइतकी लोकमान्यता या कलाप्रकाराला नव्हती. ध्रुपद गायकीचा रसिक अभिजन वर्गापुरताच मर्यादित असल्यामुळे नि लावणी तमाशाला लपत छपत जाण्याची पाळी येत असल्यामुळे सर्वसाधारण जनतेचं सांगीतिक मनोरंजन करण्याची जबाबदारी मुख्यत्वे कीर्तनकारांवरच होती. यातही दोन प्रकार होते. वारकरी संप्रदायाचे कीर्तनकार व हरिदासी परंपरेचे कीर्तनकार. वारकरी संप्रदायात संतांच्या अभंगरचना प्रामुख्याने म्हटल्या जात असल्या तरी संगीतात विविधता नव्हती. या उलट हरिदासी परंपरेतील कीर्तनाला वैविध्यपूर्ण संगीताचा बाज होता. या परंपरेतला कीर्तनकार त्यावेळी एकपात्री संगीत नाटकाचा प्रयोगच करतोय की काय असे ऐकणाऱ्यांना वाटावे असा त्या कीर्तनाचा थाट होता.
- विष्णुदास भावे यांनी आपल्या नाटकात आणलेला गाणारा सूत्रधार ही हरिदासी कीर्तनकाराचीच सुधारीत आवृत्ती होती असं मानायला जागा आहे. प्रत्यक्षात या नाटकांत सूत्रधाराची भूमिका करणारे बहुतेक कलावंत हे हरिदासी कीर्तनकारच होते असं दिसून येतं. ध्रुपद गायकीपासून लोकसंगीतापर्यंत कुठलाही प्रकार गाण्यात हे कीर्तनकार वाकबगार असत. मात्र या गायन प्रकारांना थोडं ललित स्वरूप देण्याकडेही त्यांचं लक्ष असायचं. उदा. ध्रुपद अंगानं पद म्हणायचं झाल तर त्यातला शास्त्रीय काटेकोरपणा काढून टाकून त्याला थोडासा श्रवणीय साज हे कीर्तनकार चढवीत. तसचं ओवी, कामदा-दिंडी, साकी वगैरे जातिवृत्तं म्हणताना त्यातील काव्यपठनाचं रूप काढून त्याला किंचितसा रागदारी संगीताचा साज चढवीत. संगीताचा प्रकार कुठलाही असो, एका विशिष्ट ललित ढंगात तो पेश करायचा आणि श्रोत्याला अभिजात गायकीहून श्रवणीय नि लोकसंगीताहून समृद्ध असं वेगळ्याच प्रकारचं संगीत ऐकल्याचा आनंद द्यायचा ही त्यांची दृष्टी होती. लावण्या किंवा ठुमरी यांचाही चपखल सांगीतिक वापर ते करायचे. त्याचबरोबर टप्प्याची चपळ व ढंगदार गायकीही पेश करायचे. या कीर्तनकारांपैकी तेव्हाच्या काळी नारायण बुवा गोगटे (फलटणकर बुवा) हे टप्पा गायकीत प्रवीण होते अशी माहिती उपलब्ध आहे. ही टप्पा गायकी ते आपले वडील देवजीबुवा गोगटे यांच्याकडून शिकले. या टप्पा गायकीनं सर्वच तात्कालिक कीर्तनकारांना मोहिनी घातली होती. मुरकीच्या, भिंगरीच्या व टप्प्याच्या ताना हे खास लावणीचं वैशिष्ट्य आहे अस आज आपण म्हणतो ते तितकंसं खर नाही. कीर्तनकारांनी टप्पा गायकीद्वारे हे प्रकार आधीच सामान्य रसिकांपर्यंत पोचवले होते. थोडक्यात, कीर्तनकारांच्या गायकीचं स्वरूप ललित प्रकारचं होतं व त्यात ध्रुपद गायकी, ठुमरी गायकी, लावणी गायकी, भजने, स्त्री गीते, जातीवृत्ते वगैरे सर्व प्रकारच्या संगीताला स्थान होते.

कृष्णभट्टांचा मूळ आकृतीबंध

- विष्णुदास भावे यांच्या नाटकातला सूत्रधार याच हरिदासी छापाच्या संगीताचा मसाला वापरत असावा. स्वतः अण्णासाहेब किर्लोस्कर यानी 'सं. शाकुंतल' लिहिण्याआधी बरीचशी पौराणिक पद्यमय आख्याने नाटक मंडळींसाठी लिहिल्याचा उल्लेख सापडतो. त्यांनी दोन गद्य नाटकेही लिहिली होती म्हणतात, पण या नाटकांमुळे सर्वसामान्य रसिकांचं मनोरंजन होत नाही हे पाहिल्यावर त्यांनी सर्वस्वी स्वतंत्र असा संगीत नाट्यप्रकार लिहिण्याचा निश्चय केला. याच काळात कृष्णभट्ट बांदकर यांनी लिहिलेली व सादर केलेली नाटके योगायोगाने त्यांच्या पाहण्यात आली व संगीत नाटकाचा आकृतीबंध कसा असावा यांचे स्पष्ट चित्र किर्लोस्करांच्या डोळ्यापुढं उभं राहिलं.

किर्लोस्करांचं 'शाकुंतल' १९८० साली रंगभूमीवर आलं. या नाटकात एकंदर २०० पदं होती! यातली जवळजवळ ९० पदं साकी, दिंडी, अंजनीगीत इत्यादी प्रचलीत वृत्तांच्या चालीवर होती. बाकीच्या पदांपैकी बरीचशी त्याकाळी परिचित असलेल्या भक्तिसंगीतावर आधारित होती. 'शाकुंतल' मधील पंचवीसेक पदे वगळता इतर सर्व

पदे सूत्रधारी संगीताच्याच परंपरेतली होती असे म्हणावे लागेल. नाटक बघायला (खरं तर ऐकायला) येणाऱ्या प्रेक्षकांना या दोनशेमधली किमान दहा-बारा गाणी ओळखीची व आपली वाटावीत अशी किर्लोस्करांची योजना होती. काही विशिष्ट पदांसाठी त्यांनी ललित, मालकंस, सोहनी, जोगी, आसावरी, कानडा असे लोकप्रिय रागही वापरले होते.

- 'शाकुंतल'ने मराठी रंगभूमीवर व संगीताच्या प्रांतातही एकप्रकारची क्रांती घडवून आणली. यात अण्णासाहेबांच्या कल्पकतेबरोबरच त्यांना लाभलेल्या गायक नटांचाही फार मोठा वाटा होता. बाळकोबा नाटेकर, मोरोबा वाघोलीकर व त्यानंतर भाऊराव कोल्हटकर यांच्यासारखे गायक नट त्यांना मिळाले. बाळकोबा हे विशेष गाणारे पात्र होते. मोरोबा हे गाण्याच्या दृष्टीने कमी प्रभावी; पण त्यांचा आवाज खणखणीत होता. मोरोबांची गायकी ही शब्दनिष्ठ होती. याउलट बाळकोबा मुळातच गायक असल्यामुळे ते स्वरनिष्ठ ढंगाने गात असत. 'शाकुंतल' नंतर किर्लोस्करांना भाऊराव कोल्हटकर सापडले. असामान्य आवाजाची देणगी व विलक्षण बुद्धिमत्ता लाभलेल्या भाऊरावांना बडोद्यातील काही प्रख्यात गायकांचाही सहवास लाभला होता. 'शाकुंतल' नंतर किर्लोस्करांनी 'सौभद्र' रंगभूमीवर आणले आणि एका नव्याच सुवर्णयुगाला प्रारंभ झाला.
- 'सौभद्र' नाटकाला प्रचंड लोकप्रियता लाभली पण संगीत चालींच्या दृष्टीनेही 'सौभद्र'चे वेगळेपण टिकून राहिले. रागदारीतील पदे, हरिदासी संगीत, ठुमरी गायकी, टप्प्याचे अंग, लावणीचे अंग, कर्नाटकी चाली, गुजराती गाण्यांच्या चाली वगैरे सर्व प्रकारच्या समृद्ध अशा किर्लोस्करी संगीताचे स्वरूप 'सौभद्र' मध्ये दिसते.
- किर्लोस्करांनंतर गोविंद बल्लाळ देवल, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर असे आणखी काही नाटककार उदयाला आले व त्यांनी आपापल्या परीने संगीतात विविधता आणण्याचा प्रयत्न केला. देवलांच्या 'मृच्छकटिक', 'विक्रमोवर्शीय', 'शाप्रसंभ्रम' इत्यादी नाटकांतून संगीताची योजना 'शाकुंतल'च्याच धर्तीवर करण्यांत आली होती. 'मृच्छकटिका'त रागदारीची काही पदे होती पण ती रचनेच्या दृष्टीनं सुलभ व रागांच्या दृष्टीने परिचित अशीच होती.

रागदारी संगीताची भर

- या काळात म्हणजे १९०५ पर्यंत सांगीतिकदृष्ट्या आणखीही काही भर पडत गेली. बाळकृष्ण बुवा इचलकरंजीकर ग्वाल्हेर गायकी शिकून महाराष्ट्रात आले होते. आग्रेवाले नथ्थनखाँ मुंबईत वास्तव्याला आले होते. १८९५ सालच्या सुमाराला अल्लादियाँ खानसाहेब देखील महाराष्ट्रात आले होते. त्या काळात या दिग्गज गवयांकडे संगीताचे शिक्षण घेऊन अनेक तरूण बाहेर पडले व संगीत रंगभूमीकडे वळले. सुरूवातीच्या हरिदासी परंपरेतील गायक नटांची जागा हे प्रशिक्षित गायक नट घेऊ लागले. याचा प्रभाव नाट्यसंगीतावर पडणं साहजिकंच होतं.
- नाटकांतील प्रमुख भूमिकांसाठी नामांकित गवयांना घेऊन व शास्त्रोक्त रागदारीवर आधारीत पदांचा वापर करून वासुदेवराव डोंगरे यांनी 'वेणी-संहार' व 'इंद्रसभा' सारखी नाटके रंगमंचावर आणली व ती बरीच लोकप्रिय झाली. पण रागदारीचा सर्वांगीण वापर मराठी नाट्यसृष्टीत सर्वप्रथम केला तो पांडुरंग गोपाळ गुरव-यवतेश्वरकर यांनी. 'शाकुंतल' नंतर आठदहा वर्षांनी त्यांचं 'द्यूत विनोद' हे नाटक लोकांसमोर आलं. या नाटकात एकंदर ६५ पद होती. त्यात एकच साकी, एक दोन लावणी थाटाची व अगदीच थोडी 'सौभद्र' 'शाकुंतल' च्या पठडीतील होती. बाकीची पन्नासहून अधिक पदे जयजयवंती, आरवी, सिंधुरा, अडाणा, सुहा, वसंत, परज, बहार, मालकंस, वसंत-बहार, मल्हार, भैरव इत्यादी राग तसेच रागिणींतील ठुमऱ्या, गजल, तराणे, सरगमा यावर आधारीत होती. या नाट्यसंगीताचं वैशिष्ट्य म्हणजे रागदारीचा वापर करूनही गायनाच्या बाबतीत नटांना विलक्षण संयम पाळावा लागत असे. या पदांची शब्दरचनाही सुबोध व नाट्यवस्तूच्या आशयाशी एकरूप होणारी असल्यामुळे केवळ आपल्या गायकीच्या प्रदर्शनानं अर्थाची हानी व रसाची दुर्दशा करण्याचं पाप गायक नटांकडून होत नसे. या काळात 'चंद्रसेना', 'रासोत्सव' ही नाटकंसुद्धा अशाच रागदारी संगीतामुळं लोकप्रिय झाली होती.

'सं.शारदा'ची लोकप्रियता

- त्यानंतर कोल्हटकरांचा उदय झाला व त्यांच्या 'वीरतनय', 'मूकनायक' व 'गुप्तमंजूष' या नाटकांनी नाट्यसंगीताचा वेगळाच बाज निर्माण केला. कोल्हटकरांनी उर्दू रंगभूमीवरील आकर्षक चाली मराठी रंगभूमीवर आणल्या. त्यामुळे त्यांचे 'वीरतनय' अतोनात गाजले. पण या नाटकानंतर तीन चार वर्षांनी गोविंद बल्लाळ देवलांचे 'शारदा' हे स्वतंत्र नाटक अवतीर्ण झाले व त्याने 'वीरतनय'ची लोकप्रियता पुसून टाकली. भाऊराव कोल्हटकरांच्या कोदंडाच्या पदांनी मराठी रंगभूमी दणाणून गेली. 'शारदा' नाटकाच्या संगीतात रचना व सादरीकरणाच्या दृष्टीकोनांतून नाविन्य असे काहीच नव्हते पण त्यांची सुबोधता, सरलता व भावपूर्ण पद्यरचना रसिकांना कमालीची आवडली. याउलट कोल्हटकरांनी उर्दू बाजाच्या

वापरासाठी निर्माण केलेली पदे दुर्बोध व भावनारहित वाटत होती. याचा परिणाम नाट्यसंगीताच्या स्वरूपावर झाला व किर्लोस्करी परंपरेत भावनिष्ठ बनलेली गायकी कोल्हटकरी प्रवाहात स्वरनिष्ठ बनू लागली. क्लिष्टतेकडे झुकू लागली.

'क्लासिकल' गायकीचा अतिरेक

- भाऊराव कोल्हटकर १९०१ साली मृत्यू पावले. त्यापूर्वीच त्यांच्या स्वरनिष्ठ गायकीचा प्रचंड प्रभाव रंगभूमीवर पडला होता. भाऊरावांच्या मृत्यूनंतर तो आणखी ९-१० वर्षे टिकला. गायक, नट स्वरनिष्ठ गायकीलाच प्रमाण मानू लागले. याच्या जोडीला नाटकातील साथीची वाद्ये रंगमंचासमोर आणण्याचा प्रघात पडला. त्यात सारंगी व फिडल या वाद्यांची भर पडली. या गोंगाटात पदांचे शब्द नीटपणे प्रेक्षकांच्या कानावर पडेनासे झाले. श्रोत्यांवर होऊ लागला तो रसपूर्ण गायकीचा प्रचंड भडिमार. शब्द ऐकू येत नाहीत म्हणून प्रेक्षक अक्षरशः हातात नाटकाची संहिता घेऊन बसू लागले. पुस्तकावर डोळे व कान गाण्याकडे असा अजब प्रकार सुरू झाला! नाटकातील गाणे सुबोध, आटोपशीर व रसपूर्ण, त्याचप्रमाणे शब्दनिष्ठ असले पाहिजे हा संकेत जवळजवळ मोडीतच निघाला. यामुळे गायक नट मोकाट सुटले व रंगभूमी या माध्यमाच्या मर्यादा विसरून हवे तसे गाऊ लागले. नवनव्या रागांचा वापर पदांसाठी होऊ लागला. दुर्दैव म्हणजे गायक नटांचे हे चाळे खपवून घेण्यात प्रेक्षकच आघाडीवर होते. भाऊराव कोल्हटकर जसे या प्रवृत्तीला बळी पडले तसेच त्यांच्या गायकीचा पगडा असलेले कृष्णराव गोरे, नानासाहेब जोगळेकर व दत्तोपंत हल्याळकर हे लोकप्रिय नटही त्याच वळणाने जाऊ लागले.

'मानापमान'ची नवक्रांती

- विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकापर्यंत (१९१० पर्यंत) मराठी रंगभूमीवर जवळजवळ हीच परिस्थिती होती. त्यात पहिले स्थित्यंतर घडले ते 'मानापमान' या नाटकामुळे. नाटककार म्हणून कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांचा उदय झाला. गायक नट म्हणून बालगंधर्व व केशवराव भोसले पुढे आले. बालगंधर्वांनी १९०४ सालीच रंगभूमीवर पदार्पण केले होते. केशवरावांनी १९०८ साली आपली कंपनी स्थापन करून स्वतःची गायकी प्रेक्षकांसमोर ठेवली होती. याच सुमारास फैजमहमद खाँ व नथ्थनखाँ यांच्याकडून गायनाचे शिक्षण घेऊन प्रगल्भ झालेले भास्करबुवा बखले पुन्हा रंगभूमीकडे वळले होते. भास्करबुवा सुरुवातीला किर्लोस्कर कंपनीत होते पण शास्त्रीय संगीत शिकता यावे म्हणून त्यांनी कंपनी सोडली. ते पुन्हा आले तेव्हा भाऊरावांनी किर्लोस्कर कंपनीतच संगीताचे तालीम मास्तर म्हणून त्यांची नेमणूक करून घेतली. याच बखलेबुवांकडून बालगंधर्व संगीताची तालीम घेऊ लागले. केशवराव भोसले यांनी अल्लादिया खांसाहेबांची तनायती गायकी अप्रत्यक्षपणे शिकून घेतली होती. शिवाय त्यांनी रामकृष्णबुवा वझे यांचाही गंडा बांधला होता. त्यामुळे त्यांनी स्वतःची एक वेगळीच आक्रमक गायकी विकसित केली होती.
- बखलेंच्या तालमीतले बालगंधर्व रंगभूमीवर आले ते एक वेगळीच सौंदर्यदृष्टी घेऊन. खाडिलकरांनी 'मानापमान' मधील भामिनीसाठी बालगंधर्वांची निवड केली व संगीताची जबाबदारी गोविंदराव टेंबे यांच्यावर सोपवली. टेंबे हे भास्करबुवांच्याच सहवासातले. त्यामुळे बुवांची सौंदर्यदृष्टी त्यांना पूर्णपणे परिचित होती. त्याशिवाय पूरब अंगाची गायकी गाणाऱ्या गोहरजान यांच्या गायकीची मोहिनीही टेंब्यांवर पडली होती. त्यामुळे 'मानापमान'ला संगीत देताना त्यांनी ठुमरी, कजरी, कव्वाली थाटांचा पुरेपूर उपयोग केला. बालगंधर्वांनी पूरबचा खास रंग आत्मसात करण्याऐवजी आपला स्वतःचाच रंग त्या चालींना दिला व एक वेगळीच मोहक, श्रवणीय परंतु रसपूर्ण गायकी रंगमंचावर आविष्कृत झाली. अशाप्रकारे मराठी नाट्यसंगीताला मध्यलयीच्या ख्याल गायकीचे किंवा बंदिशीच्या ठुमरी गायकीचे वळण लाभले.
- किर्लोस्करांच्या 'शाकुंतल' नंतर साधारण २० वर्षांनी रंगभूमीवर आलेल्या 'मानापमान' या खाडिलकरांच्या नाटकाने अशा प्रकारे ख्यालप्रधान संगीताची प्रथा रूढ केली. पण दुर्दैवाने शब्दनिष्ठा व स्वरनिष्ठा यांचा मेळ साधणाऱ्या, ललित स्वरूपाच्या या मध्यलयीच्या ख्यालप्रधान गायकीची खूण गायक नटांनाच हवी त्या प्रमाणात कळली नाही. त्याना वाटलं की आपणाला जे काही गायचंय ते उस्तादी स्वरूपाचंच ख्यालगायन आहे. यानंतर प्रत्येक प्रथितयश गायक नट आपल्या तानबाजीचा व रागदारीच्या ज्ञानाचा पुरावा प्रेक्षकांना देण्यासाठी धडपडू लागला. नाट्यसंगीत शास्त्रोक्त संगीताच्या वळणावर गेले. या काळात सर्वात प्रभावी ठरले ते आपल्या मोहक आवाजात लडिवाळपणाचा प्रत्यय देणारे बालगंधर्व व आक्रमक शैलीने प्रेक्षकांना भारून टाकणारे केशवराव. अनावश्यक तानबाजीच्या दोषांसहित रसिकांनी त्यांना स्वीकारले कारण आवाजाचा धर्म व रियाज यामुळे त्यांच्या गाण्याची बैठक पक्की होती. त्या काळातील इतर गायक नटांना मात्र प्रयत्न करूनही बालगंधर्व व केशवराव यांचे अनुकरण करणे जमले नाही.

'दीनानाथ पर्वा'ची सुरुवात

- बालगंधर्व व केशवराव यांच्यानंतर १९१८ पासून मराठी रंगभूमीवर 'दीनानाथ पर्व' सुरू झाले. मा. दीनानाथ हे सुद्धा वझेबुवांचेच शिष्य, पण नाविन्याची प्रचंड हौस असलेले. चमत्कृतीजन्य सौंदर्यनिर्मिती हा त्यांच्या गायकीचा विशेष गुण. ही चमत्कृती शब्दांचे लालित्य साधून नव्हे तर स्वररचनेत अकल्पित धक्का देणाऱ्या योजना करून मा.दीनानाथ साधीत असत. त्यामुळे त्यांची गायकीही लोकप्रिय झाली व बालगंधर्व, केशवराव यांच्याच वाटेने जात जात मा. दीनानाथही नाटकात पदे गाण्याऐवजी मैफली सजवू लागले.
- किर्लोस्करांची प्रासादिक धाटणी सोडून ख्यालगायकीचा थाट उचलणाऱ्या नाट्यसंगीताचा १९२० नंतर एवढा अतिरेक होत गेला की प्रेक्षकांनाच हळूहळू संगीत नाटकांचा कंटाळा येऊ लागला. 'स्वयंवर', 'विद्याहरण', 'राक्षसी महत्वाकांक्षा', 'रणदुंदुभी' यासारखी अनेक नाटके त्या काळात आली. भास्कर बुवा बखले, रामकृष्ण बुवा वझे, गोविंदराव टेंबे, मा. कृष्णराव यासारखे प्रतिभावान संगीतकार लाभले तरी संगीत रंगभूमी संगीताच्या अतिरेकामुळे खंगत जाऊ लागली. शेवटी परिणाम असा झाला की नाट्यसंगीतात वापरण्याजोगा एकही राग शिल्लक राहिला नाही. नाही म्हणायला १९२३-२४ च्या सुमाराला मा.कृष्णराव व टेंबे यांनी किर्लोस्करी वळणाचे नाट्यसंगीत पुन्हा रंगभूमीवर आणण्याचा प्रयत्न 'नंदकुमार', 'पटवर्धन' इत्यादी नाटकांद्वारे केला. पण तोपर्यंत रागदारी गायनातिरेकाच्या अजगराने मराठी रंगभूमी जर्जर करून सोडली होती. यामुळे एकूणच संगीत नाटकावर एक काळीकाभिन्न पडछाया पडल्यासारखी झाली.

बोलपटांचा रंगभूमीला तडाखा

याच सुमारास महाराष्ट्रात बोलपटांचे युग आले होते. रसिकांच्या मनावर या नव्या माध्यमाने जबरदस्त मोहिनी घातली होती. नाटकांच्या ढासळत्या गुणवत्तेमुळे रंगभूमीला कंटाळलेले प्रेक्षक मोठ्या प्रमाणात बोलपटांकडे वळले व मराठी संगीत रंगभूमीला अधिकच अवकळा आली. हरवत चाललेल्या नाट्यसंगीताला पुन्हा लोकप्रिय व सुप्रतिष्ठित करण्यासाठी काय करावे, कोणालाच कळेना. ही कोंडी सर्वप्रथम फोडली ती केशवराव भोळे यांनी.

भावगायकीचा प्रारंभ

- १९२५ नंतर मराठी साहित्य क्षेत्रात भावकाव्य हा नवीनच प्रकार रुजू लागला होता. हा प्रकार मराठी वाचकांमध्ये अत्यंत लोकप्रिय झाला होता. त्याचा वापर करून नाट्यसंगीतात काही नवे करता येत का पहावं असं केशवराव भोळ्यांनी ठरवलं नि १९३३ मध्ये रंगभूमीवर आणलेल्या 'आंधळ्यांची शाळा' या नाटकात प्रमुख भूमिका करणाऱ्या ज्योत्स्नाबाई भोळे यांना एक भावगीत म्हणायला लावलं. हा नवीन प्रयोग रसिकांना भावला. त्यानंतर मो.ग. रांगणेकरांच्या 'कुलवधू'त हाच प्रयोग अधिक सकसपणे वापरण्यात आला. या नाटकांपासून भावगीत शैलीचं एक नवीन वळण नाट्यसंगीतात आलं. आणि बऱ्याच प्रमाणात पूर्वीच्या ख्याल गायकीला पायबंद बसला. शब्दनिष्ठेला महत्व देऊन विविध स्वरपंक्तींनी भावगीत आळवून म्हणणं हे या भावगीत गायकीचं स्वरूप. खरं तर हा जुन्या हरिदासी गायनशैलीचा नव्या स्वरूपात केलेला आविष्कारच होता. सुमारे एक दशकभर रंगभूमीवर या शैलीचा प्रभाव कायम राहिला.
- संगीतातील या परिवर्तनाच्या बरोबरीनेच या काळात नाटकाचा आकृतीबंधही झपाट्यानं बदलत होता. नाटक अधिकाधिक सोपं बनत चाललं होतं. संवाद सुटसुटीत झाले होते व पल्लेदार भाषणांचा काळ इतिहासजमा झाला होता. साडेचार तास चालणारं नाटक अडीच तीन तासांवर आलं होतं. नाटकाचं एकंदर स्वरूप बदललं त्याप्रमाणे संगीताचा बाज बदलणं हीसुद्धा एक अपरिहार्य गरज होऊन बसली, हे इथं लक्षात ठेवण्यासारखं आहे.
- मराठी रंगभूमीच्या प्रारंभपर्वात अण्णासाहेब किर्लोस्कर, मोरोबा वाघोलीकर, बाळकोबा नाटेकर, दत्तोपंत हल्याळकर, भाऊराव कोल्हटकर, नारायणराव जोगळेकर, बालगंधर्व, मा.कृष्णराव, केशवराव भोसले, विनायकबुवा पटवर्धन, सवाई गंधर्व, मा.दीनानाथ यांच्यासारख्या प्रतिभावंत गायक नटांची छाप होती. १९३० नंतर संगीत रंगभूमीला उतरती कळा लागली तरी ज्योत्स्ना भोळे, श्रीपादराव नेवरेकर, भार्गवराम आचरेकर, छोटा गंधर्व, हिराबाई बडोदेकर, सरस्वतीबाई राणे, सुरेश हळदणकर, जयमाला शिलेदार या कलावंतांनी संगीत रंगभूमीची परंपरा चालू ठेवली. सौभद्र, मानापमान, एकच प्याला, संशयकल्लोळ, स्वयंवर, भावबंधन यासारख्या संगीत नाटकांचे प्रयोग सातत्याने होतच राहिले.

तिसऱ्या पर्वाचा प्रारंभ

- 'आंधळ्यांची शाळा' या नाटकापासून मराठी संगीत रंगभूमीचे दुसरे पर्व सुरू झाले. या पर्वात मो.ग. रांगणेकर (कुलवधू, माहेर, वहिनी, एक होता म्हातारा), मामा वरेरकर (कुंजविहारी, भूमीकन्या सीता), चिं.य. मराठे (होनाजी बाळा), रा.ना.पवार (शाहीर रामजोशी), बाळ कोल्हटकर (दुरितांचे तिमिर जावो, देव दीनाघरी धावला), आचार्य

अत्रे (प्रीतीसंगम), (गोपाळकृष्ण भोबे) धन्य ते गायनी कळा अशा अनेक नाटककारांचे योगदान आहे.

- १९६० नंतर संगीत रंगभूमीला उठाव देणारे तिसरे पर्व सुरू झाले. या पर्वात नाटककार म्हणून विद्याधर गोखले, पुरुषोत्तम दारव्हेकर, वि.वा.शिरवाडकर, वसंत कानेटकर, ही नावे ठळकपणे समोर आली. जितेंद्र अभिषेकी, वसंत देसाई हे प्रतिभावान संगीत दिग्दर्शक झाले. रामदास कामत, विश्वनाथ बागूल, नारायण बोडस, प्रकाश घांग्रेकर, आशालता, रजनी जोशी, वसंतराव देशपांडे, प्रसाद सावकार, राम मराठे, कीर्ती शिलेदार, चंद्रकांत लिमये, भालचंद्र पेंढारकर, फैयाज, अरविंद पिळगावकर, अनंत दामले, भार्गवराम आचरेकर असे अनेक कलावंत ऐन भरात असल्यामुळे या तिसऱ्या पर्वातील नाटकांना पुन्हा एकवार प्रेक्षकांचा उत्साही प्रतिसाद मिळू लागला. याच पर्वात घाशीराम कोतवाल (१९७१) लेकुरे उदंड झाली (१९६९), तीन पैशांचा तमाशा (१९७८), महानिर्वाण (१९७९), पडघम सारखी वैशिष्ट्यपूर्ण संगीताचा अनोखा वापर असलेली नाटके रंगभूमीवर आली पण संगीत रंगभूमीच्या मूळ प्रवाहापासून ती सर्वस्वी वेगळी असल्यामुळे त्यांचा विचार करणं इथं अप्रस्तुत ठरतं.

विद्याधर गोखल्यांचे योगदान

- १९६० नंतर रंगभूमीवर जे संगीत नाटक आलं त्यात संगीत हे नाटकाला पूरक असावं पण त्याचा अतिरेक होऊ नये ही जाणीव जपल्याचं आढळून येतं. या कालखंडातले अत्यंत महत्वाचे नाटककार आहेत विद्याधर गोखले. पंडितराज जगन्नाथ (१९६०), सुवर्णतुला (१९६१), मंदार माला (१९६३), मदनाची मंजिरी (१९६५), जयजय गौरीशंकर (१९६६), मेघमल्हार (१९६७), चमकला ध्रुवाचा तारा (१९६९), स्वरसम्राज्ञी (१९७२) आणि बावनखणी (१९८३) ही संगीत नाटकं त्यांनी लिहिली. किमान दोन दशके केवळ संगीताला वाहिलेली नाटके त्यांनी रंगभूमीवर आणली. रागदारी प्रधान, शास्त्रीय संगीताला त्यांनी महत्व दिलेच पण स्तोत्र, गझल, भावगीत, लावणी यांचाही वापर यथास्थितपणे करून घेतला. वसंत देसाई, छोटा गंधर्व, राम मराठे, प्रभाकर भालेराव, नीलकंठ अभ्यंकर, यशवंत देव यासारख्या संगीतकारांनी त्यांच्या नाटकांना आकर्षक साज चढवला. काही ठिकाणी उर्दू-हिंदी मधील चीजांचा गोखल्यांनी जशास तसा वापर केलेला आढळतो. गोखल्यांच्या नाटकातील भक्तिपर गीते विशेष लोकप्रिय ठरली. उदा. जय गंगे भागीरथी, जय शंकरा गंगाधरा, जय जय रमारमण श्रीरंग, तारील तुज हा गिरीजा शंकर इ. त्यांच्या नाट्यगीतात शृंगारिकतेवरही खूप भर दिलेला आढळतो. काही पदे ही तत्वज्ञानपरही आहेत. परंतु जुन्या काळातील किर्लोस्कर, गडकरी, खाडिलकर यांची पदे आजही लक्षात राहतात तशी विद्याधर गोखले यांची राहू शकली नाहीत. थोडाफार अपवाद 'स्वरसम्राज्ञी' व 'पंडितराज जगन्नाथ' या नाटकांचा. नाट्यरचनेच्या आकृतीबंधाकडे त्यांनी फारसे लक्ष दिले नाही तरी साठोत्तरी कालखंडात संगीत रंगभूमीच्या वाढीसाठी गोखल्यांनी जे काम केले ते निःसंशय श्रेष्ठ आहे.

दारव्हेकर मास्तरांचे कार्य

- संगीत रंगभूमीच्या संदर्भात नाटककार म्हणून गोखले यांच्यानंतर नाव येते ते पुरूषोत्तम दारव्हेकर यांचे. मराठी नाटक सृष्टीच्या पारंपारिक चौकटीत राहूनच दारव्हेकरांनी नाट्यलेखन केलं. मात्र त्यांच्यात एक सजग दिग्दर्शकही लपला असल्याकारणानं त्यांनी या नाटकांचं प्रयोगरूप अधिक देखणं बनवलं. चंद्र नभींचा ढळला, नयन तुझे जादुगार, घनःश्याम नयनी आला व कट्यार काळजात घुसली ही त्यांची महत्वपूर्ण संगीत नाटके. यात सर्वार्थाने लोकप्रिय ठरलेले एकच-कट्यार काळजात घुसली! यात नाट्यकथा व संगीत पूर्णपणे एकजीव झाले होते. संगीतातील दोन घराण्यांमधील परस्पर विरोध ही एक स्वातंत्र्यपूर्व काळातल्या संगीत क्षेत्रातील वास्तविक घटनाच होती. तिचा आधार दारव्हेकरांनी घेतला. अभिषेकींच्या संगीताने या नाटकात अक्षरशः प्राण ओतला नि वसंतराव देशपांडे आणि प्रसाद सावकार यांच्या सांगीतिक जुगलबंदीने प्रेक्षकांना झपाटून टाकले.

कुसुमाग्रज व कानेटकर

- वि .वा. शिरवाडकर (ययाती आणि देवयानी) व वसंत कानेटकर (मत्स्यगंधा, मीरा मधुरा, लेकुरे उदंड झाली) हे संगीत नाटकांना लोकप्रियता मिळवून देणारे दोन दिग्गज नाटककार -परंतु त्यांच्या एकंदर नाट्यनिर्मितीचा झपाटा पाहता प्रतिभा असून देखील त्यांनी संगीत रंगभूमीकडे दुर्लक्षच केले असे म्हणावे लागेल. सुदैवाने दोघांनाही पं. जितेंद्र अभिषेकी यांच्यासारखा कल्पक दिग्दर्शक मिळाला. त्यामुळे नाट्यसंगीतालाही वेगळी झळाळी प्राप्त झाली. पारंपारिक बंदिशींचा वापर करण्याऐवजी अभिषेकींनी आपल्या कल्पनाशक्तीचा आविष्कार घडवीत नवनवे राग नाट्यसंगीतात वापरले. 'नको विसरू संकेत मिलनाचा' ही दिंडी मुलतानी रागाचा विहंगम वेष धारण करून अवतरली. गावती, बिहागडा, सालग वराळी असे राग आले. 'धन्य ते गायनी कळा' मध्ये पं. भीमसेन जोशी यांच्या सांगीतिक तपश्चर्येचा परिसस्पर्श नाट्यसंगीताला झाला.

नाटकातील संगीत आटोपशीर झाले. बालकवी व गिरीश या कवींच्या रचनांचा 'मत्स्यगंधा'त वापर करून कानेटकरांनी नाट्यसंगीतात मोकळेपणा आणला. रणजित देसाईंच्या 'हे बंध रेशमाचे' नाटकासाठी शांता शेळके यांची गीते वापरण्यात आली. याच काळात नानासाहेब शिरगोपीकर (गीता गाती ज्ञानेश्वर, शाबास बिरबल शाबास), अशोकजी परांजपे (संत गोरा कुंभार) यांचीही नाटके आली. पण पद्यरचना व आकृतीबंध यासंदर्भात त्यांनी नवे काहीच दिले नाही.

काही वेगळे प्रयोग

- संगीत नाटकांच्या पारंपारिक प्रवाहापासून सर्वस्वी अलग असलेली काही मोजकीच नाटके साठोत्तरी काळात मंचावर आली आहेत पण त्यांची पुढे आपली 'परंपरा' होऊ शकली नाही. त्यामुळे रंगभूमीवरील नवा प्रयोग एवढ्यापुरतेच त्यांचं महत्व मर्यादित झाले. मुक्तछंदातील 'लिरिक्स' संवादरूपाने येण्याचा व त्यांचं सादरीकरण गद्यलयीच्या पद्धतीनं न होता स्वर व लय यांच्या पार्श्वभूमीवर चमकदार पद्धतीनं करण्याचा सर्वथा वेगळा प्रयोग कानेटकर-अभिषेकींनी केला. त्यासाठी त्यांनी कोकणी रंगभूमीवरील तियात्र संगीताकडून प्रेरणा घेतली व पौर्वात्य-पाश्चात्य सुरावटींचा अनोखा संगम साधला.
- तेंडुलकरांच्या 'घाशीराम कोतवाल' या नाटकात संगीत नाट्यवस्तूचा अपरिहार्य घटक म्हणून पुढे आले. भास्कर चंदावरकरांनी त्यासाठी लोकसंगीताचा पुरेपूर वापर करून घेतला व ते लवचिकही ठेवले. ब्रेश्टच्या 'थ्री पेनी ऑपेरा' वर बेतलेल्या 'तीन पैशाचा तमाशा' या नाटकासाठीही पु.लं.नी असाच लवचिक, मुक्त फॉर्म वापरल्याचे दिसते. पु.लं.नी या नाटकात तमाशा पद्धतीचा वापर केला. महानगरीय पार्श्वभूमी अधोरेखित करण्यासाठी पॉप म्युझीक, गझल, नाट्यसंगीत, कव्वाली, गणगौळण, लावणी अशा अनेक प्रकारांचा वापर करून एक वेगळाच नाट्यानुभव या नाटकाने दिला. पडघम (अरूण साधू) या नाटकात समूहगानाचा वापर करण्यात आला होता. सतीश आळेकरांच्या 'बेगम बर्वे' या नाटकात जुन्या जमान्यातील नाट्यगीतांचा वापर चपखलपणे करण्यात आला होता. बालगंधर्वकालीन रंगभूमीच्या झगमगत्या सुवर्ण काळाशी एकरूप होऊ इच्छिणाऱ्या परंतु दुर्दैवानं परिस्थितीच्या कठोर जाळ्यात सापडल्यामुळं तडफडणाऱ्या जुन्या काळात स्त्री पार्ट करणाऱ्या कलावंताचे शोकात्म जीवन या नाटकात आळेकरांनी दाखवले. यातील संगीताचा वापर हा वेगळाच जीवनानुभव देणारा होता.
- संगीत रंगभूमीवर वेगळे काही करू पाहणारी अशी ही मोजकीच नाटके. बाकी सर्व रंगमंचावर आलेली नाटके या ना त्या स्वरूपात पारंपारिक मराठी संगीत रंगभूमीशी साधर्म्य दाखवणारीच होती. पहिल्या पर्वात सादर झालेल्या अभिजात नाटकांचा प्रभाव मराठी नाट्यसृष्टीवर अलीकडच्या काळापर्यंत कायम होता, याची तो साक्ष आहे.

चेहरामोहरा बदलतोय

- मराठी नाटकाचा चेहरामोहरा आज बदलत चालला आहे. व्यावसायिक रंगभूमीवर नवी नवी नाटके येतच आहेत. प्रायोगिक रंगभूमीवरही नवे प्रयोग सातत्याने होताना दिसतात. पण या गदारोळात अस्सल संगीत नाटक मात्र कुठेच दिसत नाही ही शोकांतिका आहे. काही दिवसांपूर्वी मोहन वाघांच्या चंद्रलेखा या संस्थेनं मोठा गाजावाजा करून 'शतजन्म शोधिताना' हे संगीत, नाटक रंगभूमीवर आणलं. हृदयनाथ मंगेशकर व लता मंगेशकर यांचे फोटो जाहीरातीत छापून उत्तम प्रसिद्धी ही केली. पण प्रेक्षकांनी या नाटकाकडे पाठ फिरवली. लताबाईंच्या आवाजातील गाणी बॅकग्राऊंडमध्ये वापरून रसिकांना चकवण्याचा मोहन वाघांचा बेत काही यशस्वी झाला नाही. कारण मुळातच प्र.ल. मयेकरांच्या नाटकात खोट होती. काही वर्षांपूर्वी साहित्य संघानं 'मोराचे अश्रू' या नावाचं एका लोककथेवर बेतलेलं संगीत नाटक रंगभूमीवर आणलं पण तेही चाललं नाही. प्रख्यात शास्त्रीय गायिका श्रुती सडोलीकर यानी 'संत तुलसीदास' या जुन्या नाटकाचं पुनरुज्जीवन केलं पण त्याचेही अवघेच प्रयोग झाले. 'कट्यार काळजात घुसली' हे नाटक नव्याने आले आहे. खाँसाहेबांची वसंतराव देशपांडे यांनी गाजवलेली भूमिका त्यांचे नातू राहुल देशपांडे आता वठवीत आहेत.
- रंगभूमीवर आता जुन्या संगीत नाटकांचे प्रयोग होणं देखील दुरापास्तच झालं आहे. कीर्ती शिलेदार, आशालता, फैयाज, रामदास कामत, नारायण बोडस हे कलाकार वयानुसार बाजूला पडले आहेत. गायनावर हुकमत असलेले गायक नट फारसे दिसत नाहीत. शिवानंद पाटील, प्रल्हाद हडफडकर आहेत पण ते फारशी चमक दाखवू शकलेले नाहीत. पुण्याचे चारूदत्त आफळे हे आजच्या काळातले समर्थ गायक नट आहेत पण त्यांचा अर्धा वेळ कीर्तनात जातो. चांगल्या महिला कलाकारांची तर वानवाच आहे.

संगीत नाटकापुढील अडचणी

- नवीन संगीत नाटक निर्माण होत नाही कारण मुळातच आज आपल्याकडे चांगले लेखक नाहीत. मराठीतील आजचे आघाडीचे सर्व लेखक हे

गद्यलेखक आहेत. खाडिलकर, वरेरकर, गडकरी, शिरवाडकर, गोखले उत्तम संगीत नाट्यलेखन करू शकले कारण ते कवी प्रवृत्तीचे होते. एकूणच मराठी कवितेत छंदापासून फारकत घेऊन कविता लिहिणाऱ्यांची संख्या वाढते आहे. त्यामुळे उत्तम कवीच होत नाहीत अशी स्थिती आहे. या परिस्थितीत संगीत नाटक लिहिणार कोण?

- बरं, एखाद्यानं काळाचं आव्हान स्वीकारून नवीन नाटक लिहिलं तरी त्याची निर्मिती कोण करणार हा प्रश्न शिल्लक राहतोच. ललीतकलादर्श, मराठी रंगभूमी, नाट्यसंपदा या जुन्या संस्था थकल्या आहेत. वैशिष्ट्यपूर्ण संगीत नाटक देणाऱ्या दि गोवा हिंदु असोसिएशन सारख्या संस्थेनं नाट्यनिर्मितीच्या क्षेत्रातूनच 'व्ही.आर.एस' घेतली आहे. नवा निर्माता संगीत नाटक सोडाच पण विचार प्रधान, सिरीयस नाटकही करायला तयार नसतो. लता नार्वेकरसारखी निर्माती 'लोच्या झाला रे' 'आयला हो रे' च्या पलीकडे जायला तयार नाही. 'सुयोग'च्या गोपाळ अलगेरी व सुधीर भट यानी संगीत नाटक निर्माण करण्याची घोषणा गाजत वाजत केली होती, पण त्यांचाही योगायोग जुळून येत नाही. जितेंद्र अभिषेकी, वसंत देसाई यांच्या ताकदीचा कल्पक व प्रतिभावान संगीत दिग्दर्शक तरी आज कुठं आहे आपल्याकडे?
- किर्लोस्करी नाटकांपासून उगम पावलेलं नाट्यसंगीत केशवराव भोसले-बालगंधर्वोत्तर काळात झालेल्या रागदारीच्या अतिरेकामुळं संपलं, असं म्हणण्यात येत होतं. प्रत्यक्षात आता संगीत रंगभूमी संपली तरी नाट्यसंगीत टिकून आहे. प्रभाकर कारेकर, अजित कडकडे यांच्या नाट्यसंगीताच्या कॅसेटस् अजूनही हजारोंनी खपतात. नाट्यसंगीत रजनीला प्रेक्षकांची तुफान गर्दी होते. शास्त्रीय गायनाच्या मराठी कलावंतांच्या मैफलीत हटकून नाट्यसंगीताची फर्माईश होते. याचाच अर्थ असा की मराठी माणसाला नाट्यसंगीत नकोसं झालेलं नाही. त्यानं पाठ फिरवलीय ती संगीत नाटकांशी. पण संगीत नाटकांचा प्राणच तर नाट्यसंगीत आहे! यावरून आपण निःशंकपणे असं म्हणू शकतो की मराठी समाजाची नाट्यसंगीताची अभिरुची कायम राहिली तर संगीत रंगभूमीच्या चौथ्या पर्वाचा उदयकाल कधी न कधी होईल अशी आशा करायला वाव आहे. फक्त हे नाटक नव्या स्वरूपात, नव्या आशयासहीत अवतीर्ण होण्याची गरज आहे.

कला अकादमीचा प्रयोग

- काही वर्षांपूर्वी आम्ही गोव्यात एक प्रयोग करून पाहिला होता. मा.दीनानाथांच्या जन्मशताब्दी वर्षात आम्ही गोवा कला अकादमीतर्फे संगीत नाटक महोत्सव घडवून आणला. तेव्हापासून दरवर्षी हा महोत्सव आयोजित केला जातो. गोव्यामध्ये नाट्यक्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांनी संगीत मराठी नाटकांची निर्मिती करावी यासाठी कला अकादमीने एक अर्थसहाय्य योजना जाहीर केली. या योजनेखाली संबंधित संस्थांनी अकादमीकडून अनुदान घेऊन संगीत नाटक तयार करावं व त्याचा प्रयोग महोत्सवात करावा अशी ती योजना होती. पहिल्याच वर्षी तिला चांगला प्रतिसाद मिळाला व दरवर्षी तो वाढत चालला आहे. यंदा तर बारा नाटकांच्या निर्मितीची तरतूद असताना तब्बल २६ संस्थांनी अर्ज केले! संगीत नाटक करण्याची इच्छा बाळगून इवल्याशा गोव्यात तब्बल २६ संस्था उभ्या राहतात हे चित्रच किती आशादायक आहे!
- संगीत नाटकांचा हा असा महोत्सव करीत असताना त्यात प्रेक्षकांचाही सहभाग असावा याची दक्षता कला अकादमीनं घेतली. महोत्सवातील कुठल्याच नाटकाचा प्रयोग फुकट ठेवला नाही. नाटकासाठी तिकीटं ठेवली व वरून अशी तरतूद केली की तिकीट विक्रीतून जे उत्पन्न येईल त्यातला ७० टक्के वाटा संबंधित संस्थेला मिळेल. यामुळे संस्थांनाही हुरूप आला व आपल्या नाटकाला जास्तीत जास्त लोक यावेत म्हणून त्यांचे प्रयत्न सुरू झाले. यातूनच आज संगीत रंगभूमीची एक सशक्त चळवळ गोव्यात उभी राहते आहे.
- गोव्या सारख्या इवल्याशा राज्यात जे घडतं ते महाराष्ट्रात का घडू नये? शासनाच्या सांस्कृतिक संचालनालयानं याबाबत पुढाकार का घेऊ नये? कदाचित संचालनालय म्हणेल की आम्ही संगीत नाटकांच्या स्पर्धा घेतो. पण या स्पर्धेत किती संस्था सहभागी होतात? शिवाय स्पर्धा वेगळी नि महोत्सव वेगळा. स्पर्धांच्या नाटकांना जेमतेम १५-२० प्रेक्षक असतात. महोत्सवात प्रेक्षकांचा सहभाग प्रामुख्यानं अपेक्षित आहे. त्यासाठी ठोस योजना आखण्याची गरज आहे.

तीन नाटकांची नवनिर्मीती

- फोंड्याच्या राजीव गांधी कला मंदिराचा मी उपाध्यक्ष होतो त्यावेळी आणखी एक प्रयोग मी करून पाहिला. नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांच्या 'सं. स्वयंवर' या नाटकाची आम्ही पुनर्निर्मिती केली. त्यासाठी संपूर्ण नाटक मी पुन्हा लिहून काढले. त्यातला पाल्हाळ काढून टाकला. काही नवीन प्रवेश लिहिले. गाणी लिहिली. गंमत म्हणजे प्रेक्षकांनी हा नवीन प्रयोग आनंदाने स्वीकारला. कला मंदिरमध्ये झालेल्या दोन्ही प्रयोगांना अलोट गर्दी झाली. पुढे आणखी काही ठिकाणी आम्ही या नाटकाचे प्रयोग केले. जुन्या नाटकातला 'जुनाटपणा' काढून टाकला तर प्रेक्षकांना नाटक भावते हे मी त्या प्रयोगातून शिकलो.

- नंतरच्या वर्षी मी शूद्रकाच्या 'मृच्छकटिकम्' या संस्कृत नाटकाच्या कथानकावर आधारीत 'वसंतसेना' हे नवीन नाटक लिहिले. याच विषयावर पूर्वी देवलांचे 'मृच्छकटिक' हे नाटक आले होते. त्यातील बरीच गाणी गाजली होती. 'वसंतसेना' साठी मी नवी गाणी लिहिली. त्यापैकी 'परिमळ ना सोडी चंदना गंधाची आवडी', 'प्राचीवरी ये भास्कर', 'शापचि मज वाटे', 'पेटवीन क्रांतीच्या ज्वाला', 'रात्र काळी पसरी बाहुपाश' इत्यादी गाणी बुजुर्ग रसिकांनी डोक्यावर घेतली. 'तुम्ही अगदी जुन्या वळणाची पण फ्रेश वाटतील अशी गाणी लिहिली आहेत' असा अभिप्राय नटवर्य प्रभाकरपंत पणशीकर यांनी दिला.
- संगीत रंगभूमीच्या संदर्भात हे दोन प्रयोग केल्यानंतर मी जरासा निर्ढावलो- धीट झालो. आपणाला नाट्यगीतं लिहिता येतात हा आत्मविश्वास निर्माण झाला. त्याची परिणती गेल्या वर्षी दोन नवीन संगीत नाटकं लिहिण्यात झाली. पहिलं कला अकादमीच्या 'रंगमेळ' साठी लिहिलेलं 'सं.अलख निरंजन' आणि दुसर रुद्रेश्वर, पणजी या संस्थेसाठी लिहिलेलं 'युद्ध नको, मज बुद्ध हवा!' दोन्ही नाटकांचे विषय नवे- यापूर्वी रंगभूमीवर न आलेले. 'सं. अलख निरंजन' हे नाथपरंपरेतील श्रेष्ठ गुरू मच्छिंद्रनाथ व त्यांचे शिष्य गोरक्षनाथ यांच्यातील संघर्षावर आधारलेलं तर 'युद्ध नको...' हे नाटक म्हणजे सम्राट अशोकाची जीवनगाथा. 'अलख निरंजन' मध्ये शंकर, मच्छिंद्र, गोरक्ष, मैनाकीनी अशी चार गाणारी पात्रं होती. शंकराच्या तोंडी घातलेली 'सारीपाट हा या सृष्टीचा' व 'एक सूर चराचरी साऱ्या' ही दोन्ही गाणी खूपच लोकप्रिय झाली. मच्छिंद्रनाथांसाठी लिहिलेली 'सारी सद्गुरूकिमया', 'गगनमंडली विहिर उलटी', 'प्रेम हे अढळ अमर माझे' व मैनाकीनीचे 'मोगरा फुलला' ही नाट्यगीतेही लौकरच रसिकांच्या ओठांवर उतरली. गोरक्षनाथांचे 'सांगा हो सांगा कोणी माझा गुरू पाहिला' हे गाणे तर लहान मुलांच्याही पसंतीला उतरले.
- त्यामानाने 'युद्ध नको...' मधील नाट्यसंगीत हे काहीसे आधुनिक पद्धतीचे, भावगायकीच्या शैलीतले होते. 'नसे सन्मान का शौर्या', 'ही चाणक्याची पर्णकुटी', 'व्यक्ती नव्हे रे राष्ट्र महान', 'हाक देई काश्मीर नृपाळा', 'नको युद्ध हे महाभयानक', 'धम्म नसे हा जन्म नवा' ही नाट्यगीतेसुद्धा चोखंदळ रसिकांना खूप आवडली.
- अशाच प्रकारचे प्रयोग इतरत्रही चालू आहेत. रत्नागिरीतील माझे मित्र डॉ. श्रीकृष्ण जोशी गेली काही वर्षे सातत्याने संगीत नाटकांचे लेखन करताहेत. 'खल्वायन' ही त्यांची संस्था प्रसिद्ध आहे. सांगलीतही संगीत नाटकांचे प्रयोग होत असतात. त्यामुळे मला विश्वास वाटतो- संगीत, नाटक आज रुग्णशय्येवर पडलंय खरं- पण ते मरणार नाही. जोपर्यंत आपली मराठी भाषा असेल तोपर्यंत मराठी रंगभूमी राहील. रंगभूमी भाषेसोबतच येते. भाषाच साऱ्या सांस्कृतिक वारशांना प्रवाही बनवते. गरज आहे ती आपल्या सांस्कृतिक प्रेरणांना हृदयात जपून ठेवायची. शेवटी अस्मिता, अस्मिता म्हणजे तरी काय असते? आपल्या जगण्याचीच ती एक मुद्रा असते. कलेचा संबंध जोपर्यंत जगण्याशी असतो तोपर्यंत कला कालबाह्य होत नाही.
- जगण्याची सर्व स्पंदने घेऊन ती पुढं जाते. अधिक समृद्ध बनते. कला जीवनापासून तुटली की संपली. मराठी संगीत रंगभूमीचंच घ्या. तिचं मराठीपण आणि महाराष्ट्रीय माणसाचं मराठीपण टिकून होतं तोपर्यंत संगीत रंगभूमी बहरात होती. पुढं चित्रपटांचं युग आलं. चित्रपटातील गाणी ऐकता ऐकता मराठी माणूस हिंदी गाण्यांकडे वळला. यातही सुरेल व श्रवणीय गाण्यांची अभिरुची संपून छटोर व उडत्या गाण्यांचा जमाना आला. आज कुठेही गेलो तरी हे धांगडधिंगा संगीत पिच्छा सोडत नाही. संगीतातलं मराठीपण असं संपत आल्यामुळे मराठी संगीत रंगभूमीवरही मरगळ पसरली आहे.
- पण मी आशावादी आहे. मराठी संगीत नाटकाच्या पहिल्या पर्वात किर्लोस्कर-गडकरी-खाडिलकर, बालगंधर्व- दीनानाथ-केशवराव, बखले-टेंबे-वझेबुवा ही रत्नं निपजली. दुसऱ्या पर्वात रांगणेकर-वरेरकर-अत्रे, ज्योत्स्नाबाई, मराठे यांच्यासारखे दिग्गज झाले. तिसऱ्या पर्वात गोखले -दारव्हेकर-कुसुमाग्रज-कानेटकर, अभिषेकी-देसाई हे प्रतिभावंत निपजले. आता चौथ्या पर्वाला नजिकच्याच काळात प्रारंभ होईल. यातही नवे नाटककार, नवे निर्माते, नवे गायक व नवे प्रेक्षक निर्माण होतील आणि मराठी संगीत नाटकांचा झेंडा पुन्हा एकदा सह्याद्रीवर फडकू लागेल.

❑

सोगल सोमनाथ

माझी रंगभूमीवरची ५० वर्षांची वाटचाल

महाराष्ट्र साहित्य परिषद, सोलापूर शाखा व लोणकरण चंडक ट्रस्ट सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्याख्यानमाला १९.१२.२०१४

फैय्याज शेख

मी मूळची सोलापुरची. ६ फेब्रुवारी २०१५ रोजी बेळगाव इथे संपन्न होणाऱ्या ९५ व्या अखिल भारतीय नाट्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा बहुमान मला मिळाला आहे.. गेली ५० वर्षे मराठी रंगभूमीची मी जी सेवा केली, माझ्यापरीने जे योगदान दिले त्याचाच हा परिपाक असावा असे मला वाटते. पण त्यातही माझी निवड बिनविरोध झाली याचे मला विशेष समाधान आहे. मला कुणी विचारतात तुमची अध्यक्षपदी निवड झाल्यावर तुम्हाला काय वाटले ? खरे सांगायचे तर आनंद आणि भीती अशा संमिश्र भावना माझ्या मनात आहेत . अध्यक्षपद हा एक बहुमान आहे हे खरे . पण भीती अशासाठी कि आजपर्यंत अनेक दिग्गज कलावंतांनी, लेखकांनी, दिग्दर्शकांनी हे पद भूषवलेले आहे आणि तिथे उभे राहून आता आपल्याला बोलायचे आहे. आजपर्यंतच्या अध्यक्षांची मांदियाळी पाहिली तर मनावर थोडे दडपण आहे. पण या निमित्ताने मी माझे रंगभूमीवरचे अनुभव, रंगभूमी काल कशी होती, आज कशी आहे व उद्या कशी असावी याबद्दल माझे मनोगत तिथे रसिकांसमोर मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

रंगभूमीची सेवा हे एक नियोग व्रत आहे असे मला वाटते. रंगदेवतेची पूजा करून नाटकाची सुरुवात आपण करतो. नियोगव्रताचे पालन करत गेली ५० वर्षे मी जी रंगभूमीची सेवा केली तिची सुरुवात खरं तर सोलापूर मध्ये झाली. त्यावेळी मी तीन चार वर्षाची असेन, मी मेळ्यात काम करायची. मी रेडिओ लावून नाच करायची, गाणे कान देऊन ऐकायची. माझी आवड लक्षात घेऊन माझ्या आजीने मला प्रोत्साहन दिले. त्यावेळी मी जय हनुमान मेळा, जय बजरंग मेळा व श्रध्दानंद कलापथकात ३ वर्षे सातत्याने काम करायची. राम हसन आणि मास्टर इंगळे असे दोन कलावंत होते. कुमार कोठावळे व संजीव या कवींच्या कवितांना चाली लावून मी संगीतकार मास्टर दुबे व मास्टर किसन यांच्या बरोबर गायची. माझा आवाज चांगला होता व मला उपजत त्याची उमज होती असं जेव्हा मी म्हणते तेव्हा मला कट्यार काळजात घुसली मधले एक वाक्य आठवते. कला आणि विद्या मधील फरक समजवणारे.

''विद्या आपल्यात बाहेरून आत शिरते तर कला आतून बाहेर पडते.

विद्या अशी देता येते सुपारीसारखी, कला उचलावी लागते तपकीरीसारखी.

विद्या असते तालासारखी, शिकता येते, शिकवता येते पण

कला लयीसारखी आहे, ती अंगात असावी लागते, जन्माला येताना तिथून आणावी लागते.''

आणि ती जाण उपजत असेल आणि त्याला शास्त्राची, अनुभवांची जोड मिळाली कि पुढची वाटचाल सुलभ होते . खरंच ती आवड माझ्यात उपजत होती असे वाटते कारण मी मोठी झाल्यावर आता तू मेळ्यात काम करायचे नाही असे बंधन मला घरातून जेव्हा घालण्यात आले तेव्हा माझ्यातील कलाकार अस्वस्थ झाला.

ती माझी आवड कमी झाली नाही. आणि लौकरच मला नाटकात काम करायची संधी मिळाली. त्यावेळी मध्य रेल्वेच्या इन्स्टिट्यूटतर्फे गणेश हॉलमध्ये नाटकाचे प्रयोग व्हायचे. त्यांनी मला प्रथम संधी दिली. पण आपण संवाद बोलू शकू असा मला विश्वास नव्हता. पण अण्णा शिवशरण यांनी मला धीर दिला आणि पु.ल. देशपांडे यांचे 'तुज आहे तुजपाशी' या नाटकात मी मिसेस नाडकर्णी ही भूमिका केली. त्यात जब्बार पटेल शाम ही भूमिका करायचे. कंपली दिग्दर्शक होते. माया मल्लापूरजी गीताचं काम करायची ते काम मी नंतर करू लागले. मला हळूहळू नाटकाची आवड निर्माण झाली. नंतर मी प्रभाकर ताम्हणे यांच्या ''अशीच एक रात्र येते'' या रहस्यमय नाटकात व बाळ कोल्हटकरांच्या ''वेगळं व्हायचय मला'' या नाटकातून कामे केली. सगळी रेल्वेची माणसे होती. गुलबुर्गा, रायचूर, बेंगळूर अशा ठिकाणी आम्ही अनेक प्रयोग केले. पण आपण कलावंत व्हावं, तेच आपल करीयर करावं, पैसा मिळवावा, नाव कमवावं, प्रसिद्धी मिळवावी हे डोक्यात नव्हतं कारण कॉलेजमधे माझ्या सर्व भाषा चांगल्या होत्या. मराठी, हिंदी,संस्कृत तिन्हीही. मराठीत

तर मला विशेष प्राविण्य मिळालं होत. पण अचानक मला आपण संगीत शिकावं असं वाटू लागलं म्हणून मी राम जालीहाळ यांच्याकडे संगीत शिकू लागले. त्यांच्या निधनानंतर मनोहर कुलकर्णी यांच्याकडे सुगम संगीत तर 'कट्टी' बंधूंकडे भरतनाट्यमचे धडे घेतले. सोलापूरच्या मधुर आठवणींमधली एक आठवण म्हणजे महात्मा गांधींच्या पुतळ्याच्या अनावरणासाठी जेव्हा नेहरू सोलापूरला आले होते तेव्हा आम्ही मैत्रिणींनी त्यांची गाडी अडवून त्यांना गुलाबाचे फूल दिले होते. ही कल्पना होती विठ्ठल औशेट्टि यांची आणि ज्योती श्रृंगारपुरे व शारंगपाणी या मैत्रिणी माझ्या बरोबर होत्या. ज्या कन्या माध्यमिक महाविद्यालयात मी ९ वी पर्यंत शिकले तिथे सुशीलकुमार शिंदे नाईट स्कूलमध्ये शिकत. ते नेते होण्याआधी एक उत्तम अभिनेते आहेत. शाळेच्या स्नेहसंमेलनात त्यांनी अनेक नाटकातून कामे केली आहेत. ते स्त्री भूमिका पण उत्तम करीत व तेवढेच सुंदरपण दिसत. मला मात्र माझ्या उंचीमुळे नेहमी पुरुष भूमिका द्यायचे . असे मस्त दिवस जात होते. तेव्हा मी पुढे मुंबईला रंगभूमीवर जाईन व व्यावसायिक नाटकात स्थिर होईन हे माझ्या मनात पण नव्हते.

माझे शालेय शिक्षण संपले तेव्हा मला एसटीत कॉल आला होता. पण आपल्या आयुष्यात जी घटना घडायची असते ती घडतेच. नियतीपुढे कोणाचे काही चालत नाही. मी आठवीत असताना एकदा सोहराब मोदींकडे काम करणाऱ्या शीला (रोशन) आमच्याकडे जेवायला आल्या असताना त्यांनी आमच्या आईला तुझ्या मुलींपैकी कोण गाते का असे विचारले. तेव्हा आमच्या आजीने माझ्या गाण्याबद्दल त्यांना सांगितले. मी त्यांना मदनमोहन यांची एक रचना म्हणून दाखवली. त्या मदनमोहनजींच्या मानलेल्या बहीण होत्या. सी रामचंद्र यांची त्यांना ओळख होती. त्यांनी मला गाण्यासाठी व माझ्या मोठ्या बहिणीला सिनेमात अभिनय करण्यासाठी मुंबईला येण्याचा प्रस्ताव ठेवला. पण आपण शिकायचे, लेक्चरर व्हायचे माझे स्वप्न होते म्हणून मी नकार दिला. पण नशिबाची चक्रे कशी विचित्र फिरतात बघा. शालेय शिक्षण संपले, सहा महिन्यात अशी काही परिस्थिती ओढवली कि मी आई, आजीला न सांगता शीलाबाईना पत्र लिहीलं कि मी मुंबईला येणार आहे. ६ मे १९६५ रोजी मी मुंबईला पोचले. आई, आजी यांना सोडून त्या महानगरीत मी प्रवेश केला तेव्हा लोकलची गर्दी पाहून मी गांगरून गेले. शीलाबाईंकडे ४ वर्षे राहिले.

तिथे सुमतीबाई धनवटे यांच्या संगीत नाटकात मला प्रथम संधी मिळाली. संगीतकार होते प्रभाकर भालेकर. अतिशय गुणी माणूस. त्यांनी माझ्या आवाजाची जात व पोत ओळखली. माझ्या आवाजात दर्द आहे, उर्दूचा लहेजा आहे असे ते म्हणाले. दत्ता भट, माई भिडे, कृष्णकांत दळवी अशा दिग्गजांबरोबर काम करायची संधी मिळाली. तेव्हा फार संस्था नव्हत्या. ललितकला, आयएनटी, गोवा हिंदू असोसिएशन होत्या. नाट्यसंपदेचा अजून जन्म व्हायचा होता. लोक बघायला यायचे. शंकर घाणेकर, वसंत जोगळेकर, श्री लालचंद यायचे. त्यावेळी मी १६-१७ वर्षाची असेन. मी न भिता मनापासून गायची. अण्णासाहेब अण्णगिरी म्हणून व्यवस्थापक होते. ते गंधर्वांचे भक्त. त्यांनी पण माझ्या आवाजाची तारीफ केली. मग आमचा पहिला प्रयोग झाला. पेपरमध्ये माझ्याबद्दल रकानेच्या रकाने भरून यायला लागले. ''ती आली, तिने पाहिले, तिने जिंकले'', ''महाराष्ट्राचा गहिरा स्वरविलास'' ''संगीत रंगभूमीवर गाणारी नवीन मुलगी'' वगैरे.

बाई म्हणाल्या आपण हिचे नाव बदलून 'संगीता' ठेवूया. पण पणशीकर म्हणाले, नाही. कोल्हटकर, पणशीकर, कानेटकर, घाणेकर, कालेलकर अशा नावात तीचं वेगळेपण फैय्याज नावातच आहे. तुम्हाला माहित आहेच फैय्याज म्हणजे दाता, दातृत्व, देणारा. म्हणून ५० वर्षात रंगभूमीला मी काहीतरी देण्याचा प्रयत्न केला आहे. मी फैय्याज नावानेच काम करत राहिले. पणशीकर यांच्याबरोबर 'मदनाची मंजिरी' हे नाटक केले, त्याचे संगीत प्रभाकर भालेकर करीत. माझे खरं तर संगीताचे शिक्षण पूर्ण नव्हते, मी कसलेली अभिनेत्री पण नव्हते तरी मी एक ठुमरी गायले.

५०० रु. पगारावर नाट्यसंपदेमध्ये काम करायची तेव्हा मला घरी पैसे पाठवावे लागत आणि तीन महिने पगार झाला नव्हता. त्याच दरम्यान ललितकलेचे भालचंद्र पेंढारकर यांनी मला 'जय जय गौरीशंकर' नाटकासाठी बोलावले. मी त्यांच्याकडून २००० रु. ॲडव्हान्स घेतले. ते पैसे त्यांनी परत घेतले नाहीत. माझा आशीर्वाद म्हणून ते तुझ्याकडे असू देत असे त्यांनी सांगितले. त्यावेळी पु.ल. देशपांडे नाट्य परिषदेचे अध्यक्ष होते. मोहन वाघ, पणशीकर, वासू कोल्हटकर आदींनी त्यांच्याकडे याबद्दल तक्रार केली. पण माझा ३ महिने पगार न झाल्याने माझा नाईलाज होता. पण याचा परिणाम असा झाला कि शेवटपर्यंत मदनाची मंजिरी नाटकाच्या तालमी करून पण ऐनवेळी ती भूमिका जोस्ना मोहिले हिला दिली गेली. पहिल्याच व्यावसायिक नाटकाची अशी कहाणी झाली. माझं ते नाटक गेल. मला खूप वाईट वाटलं.

नंतर मला कावीळ झाली, मी काही दिवस घरीच होते. थोड्या दिवसांनी पणशीकर परत बोलवायला आले. 'अश्रुंची झाली फुले' मधील नीलमची भूमिका मी केली. चित्तरंजन कोल्हटकर, प्रभाकर पणशीकर, काशिनाथ घाणेकर कलाकार, पुरुषोत्तम दारव्हेकर दिग्दर्शक, वसंत कानेटकर लेखक - या नाटकाने मला खूप काही दिलं. चित्तरंजन कोल्हटकर यांच्याबरोबर काम करायला मिळणार म्हणून भूमिका छोटी असूनही मी ते काम स्वीकारलं. 'कट्यार काळजात घुसली' हे नाटक जेव्हा

मला धन्य वाटते. बेगमसाहेबांचा आशीर्वाद म्हणा किंवा रंगदेवतेची कृपा म्हणा तो प्रयोग खूप यशस्वी झाला.

मी जे आज मिळवलंय ते व्यवस्थित आहे. आजपर्यंतचा माझा जो ५० वर्षाचा प्रवास झाला त्यावर मी समाधानी आहे. मी जिथे जिथे गेले तिथे आनंद मिळवलाय. माझ्या व्यवसायाला कधीही नावे ठेवली नाहीत. माझ्या आयुष्यात जे भाग्याचे क्षण आले त्यापैकी एक मी आज नाट्य संमेलनाची अध्यक्ष झाले हा क्षण. बुजुर्गांची इच्छा, गुरुजनांचे आशीर्वाद आणि रसिक प्रेक्षकांचे प्रेम, त्यांची आपुलकी, जिव्हाळा यांच्या जोरावर हा ५० वर्षांचा प्रवास सुकर झाला. त्यांचे ऋण माझ्यावर आहेत, ते असेच राहतील हे नक्की.

(संकलन- अशोक देशपांडे)

शब्दांकन- शोभा लोकूर

❑

स्वप्नपूर्ती

कधीतरी पाहिले होते त्यांना हळूच स्वप्नांत शिरताना ।
पहाटेचे स्वप्न खरे व्हावे ही आस मनी असताना ।।

ओळख व्हावी, मैत्री जुळावी... छे! कठीण हे जाणवताना ।
कित्येक भूमिका, गायकी मधूनी पाहिले त्यांना उमलताना ।।

अनेक पदे भूषविताना, पारितोषिकांनी सन्मानित होताना ।
मौलिक 'विष्णुदास भावे' पुरस्कारासाठी घोषित त्यांचे नाव ऐकताना ।।

अभिनंदनासाठी पाठविला संदेश तेव्हा कंप होता हातांना ।
आनंदले, भांबावूनही गेले प्रत्यक्ष त्यांच्याशी बोलताना ।।

देवाण-घेवाण झाली विचारांची, संवाद त्यांच्याशी साधताना ।
प्रेमाची पाखर, मैत्रीचा दरवळ पसरला दुवा जोडताना ।।

जवळीक झाली, मने जुळली मुलाखत घेताना ।
मैत्रीचे रोपटे वृक्ष झाले, नकळत भेटी घडताना ।।

हळुवार मैत्री जपीन आपुली हा भवसागर तरताना ।
वचन देते फैय्याजताई काव्य मला हे स्फुरताना ।।

– मृदुला दामले

आमच्या फैयाजताई

ताई म्हणजे दया आहे
ताई म्हणजे माया आहे
ताई म्हणजे प्रेम आहे
आम्हां सर्वांची त्यांच्यावर भक्ती आहे.
ताई म्हणजे निःस्वार्थपणा आहे
ताई म्हणजे त्याग आहे
ताई म्हणजे दानत आहे
आम्हां सर्वांची त्यांच्यावर श्रद्धा आहे.
ताई म्हणजे धर्म आहे
ताई म्हणजे कर्म आहे
ताई म्हणजे कर्तव्य आहे
आम्हां सर्वांमागे तिचे बळ आहे.
ताई म्हणजे ताई आहे
ताई म्हणजे आई आहे.
ताई एक मैत्रीणही आहे.
आम्हाला तिचा खूप अभिमानही आहे.
तिच्या शुभेच्छा तिचे आशीर्वाद
आम्हाला तिची आहे भक्कम साथ
पाठीवरील आश्वासक हात
अखंड राहो आनंदाची बरसात
अशा या ताईसाठी मागते मनांत
ताईला आमच्या ठेव सुखात
अजूनही आहे तिचे तरुण मन
प्रेमळपणा हेच आहे तिचे धन
साऱ्यांचे वतीने देते शुभेच्छा !
देव करो त्यांच्या पूर्ण इच्छा !!

– सौ. ज्योती पाध्ये गाडगीळ

प्रकाशयोजना - कशासाठी करावा हा अट्टाहास ?

पुण्याचे प्रतिथयश नाट्यकर्मी श्री प्रदीप वैद्य हे एक लेखक, संगीतकार, कथालेखक, नट, कवी व विशेषतः एक उत्तम प्रकाश-योजनाकार आहेत. शिक्षणाने M.B.B.S (डॉक्टर) असणारे प्रदीप वैद्य नाट्य-वेडापायी फक्त 'नाटकच' करतात. नाट्यासंबंधीच्या सर्व तांत्रिक गोष्टी व अभिनयासंबंधीचं प्रशिक्षण ते आपल्या "Expression लॅब' या कार्यशाळेत देतात- दिग्दर्शक, संगीतकार, प्रकाशयोजनाकार, नट, संयोजक अशा अनेक भूमिका निभावताना त्यांनी सुमारे ६० नाटकांसाठी कामे केली आहेत आणि त्यासाठी त्यांना META (mahendra excellence Award) सन्मान २०१२, झी गौरव २००८, भालबा केळकर अॅवार्ड २००७-२००८ असे अनेक पुरस्कार प्राप्त आहेत.

प्रदीप वैद्य

मी माझ्या कॉलेजच्या दिवसात एकच नाटकाचं शिबिर केलं होतं. त्या शिबिरातल्या सरांचे शब्द मला अजून, सतत आठवतात. ''नाटक करायला तीनच गोष्टी अत्यावश्यक आहेत. सादर करणारी व्यक्ती, सादर करायची जागा आणि प्रेक्षक. इतर कशाचीही नाटकाला आवश्यकता नाही.'' या विधानाकडे आज जेव्हा मी प्रकाशनयोजनेच्या क्षेत्रात काही मनाजोगं काम करून काही महत्वाच्या व्यक्ती, संस्था यांच्याकडून प्रशंसनीय ठरल्यावर पाहातो तेव्हा मला त्याचा खरा अर्थ समजतो. मध्यंतरीच्या काळात या विधानात सांगितल्याप्रमाणे खरंच काहीही न घेता मी माझं नाटक करायचा प्रयत्न केला तेव्हा नाटकाच्या तीन मुख्य घटकांमधला एक म्हणजे प्रेक्षक खूपच चिडले... काय हा भिक्कारपणा? अशा प्रकारच्या प्रतिक्रिया देत निघाले.

मग जर नाटकाच्या एकंदर पसाऱ्यात प्रकाशयोजनेचं काम एखाद्या पूरक घटकाचंच असेल तर त्यासाठी प्रकाशयोजनाकार हा सर्व साधारणपणे महत्वाचा का ठरतो? प्रकाशयोजनाकार नाटकाच्या तालमीला सर्वात शेवटीच का येतो किंवा बोलावला जातो? तो जे करतो ते रंगमंचावरून आपल्याला नीटसं आकळत नसलं तरीही प्रेक्षक कधी कधी काय छान प्रकाशयोजना, किंवा किती भिकार प्रकाशयोजना असं काही कसं काय म्हणतात आणि ते कशावर ठरतं? एखादा प्रकाशयोजनाकार नक्की कशामुळे श्रेष्ठ मानला जातो? नाटक पाहून हे कसं ठरतं की प्रकाशयोजना अशी अशी करावी ? गेल्या प्रयोगाच्या नंतर माझा प्रकाशयोजनाकार माझ्याकडे मारक्या बैलासारखा बघत का गेला, किंवा तुला स्पॉट घ्यायची अक्कल कधी येणार असं का म्हणाला? वगैरे प्रश्न नाटक करणाऱ्या प्रत्येकाला भेडसावू लागतात.

नाटक हा कलाप्रकार ज्या प्रकारच्या कथनातून जन्माला आला त्या आदिम कलाप्रेरणेच्या मुळातही प्रकाश ही बाब महत्वाची मानून हे कथन केलं जात असणार. म्हणजे असं म्हणता येईल की एखादा आदिम मानव जेव्हा जंगलात पाहिलेल्या एखाद्या प्राण्याचं वर्णन आपल्या वस्तीतल्या इतरांना सांगत असेल तेव्हा त्याने किंवा कोणीतरी त्याला विशिष्ट पद्धतीने उभं राहाण्याची प्रेरणा दिलीच असेल की ज्यामुळे तो सर्वांना नीट दिसेल. पुढे पुढे दवंडीवाले, लोककलाकार, शाहिरी करणारे, कीर्तनकार ह्या सर्व लोकपरंपरांमध्येही ''सादरीकरणाच्या स्थाना''च्या विचाराला चिकटूनच प्रकाश असण्या-नसण्याचा विचार होत असेल. मग पुढे नाटक बंदिस्त जागांमधल्या एका चौकटीत स्थिरावल्यावर त्याच ''सादरीकरणाच्या स्थाना''ला एका प्रकारे कृत्रिमरीत्या प्रकाश ''पुरवावा'' लागेल हे ओघानेच आलं. मग ह्या प्रकाश पुरवण्याच्या तंत्रामधे जे जे बदल होत गेले त्यात मशाली, चूड, पेट्रोमॅक्स तसच सोडालाईमच्या कांड्या, टंग्स्टन फिलामेंट आणि आता एल् ई डी पर्यंत आपण येऊन स्थिरावलो. ह्या प्रत्येक प्रकाशस्रोतासोबत तंत्रज्ञांनी विविध काळात, विविध प्रकारचे प्रयोग करून पहात हा पुरवठा विविध कारणांनी, विविध कारणांकरता नियंत्रित करू पाहाण्याचे प्रयत्न चालूच ठेवले. म्हणजेच ''पुरेसा किंवा मुबलक प्रकाश असावा'' ही एखाद्या स्थानी काही सादर होण्याकरता असलेली आंतरिक किंवा नैसर्गिक गरज आता ''अतिरिक्त'' गरज आणि ती ही संपूर्णपणे कृत्रिमरीत्या नियंत्रणाखाली आणता येईल अशी गरज बनत गेली. हा प्रवास पाहिला तर एक सर्वात महत्वाची गोष्ट आपल्याला विसरता येत नाही आणि तीच प्रकाशयोजनेचं पहिलं तत्व मानायला हरकत नाही ती म्हणजे... प्रथमतः नाटक दिसावं यासाठी प्रकाशयोजना असते. आधी सांगितल्याप्रमाणे मराठी नाटकांपुरतं बोलायचं झालं तर प्रयोगशील नाट्यचळवळीचं सातत्य जे एका बाजूलाच पाडलं गेलंय किंवा पडत आलं आहे, ते सोडल्यास, बहुतांश हौशी किंवा व्यावसायिक रंगभूमीवर प्रकाशयोजना बहुत करून ''नाटक लख्ख दाखवण्या'' पलिकडे फारसं काम करताना दिसत नाही.

आपण मराठी नाटकात मर्यादित वापर करीत असलो तरीही, नाटकामधे प्रकाशयोजनेला अनन्यसाधारण महत्व आहे हे नक्की. या दृक्-श्राव्य कलेच्या श्राव्य भागावर मराठी नाटकाची जडणघडण प्रामुख्याने अवलंबून असलेली दिसते पण कलेच्या अंगभूत आणि मूलभूत तत्वांमधे दृश्य हा ही घटक महत्वाचा असल्याने प्रकाशयोजना हा नाटककलेचा एक अविभाज्य घटक ठरत जातोच.

नाटकाच्या दृश्य परिणामामधे सर्वात महत्वाचा घटक असतो तो नट. खरंतर नाटक हे नटाचंच माध्यम म्हणून जागतिक रंगभूमीवर ओळखलं जातं. म्हणजे नटाला आणि नटाने जे काही करायचं त्याला पूरक होत जाणं आणि त्या नटाच्या आविष्काराची परिणामकारकता वाढवणं, किंवा अधिक अर्थवाही करणं अशी प्रकाशयोजनेची जबाबदारी ठरते. आधुनिक अभिनयाच्या प्रकारात नट केवळ ठळकपणे दिसणं नाटकाच्या दृश्यामानतेत अपरिहार्य मानलं जात नाही. नट कधी अपुरा दिसणंही त्यात आवश्यक असू शकतं हे मान्य केलं गेलं आहे. ह्या सर्व बाबी विचारात घेतल्या तर नटाच्या कामाच्या समांतर प्रकायोजनाकाराचं काम चालणार हे उघड आहे. त्याचप्रमाणे रंगमंचावरील नेपथ्य. मंचवस्तु (प्रॉप्स) यांच्याशीही प्रकाशयोजनेचा काही विशिष्ठ मेळ असणं आवश्यक आहे.

नाटक करताना नटाला जसे विविध प्रश्न विचारून स्वतःच्या भूमिकेची वाट शोधावी लागते तसंच काही प्रमाणात प्रकाशयोजनाकाराला करावं लागतं. कधी आणि कुठे ह्या प्रश्नांवर काही ठोस उत्तरं मिळतात. नाटक ज्या जागेत म्हणजे (रंगमंच नव्हे तर) प्रसंग घडण्याची नाटकातील जागा काय आहे, दिवसाचा तो प्रहर काय आहे, प्रकाशाचं प्रमाण तिथे किती असू शकेल, काही दिवे किंवा प्रकाशाच्या विशिष्ठ साधनांची योजना त्या जागेत अभिप्रेत आहे का, हा काळ (म्हणजे एकंदर काळ-आधुनिक, ऐतिहासिक अशा प्रकारे) कोणता आहे, रंगमंचावर पात्रांच्या येण्याजाण्यासोबत प्रकाशाची साधनं येणं जाणं किंवा त्यांनी (अभिनयाचे नव्हे, तर खरेखुरे) दिवे लावणं-विझवणं अशा प्रकारांचा उलगडा कधी आणि कुठे ह्या प्रश्नांमुळे होतो. बऱ्याचदा ह्या प्रश्नांची उत्तर संहितेत असतात, म्हणजे ती लेखकानेच लिहून ठेवलेली असतात. याचाच अर्थ प्रकाशयोजनाकाराने संहिता वाचणं हे महत्वाचं ठरतं. कारण ती वाचून ही माहिती मिळाल्यास दिग्दर्शकासोबत प्राथमिक चर्चेतून आपल्याला त्या दृष्टीने काही विशेष तयारी करावी लागणार आहे का, म्हणजे विशिष्ठ रंगाचा प्रकाश पाडायचा असल्यास तसे रंगीत कागद मिळवावे लागणार आहेत का हे कळतं. इथे हे ही सांगावं लागेल की यासाठी विशिष्ठ फिल्टर्स् मिळतात. त्यांचे शेकडो रंग असतात. स्टेशनरीच्या दुकानात मिळणारे जिलेटिन इथे वापरायचे नसतात. रंगच नाही तर काही वेळा साधनांचाही विचार नीट करावा लागतो. आजकाल रंगमंचावर उघडी ज्योत, आग वापरता येत नाही, खरे कंदिल वापरता येत नाहीत. मग त्या दृष्टीने काही विशिष्ठ प्रकारे बॅटरीवर चालणारे चार्ज करता येतील असे कंदिल तयार करता येतात, दिवट्या, मशालीही अशाच पद्धतीने करता येतात, पण हे सर्व करायला वेळ लागतो आणि तो संहितेतून डोकावल्यास तालमी चालू असताना व्यवस्थित मिळवता येतो.

अजून एक प्रश्न असतो कोण... हा प्रश्न प्रकाशयोजनाकारासाठी दुहेरी असतो. नाटकातली पात्रं कोण आहेत हे जाणून घेतल्यास पुन्हा त्यांची परिस्थिती, काळ, त्याच्या आजूबाजूची एकंदर वातावरण निर्मिती यांचा विचार त्याला जोडूनच येतो. याशिवाय हे नाटक करणारी मंडळी कोण, म्हणजे नाट्यसंस्था, त्यातले कलाकार, त्या संस्थेची एकंदर नाटक करण्याविषयीची धारणा, व्यावसायिकता, प्रकाशयोजनेला गौण किंवा महत्वाचं समजणं वगैरे भाग ह्या प्रश्नाने समजतात. अर्थातच जो काही सृजनात्मक विचार करायचा आहे तो काय पद्धतीच्या वैचारिक आणि आर्थिक वातावरणात आपल्याला करायचा आहे, त्याकरता किती स्वातंत्र्य आपल्याला मिळणार आहे ह्याची कल्पना आधीच येते. आणि ते आधीच माहीत असेल तर जास्त सोयीचं नक्कीच ठरतं.

कधी, कुठे आणि कोण यानंतरचे महत्वाचे प्रश्न असतात का, किंवा कशासाठी, कसं आणि किती ? हे मुद्दे मात्र एकंदरच नाटकाबद्दलची जाण जितकी विस्तारलेली तेवढे अधिक महत्वाचे होत जाणारे असतात. एखादं नाटक लेखकानं का लिहिलंय इथपासूनच ते सुरू होतात. ह्यामधे नाटकाचा आकृतीबंध (फॉर्म) काय आहे तो तसा घेण्यामागं काही कारणं असतील तर ती काय? त्या आकृतीबंधाने लादलेल्या अशा काही विशिष्ठ दृश्यात्मक तरतुदींची गरज आहे काय अशा प्रश्नांचा मागोवा प्रकाशयोजनाकाराला घ्यावा लागतो. ह्यामध्ये प्रकाशयोजनाकाराच्या कार्यप्रणालीच्या दृष्टीने उपस्थित होणारे हेच प्रश्न प्रकाशयोजनाकाराला एकंदर व्यवस्थापनाच्या दृष्टीने काही आणखीही उत्तरं देत जातात. म्हणजे असं की समजा एखाद्या नाटकात नेपथ्य असं काही फारसं नसेलच आणि आकृतीबंध मुक्त ठेवत दिग्दर्शकाने प्रकाशयोजनेवरच सर्व भर ठेवायचा निर्णय घेतला असेल तर ह्या नाटकाबाबत असा निर्णय काय घेतला गेला आहे हे सृजनात्मक दृष्ट्या जसं महत्वाचं आहे, तसंच व्यवहार या पातळीवरही ते समजलं पाहिजे आणि त्यातून पडणारे किती आणि कसं ह्या प्रश्नांची उत्तर मिळवली पाहिजेत ही प्रकाशयोजनाकाराची निकड होऊन बसते. ह्या नाटकाचे वारंवार प्रयोग होणं अभिप्रेत आहे का? किती वेळ प्रत्येक प्रयोगाआधी पूर्वतयारीसाठी मिळणार आहे? असे याबाबतीतले प्रश्न सोडवले गेले की नंतरच प्रकाशाची काही योजना आखता येणं शक्य असतं.

या सर्वांतून काही माहिती देणाऱ्या बाबी किंवा काही ढोबळ प्रकाशसंकेतांचे आभास निर्माण करता येतात. म्हणजे दिवसाचा प्रहर, घरातली किंवा नाटकातील पात्रांच्या घरातली आर्थिक स्थिती, नाटक किंवा प्रसंग घडण्याची नेमकी जागा, नेपथ्यातील काही महत्वाच्या गोष्टी, समुद्र किंवा जलाशय, खिडकी, दरवाजा, खिडकीबाहेरील प्रकाशाची साधनं, घरातील इतर प्रकाशसाधनं, वीज जाणं, वीज येणं अशा प्रकारच्या बाबींचं सूचन योग्य साधनांच्या आधारे करता येणं शक्य असतं. या शिवाय सूक्ष्म पद्धतीने नाटकाचा विचार करताना अधिक तरल पातळीवर जाऊन याच सर्व बाबींचा वेगळा विचार करून किंवा त्यासाठी विशेष साधनांची योजना करून नाटकाचा किंवा प्रसंगाचा किंवा त्यातल्या अभिनयाचा परिणाम किंवा आशय अधिक गडद किंवा गहन करता येणं शक्य असतं.

सृजनात्मक विचारामध्ये महत्वाचं हे की रंगांचा योग्य विचार करावा लागतोच. प्रकाशाचाच नव्हे तर नेपथ्याचा आणि कलाकारांच्या वेशभूषा आणि प्रसंगी रंगभूषेचाही रंग विचारात घ्यावा लागतोच. प्रकाशाचे रंग आणि वस्तूंचे रंग यांतला भौतिकशास्त्रीय फरक लक्षात घ्यावा लागतो. शास्त्रीय परिभाषेत याला लाइट कलर्स आणि पिगमेंट कलर्स असं म्हणतात. थोडक्यात असं की रंगद्रव्यांचे रंग एकमेकात मिसळून जे रंग करता येतात तेच आणि तसेच प्रकाशाचे रंग एकत्र केल्याने तसंच मिश्रण होत नाही हे लक्षात घ्यावं लागतं. उदाहरणार्थ निळा आणि पिवळा असे पिगमेंट कलर्स (म्हणजे रंगपेटीतले रंग) एकत्र करून हिरवा हा रंग तयार होतो हे सर्वांनाच माहित आहे. पण निळा आणि पिवळा असे जिलेटिन पेपर्स एकाला एक जोडून ते प्रकाशझोतामधे आणले तर त्याप्रमाणे हिरवा रंग मिळत नाही. यासाठी रंगांच्या सी एम् वाय के ह्या रंगद्रव्यांच्या मूलभूत रंगांचा विचार बाजूला पडून आर जी बी ह्या प्रकाश रंगाच्या मूलभूत रंगाचा विचार महत्वाचा ठरतो. ली फिल्टर्स, रॉस्को अशा विविध कंपन्यांनी तयार केलेले विशेष फिल्टर्स आता भारतातही उपलब्ध होतात. ते मिळवण्यामध्ये थोडेफार कष्ट तर नक्कीच पडतात पण सुरक्षिततेच्या दृष्टीने आणि सृजनात्मक परिणामाच्या पातळीवर जे हवंय तेच साधण्यासाठी प्रत्येक रंगाचं विभाजन कितीतरी सूक्ष्म फरकांच्या शेड्स मध्ये करून देत उपलब्ध होणाऱ्या ह्या फिल्टर्सचा आग्रह आपण धरला पाहिजे. एखाद्या नाटकाच्या आकृतीबंधामधे कवितेसारख्या काही आशयाच्या दृष्टीने संदिग्ध जागा असतील तर त्या छायाप्रकाशाच्या खेळाने, रंगांच्या असण्या-नसण्याने अधिक आशयगर्भित करता येतात. सावल्यांचा अर्थाच्या दृष्टीने वापर करता येतोही आणि एखाद्या चकचकीत नाटकात एकही सावली पडू नये यासाठी दिवे आणि रंगांचा कल्पक वापर करता येतो. सादरीकरण आशयाच्या दृष्टीने अधिक परिपक्व होण्याच्या दृष्टीने जर प्रकाशयोजनाकार काही करू इच्छित असेल तर नेपथ्यकाराला नेपथ्य निर्मितीच्या आणि योजनेच्यावेळीच काही मुद्दे सांगून ते नेपथ्यात अंतर्भूत करता येतात. यामध्ये उदाहरण द्यायचं तर घराच्या नेपथ्यात ठळकपणे वापरता येतील अशा लॅम्पशेड्स्. आजकाल नाटकांमध्ये दृश्य प्रतिमा विशेषतः व्हिडिओ प्रोजेक्शनचा वापर खूप प्रमाणात आढळतो. प्रकाशयोजनाकाराला याची दखल घेत प्रकाशयोजना करावी लागते. प्रोजेक्शनवरील प्रतिमेला जेव्हा महत्व असेल आणि तेव्हाच जर तिच्यासमोर नाटकातील काही इतर घडणार असेल तर प्रकाशयोजनेतून नाटक अर्थपूर्णरीत्या दिसत राहून ती प्रतिमाही उत्तम दिसत राहील ह्याची खात्री करावी लागते.

प्रकाशयोजनेचा आराखडा ठरवताना व्यावहारिक आणि सृजनात्मक असे सर्व मुद्दे लक्षात घेतले की मग साधनसामग्रीचा विचार हा महत्वाचा असतो. साधनसामग्री म्हणजे किती दिवे आवश्यक आहेत, किती उपलब्ध आहेत, नसलेले दिवे कुठून उपलब्ध करता येतील. त्यांची रचना रंगमंचावर करून घेण्यासाठी किती वेळ लागणार आहे, पैसे किती लागणार आहेत, हा सर्व विचार करावा लागतो. मराठी नाटकांचा सर्व व्यवहार हा बराचसा टूरिंग थिएटर प्रमाणेच चालतो. म्हणजे साडेचार ते पाच तासांच्या कालावधीसाठी नाट्यगृह भाडे कराराने घेतलेलं असतं आणि त्या तेवढ्या वेळात नेपथ्य, प्रकाश आणि इतर तंत्रव्यवस्था करून, प्रयोग करून, ते सर्व पुन्हा आवरून अन्य ठिकाणी हेच पुन्हा करत जायचं असा हा प्रकार असतो. परदेशांमधे नाटक सादर होताना ते एकाच रंगमंचावर महिनोनमहिने वारंवार सादर केलं जातं. अर्थातच मराठी नाटकांच्या प्रकाशयोजनेमध्ये वेळ आणि साधनसामग्रीच्या चलनवलनाच्या दृष्टीने सुलभीकरणाचा मुद्दा महत्वाचा ठरत राहातो. नाटक करण्याच्या या पद्धतीमुळे व्यावसायिक नाटकांमधे आजवर प्रकाशयोजनेवर भर देणारी नाटकं अभावानेच सादर झाल्याने निर्मात्यांनाही प्रकाशयोजनेवर एका मर्यादेपलीकडे खर्च अनावश्यक वाटत राहातो. तसं धाडसही अपवादात्मकच आहे. या सर्वांचा विचार नियोजनात्मक पातळीवर भुतासारखा मानगुटीवर (स्वतःहूनच) बसवून घ्यावा लागतो.

म्हणजेच प्रकाशयोजनेचा जो एकंदर आवाका आहे तो ठळकपणे दोन प्रकारच्या कामांमधे विभागता येईल. एक विभाग संपूर्णपणे तांत्रिक स्वरूपाच्या कामांचा आणि दुसरा वैचारिक किंवा नियोजनात्मक कामांचा, या विभागातच एक सृजनात्मक कामांचा टप्पा अंतर्भूत आहे. कामाच्या प्रत्यक्ष स्वरूपात मात्र बहुतांश वेळा यांचा क्रम बरोब्बर उलटा असतो. म्हणजे प्रकाशयोजनाकार कामाच्या पहिल्या टप्प्यावर जे काम करतो ते

सृजनात्मक स्वरूपाचं काम असतं. त्यानंतर नियोजनात्मक काम सुरू होतं आणि या नियोजनातून प्रत्यक्ष साकारलं जातं ते काम हे संपूर्णतया तांत्रिक स्वरूपाचं असतं. पण तरीही ह्या सर्वांमध्ये एक धागा असतो. तो धागा हा सृजनात्मक कामातून सुरू झालेला असतो. त्याने हे सर्व काम बांधलेलं असतं. काही प्रकाशयोजनाकारांच्या बाबतीत या तांत्रिक कामाचा शेवटचा टप्पा म्हणजे प्रयोगाच्या वेळी प्रकाशाचं प्रत्यक्ष नियंत्रण करणं हा टप्पा आणि पहिला सृजनात्मक टप्पा यांचं नातं पुन्हा इतकं उत्तम जुळवलं जातं की त्यांच्या कामातून एक प्रकारची चेतना प्रयोगाला मिळू शकते. प्रकाशामधून ही ऊर्जा शेवटी नटाला मिळत असते. नटाची ऊर्जा, ही ऊर्जा असं एक समीकरण साधलं जाऊन ती ऊर्जा शेवटी प्रेक्षकाला मिळते. असा हा ऊर्जेचा तेजोमय खेळ, प्रेक्षागृहांमधे सर्वसाधारणपणे सर्वांच्या मागे असलेल्या एका अंधाऱ्या खोलीतून स्वतः अंधारात बसून करावा लागतो. त्या अर्थी स्वतः प्रकाशझोतात येण्याच्या शक्यताही कमीच असल्याने स्वतःच्या कामानिमित्त फार मोठं नांव न होण्याच्या तयारीनेच हे सर्व करावं लागतं. मराठी प्रेक्षकांना प्रकाशयोजनेचं खरं महत्वही फार अभावानेच कळत आलं आहे असा सर्वसाधारण अनुभव आहे. पण ते बऱ्याचदा कलाकारांनाही फारसं जाणवत नाही. त्या अर्थी मराठी नाटकांच्या (आजवरच्या) दुनियेत प्रकाशयोजनाकार हा बऱ्याचदा गृहीतच धरला जाणारा प्राणी आहे हे मात्र नक्की.

कशासाठी करतो आपण हा अट्टाहास, असा सवाल उभा करणारे कितीतरी प्रसंग येत राहातातच. पण स्वतः अंधारात असताना हा छायाप्रकाशाचा खेळ करण्यातून जे साधलं जात त्याचं महत्व अंतर्यामी कळलं की मात्र या एक प्रकारच्या कृतज्ञताहीनतेचं काहीही वाटत नाही. नवीन नाटकाची तालीम पाहाताना त्याची प्रकाशयोजना करण्याबद्दलची आव्हानं पट्टीच्या प्रकाशयोजनाकाराच्या मनात नव्या शक्याशक्यतांची बीजं स्वतःहूनच पेरायला सुरूवात करतात.

❑

भगवानराव पंडीत यांनी बालगंधर्व यांच्या घेतलेल्या मुलाखतीचे शब्दांकन

बालगंधर्व

शोभा लोकूर :

ललित लेख आणि कविता प्रसिद्ध. व्यवसाय. शारदोत्सव समिती आणि मंथन या संस्थांची कार्यवाह. (बालगंधर्वांबरोबर झालेला संवाद सिडी स्वरूपात श्री. अशोक देशपांडे यांच्या संग्रहातून उपलब्ध झाला आहे.)

शब्दांकन – शोभा लोकूर

मी आठव्या वर्षी किर्लोस्कर कंपनीत रुजू झालो. माझ्या वडिलांची परिस्थिती नव्हती. मालेगावला असताना ते मारुतीच्या देवळाजवळ घसरून पडले व आजारी झाले. आईचे एक बाळंतपण अवघड होऊन बराच खर्च झाला होता. हजार दोन हजार कर्ज झाले होते. आर्थिक टंचाई मुळे मला नाटकात जाण्याशिवाय पर्याय नव्हता. माझ्या वडिलांची मी नाटकात जावं अशी इच्छा नव्हती. कारण माझे दोन मामा नाटकात होते. वामनमामा हा वाशीमकर कंपनीत तर वासुदेव मामा नाट्यकलेत होता. दोघांकडेही पैशाची वानवाच. त्यामुळे नाटकात जाऊन काय पैसे मिळवणार असे वडीलांना वाटायचे.

कंपनीत जायच्या आधी पंडित महाराजांकडे कोल्हापूरला रहायचो. त्यांनी मला शाहूमहाराजांपुढे गायला लावलं. महाराजांना जेव्हा समजलं की मला एका कानाला ऐकायला येत नाही तेव्हा ते म्हणाले, तू मिरजेला जा. महाराजांचं किर्लोस्कर कंपनीवर फार प्रेम. चार ते सोळा वर्षापर्यंत मी जळगावला होतो. तिथे मला गाण्याची आवड व ओढ असल्याने किर्लोस्कर कंपनीची नाटकं पाहिली होती. महाराज मला मिरजेला घेऊन आले तेव्हा कंपनीची परिस्थिती बरी नव्हती. स्त्री कलाकारांची उणीव होती. गणपतराव बोडसनी माझ्याकडून शारदाची भूमिका बसवून घेतली. मी ते काम केलं, सर्वांना आवडलं पण घरच्यांचा रोष ओढवून घेतला. कोल्हापूरला माझी मावशी होती ती मिरजेला जी आली आणि मला मालेगावला पोचवूनच परत गेली. मी कशीबशी आईची समजूत घातली व परत कंपनीत आलो. मी पुण्याला आलो. माझे वडील दत्तुमामाना म्हणाले. तू पैसे खाऊन माझ्या मुलाला नाटकात घातलेस. पण तेव्हा तिथे लोकमान्य टिळक होते. ते वडीलांना म्हणाले काळजी करू नका आमचीच कंपनी आहे. वडिलांची टिळकांवर श्रद्धा होती. त्यांनी खात्री दिल्यानंतर पुढे वडीलांनी विरोध केला नाही. मग मी नाटकात कामे करायला सुरुवात केली.

ऑक्टोबर १९०५ ला मी कंपनीत आलो व १९०६ ला माझे लग्न झाले. माझ्या आईने माझ्या लग्नाची गडबड केली कारण तिला वाटायचे, हा जर नाटकात काम करायला लागला तर याला मुलगी कोण देणार. कारकीर्दीच्या सुरुवातीसच आई, दत्तुमामा व शंकरराव यांच्या आग्रहास्तव इच्छा नसतांनाही मला पारगावच्या लक्ष्मीबाई हिच्याशी विवाह करावा लागला.

गोविंदराव देवलना माझा आवाज फारसा आवडत नसे पण माझ्या मालकांनी मला सांभाळून घेतल्याने मी कंपनीत टिकून राहिलो. काही कारणाने देवल कंपनी गेली. नंतर मी गणपतराव बोडस यांच्याकडे. पण माझी संगीताची उत्तम तालीम काकासाहेब खाडिलकर यांच्याकडे झाली. रोज तीन ते सहा ते शकिवत. रात्री दहाला परत, त्यांच्या दृष्टीने ज्यांची तालीम कच्ची वाटेल त्यांना घेऊन बसत. पण ते भूमिका इतक्या सुंदर समजावून सांगत, एका भूमिकेचा दुसऱ्या भूमिकेशी संबंध काय, नाटक कशावर आहे, नाटकात कशावर जोर आहे, अगदी शब्द न शब्द असे घोटून घेत, कि सारे परत रात्री पण त्यांच्यासमोर बसत असत. मला तरी ते स्वतंत्र पण शिकवत.

समुद्रकिनारी घेऊन जात, तिथे एकांतात अभिनय शिकवत. मानापमान, स्वयंवर, सावित्री, मेनका सर्व भूमिका त्यांनी माझ्याकडून घोटून घेतल्या. गुरुजी (भास्करबुवा) पण तालिमिला बसत. गद्य व पद्य तालिमी एकत्र चालायच्या. एकेका नाटकाच्या तालमी चार सहा महिने चालायच्या. आमचे जीवन तेव्हा कॉलेज विद्यार्थ्यांसारखे होते. आम्ही त्या वेळी ज्या गावात नाटक करायचो तिथे काहीवेळा महाराष्ट्र नाट्य मंडळी पण यायची. त्यांची पण एकदोन नाटके लागायची. आमच्या मालकांना ती आवडायची. भाऊराव कोल्हटकरांच्या इ.स. १९०१ मधील निधनानंतर कंपनी चालवणे सोपे नव्हते. नानासाहेबाना गाणं कुणी शिकवलं असेल तर काकासाहेबांनी. प्रत्येक तान नीट आलीच पाहिजे असा त्यांचा आग्रह असे.

माझी रंगभूमीवरील कारकिर्द किर्लोस्कर संगीत मंडळी या नाट्यसंस्थेत इ.स. १९०५ साली सुरु झाली. मात्र तिचे एक भागीदार नानासाहेब जोगळेकर यांच्या इ.स. १९११ मध्ये निधनानंतर संस्थेत वाद झाले. परिणामी इ.स. १९१३ मध्ये मी, गणेश गोविंद (गणपतराव) बोडस आणि गोविंदराव टेंबे यांच्यासह ती संस्था सोडली आणि गंधर्व संगीत मंडळीची स्थापना केली. त्यानंतर ३ सप्टेंबर १९१३ साली 'मूकनायक' हे नाटक करून गंधर्वयुगाची सुरुवात केली. त्यानंतर संगीत शकुंतला, संगीत मानापमान, संगीत सौभद्र, संगीत मृच्छकटीक, संगीत संशय कल्लोळ, संगीत शारदा, संगीत स्वयंवर, संगीत विद्याहरण, संगीत एकच प्याला अशा विविध नाटकातील स्त्रीच्या भूमिकेतून रंगभूमीवर भूमिका केल्या. २१ वर्षाच्या स्त्रीपार्टीच्या भूमिकेतून बाहेर होत 'वीरतनय' या नाटकात शूरसेनाची भूमिका केली. त्यानंतर नाटकानी मिळवलेल्या लोकप्रियतेच्या जोरावर त्यापुढच्या सात वर्षात कंपनीने सर्व देणी फेडली. मात्र त्यापुढच्या काळात या संस्थेची आर्थिक स्थिती चढउताराचीच राहिली.

गंधर्व कंपनी कर्जातून बाहेर पडावी यासाठी केशवरावांच्या बरोबर नाटके करावी असे माझे मत होते. पण गणपतराव बोडस, भास्करराव गुरुजी यांना ते पटत नव्हते. केशवरावांची नाटके मी आधी पाहिली होती. केशवराव लाथ मारीन तिथे पाणी काढीन अशा बाण्याचे होते. गाणारे खंदे होते. आवाज चांगला करडा होता पण अभिनयात ते जरा डावे होते. टिळक स्वराज्य फंडाकरता त्यांच्याबरोबर संगीत मानापमान केले. ९०० रुपये मिळाले. दोघांनी ४५० - ४५० वाटून घेतले. अजूनही पुढे नाटके करायची इच्छा होती पण दुर्दैवाने केशवरावांचे निधन झाले.

मी ८-१० वर्षाचा असेन, काका यशवंत यांच्याकडे मी सहज म्हणून पुण्याला फिरण्यासाठी गेलो असताना 'केसरी' या वर्तमानपत्राकडून गाण्याचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. माझे गुरु मेहबूब खां यांनी मी एकदोन तास गाऊ शकेन अशी माझी गाण्याची तयारी पण करून घेतली होती. मी कार्यक्रम करायचो पण कधी जरीचे उपरणे कधी जरीची टोपी अशी खुशाली पण मिळायची. केसरी वर्तमानपत्रात यशवंत काका काम करत असल्याने मला तिथे गाण्याची संधी मिळाली. त्यावेळी प्लेग आला होता. लोकमान्य गावाबाहेर रहात होते. माझे आजोबा अप्पाशास्त्री बाबा महाराजांकडे पुराण सांगायला जात, माझी आई कृष्णाबाई बाबा महाराजांकडे गुरुवारी भजन आरती गायची. बाबा महाराज व लोकमान्य चांगले मित्र होते. त्यामुळे लोकमान्य माझ्या आजोबांना ओळखत होते. त्यामुळे ते मला अप्पाशास्त्रीचा नातू व कृष्णाबाईचा मुलगा म्हणून ओळखत होते. त्या कार्यक्रमात गायलेल्या 'हरवा मोरा देव बंधवा', 'ना तर मै गारी दुंगी, ना रहूंगी तुम्हीसो बलमा' हे गीत गायल्यानंतर लोकमान्यांनी मला 'बालगंधर्व' ही पदवी बहाल केली. केसरीच्या पहिल्या पानावर झळकत नारायण हे नाव संपूर्ण महाराष्ट्रभर ' बालगंधर्व' नावाने प्रसिद्ध झाले. गाणं असचं पुढे चालू ठेव अस ते मला म्हणाले.

बडोद्याला निळकंठेश्वराचे मंदिर होते. भाऊरावांचे थोरले बंधू आप्पाराव तिथे होते. तिकडे आमचे नेहमी जाणे होई. नाटक तर व्हायचीच पण नाटक संपल्यावर पुन्हा गाण्याची मैफल रंगायची. आमच्या गुरुंची गाणी व्हायची. कधीही थकवा किंवा कंटाळा येत नसे. भाऊरावाना मी जरी पाहिलं नाही तरी माझी त्यांच्यावर अतिशय श्रद्धा आहे. ते फार देखणे तर होतेच व त्यांच्या आवाजाची सर दुसऱ्या कोणाला नाही असं सगळे म्हणायचे. अण्णासाहेबांच्या एका मांडीवर भाऊसाहेब व दुसऱ्या मांडीवर त्यांची भाची व मागे मोरुबाबा, काशिनाथपंत असा एक फोटो होता. किर्लोस्कर कंपनीत असताना नाटकांच्या प्रयोगाआधी त्या फोटोला पंचायतन म्हणून नमस्कार करून आम्ही प्रयोग सुरु करत असू. दत्तोपंत हल्याळकर भाऊरावांची हुबेहूब नक्कल करीत. ती नक्कल लोकांना आवडत असे.

गंधर्व आणि किर्लोस्कर कंपनीत काम करणाऱ्यांशिवाय केशवराव व दिनानाथराव यांची गाणी पण लक्षणीय असत. दैवी देणगी व गुरूची कृपाच ती. दिनानाथांच्या गाण्याला तर मी चमत्कारिक हाच शब्द म्हणेन. पण चमत्कारिक म्हणजे चांगल्या अर्थाने. त्यांची गाणीही त्यांच्याचसाठी होती. सुंदर ताना घेत सहज लयीवर यावं ते त्यांनीच. गद्य काम करणाऱ्यांमध्ये गणपतराव शाहूनगरवासी यांना तर मी देवच मानतो. नट सम्राट करावा तर त्यांनीच. ते काय आमचं काम नव्हे. शंकररावांसारखा तर माणूसच नाही. ते फार नशीबवान, त्यांना बाजीराव केळकरांसारखे गुरु लाभले. शेक्सपियर त्यांनी समजावून सांगितला. शेक्सपियर किती पुण्यवान माणूस होता ते गणपतरावांचं नाटक पाहून आम्हाला समजले. काकासाहेब खाडिलकर, बाजीराव केळकर, पाठक भाऊ अशी माणसे म्हणजे नाटक कंपन्यांची अमोल ठेव होती. एखादी भूमिका समजावून देणे, कलाकाराकडून हुबेहूब वठवून घेणे यासाठी ते निरपेक्ष अपार मेहनत घेत.

त्यामुळे संगीत नाटक आणि नाट्यसंगीत हे कलाप्रकार मध्यमवर्गीय महाराष्ट्रीय कुटुंबांमध्ये लोकप्रिय झाले. नाटककार अण्णासाहेब किर्लोस्कर, गोविंद बल्लाळ देवल, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, काकासाहेब खाडिलकर, राम गणेश गडकरी आणि वसंत शांताराम देसाई प्रभृतींनी लिहिलेली अनेक संगीत नाटके मी केली. गडकरींच्या एकच प्याला मधली सिंधू मी करीत असे. सिंधूचे संवाद बोलताना गडकरी किती थोर माणूस आहे जाणवत रहायचं. आज असं वाटतं जर गडकरी जिवंत असते तर अजून किती भूमिका त्यांनी मला दिल्या असत्या व अजून किती अजरामर भूमिका माझ्या वाटयाला आल्या असत्या कोण जाणे.

स्वरातील चढ उतार, शुद्ध उच्चार, शब्द लयीमध्ये फेकणे, शब्द न तोडता अर्थ समजावून घेणे यासर्वांचं बाळकडू आम्हाला तालीमीतच दिलं जायचं. साधारण वाक्याला जी लय किंवा सूर असे त्याच सुरात पद द्यायचे. शोकरस, शृंगाररस प्रत्येक वेळी वेगळी धून. आम्ही फार नशीबवान कि असे गुरू मिळाले. आम्ही कितीही विचार केला, मेहनत घेतली तरी गुरुकृपा आणि आशीर्वाद, पुण्याई असल्याशिवाय काहीही साध्य होत नाही हे खरे. अलाउद्दीन खां जे माझ्या गुरुंचे गुरु ते माझं गाणं आवडीने ऐकायचे. ही गुरुकृपाच नाही का. माझे गुरु म्हणजे माझ्या आयाबहिणीच! आणि नाटकातील गाणीच वेगळी असतात. चांगला गाणारा चांगला अभिनय करेलच असे नाही. मी माझी स्वतःची कंपनी असून पण कधी कंपनी कारभारात लक्ष घातलं नाही, तिचे आर्थीक व्यवहार पाहिले नाहीत. मी फक्त माझी भूमिका व नाटक सजवणे यावर लक्ष केंद्रित करायचो. बाळासाहेब पंडित मॅनेजर असताना कंपनीला कर्जमुक्त करण्यासाठी त्यांनी एक कल्पना मांडली. बुधवार, शनिवार, रविवार आपली नाटके करायची व सोमवार, गुरुवार इतर नाटके करायची. त्यासाठी आम्ही गुर्जरांचे अशोकवन, अप्पा टिपणीस यांचे आशा निराशा तसेच ना.भी. कुलकर्णी यांचे पण एक नाटक बसवले होते.

१९३० पासून बोलपटांचा जमाना आला. काळाच्या बदलानुसार लोकांनी रंगभूमिकेकडे पाठ फिरवली व सिनेमाकडे त्यांचा कल झुकल्याचे बघून व्ही शांताराम यांच्या आग्रहाने प्रभात कंपनीच्या 'धर्मात्मा' या चित्रपटातील संत एकनाथांच्या सात्विक भूमिकेतून मी चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. पण रंगभूमीवरचा अभिनय मला श्रेष्ठ वाटतो. माझे मन सिनेमात रमले नाही.

मला बरेचजण विचारतात कि तुमची आवडती भूमिका कोणती. मला वाटते प्रत्येक भूमिका चांगलीच असते. प्रत्येक भूमिका निराळी असते. मन लावून त्या भूमिकेत शिरणे गरजेचे असते. मी संगीत सौभद्र, संगीत मृच्छकटिक, संगीत शाकुंतल, संगीत मानापमान, संगीत संशयकल्लोळ, संगीत शारदा, संगीत मूकनायक, संगीत स्वयंवर, संगीत विद्याहरण, संगीत एकच प्याला सह एकूण २५ विविध नाटकांत भूमिका केल्या. पण माझी प्रत्येक भूमिका मला आवडतेच. आणि एखादी भूमिका रंगायला, उठावदार व्हायला सहकलाकार पण तेवढ्याच ताकदीचे लागतात. योग्यवेळी योग्य साथ देणे ही पण एक कला आहे. यासाठी मी सदाशिव रानडे व बापू माने यांचे उदाहरण देईन.

संगीत नाटक उठावदार व्हायला साथीदारांचं पण तेवढंच योगदान असतं. सुरुवातीच्या काळात फक्त पायपेटी असायची. कधी कधी हार्मोनियमचा नुसता स्वर लावून ठेवायचो. नंतर तंबोरा आत ठेवून मृदुंग वाजवायचो. हळूहळू तबला, ऑर्गन, सारंगी यांचा समावेश झाला. सर्वांची साथ इतकी बेमालूम असायची कि गाणे न रंगून करतंय काय. कादरबक्ष, तिरकवा यांच्यावर पण रसिकांनी भरभरून प्रेम केलं. नाटकामुळे या कलाकारांच्या गुणांचे पण चीज झाले.

नेपथ्य म्हणा किंवा प्रकाश योजना याबाबतीत पण अनेक स्थित्यंतरे मी पाहिली आणि अनुभवली आहेत. मी लहान असताना झालर असलेल्या खोबरेल तेलाच्या दिव्यांच्या प्रकाशात मी नाटके पाहिली आहेत. नंतर ४० नंबरचे दिवे, १४ नंबरचे फुट लाईट असत. मी किर्लोस्कर कंपनीत असताना कार्बाईटचे दिवे होते. नंतर ते अलाउद्दीन नावाचे गॅस (gas) दिवे आले. पण विजेचे दिवे आले आणि नाटक करणे जास्त सुखकारक व परिणामकारक झाले. नाटकाच्या नेपथ्यासाठी आवश्यक महालाचे, अरण्याचे पडदे मात्र किर्लोस्करांच्यापेक्षा नाट्यकलेकडे चांगले होते. मला आठवतंय कान्होपात्रा नाटकाच्यावेळी पंढरपूरच्या विठोबाच्या देवळाचा देखावा केला होता. यातही मातब्बर कलाकार त्यावेळी होते. काही पारशी, गुजराथी नाटक कंपन्या पण तेव्हा अस्तित्वात होत्या. पारशी लोकांकडे नेपथ्य सामग्री चांगली असायची. गुजराथी नाटकांमध्ये विनोदी भाग उगाच घुसडलेले असायचे. पण त्यांची पण नाटके चांगली व्हायची. आम्ही एक उर्दू नाटक पण बसवले होते. उर्दू नाटकात गाण्यात विविधता असायची. नाटकांसाठी मखमलीचा पडदा (drop) ही कल्पना मी सुरू केली.

पूर्वीच्या लोकांचे आवाज दमदार असायचे. तेव्हा कुठे मायक्रोफोन होते. पण आता थियेटर पण मोठी असतात. आणि स्त्रियांच्या भूमिका पण स्त्रियाच करतात. त्यामुळे आवाज पोचण्याच्या दृष्टीने मायक्रोफोन गरजेचे आहेत. मला बरेचदा विचारलं जात कि पदांची वेळ ठरवून तुम्ही गात होता का. पण ते तसं नसायचं. कितीदातरी वन्स मोअर मिळायचे. चार चार वेळा तेच पद गाईलं गेलं तर नाटकाचं वेळापत्रक बिघडायच. त्यामुळे त्याक्षणी त्याचा अंदाज बांधून गावे लागे.

भारत सरकारने १९५५ ला मला 'संगीत नाटक अकादमीतर्फे' राष्ट्रपती पदक देऊन गौरविले. मी आता रंगभूमीवरून निवृत्त झालो आहे. गुरूंच्या कृपेने इतकी वर्षे रंगभूमीची सेवा करायला मिळाली. पण मनात एक गोष्ट होती. ५००० लोक आरामात बसतील असं एक थिएटर असावं, तिथे रहाण्याची सोय असावी. कपडेलत्ते, दागदागिने उपलब्ध असावेत तर नाटक कंपनी कमी त्रासात दर्जेदार नाटकांची निर्मिती करू शकतील. बघूया असा दिवस कधी येईल तो.

– संकलन – अशोक देशपांडे
शब्दांकन – शोभा लोकूर

❑

With Best Compliments from.....

SOUTH KONKAN EDUCATION SOCIETY

Tilakwadi-Belgaum-590006

Our Institutions : -

- R.P.D Degree College of Arts & Commerce
- R.P.D PU College of Arts & Commerce
- G.S. Science Degree College
- G.S. Science PU College
- G.S. College of Computer Application
- R.P.D College of Business Administration
- Thalakwadi High School
- Swadhyay Vidya Mandir High School
- V. M. Shanbhag Marathi School
- Shri M. R. Bhandari Kannada School
- Agricultural Research Centre
- G.S.S. College Coaching Academy
- SKE Society's Sports Academy
- G.S. Sc. PG Department (Organic Chemistry)
- IGNOU Study Centre, Belgaum

Shri. R. D. Shanbhag
Chairman
S.K.E. Society, Belgaum.

काकडेकाका - एक नाट्यप्रवास

महाराष्ट्रातील प्रायोगिक नाट्य चळवळीत साठ वर्षे सक्रीय प्रायोगिक नाटक हाच एकमेव जीवित हेतु मानणारे एक झपाटलेले व्यक्तिमत्व म्हणजे अरुण काकडे. १९५६-१९६० पर्यंत रंगायन आणि १९७१ पासून आजतगायत 'अविष्कार' अशा दोन प्रायोगिक नाट्यसंस्था यशस्वीपणे चालविणारे 'काकडे काका' २०१४ च्या पंढरपूरच्या अ.भा.म.नाट्य संमेलनाचे अध्यक्ष होते. २०० हून अधिक प्रायोगिक नाट्यकृतींची निर्मिती लेखन. श्री. अरुण काकडे यांची डॉ. अरूण प्रभुणे यांनी घेतलेली ही मुलाखत.

(अक्षर वाङ्मयच्या सौजन्याने)

अरुण काकडे

गेली साठ वर्षे प्रायोगिक रंगभूमीवर कार्य करणारे श्री. अरुण काकडे हे कला शाखेचे पदवीधर आहेत. प्रा.भालबा केळकर ह्यांच्याकडून पाच वर्षे नाट्यविषयक मार्गदर्शन त्यांना प्राप्त झाले व त्यांच्याकडेच श्री. काकडे ह्यांनी प्रशिक्षणही घेतले.

मुंबईतील 'रंगायन' आणि 'आविष्कार' या दोन नाट्यसंस्थांचे ते संस्थापक सदस्य आहेत. 'आविष्कार' नाट्यसंस्थेचे १९७१ पासून आजतागायत पदाधिकारी आहेत. २००८ पासून ते या संस्थेचे अध्यक्ष आहेत. या दोन्ही नाट्यसंस्था कार्यरत ठेवण्यात व त्यांद्वारा नाट्यनिर्मिती करण्यात त्यांचा मोठा वाटा होता. 'आविष्कार' बाबत तर आजही आहे. 'आविष्कार' तर्फे होणाऱ्या नाट्यनिर्मितीचे ते आजही सूत्रधार आहेत.

महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक पुरस्कार, उत्तम गुणीजन पुरस्कार, सह्याद्री दूरदर्शन वाहिनीचा नाट्यरत्न पुरस्कार, झी दूरदर्शन वाहिनीचा जीवन गौरव पुरस्कार आदी पुरस्कारांनी त्यांच्या जीवनकार्याला गौरवले गेले आहे.

मराठी नाट्यवाङ्मयाच्या इतिहासात प्रायोगिक नाटकांच्या संदर्भात 'छबिलदास चळवळी'चे अत्यंत मोलाचे कार्य आहे. या नाट्यचळवळीला जन्म देण्याच्या योजनेत सहभागी असलेले, प्रत्यक्ष कार्य करणारे आणि आजही प्रायोगिक नाटकांच्या निर्मितीचे एक सूत्रधार असलेले श्री.अरुण काकडे उर्फ काकडे काका हे गेल्या साठ वर्षापासून प्रायोगिक नाटकांच्या चळवळीतील एक महत्वाचे रंगकर्मी आहेत.

डॉ.अरूण प्रभुणे : १९६० नंतरच्या प्रायोगिक नाटकापासून आपण चर्चेला सुरूवात करूयात की त्या पूर्वीचे नाटक आधी विचारात घेणे योग्य वाटेल?

अरूण काकडे : साठीच्या आधीपासून आपल्याला विचार करावा लागेल असं मला वाटतं. ज्याला सुवर्णकाळ म्हणतात त्याप्रमाणे गंधर्वांची नाटकं, केशवराव भोसल्यांची नाटकं, दीनानाथांची नाटकं, ही त्यावेळची नाटकं, आणि त्याच्या नंतरची नाटकं, ही आपली परंपरा. या दरम्यान सिनेमाचं आक्रमण झालं आणि कंपन्या बंद पडायला लागल्या. त्या वेळच्या स्थित्यंतराच्या काळात आपल्याला रांगणेकरांचं आणि अत्र्यांचं महत्व विसरता येत नाही. रांगणेकारंनी संगीत नाटकातील गाण्यांच्या मैफिली थांबवल्या आणि छोटी छोटी अशी चार पाच मिनिटांची पदं ठेवली. नाटकं सुटसुटीत केली. नाटकांबरोबर एकांकिकेचेही प्रयोग रांगणेकरांनी केले. रांगणेकरांचं महत्व यामध्ये आहे. प्रल्हाद केशव अत्र्यांनी 'मोलियर' आणला आणि चित्रपटाला जर टक्कर द्यायची तर लोकांचं मनोरंजन जास्तीतजास्त कसं होईल हे पाहिलं. विनोदी नाटकांची निर्मिती 'बालमोहन' या नाट्यसंस्थेनं म्हणूनच केली. त्यामुळे प्रेक्षक नाटकाकडे पुन्हा वळायला लागला; तर अत्र्यांची नाटकं आणि रांगणेकरांची नाटकं अशा प्रकारची आहेत. यानंतर जीवन जसे जसे गतिमान होत गेले तसा तसा नाटकाचा कालावधी कमी कमी होत गेला.

डॉ.प्रभुणे : बरोबर आहे तुमचं. तर मी तुम्हाला असं विचारीत होतो काका, की आज ज्याला आपण प्रायोगिक नाटकाची चळवळ म्हणतो ती केव्हापासून सुरू झाली असं तुम्हाला वाटतं? आणि तिची का निकड वाटली?

अरूण काकडे : वेगळं केलं पाहिजे असं वाटत होतं. आतापर्यंत काही वेगळं करायला मिळत नव्हतं पण काही तरी वेगळं करायला मिळणार आहे याचा आनंद वाटत होता.

दुसरी गोष्ट म्हणजे ह्या निमित्तानं त्यावेळी नवीन नाट्यसंहिता लिहायला सुरूवात झाली. पुरुषोत्तम दारव्हेकरांनी लिहिलं, विजय तेंडुलकरांनी लिहिलं. बोलपटांच्या आक्रमणामुळे नाटक कंपन्या बुडू लागल्याने आणि प्रेक्षकांनी रंगभूमीकडे पाठ फिरवली

असल्याने 'नाटक कुणासाठी लिहू?' असं जे वाटत होतं ते आता वाटेनासं झालं आणि मग नाट्यस्पर्धांच्या निमित्ताने काही नवीन नाटककार नाटकं लिहायला लागले.

डॉ.प्रभुणे : तेव्हा तुम्ही कुठे होता?

अरूण काकडे : त्यावेळेला म्हणजे १९५१ ते ५६ पर्यंत पुण्यात भालबा केळकरांच्या हाताखाली मी शिकत होतो. अनुभव घेत होतो. चार वर्ष मी भालबांच्या हाताखाली या माध्यमाचा तसा शास्त्रीयदृष्टीने अभ्यास न करता मी अनुभव घेतला. आपली ॲक्टिव्हिटी नाट्यस्पर्धेपुरतीच न राहता ही ॲक्टिव्हिटी वर्षभर चालली पाहिजे असं माझं म्हणणं होतं.

डॉ. प्रभुणे : पण त्यातला पाहिला असा कोणता प्रयोग केलेला आठवतो तुम्हाला? वेगळा, म्हणजे रांगणेकरांच्या नाटकापेक्षा ज्याचं वेगळेपण आहे असा कोणता नाट्यप्रयोग सादर केला गेला?

अरूण काकडे : नाही, त्याच्यामध्ये असं झालं की १९५४-५५ साली किंवा त्या दरम्यान विजय तेंडुलकरांचं 'मुंबई मराठी साहित्य संघा'मध्ये 'गृहस्थ' हे नाटक झालं. 'साहित्य संघा'च्या महोत्सवात दामू केंकरेनी केलेलं ते नाटक हे तेंडुलकरांचं पाहिलं नाटक. 'गृहस्थ' हे एकदम निराळंच आहे. तोपर्यंत 'साहित्य संघा'ची पारंपरिक नाटकं चालू होती. त्यांचा महोत्सवसुद्धा पारंपरिक नाटकांचा होता. याच्यामध्ये डॉ. अ. ना. भालेरावांचं महत्व जास्त आहे. दामूला त्यांनी म्हटलं, ''नाटक तू कर. दामू, तू लंडनमध्ये जाऊन नाट्यकलेचा अभ्यास करून आलेला आहेस हे लक्षात घेऊन तुला ह्या महोत्सवात नाटक करायचंय. तुला कोणतं पाहिजे ते तुझ्या पठडीतलं नाटक तू कर.'' मग दामूने तेंडुलकरांच्याकडे जाऊन त्याचं 'गृहस्थ' नाटक मिळवून घेऊन केलं.

डॉ. प्रभुणे : बरं.

अरुण काकडे : नवीन प्रवाहाचं केंद्र तेव्हा 'भारतीय विद्याभवन' होतं. हा सगळा प्रवाह तिथे चालू होता. तिथं एकांकिका स्पर्धा व्हायच्या. १९५५ साली विजयाबाईंनी तेंडुलकरांचं केलेलं 'श्रीमंत' या प्रवाहामधलंच.

१९५२ पासून हे सगळं हळूहळू व्हायला लागलं होतं. 'प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन' म्हणजे पीडीए मध्ये होतं ते. स्पर्धेमध्येच नाही तर इतर वेळेलाही नाटकं केली जायची.

डॉ. प्रभुणे : इंग्रजी नाटकाच्या प्रभावाचा परिणाम असं म्हणायचं का?

अरूण काकडे : अं ऽ नाही-

डॉ. प्रभुणे : का रंगभूमीवर नवीन काही करण्याची निकड?

अरूण काकडे : निकड. अऽर्ज. त्याला आपण अऽर्ज (urge) म्हणतो. अशा एक एक संधी येत गेल्या. ज्यावेळेस सातत्याचा अभाव होता, त्यावेळी सातत्याने करायची जाणीव निर्माण झाली. असा हा प्रवाह आहे. ही ॲक्टिव्हिटी आपण वर्षभर करत राहिली पाहिजे, हे सृजनाचे कार्य होत राहिलं पाहिजे ही जाणीव झाली. हा त्याचा उपयोग झाला. म्हणून मग १९५७ साली वसंत कानेटकरांच 'वेड्याचं घर उन्हात' भालबांनी केलं. मग कानेटकरांची अन्य काही नाटकं भालबांनी केली. त्या काळाचे वैशिष्ट्य हे म्हणावे लागेल की वसंत कानेटकर आणि भालबा केळकर ही लेखक-दिग्दर्शकाची जोडगोळी पुण्यात, तर विजय तेंडुलकर आणि विजया जयवंत ही लेखक-दिग्दर्शकाची जोडगोळी मुंबईमध्ये नाटकं करीत होती.

डॉ.प्रभुणे : म्हणजे नुसती नवे करण्याची निकड नव्हती, गरज नव्हती तर अऽर्ज होती.

अरूण काकडे : हो, गरज नव्हती. नाटक करायची अऽर्ज होती. करून पाहण्याची अऽर्ज होती. नाटकाचा जर आपण विचार केला तर 'स्वान्तसुखाय' करायची ही कला नाही!

डॉ. प्रभुणे : बरोबर आहे. एक समूहाने करायचा हा कलाप्रकार आहे.

अरूण काकडे : बरोबर आहे. एक म्हणजे, समूहाने करायचा हा कलाप्रकार आहे आणि मुळातून जर आपण विचार केला तर नाटक आपण आपल्या सुखासाठी करतो पण त्याचवेळी कुणासाठी करतो हेही तितकंच महत्वाचं आहे. आमचा प्रेक्षक आमच्या दृष्टीने महत्वाचा आहे. आम्ही त्यांच्याकरता करतो. प्रेक्षकांना आम्ही काहीतरी नवीन दाखवतो. नवीन प्रवाह कसे आहेत हे दाखवून त्या प्रवाहात त्यांना सामील करून घ्यायचं ह्या उद्देशानं आम्ही नाटक करतो. काही तरी नवीन स्वीकारायला मानसिकदृष्ट्या प्रेक्षक तयार होईल अशा पद्धतीने आम्ही नाटक करायला लागतो.

डॉ. प्रभुणे : पण नाटक प्रेक्षकानुगामी नको.

अरूण काकडे : नाही. नाही. आता ह्याला काही नवीन शब्द आले. 'प्रेक्षकशरण,' 'प्रयोगशरण,' वगैरे वगैरे. मला ते तसं

नाही वाटत. ह्या संपूर्ण माध्यमाचा एक महत्वाचा घटक प्रेक्षक आहे. प्रेक्षकांशिवाय नाटक होऊ शकत नाही. माझा-आमचा तरूण मित्र सत्यदेव दुबे एकेकाळी म्हणत असे, "I can play to the empty houses." त्यावेळेला ती त्याची जिद्द होती म्हणून असं तो म्हणायचा; पण आता तुम्ही बघा प्रेक्षक असल्याने तोही सुखावतो. जिद्द असल्याने तो म्हणून गेला असेल. तर प्रेक्षक हा महत्वाचा घटक आहे आमचा. त्याला विसरून चालणार नाही.

डॉ. प्रभुणे : पण मग प्रायोगिक नाटकांबाबत असंही म्हटलं जातं, ''प्रेक्षक पाठ फिरवायला लागले. त्यांना नाटक कळेना.'' त्याला काय म्हणाल?

अरूण काकडे : असं नव्हतं झालं. पण केव्हा झालं माहीत आहे का तुम्हाला? जेव्हा आम्ही आयनास्कोला हात घातला तेव्हा! ते 'न-नाट्य' असं काही तरी, (हसत हसत) त्याचा आमच्यावर मारा झाला आणि तिथून मग हे सुरू झालं. आता ते कसं होतं? तर नॉन कम्युनिकेशन. दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपमध्ये जो एक प्रकार झाला त्याने सामाजिकदृष्ट्या आणि वैयक्तिकदृष्ट्या कम्युनिकेशन कसं ते राहिलं नाही. आपण एक बोलतो तर ते दुसरा दुसरं घेतो असं काही तरी निरर्थक (absurd) वाटू लागलं. त्यांच्या डोक्यामध्ये हे असल्यानं ती संकल्पना निर्माण झाली आणि त्या पद्धतीने नाटकं लिहिली गेली. आयनास्को केला त्यावेळेला 'डोक्यावरनं जाणारी नाटकं' वगैरे असं म्हणायला लागले. पण मी म्हटलं, ''ठीक आहे. आयनास्को केला.''

एका नवीन पद्धतीने मग आपले नाटककार या मातीतील नाटकं लिहायला लागले. डिसेंबर १९६० साली पाहिलं नाटक आम्ही 'रंगायन' मध्ये केलं ते शं.गो.साठ्यांचं 'ससा आणि कासव'. अतिशय मध्यमवर्गीय कुटुंबाचं नाटक. नाटक स्पर्धेत ते पाहिलं आलं. त्यावेळेला त्याच्यामध्ये काय केलं आमच्या विजायाबाईंनी? तर दहा-अकरा फुटी सेट असायचे ते न ठेवता साधारणपणे सहा-सात फुटी असे सेट आणून खरोखरच्या चाळीचा भास व्हावा अशा प्रकारचं नेपथ्य केलं. सादरीकरणाची जी स्वाभाविक शैली असते त्या अतिशय स्वाभाविक शैलीमध्ये त्यावेळेला हे नाटक झाल. याप्रकारे कुठेही नाटकीपणा न येता अशी नाटकं सादर व्हायला लागली. नाटकांत असा बदल झाला.

'इंडियन ॲकॅडमी ऑफ ड्रॅमॉटिक आर्टस्' अशी मुंबईमध्ये एक संस्था होती. त्या संस्थेच्या वतीने आम्ही एक नाटक केलं. त्यावेळेला त्यासाठी आमचा एक ग्रुप एकत्र झाला.

डॉ. प्रभुणे : कोण होतं त्या ग्रुपमध्ये ?

अरूण काकडे : त्या वेळेला विजयाबाई 'इंडियन ॲकॅडमी ऑफ ड्रॅमॅटिक आर्टस्' या संस्थेच्या रजिस्ट्रार होत्या.

डॉ. प्रभुणे : पण मराठी रंगभूमीला या वास्तवाचा पुढे जाच व्हायला लागला आणि वास्तवाची मोडतोड करण्याचा प्रयत्न प्रायोगिक नाटकांनी केला असंही म्हटलं जातं.

अरूण काकडे : नाही, ती मोडतोड करायला माझी काही हरकत नाही. मोडतोड करायलाच पाहिजे पण मोडतोड कुणी करावी याच्याबद्दल माझं मत आहे.

डॉ. प्रभुणे : हां, ते काय आहे?

अरूण काकडे : ज्यांना पुर्ननिर्मिती करण्याची ताकद अंगामध्ये आहे त्यांनी आशय, विषय आणि मांडणी या सर्वांची मोडतोड करावी. पण नुसती मोडतोड करू नये तर नवीन काही करायचं असेल तेव्हा मोडतोड जरूर करावी. ''तुला हे करायचं तर जरूर कर पण दुसरं काही तरी नवीन ताकदीनं उभं कर'' असं मी म्हणेन. मी आता तुम्हाला तीन वेगवेगळ्यां काळात केलेल्या प्रयोगांविषयी सांगतो.

एक प्रसंग सांगतो तुम्हाला महत्वाचा. 'आमचं आविष्कार' प्रथम जेव्हा सुरू झालं त्यावेळेस गिरीश कर्नाड ह्यांच्या नाटकाचा तेंडुलकरांनी केलेला 'तुघलक' हा अनुवाद आम्ही सादर केला. काय प्रकार होता 'तुघलक' हा?

डॉ. प्रभुणे : पहिलंच नाटक ना 'आविष्कार'चं?

अरूण काकडे : हो. त्या नाटकानेच आम्ही सुरूवात केली होती. बहुधा ७५ कलाकार त्या नाटकामध्ये होते. दामू केंकरेचा स्तरनिविष्ट सेट होता. त्या सेटला त्याने अर्थ दिला होता. अशा पद्धतीनं रंगभूमीवर सेट निर्माण होणं आणि त्या सेटचा संपूर्ण उपयोग अरविंद देशपांडेनं तितक्याच चांगल्या पद्धतीनं करून घेणं हे अत्यंत महत्वाचं होतं. कोलकत्याचा तापस सेन प्रकाश योजनेत माहीर. त्याने केलेली प्रकाशयोजना तोपर्यंत कुणीही पाहिलेली नव्हती. या नाटकात दिल्ली ते दौलताबाद आणि दौलताबाद ते परत दिल्लीला जाणाऱ्या प्रजेचा प्रचंड लोंढा त्याने केवळ वीस कलाकारांच्या छायांवरून

दाखवला होता. तसेच सरयू दोसी याने त्या काळातील वेशभूषेचा अभ्यास करून वेशभूषा तयार करून घेतली होती. एकजिनसीपणानं असे सगळे घटक एकत्र येतात तेव्हा उत्कृष्ट निर्मिती होते. मग जे प्रॉडक्शन होतं ते जरी आर्थिकदृष्ट्या नुकसानीत गेलं तरी सर्जनशीलतेचं एक समाधान (creative satisfaction) देत असतं. ते समाधान आम्हाला देऊन गेलंय 'तुघलक'. मोडतोड झाली आहे पण नवीन काही तरी निर्माण झालेलं आहे ! आता तुम्हाला दुसरं उदाहरण सांगतो. महेश एलकुंचवारने 'वाडा चिरेबंदी' लिहिलं. विजयाबाईंनी ते व्यावसायिक रंगभूमीवर आणलं. त्यानंतर महेशला वाटलं, 'हे एका पिढीचं झालं.' दुसऱ्या पिढीचं नाटक मग त्याच्या डोक्यात आलं. त्याच संदर्भामधलं. ते नाटक त्यानं लिहिलं. मग तिसरी पिढी त्याच्या डोळ्यांसमोर आली आणि त्यानं तीन नाटकं लिहिली. ही ट्रिलॉजी (trilogy) झाली. आता ही तिन्ही नाटकं एकत्र करायची. मराठी रंगभूमीवरती किंवा भारतीय रंगभूमीवरती असा प्रयोग कुणीच केला नाही. मग आम्ही केला! साडेआठ तास प्रेक्षकांना नाट्यगृहात सलग बसायला लावलं!

डॉ. प्रभुणे : सलग?

अरुण काकडे : हो. सलग! पहिल्या 'वाडा चिरेबंदी' या दोन अंकी नाटकाला एक मध्यंतर. नाटक संपल्यावर अर्धा तास विश्रांती. 'मग तळ्याकाठी'या दुसऱ्या दोन अंकी नाटकाचा सेट लावून मग ते सुरू केलं. मग अर्धा तास विश्रांती दिल्यानंतर 'युगांत' हे तिसरे नाटक सुरू केलं. अहो, 'आविष्कार'ची निर्मिती आहे ती. आमचा चंद्रकांत कुलकर्णी, त्यानं दिग्दर्शित केलं होतं. त्यावेळी व्यावसायिक रंगभूमीवरचे सर्व कलाकार त्या नाटकात होते आणि त्यांनी एकही पैसा न घेता त्या संपूर्ण ट्रिलॉजीत काम केलं होतं. मराठी रंगभूमीच्या दृष्टीने किती महत्वाचा आहे प्रयोग. ईव्हन जागतिक रंगभूमीच्या दृष्टीनंही महत्वाचा आहे हा प्रयोग. दिल्ली ते महाराष्ट्र जवळ जवळ ४० प्रयोग आम्ही या ट्रिलॉजीचे केले. आता तुम्हाला तिसरं उदाहरण सांगतो. चेतन दातार हा माझा तरुण सहकारी. त्याने तर प्रयोग सादर करण्याची नवी 'रंगनृत्यशैली' निर्माण केली. या शैलीची उदाहरणे म्हणजे त्याने स्वत: लिहिलेले 'माता हिडिंबा', महेश एलकुंचवारांचे 'प्रतिबिंब', रवीन्द्रनाथ टागोरांच्या कथेवर आधारलेले 'गिरिबाला'.

नाटक वगळता लिखित रूपातलं जे जे साहित्य असतं ते वाचकांसाठी असतं. नाटक मात्र प्रयोगाच्या उद्दिष्टानेच लिहिलं जातं. परंतु ललित नाट्येतर ललित साहित्य जेव्हा रंगभूमीवर सादर केलं जात असतं तेव्हा त्याला मी नाट्यकृती म्हणतो. कारण ते प्रेक्षकांसाठी सादर होत असतं. या नाट्यकृतींना जगवलं पाहिजे, ही नाटकं जास्तीत जास्त प्रेक्षकांपर्यंत गेली पाहिजेत अशी माझी सातत्यानं भूमिका तेव्हापासून आत्तापर्यंत राहत आली आहे.

डॉ. प्रभुणे : तुमच्या कारकीर्दीत तुम्ही किती नाटकं केली?

अरूण काकडे : आता ढोबळमानाने बघितलं तर आमच्या 'रंगायन'च्या जवळजवळ ३०-३५ नाटकांच्या निर्मितीची संपूर्ण जबाबदारी माझ्या डोक्यावर होती. नाटकांचं संपूर्ण पालन-पोषण करण्याची जबाबदारी मी अंगिकारलेली होती.

डॉ. प्रभुणे : 'रंगायन'चं पहिलं नाटक कोणतं?

अरूण काकडे : 'रंगायन'च्या आधी 'रंगमंच' नावाची संस्था होती. 'रंगायन' जेव्हा आम्ही सुरू केली तेव्हा त्याच्या आधी आमचा हा ग्रुप तयार झाला होता. मग आम्ही 'इंडियन नॅशनल थिएटर' कडे जा, तिथे कर, असं करायचो. आता नाटक तर करत राहिलं पाहिजे ना! म्हणून तिथे त्यांच्या बरोबर कर, 'कुलाबा महिला मंडळ संस्थे'त जा, तिथं कर, असं करीत असू. पण काय व्हायला लागलं, की त्यांचं नाटक झालं की 'तिथून निघून जा' असं व्हायचं. म्हटलं, आम्ही विचार केला, असं करून चालणार नाही. स्वतःची आपली संस्था असली पाहिजे. चांगलं आणि वाईट 'आपलं' असलं पाहिजे. मग आम्ही 'रंगमंच' नावाची संस्था काढली. या 'रंगमंच' संस्थेतर्फे विजय तेंडुलकरांचं नाटक १९५९ साली आम्ही केलं 'चिमणीचं घर होतं मेणाचं'. आमच्या या संस्थेचं हे पहिलं नाटक.विजया जयवंत, विजय तेंडुलकर, अरविंद देशपांडे, सुलभा देशपांडे, माधव वाटवे, राम शितूत, नारायण पै इत्यादी लोक त्या ग्रुपमध्ये होते. याशिवाय ग.वा.बेहरे हे सुरुवातीला काही काळ आमच्या बरोबर होते. त्या काळात त्यांनी आम्हाला अर्थसाह्य केलं होतं.

डॉ. प्रभुणे : 'रंगायन' स्थापन झाल्यानंतरचं पहिलं नाटक कोणतं होतं?

अरूण काकडे : मी सांगितल्याप्रमाणे 'ससा आणि कासव' साठ साली. त्याच्या आधी मी भेंड्यांचं नाव घेतो. आत्माराम भेंड्यांनी सुरुवात केली. सुरुवातीला १९५२ साली त्यांनी 'कलाकार' नावाची संस्था' स्थापन केली होती. त्या संस्थेतर्फे त्यांनी माधव मनोहरांची अनुवादित दोन नाटकं सुरुवातीला केली. मग त्याच्यानंतर दामू केंकरे आले. हा तो काळ. सगळी चहूकडनं एका वेळेला सातत्यानं ही ॲक्टिव्हिटी सुरू झाली.

डॉ. प्रभुणे : कोण कोण होते लोक नाटककारांमध्ये?

अरूण काकडे : मुंबईत तेंडुलकर तर होतेच. नाशिकच्या वसंत कानेटकरांची नाटके पुण्यात होत होती. नागपूरचे पुरूषोत्तम दारव्हेकर, नगरचे मधुकर तोरडमल, मुंबईच वसंत माने, सुरेश खरे, रत्नाकर मतकरी इत्यादी आणखीही नाटककार होते.

डॉ. प्रभुणे : मग यापेक्षा वेगळी नाटकं करण्यासाठी छबिलदासची गरज निर्माण झाली का? आता आपण छबिलदासपर्यंत येतो का?

अरुण काकडे : नाही, आधी काय सांगितलं मी तुम्हाला, ही सगळी नाटकं आम्ही करायचो ती मोठ्या रंगमंचावरती. प्रोसीनियम थिएटरमध्ये आतापर्यंत आपण चर्चिलेली ही सगळी नाटकं व्हायला लागली. पण अशा मोठ्या थिएटरमध्ये सातत्यानं नाटकं करणं आम्हाला आर्थिकदृष्ट्या परवडणार नव्हतं. परंतु आमच्याकडे दुसरी जागा नसायची कुठे.

विल्सन कॉलेजमध्ये त्यावेळी रसिक व नव्या साहित्याचे अभ्यासक वा.ल.कुलकर्णी हे मराठीचे विभाग प्रमुख होते. विजयाबाई त्यांच्या विद्यार्थिनी. विजयाबाईंनी त्यांना तालिमीसाठी जागा देण्याबाबत विनंती केली. ही विनंती त्यांनी लगेच मान्यही केली. त्यामुळे आम्हाला विल्सन कॉलेजमध्ये थोडी जागा मिळाली. अशा प्रकारे वा.ल.कुलकर्णी यांचा अप्रत्यक्षरीत्या सुरुवातीच्या काळात या चळवळीला उपयोग झाला आहे. त्याच्यानंतर 'भुलाभाई मेमोरियल इन्स्टिट्यूट' मध्ये विजयाबाईंच्यामुळं आम्हाला जागा मिळाली. अशा दोन्ही जागा आम्हाला वापरायला मिळू लागल्या, त्या 'भुलाभाई मेमोरियल इन्स्टिट्यूट' मध्ये छोटासा असा हॉल होता आणि त्या हॉलमध्ये प्रथम आम्ही आयनॅस्कोच्या 'लीडर' चे प्रयोग केले. इतरही दुसरे महत्वाचे प्रयोग झाले. विजय तेंडुलकरांची 'मादी', सदानंद रेग्यांची 'पाच दिवस' अशा काही एकांकिका आम्ही तिथे सादर केल्या. इतक्या जवळून नाट्यानुभव घेणं हे अप्रूप आहे असं मग प्रेक्षकांना वाटायला लागलं. प्रेक्षकांना वाटे, आपल्या समोर नाटक होतं आहे पण आपल्यात आणि नाट्यप्रयोगात अंतर किती? तर एक शेकहँडचं अंतर! तिथे अगदी जवळ समोर कलाकार आहेत आणि प्रेक्षक म्हणून आम्ही इथे बसलेलो आहोत. प्रोसिनियम थिएटरमध्ये जे एस्थेटिक डिस्टन्स म्हणून असतं ते इथे नाही. इथे इंटिमसी आली. त्यामुळं चेहऱ्यावरच्या रेषान् रेषा दिसायला लागल्या. पूर्वी कसं, शेवटच्या माणसापर्यंत पोहोचायचं म्हणजे तुमचा आवाज तेव्हढा पोहोचायचा. अभिनयाची जी सूक्ष्मता असायची ती कुठेही पोहोचायची नाही. ती सूक्ष्मता दिसू लागली. तुम्ही जवळ बसल्यानंतर तुम्हाला अभिनय करणाऱ्या कलाकाराच्या चेहऱ्यावरच्या अगदी बारीक बारीक रेषा दिसू लागल्या आणि प्रेक्षक आणि कलाकारांच्यामध्ये एक जवळीक निर्माण झाली. हे फार महत्वाचं होतं.

डॉ. प्रभुणे : फार फार महत्वाचं होतं.

अरूण काकडे : अतिशय सूक्ष्म, तरल अभिनयाच्या छटा दिसायला लागल्या. इतक्या जवळ आपला प्रेक्षक आहे हे कळल्यावर सिक्स्थ सेन्स जागृत ठेवून कलाकारांनाही ते प्रयोग सादर करायला लागायचे. माझ्या मते त्यांच्या दृष्टीने कित्ती मोठ्ठा अनुभव होता. तर यामुळं ते पण झालं. तेव्हा यामुळे मग आम्हाला अशा प्रकारची छोट्या हॉलची निकड वाटायला लागली. कोणत्याही क्षेत्राच्या विकासासाठी जसे संशोधन आणि प्रयोगशीलता हे आवश्यक असते व त्यासाठी जशी प्रयोगशाळेची आवश्यकता असते तशी प्रयोगशाळा आपल्यालाही नाटकासाठी हवी असे वाटायला लागले. आपल्याला जे काही करून बघायचं आहे ते करून बघितलं पाहिजे असं जेव्हा वाटायला लागलं तेव्हा मग छोटासा हॉल असण्याची गरज आम्हाला भासायला लागली. प्रेक्षकांच्या आर्थिक, आणि परिणामाच्या अशा सर्व दृष्टीनेही अशी गरज आम्हाला वाटायला लागली. म्हणून मग 'छबिलदास'च्या आधी

'भुलाभाई इन्स्टिट्यूट' मध्ये तशा पद्धतीने आम्ही प्रयोग सुरू केले. तरीही पण प्रोसिनियम थिएटरचा राबता मात्र तोडला नाही.

डॉ. प्रभुणे : बरं, तिकडेही चालूच ठेवलं?

अरूण काकडे : कारण १९६३ साली विजय तेंडुलकरांचं 'मी जिंकलो मी हरलो', 'कावळ्यांची शाळा' ही नाटकं किंवा तेंडुलकरांची दुसरीही नाटकं आम्ही केली. शं. गो. साठ्यंचं 'ससा आणि कासव' केलं. श्री. ना. पेंडशाचं 'यशोदा' नाटक केलं. ह्या नाटकांची गरज मोठ्या थिएटरची होती. छोट्या थिएटरची नव्हती. कारण छोट्या थिएटरचा जो अवकाश होता तो या नाटकांसाठी आम्हाला पाहिजे तेवढा नव्हता. रंगभूमीसाठी जे इतर घटक आहेत त्या घटकांचा तिथे उपयोग करता येणार नव्हता. जे दृश्य स्वरूपाचे घटक आम्हाला पाहिजे असायचे, त्याची गरज असायची. सेट पाहिजे असायचा, त्याच्या अवकाशाची व्याप्ती आम्हाला पाहिजे असायची. ती तिथे नसायची. त्यामुळे एक म्हणजे या काही रिस्ट्रिक्शन्स आणि दुसरे म्हणजे आम्हाला या नाटकांसाठी हवा असलेला जास्तीचा प्रेक्षक. यासाठी प्रोसिनियम थिएटरची नाळ आम्ही तोडली नाही.

आम्ही त्यावेळेला 'भारतीय विद्याभवन' मध्ये रविवारी सकाळी जाऊन प्रयोग करायचो. 'साहित्य संघा'त आमचे प्रयोग व्हायचे. त्यावेळी गिरगाव हेच सांस्कृतिक केंद्र होतं. नंतर पुढं सरकत गेलं आणि दादरमध्ये आलं आणि आता तर सर्व मुंबईभर पसरलं आहे.

काही वर्षांनी आमच्याकडनं 'भुलाभाई' गेलं तेव्हा विल्सन कॉलेजच्या क्लासरूममध्ये आम्ही नाटक केलं. महेश एलकुंचवार यांच्या 'होळी' आणि 'सुलतान' या एकांकिका सायन्स क्लासरूममध्ये पायऱ्या पायऱ्यांवर प्रेक्षकांना बसवून केल्या. जेव्हा चि. त्र्यं. खानोलकरांचं 'एक शून्य बाजीराव' आम्ही 'रंगायन'च्या वतीनं केलं, तेव्हा इथे विल्सन कॉलेजमध्ये छोटं ॲम्फीथिएटर (Amphi theatre) आहे त्याचा वापर करून आम्ही तिथे ते केलं. नंतर मग जेव्हा 'रंगायन'चे प्रयोग दादर विभागात करायला लागलो तेव्हा आम्ही 'वनमाळी हॉल' मध्ये काही प्रयोग केले. काही प्रयोग 'बालमोहन'च्या छोट्याशा थिएटरमध्ये केले. थोडक्यात म्हणजे, जिथे जिथे आम्हाला अवकाश मिळत होता तिथे तिथे तशा पद्धतीने आम्ही प्रयोग केले. एका नाटकाचे तीन चार प्रयोग. नंतर असं वाटायला लागलं की मोठ्या थिएटरमधून आम्हाला जास्तीत जास्त प्रेक्षकांपर्यंत पोहचता येत आहे. म्हणून मग आम्ही ती नाटकं व्यावसायिक पद्धतीने करायचो. तिकीट लावायचं, तिकीट लावून नाटकं करायचो. मग आम्ही असं सुरू केलं.

डॉ. प्रभुणे : किती साली?

अरूण काकडे : १९६० सालापासूनच. तिकिटं लावून आम्ही नाटकं करायचो. इव्हन 'ससा आणि कासव' च्या वेळी आम्ही बाहेर तिकीटविक्रीला माणूस बसवायचो.

डॉ. प्रभुणे : किती होतं तिकीट?

अरूण काकडे : पाच रुपये तिकीट.

डॉ. प्रभुणे : बरं, मग छबिलदासला कधी गेलात?

अरूण काकडे : त्यावर बोलायचंय, माहिती आहे मला. तिथपर्यंत आलो आता. आधी 'रंगायन'चं पूर्ण करतो.

डॉ. प्रभुणे : करा. करा. पूर्ण करा.

अरूण काकडे : तर अशी 'रंगायन'ची कारकीर्द सुरू असताना नंतर काय झालं, विजयाबाई १९६५ साली लंडनला गेल्या. तीन चार वर्षांसाठी. या परिस्थितीत मग अरविंदनं आपणहून पुढाकार घेतला आणि कार्य पुढं नेलं. थांबायचं नाही आम्हाला. विनाकारण थांबायचं नव्हतं आम्हाला विजयाबाई येईपर्यंत. नाटकं करत राहायचं आणि नाटक करत राहण्यासाठी उद्देश होता आणि आहे, तो म्हणजे नाट्यस्पर्धा. त्या स्पर्धेच्या निमित्तानं आम्ही नाटकं करीत गेलो. त्या स्पर्धेतूनच शेवटी विजय तेंडुलकरांचं महत्वाचं नाटक आलं 'शांतता कोर्ट चालू आहे' ! अरविंद देशपांडेनी बसवलेलं नाटक.

डॉ. प्रभुणे : 'शांतता...' मध्ये तुम्हीही काम केलं होतं वाटतं.

अरूण काकडे : हो. मुळात मी अभिनेता आहे. (शब्दांवर जोर देत) पण मी तिथे जेव्हा या माध्यमाचा विचार करायला अनुभवातून शिकलो, तेव्हा मला असं जाणवायला लागलं की, -आमच्या दुबेंच्या भाषेत बोलायचं तर- मी स्वतःवरच फोकस केलं असतं, तर आरामात बसलो असतो. मी लिहिलं असतं. दिग्दर्शित केलं असतं. सगळं केलं असतं, पण मग ते 'माझं' झालं

असतं. ह्या माध्यमाचं काहीच झालं नसतं. एका उद्देशानं आम्ही जिथे आलो त्या माध्यमाचं काहीच झालं नसतं. कुणी केलं असतं मग?

डॉ. प्रभुणे : म्हणून अभिनयाची आवड असतानाही तुम्ही त्याकडं फार लक्ष दिलं नाही. असंच ना?

अरूण काकडे : I sacrificed my creative urge.

डॉ. प्रभुणे : हं. ते महत्वाचं झालं.

अरूण काकडे : आणि मला त्याचं अजिबात काही वाटत नाही. जेव्हा केव्हा माझ्या सगळ्या सहकाऱ्यांना वाटतं, की ह्यांनी या अमुक नाटकांत काम करायला पाहिजे, केली मी कामं! मी त्यांची निराशा नाही केली. 'शांतता...' यांचं फार महत्वाचं काम केलं. त्यांची निराशा नाही केली.

डॉ. प्रभुणे : पण असं नाटक तुम्ही कधी स्वीकारलं नाही की जे तुमच्यावर केंद्रित होईल. होय ना?

अरूण काकडे : अशी संधी आली नाही खरं तर. पण मी असं एक चांगलं नाटक केलं. देबॉशिश मुजुमदारचं 'ताम्रपट'. त्या नाटकात मात्र महत्वाची भूमिका मी केली होती. अतिशय चांगली भूमिका केली होती.

डॉ. प्रभुणे : तुमचा हेतू असा होता की स्वयंकेंद्रितता नको.

अरूण काकडे : म्हणजे माझं केंद्र व्यापकच आहे. स्वतःवर फोकस मी कधीच नाही केलं. माझ्या दिग्दर्शकांनी मला ज्या भूमिका दिल्या त्या मी यशस्वीपणे साकार केल्या पण आपणहून कधी कोणतीच भूमिका मागण्यासाठी पुढं झालो नाही.

डॉ. प्रभुणे : बरोबर आहे. खूप महत्वाचं आहे ते.

अरूण काकडे : आणि म्हणून तर १९५२ सालापासून आज साठ वर्षं इथपर्यंत प्रवास झाला.

माझा 'रंगायन' मधला सहकारी प्राध्यापक के.ना.वाटवे याचा अतिशय इंटिलिजंट असलेला मुलगा होता माधव. अप्रतिम कलाकार असलेला हा मुलगा आमच्या बरोबर होता. तो नेहमी सर्वांगांनी विचार करायचा. आमच्या डोक्यातही असे विचार कधी यायचेही नाहीत. म्हणायचा, अरूण, मी विचार करतो, ''तू नसता तर काय झालं असतं आमचं? आम्ही केलं असतं का एव्हढं सगळं? तू आमच्या पाठीशी उभा राहिला आहेस. सगळे व्याप, ताप, मनस्ताप, सगळ्या विवंचना तू आपल्या अंगावर घेतल्यास. आम्हाला वेडं केलेलं आहेस.'' ही वस्तुस्थिती आहे. पण मी म्हणतो मी निमित्तमात्र आहे. सृजनाचं कार्य तुमचं आहे. ते घडावं म्हणून मी उभा आहे. सृजन तुमचं आहे सगळं. ते घडावं अशी माझी इच्छा आहे आणि ते सातत्यानं घडत राहवं माझी इच्छा आहे.

डॉ. प्रभुणे : अशी किती नाटकं तुम्ही घडवली?

अरूण काकडे : साठ वर्षांमध्ये जवळजवळ २०० च्या वर झाली असणार. यात एकांकिका, नाटकं, दीर्घांक, कथा, कादंबऱ्या, ललितलेख आहेत. वर्तमानपत्रातले काही लेखही आहेत. हे सगळं त्याच्यामध्ये आलं. पण ही सगळी जी क्रिएटिव्हिटी आहे. त्याचं श्रेय माझ्या सर्व कलाकारांना, सहकाऱ्यांना, सहदिग्दर्शकांना आहे. पण ते घडलं पाहिजे म्हणून मी सतत त्यांच्या पाठीशी आहे.

डॉ. प्रभुणे : आपण आलो होतो छबिलदासपर्यंत.

अरूण काकडे : नाही नाही. त्यानंतर मग विजयाबाई आल्या १९७० सालामध्ये. पुढं 'रंगायन'ची नाटकं चालू राहिली. थोडंसं वातावरण गढूळ व्हायला लागलं. आणि दुर्दैवानं जे घडू नये ते घडलं. 'रंगायन' मधला ताण विकोपाला गेला आणि 'रंगायन' फुटली!

असं झालं. दुर्दैव ते. कुणाचा काही इलाज नव्हता. झालं ते झालं. आणि त्याच्यानंतर मी बाहेर आल्यानंतर दुर्दैवान 'रंगायन' बंदच पडली! ह्याची अजूनही मला रुखरुख लागते. खंत वाटते आणि वाईटही वाटतं. पण आम्ही जेव्हा 'आविष्कार' सुरू केलं तेव्हा ज्या उद्देशाने आम्ही 'रंगायन'चा मेमोरेंडम ऑफ असोसिएशन कॉन्स्टिट्यूशनमध्ये ठेवला होता, तेव्हा तोच मेमोरेंडम ऑफ असोसिएशन आम्ही 'आविष्कार'च्या कॉन्स्टिट्यूशनमध्येही ठेवला. आणि त्याच उद्देशांनी 'रंगायन'चंच कार्य पुढे चालू ठेवलं.

तुम्हाला आता सांगितलं की १९७१ला आम्ही 'आविष्कार' सुरू केलं आणि पाहिलं नाटक 'तुघलक' केलं. पण मी तुम्हाला सांगितलं होतं की छोट्याशा हॉलची जी गरज होती ती आम्ही विसरलो नव्हतो. ती गरज होतीच. आजही आहेच. तेव्हा आम्हाला सगळ्यांना वाटत होतं की कुठे तरी जागा पाहिजे. कारण बाहेर कुठे परवडत नव्हतं. आमचा प्रेक्षकही मर्यादित. काही नाटकांनी तो वाढत गेला. पण तरीही असं वाटत होतं की आमचे सगळेच नवीन नवीन प्रयोग मोठ्या थिएटरमध्ये आम्हाला परवडणारे नाहीत. त्यासाठी आम्हाला कुठे तरी प्रयोगशाळा हवी होती. आणि सुदैवानं छबिलदास शाळा मिळाली.

दादर पश्चिम रेल्वे स्टेशनपासून दोन मिनिटांच्या अंतरावरती ही शाळा आहे. फार जुनी शाळा आहे. त्या शाळेच्या दुसऱ्या मजल्यावरती एक अतिशय चांगला मोठा हॉल आहे. पाठीमागे एक छोटं स्टेजपण आहे आणि त्याच्या पाठीमागे थोडीशी जागा आहे. मेकअपसाठी वगैरे. त्याचा फक्त गॅलरीसाठी वगैरे उपयोग होत असे. त्या शाळेचे काही शिक्षक आमच्या 'रंगायन'चे सभासद होते. त्यांनी आमचं कार्य पाहिलेलं होतं. त्या शाळेमध्ये माधव साखरदांडे नावाचे शिक्षक होते. त्या मुलींच्या शाळेच्या हायस्कूलमध्ये सुलभा देशपांडे शिक्षिका होत्या. जेव्हा अशी गरज वाटायला लागली तेव्हा जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटच्या कार्यकारी मंडळाला विजय तेंडुलकर, अरविंद व सुलभा देशपांडे आणि मी त्यांना जाऊन भेटलो. त्यांच्यापुढं प्रस्ताव मांडला की आता सातत्यानं नाट्यनिर्मितीचं काम करायचं असेल तर आम्हाला छोटासाच असा कुठे तरी हॉल पाहिजे. ही आमची गरज आहे. तुमचा हॉल आम्हाला सोयीस्कर आहे. आमच्या गरजेसाठी जर तुम्ही आम्हाला हा हॉल दिलात तर चांगलं होईल. त्याप्रमाणे आम्ही त्यांना अर्ज दिला. बोलणी झाली. आर्थिक व्यवहारापर्यंत आम्ही आलो. आम्ही त्यांना एवढंच म्हणालो, ''तुम्हाला ह्या हॉलचं वार्षिक उत्पन्न काय आहे, त्यापेक्षा आम्ही कमी देणार नाही. तुमचं जे वार्षिक उत्पन्न आहे तेवढं आम्ही निश्चित तुम्हाला देऊ. त्याच्यापायी तजवीज करू; परंतु आम्ही तुम्हाला देऊ. आणि जास्त मिळालं तर आम्ही ठेवणार नाही.'' असंही त्यांना प्रामाणिकपणे सांगितलं. आम्ही अतिशय प्रामाणिकपणे काम करतो सगळ्या गोष्टींबद्दल. त्यांनी आम्हाला त्याप्रमाणे एका वर्षाकरता हॉल दिला. त्यांच्या परीक्षेत आम्ही कितपत उतरलो हे पाहण्यासाठी आम्हाला काही अटी घातल्या. एव्हढ्या सगळ्या त्या अटींचं आम्ही पालन केलं पाहिजे असं बजावलं. आम्ही कबूल केलं. त्यात मग आम्ही सगळ्यांनी असाही विचार केला, 'हे आपल्यासाठी झालं. पण आपल्यासारखी धडपडणारी मंडळी खूप आहेत. त्यांचीही अडर्ज आहे. तर त्यांनाही हे जे व्यासपीठ आहे ते का उपलब्ध करून देऊ नये?' हा व्यापक दृष्टिकोन आम्ही ठेवला आणि त्याप्रमाणे छबिलदास रंगमंच सगळ्यांना वापरण्यासाठी उपलब्ध करून दिला.

डॉ. प्रभुणे : छबिलदास रंगमंच मिळवण्यासाठी शाळेकडे 'आविष्कार' ही संस्था गेली. म्हणजे तुमच्या 'आविष्कार'च्या लोकांचं हे कर्तृत्व आहे.

अरूण काकडे : हो. 'आविष्कार'चं. किती गंमत असते पहा, ही 'आविष्कारप्रणित' नाट्यचळवळ 'छबिलदास चळवळ' म्हणून प्रसिद्ध झाली!

डॉ. प्रभुणे : हो. तेच मला म्हणायचंय!

अरूण काकडे : आता बघा, छबिलदास हे देणगीदार. कधीतरी मागच्या शतकामध्ये एक देणगी दिली तेव्हा त्यांनी असा काही विचारही केला नव्हता; पण ही 'आविष्कारप्रणित' नाट्यचळवळ ही 'छबिलदास चळवळ' म्हणून प्रसिद्ध झाली!

डॉ. प्रभुणे : तर मग 'आविष्कार चळवळ' ही छबिलदास चळवळ' बनली.

अरूण काकडे : गोष्ट खरी आहे.

डॉ. प्रभुणे : मला असं वाटतं की तुम्ही लोकांनी व्यापक दृष्टिकोन ठेवला होता, हे त्याचं कारण होतं.

अरूण काकडे : निश्चितपणे.

डॉ. प्रभुणे : फक्त 'आविष्कार'चीच ॲक्टिव्हिटी जर त्यात झाली असती तर कदाचित 'छबिलदास चळवळ' म्हणून ती ओळखली गेली नसती.

अरूण काकडे : बरोबर. मी आताच तुम्हाला सांगितलं, 'छबिलदास' काय आहे ते.

आपण चळवळ कशाला म्हणायचं? तर 'सामाजिक असेल, शैक्षणिक असेल, किंवा क्रिएटिव्ह असेल, कुठल्या तरी एका उद्देशानं सर्वांनी एकत्र येऊन त्या उद्देशपूर्तीसाठी कार्य करणं म्हणजे चळवळ.' माझ्या दृष्टीने चळवळीची ही व्याप्ती आहे. त्याची व्याख्या वगैरे मला जमणार नाही. पण 'जो एक उद्देश आपल्या डोळ्यांसमोर आहे, त्या उद्देशासाठी सर्वांनी एकत्र येणं, कोणताच असा विशिष्ट ग्रुप नाही, तर सर्व संस्थांनी एकत्र येऊन त्या उद्देश्यपूर्तीसाठी कार्य करणं' ह्याला चळवळ असं मी म्हणू शकतो. तेव्हढ्या अर्थापुरतीच ही चळवळ आहे.

डॉ. प्रभुणे : हो पण तुम्ही 'आविष्कार'च्या ग्रुपचे लोक फक्त 'आविष्कार' चीच नाटकं शाळेत करू द्या म्हणून शाळेला ॲप्रोच झाले असते तर कदाचित ही 'आविष्कार' चळवळ झाली असती. नाही का?

अरूण काकडे : मग ती चळवळ झाली नसती.

डॉ. प्रभुणे : मग ती 'आविष्कार'ची नाटकं झाली असती.

अरूण काकडे : हो. ती चळवळ नसती झाली.

डॉ. प्रभुणे : नसती झाली. बरोबर आहे.

अरूण काकडे : चळवळीची आता तुम्हाला मी व्याप्ती सांगितली.

डॉ. प्रभुणे : बरोबर आहे. त्यामुळे एका समान उद्दिष्टानं काम करणारी ती सगळीच मंडळी त्यामध्ये आली यामुळेच त्या चळवळीला 'आविष्कार'चे नाव न मिळता 'छबिलदास' मध्ये नाटकं केली जात होती म्हणून 'छबिलदास चळवळ'असं नाव पडलं.

अरूण काकडे : बरोबर आहे. म्हणून 'छबिलदास चळवळ' अस नाव पडलं. पण त्याला थोडी पुस्ती जोडायवी आहे. 'आविष्कार' प्रणित 'छबिलदास चळवळ'; पण पर्यायानं 'आविष्कार चळवळ'.

डॉ. प्रभुणे : म्हणजे इनिशेटिव्ह तुमचा होता म्हणून.

अरूण काकडे : निश्चितपणे. निश्चितपणे. पण नंतर सगळ्या संस्थांचा सहभाग त्यात झाला म्हणून 'चळवळ' ही उपाधी दिली गेली असं मला वाटतं.

डॉ. प्रभुणे : महत्वाचंय. तुम्हाला जे वाटतं ते महत्वाचयं. पण त्यात कोणतं पहिलं नाटक केलं होतं? बरं, तेव्हा पहिल्या वर्षी किती पैसे द्यायचे ठरले होते छबिलदासला? जिज्ञासा म्हणून विचारलं.

अरूण काकडे : त्यावेळेला छबिलदासचा हा हॉल कमर्शियल म्हणून वापरला जायचा नाही. गाण्याच्या मैफिलीसाठी आणि इतर काही कार्यक्रमासाठी वापरला जायचा. एव्हढंच त्याच्यामध्ये होत होतं. गाण्याच्या मैफिली तिथे चिकार व्हायच्या.

डॉ. प्रभुणे : पहिलं नाटक कोणतं होतं म्हणता? कोणत्या साली ते केलं गेलं?

अरूण काकडे : मे १९७४ साली चि. त्र्यं. खानोलकरांचं 'प्रतिमा' हे आमचं तिथं केलेलं पहिलं नाटक. 'प्रतिमा' ही फेअरीटेल म्हणजे परीकथाच आहे. त्यातले सर्व संवाद हे मुक्तछंदात्मक संवाद होते आणि परीकथाच होती ती.

डॉ. प्रभुणे : हे नाटक 'आविष्कार' निर्मित पहिलं नाटक. बरोबर?

अरूण काकडे : हो, 'आविष्कार'चीच निर्मिती आहे ही. म्हणजे 'छबिलदास' मधली पहिली. त्याच्या आधी १९७१ सालापासून आम्ही तीन नाटकं छबिलदासबाहेर केली होती. गिरीश कर्नाड यांचं विजय तेंडुलकरांनी अनुवादलेलं 'तुघलक', सुहासिनी मुळगावकर यांचा म्युझिकल रिव्ह्यू 'बाई एके बाई', बादल सरकारचं पु. ल. देशपांडे ह्यांनी अनुवादलेलं 'सारी रात्र' ही तीन नाटके कमानी रंगमंचवर आम्ही सादर केली. नंतर आम्ही इकडे छबिलदास मध्ये आलो. अशी बाहेरही आम्ही नाटकं करीत होतो.

डॉ. प्रभुणे : कोण काम करीत होतं 'प्रतिमा' त?

अरूण काकडे : हे नाटक सुलभा देशपांडेने दिग्दर्शित केलं होतं. त्याच्यामध्ये डॉ. श्रीराम लागू, अमोल पालेकर, दीपा श्रीराम, स्वतः सुलभा, आणि प्रदीप प्रधान असे हे पाच कलाकार होते.

खानोलकरांना 'प्रतिमा' म्हणजे अक्षरशः मातीची प्रतिमा अभिप्रेत होती. नाटकात जो चर्मकार आहे त्या चर्मकाराने केलेली स्त्रीची प्रत्यक्ष प्रतिमा खानोलकरांना रंगमंचावर पाहिजे होती. पण आमच्या काही लोकांनी असं म्हटलं, प्रतिकात्मक करूया आपण. म्हणून झाडाची फांदी लावली. (दोघे हसतात.) हे पाहिल्यावर खानोलकर अतिशय संतापले माझ्यावर. मी पाठीमागे बसलेलो होतो. आत येऊन म्हणाले, ''नाही. नाही. असं नसतं. नाही जमत.'' एक प्रयोग तसा केला आम्ही. नंतर आम्ही मातीची प्रत्यक्ष स्त्रीप्रतिमा उभी करून नाटकाचे तेरा प्रयोग केले. अशा प्रतिमात्मक गोष्टी ठेवून त्याला काही अर्थ देण्याचा प्रयत्न असतो, तो आम्ही करून बघितला होता.

डॉ. प्रभुणे : हे नाटक तुम्ही कधी सादर केलं होतं?

अरूण काकडे : शाळा संपून सुटी लागली. नंतर त्यांनी हॉल आम्हाला ताब्यात दिला आणि हे नाटक आम्ही केले.

डॉ. प्रभुणे : सुटीमध्येच व्हायची का नाटकं प्रत्येक वेळी?

अरूण काकडे : नाही. नाही. ज्या अटी होत्या त्याच्यामध्ये पहिली अट अशी असायची, आणि आता आमच्या माहीमच्या शाळेतही हीच अट आहे. अट अशी: ''ही शाळा आहे, शैक्षणिक असं हे संकुल आहे. शाळेमधलं जे शैक्षणिक कार्य आहे ते इथे होणार. ज्या वेळेला शाळा सुटेल, त्या वेळेला तो हॉल तुम्हाला तुमच्या ताब्यात मिळेल.'' म्हणजे साधारण पाच-साडेपाचला शाळा सुटली की तो हॉल आमच्या ताब्यात असेल. रात्री अकरा पर्यंत.

डॉ. प्रभुणे : शाळा सुटल्यावर पुढच्या अडीच तीनतासात तुम्ही प्रयोगाची तयारी करायची आणि आठला प्रयोग सुरू व्हायचा. असेच ना?

अरूण काकडे : हो. आठ-साडेआठ जे काय असेल ते. ''ज्या वेळेला तुम्ही जाल, तेव्हा हॉल जसा होता, तसा व्यवस्थित

ठेऊन जायचा. कारण सकाळी इथं मुलांच्या ड्रिल्स होतात, मुलं इथं व्यायाम करतात, त्यासाठी हॉल जसाच्या तसा ठेवायचा.'' ही अट होती. अर्थात ती अट आणि ती जबाबदारी आम्ही स्वीकारलेली होती. म्हणून प्रयोग संपल्यानंतर संबंध हॉल झाडून-पुसून स्वच्छ ठेऊन आम्ही ती जबाबदारी पार पाडीत असू.

डॉ. प्रभुणे : 'प्रतिमा' मध्ये झाड ठेवलं होतं म्हणून खानोलकर नाराज होते, पण प्रयोगाच्या बाकी बाबतीत तरी खानोलकर समाधानी होते का?

अरूण काकडे : निश्चितपणे. निश्चितपणे समाधानी होते ते. खूप समाधान होतं.

डॉ. प्रभुणे : 'प्रतिमा' नंतर 'आविष्कार' प्रणित नसलेलं कुठलं नाटक तिथे झालं?

अरूण काकडे : मला संबंध तो चार्ट पहायला पाहिजे. तुमच्याकडे 'रंगनायक' पुस्तक आहे का?

डॉ. प्रभुणे : आहे.

अरूण काकडे : त्याच्यात असण्याची कदाचित शक्यता असेल. तरी थोडक्यात सांगतो. १९७४ नंतर आमचं हे 'प्रतिमा' झाल्यानंतर जी नाटकं झाली त्यांची नावं आम्ही त्या पुस्तकात दिली आहेत. ऑलरेडी. 'हयवदन' केलं. 'छबिलदास' मध्ये सत्यदेव दुबेजींनी नाटकं केली. त्यांची इतकी नाटकं 'आविष्कार' सोडून कोणीही केली नाहीत. दुबेजींनी मराठी नाटकं केली. हिंदी नाटकंही केली. त्याच्यातलं त्यांचं पाहिलं नाटक इथे झालं 'हयवदन', गिरीश कर्नाडचं.

डॉ. प्रभुणे : 'आविष्कार' सोडून दुसरे जे रंगकर्मी नाटक करणारे होते त्यातले ते पहिले रंगकर्मी आणि त्यांचं पहिलं 'हयवदन' होय ना?

अरूण काकडेट : हो. पहिलं हे. नंतर त्यांनी दुसरं पण नाटक केलं 'सारी रात'. तिसरं नाटक आहे हिंदी 'और एक गार्बो'. चौथं 'अच्छा एक बार और'. दुबेंनी चार नाटकं त्या वर्षी केली 'छबिलदास' मध्ये. 'आविष्कार'नी दोन केली. 'प्रतिमा आणि 'चांगुणा'. त्या वेळेला जयदेव आणि रोहिणी ओक (हट्टंगडी) हे एनएसडीतून ग्रॅजुएट होऊन आले होते. आम्ही सगळ्यांचं स्वागतच करतो. एनएसडीतून जेवढे आले त्या सर्वांचं आम्ही स्वागतच केलं. तसं त्यांचं आम्ही स्वागत केलं आणि त्यांना नाटक दिलं 'चांगुणा'. आरती हवालदार ह्यांनी स्पॅनिश नाटककार Federico Garca Lorca याच्या Yerma ह्या नाटकाचे चांगुणा नावाने रूपांतर केलं होते. दिग्दर्शक जयदेव हट्टंगडी होता. चांगुणाची प्रमुख भूमिका रोहिणी ओकने केली होती. कारण 'नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा' मधून ती स्पेशलायझेशन इन ॲक्टिंगमध्ये ग्रॅजुएट झालेली होती. तर जयदेवने स्पेशलायझेशन डायरेक्शनमध्ये आणि टीचिंगमध्ये केलं होतं. तो आल्यानंतर छबिलदासमध्ये आमच्याकडच्या एज्युकेशनल ॲक्टिव्हिटीज सातत्यानं सुरू झाल्या. त्याचं चांगुणा हे नाटक झालं. चांगुणा नाटक आम्ही त्यावर्षी स्पर्धेमध्येच केलं. स्पर्धेत नाटक करण्याचा उद्देश आम्ही सोडलेला नव्हता आणि आजही सोडलेला नाही. स्पर्धेतल्या ह्या नाटकाला त्या वर्षीचं पहिलं बक्षीस मिळालं. हे पहिल्या वर्षी तिथे 'छबिलदास' मध्ये झालेलं नाटक.

डॉ. प्रभुणे : त्या पहिल्या वर्षात 'छबिलदास' मध्ये सहा नाटकं झाली तर.

अरूण काकडे : नाही नाही, अजूनही झाली. 'बहुरूपी' संस्थेचं 'राजाचा खेळ' हे वृंदावन दंडवतेचं दिलीप कोल्हटकरनी दिग्दर्शित केलेलं, तर 'उन्मेष' संस्थेचं 'चल रे भोपळ्या टुणुक टुणुक' हे अच्युत वझेचं अमोल पालेकरनी दिग्दर्शित केलेलं नाटक. अशी ही दोन्ही नाटकं त्या वर्षी तिथे झाली.

डॉ. पप्रभुणे : म्हणजे आठ नाटकं झाली.

अरूण काकडे : हो, आठेक नाटकं झाली. शिवाय नवोदित अन्य काही नाट्यसंस्थाचे प्रयोगही तिथे होत गेले.

डॉ. प्रभुणे : म्हणजे प्रयोग जास्त झाले, पण नाटकं आठच झाली.

अरूण काकडे : हो. अशी दरवर्षी होत गेली. मोठी लिस्ट आहे. १९७४ ते १९९२ या अठरा वर्षांच्या कारकीर्दीत किती नाटकं झाली, कशी नाटकं झाली, आणि त्या नाटकांचं योगदान किती होतं, हे आपल्याला पाहावं लागणार आहे.

डॉ. प्रभुणे : ते महत्वाचं आहे.

अरूण काकडे : तेच महत्वाचं आहे. या नाटकांनी तुम्हाला काय नवीन देण्याचा प्रयत्न केला? या प्रवाहात कोणकोणते प्रवाह मिसळत गेले, रंगमंचाचा तो अवकाश कसा वापरला गेला. कारण पुन्हा इथे 'इंटिमेट थिएटर'च आहे ते. तिथे प्रोसेडियम नाही, फ्रंट कर्टन नाही. शेकहँड डिस्टन्स ठेवूनच आम्ही तिथे प्रयोग केले. सगळं केलं. खरं तर तो हॉल खूप लांबच्यालांब होता आणि त्याला

पाठीमागे छोटं स्टेजही होतं. पण एवढ्या कमी प्रेक्षकांसाठी एवढा प्रचंड अवकाश वापरणं आम्हाला रास्त वाटलं नाही. त्या हॉलची रुंदी जवळजवळ चौतीस-छत्तीस फूट अशी काही तरी होती.

डॉ. प्रभुणे : म्हणजे प्रेक्षक आणि स्टेज एकाच लेव्हलला असायचे.

अरुण काकडे : हो, पण प्रेक्षकांसाठी आम्ही तीन लेव्हल केल्या होत्या. एक खाली भारतीय बैठक होती, त्याच्यानंतर एक नऊ इंचाची लेव्हल होती. त्याच्यामध्येही भारतीय बैठक होती. त्यानंतर पुन्हा एक लेव्हल होती नऊ इंचांनी वाढलेली. त्याच्यावर आम्ही खुर्च्या ठेवायचो आणि त्यांच्यानंतरही पुन्हा एक लेव्हल होती. त्याच्यावरही आम्ही खुर्च्या ठेवायचो. जवळ जवळ शंभर एक खुर्च्या असायच्या आणि शंभर एक प्रेक्षक खाली बसायचे. असे दोनशे प्रेक्षक त्या 'छबिलदास' मध्ये बसू शकतील एवढी त्याची क्षमता होती.

डॉ. प्रभुणे : हो, पण हे जरी असं उतरतं होतं तरी समोर स्टेज नव्हतं.

अरूण काकडे : नाही. ग्राउंड लेव्हलच होती. जे मोठं स्टेज होतं ते आम्ही वापरलं नाहीच नं. बरोबर मध्ये आम्ही स्टेज करून त्याप्रमाणे झालरी लाऊन घेतल्या, मंडपी तयार करून घेतली, त्याचप्रमाणे वर लाईट्स टांगण्यासाठी बार लाऊन घेतले. त्याला सगळे स्पॉट्स वगैरे बांधून जेव्हढी आवश्यकता असते तेव्हढी प्रकाशयोजनेची व्यवस्था केली. बाहेरही एक छोटी गॅलरी होती. त्या गॅलरीमध्ये आम्ही एक छोटंसं एक कपाटासारखं केलं. त्याच्यामध्ये सगळी लाईट्सची कनेक्शन वगैरे घेऊन, डीमर्स वगैरे ठेवून तिथे सर्व व्यवस्था केली. तिथे एक दार होतं. तिथून प्रत्येक तंत्रज्ञाला सगळा प्रयोग पाहायला मिळायचा आणि त्याप्रमाणे लाईट्सची व्यवस्था करता यायची. हे सगळं आम्ही तिथे करून ठेवलं होतं.

डॉ. प्रभुणे : बाकीच्या संस्था जेव्हा यामध्ये सहभागी होऊन नाटक करायच्या तेव्हा त्यांच्याकडून काही चार्जेस घ्यायचे का तुम्ही?

अरूण काकडे : निश्चितपणे. साधारणपणे भाडं ५० रुपये असायचं.

डॉ. प्रभुणे : लाईट्स, डीमर्स वगैरे जी इक्विपमेंट्स होती ती इन्व्हेस्टमेंट 'आविष्कार'ची होती?

अरूण काकडे : हो. सगळं 'आविष्कार'. सगळं 'आविष्कार'. सगळं 'आविष्कार'चं. सेट्स आणि प्रॉपर्टी, स्टेजला लागणारे लीव्हर्स वगैरे सगळं होतं आमच्याकडे. जे जे काय वापरायचं त्याचं नाममात्र भाडं घेत असू.

डॉ. प्रभुणे : पण मग जेव्हा 'आविष्कार'चं नाटक नसायचं तेव्हा या सगळ्यांवर तुम्ही देखरेख करायचा का?

अरूण काकडे : पहिले पंधरा दिवस आमचा विसू कामेरकर बघायचा. त्याच्या हातात अरविंद देशपांडेनं वही दिली. म्हणाला, "तू सगळी व्यवस्था बघायची". सगळी जबाबदारी त्याच्यावर टाकली. विसूने आठ पंधरा दिवस पाहिल्यावर म्हणाला, "अरविंद, मला शक्य नाही." अरविंद आला आणि मला म्हणाला, "काकडे, वही. आता सगळी जबाबदारी तुझी. मी म्हणालो, "हरकत नाही. मी घेतली."

डॉ. प्रभुणे : म्हणजे, छबिलदास सुरू झाल्यानंतर पंधरा दिवसांनंतरची गोष्ट आहे तर.

अरूण काकडे : हो. पंधरा एक दिवसांनंतरची गोष्ट आहे. म्हटलं, "घेतली जबाबदारी." तेव्हापासून तिथून म्हणजे छबिलदासमधून १९९२ साली बाहेर पडेपर्यंत-तोपर्यंत अरविंदही नव्हता. दुर्दैवाने गेला होता. -जबाबदारी संपूर्ण माझी.

डॉ. प्रभुणे : फक्त एकटे काकडेंची होती.

अरूण काकडे : हो. ऑफिस सुटल्यावर ५-३० ते ६-३० पर्यंत मी तिथे पोहोचलेला असे. माझा बॅकस्टेजचा एक सहकारी होता सीताराम कुंभार - तो अजूनही माझ्या बरोबर आहे - तो आणि मी असायचो. मग कधी जास्त बॅकस्टेज वर्कर लागले तर तो कुठून तरी दोन माणसं आणायचा. त्यांना आम्ही त्याचं वेतन द्यायचो त्या दिवशीचं काय असेल तेवढं.

डॉ. प्रभुणे : पण तुम्ही कधी वेतन नाही घेतलं?

अरूण काकडे : मी नाही घेतलं. उलट काही प्रसंगी स्वतःच्या खिशातून वेळ निभावली आहे.

डॉ. प्रभुणे : ठीक आहे. पण तुम्ही कशात काम करीत होता? म्हणजे कुठल्या ऑफिसमधून तुम्ही यायचा?

अरूण काकडे : मी कस्टम्समध्ये होतो. कस्टम्स अँड सेंट्रल एक्साईजमध्ये होतो. सकाळी १०-३० ते संध्याकाळी ५-३० एवढा वेळ मी तिथे असायचो. मी सगळ्यांना सांगून ठेवलं होतं, मला प्रमोशन नको आहे. प्रमोशन घेतलं तर मी क्लास वन होऊन कुठे बाहेर जाईन आणि असा गेलो तर मुंबईला राहता यायचं नाही. मला इतर काहीही नको. माझ्या स्वतःसाठी मला तीन गोष्टी मिळाल्या तर तेवढ्या मला पुरे आहेत.

डॉ. प्रभुणे : कोणत्या?

अरूण काकडे : एक दोन वस्त्रं नेसायला. दोन कोर भुकेला आणि तीन हात झोपेला.

डॉ. प्रभुणे : तेवढं पुरे आहे!

अरूण काकडे : याच्यापेक्षा मला काहीही नको आहे! आणि तेवढं मला मिळत होतं. माझी अपेक्षाच नव्हती काही.

डॉ. प्रभुणे : म्हणून तुम्ही जास्त वेळ इकडे देऊ शकत होता.

अरुण काकडे : हो. त्यामुळं मी प्रमोशन्स नाकारली, ट्रान्सफर्स नाकारल्या, घरसुद्धा नाकारलं मी.

डॉ. प्रभुणे : तुमचं ऐकलं त्यांनी?

अरूण काकडे : त्यांना पाहिजेच असतं हो असं कुणी तरी. मला ते ''च्यूतिया'' म्हणायचे. ''च्यूतिया काकडे''. (दोघे हसतात) तर असं होतं ते.

डॉ. प्रभुणे : बरं, ऑफिसमधून निघायचे तुम्ही की थेट छबिलदासला.

अरूण काकडे : हो. थेट 'छबिलदास' मध्ये यायचो. 'छबिलदास' मध्ये आल्यानंतर ज्यांची ज्यांची जी प्रयोगाची नड असेल ती बघायची. आमचा सीताराम होता तो त्या त्या प्रयोगाचं सबंध बघायचा. लाईटसाठी एक माणूस ठेवलेला होता. तो यायचा. संपूर्ण लाइटचं बघायचा. आम्ही प्रयोग संपला की हॉल क्लियर म्हणजे होता तसा नीटनेटका करायचो. प्रयोग करणारे गेलेले असायचे. मी आणि सीताराम सगळ्या त्या कंडीशन्सप्रमाणे हॉल क्लियर झाला आहे का नाही हे पाहिल्यानंतर रात्री अकरा साडेअकरापर्यंत बाहेर पडायचो. तो त्याच्या घरी जायचा. मी माझ्या घरी जायचो.

डॉ. प्रभुणे : किती वाजायचे घरी जायला?

अरूण काकडे : बारा वाजायचे.

डॉ. प्रभुने : किती वेळाच्या अंतरावर घर होतं?

अरूण काकडे : दादर ते पार्ला लोकल ट्रेनने साधारण अर्धा तास. इतकंच अंतर.

डॉ. प्रभुणे : एवढंच अंतर. सुदैवानं अंतर फार नव्हतं.

अरूण काकडे : हो, पण त्यावेळेला काय होतं, रिक्षाबिक्षा नव्हत्या नं. एकदा स्टेशनला उतरल्यावर चालत जायला लागायचं घरी. ते पंधरा-वीस मिनिटांचं अंतर असायचं. मला आठवतंय तसं मी रात्री बाराच्या आधी घरी कधी पोहोचलोही नाही आणि जेवलोही नाही. अर्थात त्याचा परिणाम माझ्या प्रकृतीवर झाला. त्या पुढच्या गोष्टी आहेत. ते जाऊ द्या.

डॉ. प्रभुणे : किती वय आहे सध्या?

अरूण काकडे : जन्म १९ जानेवारी १९३२ चा. म्हणजे माझं वय ऐंशी आहे आता.

डॉ. प्रभुणे : तब्येतीवर काय परिणाम झाला तेव्हा? तेव्हा खूप झाला होता?

अरूण काकडे : हो. तेव्हा खूप झाला होता. पण मला जाणीव झाली, आपल्याला कार्य करायचं असेल तर आरोग्याचे काही नियम आपल्याला पाळले पाहिजेत. ही जाणीव आता झाली. आत्ता आत्ता झाली. तोपर्यंत ती नव्हती. धोके सहन करीत होतो मी सगळे. सहन करायची ताकद होती तेव्हा. ॲसिडिटीचा प्रॉब्लेम तेव्हापासून सुरू झाला ना! वेळी अवेळी खाणं सगळं. सगळ्याच गोष्टी अशा होत्या. पण ते जाऊ दे.

डॉ. प्रभुणे : हो. हो. आपलं सहज विचारलं. तर तुम्ही संध्याकाळी तिथे जाऊन सगळं बघायचे. १९७४ पासून किती सालापर्यंत तुम्ही बघायचे?

अरूण काकडे : १९९२ पर्यंत. अहो, 'रंगायन' मध्ये देखील जेव्हा 'भुलाभाई'ला किंवा इतर ज्या ज्या ठिकाणी आमचं वास्तव्य असायचं तिथे मी संध्याकाळी सहाला पोहोचायचो. रिहरसल असतील, प्रयोग असतील, ते सगळं संपवून अशा प्रकारे रात्री बाराला घरी जायचो.

डॉ. प्रभुणे : म्हणजे फक्त जागा बदलली. 'भुलाभाई'च्या ऐवजी 'छबिलदास' झालं.

अरूण काकडे : विल्सन कॉलेज, ज्या ज्या ठिकाणी आम्ही गेलो, आमचा तळ ठोकला त्या ठिकाणी पहिला जाणारा मी आणि सगळ्यात शेवटी तिथून निघणाराही मीच! प्रत्येक ठिकाणच्या संध्याकाळी रिहरसल्स झाल्या की मग मी तिथून निघायचो. 'भुलाभाई' ची जागा अशा ठिकाणी होती की तिथून मला चालत ग्रॅन्टरोडला यायला लागायचं. त्याला पंधरा मिनिटं लागायची. तिथून मग घरी यायचं. अशा निरनिराळ्या ठिकाणी मी गेलो, पण मी कधीही घरी डायरेक्ट गेलेलो नाही. कधीही नाही. आजतागायतही नाही.

डॉ. प्रभुणे : नोकरी लागल्यापासून.

अरूण काकडे : हो. 'रंगायन' आणि 'आविष्कार' या दोन्ही संस्थांचे संस्था स्थापनेपासून अन्य सहकारी जरी बरोबर असले तरी इतर सगळे व्यवहार जे असायचे म्हणजे आर्थिक असतील, काही करस्पॉंडन्स असतील, अन्य काही सगळ्या गोष्टी असतील त्या सगळ्या गोष्टी मला कराव्या लागायच्या.

डॉ. प्रभुणे : आर्थिक म्हणजे?

अरूण काकडे : म्हणजे दैनंदिन जमाखर्चाचे, नाट्यनिर्मितीचे, नाट्यप्रयोगाचे हे सर्व आणि अन्य असतील त्या जमाखर्चाचे हिशोब दरवर्षी ऑडिट करून घेणे ही जबाबदारी मी 'रंगायन' सोडेपर्यंत आणि 'आविष्कार'ची तर मी आजपर्यंत पार पाडीत आलो आहे.

डॉ. प्रभुणे : जी नाट्यसंस्था नाट्यप्रयोग करायची त्यांचं भांडं घेणं?

अरुण काकडे : सगळं. सगळं. सगळं. अहो, तुम्हाला चार वाक्यांत सांगतो मी काय केलं?

डॉ. प्रभुणे : ते महत्त्वाचं आहे. तपशीलवार सांगा.

अरूण काकडे : जी कामं केल्याशिवाय संस्था उभी राहत नाही, नाटक उभं राहत नाही, प्रयोग उभा राहत नाही, कलाकार उभा राहत नाही, चळवळ उभी राहत नाही, ही सगळी कामं करण्यामध्ये माझी हयात गेली. कोणत्याही प्रकारची एम्बीए वगैरेची पदवी नसताना आयुष्यभर मी ही सगळी कामं केली. त्याचं कारण असं की ही कामं करायला कुणीही तयार नसतं. अजूनही नाही. पुढे होतील का नाही, मला माहीत नाही. म्हणून हे जू मानेवरती घेतलेलं आहे. अजूनही तसंच आहे. खाली उतरवायलां काही वावच नाही. ही सगळी कामं करायला तेव्हाही कुणाला वेळ नव्हता आणि त्यात रसही नव्हता. पण मी मागं म्हटल्याप्रमाणे ही कामं केल्याशिवाय संस्था उभी राहत नाही, नाटक उभं राहत नाही, प्रयोग उभा राहत नाही, चळवळ उभी राहत नाही, इव्हन कलाकार देखील उभा राहत नाही कलाकाराच्या पाठीशी कुणी उभं राहिल्याशिवाय आणि असं कुणी काम केल्याशिवाय. तर ती सर्व कामं मी केली.

डॉ. प्रभुणे : म्हणून मग अरविंद देशपांडे तुमच्याकडे आले आणि तुम्हाला वही दिली तेव्हा तुम्ही त्याचे इन्चार्ज झालात.

अरूण काकडे : हो, पण त्याच्या आधीपासूनच मी करीत होतो ना.

डॉ. प्रभुणे : बरोबर आहे. पण आपण छबिलदासच्या संदर्भात झालं म्हणून तेव्हढ्यापुरतं म्हणतो, पण बाकी मुळात तुम्ही करीत होताच.

अरूण काकडे : इव्हन 'भुलाबाईऽचं आमचं सगळं झाल्यावर मी इकडे आलेलो असायचो.

डॉ. प्रभुणे : आणि ह्या सगळ्याचा खूप उपयोग झाला मराठी रंगभूमीला.

अरुण काकडे : म्हणून माधव (वाटवे) म्हणाला होता, ''अरूण, मी असा विचार करतो, तू नसतास तर काय झालं असतं?'' मी म्हटलं, ''तूच विचार कर आता. आपल्या उद्दिष्टाप्रमाणे आपल्याला क्रिएटिव्हिटी करायची आहे, नाटक करायचे आहे हे समजून घेऊन त्यासाठी त्यामागे कुणी तरी मागे उभे राहायला नको का? आपल्यापैकी सगळेच जर तोंडाला रंग लावून स्टेजवर उभे राहाले तर बाकी सर्व गोष्टी कोण बघणार?'' संस्था म्हटल्यावर स्टेजमागील आणि स्टेजवरील कामे या दोन्ही गोष्टी महत्त्वाच्या असतात.

डॉ. प्रभुणे : किती पिढ्या पाहिल्या तुम्ही?

अरूण काकडे : आता बघा ना. पी. डी. ए. पासून सुरुवात केलेली आहे. दहा वर्षाला एक पिढी असं आपण म्हणतो. तेव्हापासून माझं सुरू आहे.

डॉ. प्रभुणे : म्हणजे सहा पिढ्या तुम्ही पाहिल्या! आता सध्या कोणतं नाटक आहे तुमचं ?

अरुण काकडे : 'बया दार उघड' हे अप्रतिम नाटक आहे माझ्या दृष्टीनं मला त्या नाटकाबद्दल पुन्हा पुन्हा सांगावं वाटतं की स्त्रीमुक्ती चळवळ वगैरे आहे. तिला आत्ता कुठे स्टेटस आलं आहे. पण तेराव्या शतकापासून स्त्रीकडे भोगवस्तू म्हणून पाहिलं जायचं. तर या नाटकात तेराव्या शतकापासूनच्या संतस्त्रिया ताठ मानेनं उभ्या राहिलेल्या आहेत. खरं म्हणजे त्या तशा निरक्षरच, पण उत्स्फूर्तपणे त्यांच्या रचना जन्माला आलेल्या आहेत आणि आजही त्या तितक्याच महत्वाच्या आहेत म्हणून मी ते नाटक केलं.

डॉ. प्रभुणे : बरं, पुन्हा परत येतो आपण छबिलदासवर. 'छबिलदास चळवळी' मध्ये ही नाटकं सुरू झाली, तर खरोखर किती वर्षं ही चळवळ चालली? आणि या चळवळीचं कसं मूल्यमापन कराल तुम्ही?

अरुण काकडे : त्याचं मूल्यमापन इतर बऱ्याच लोकांनी केलेलं आहे.

डॉ. प्रभुणे : तरी तुमच्या दृष्टीने.

अरूण काकडे : नाही नाही, निरनिराळ्या पद्धतीने केलेलं आहे. खवचटपणेही केलेलं आहे. 'छबिलदास'ला तिसरा मजलाच नाही! इतक्या खवचटपणे केलेलं आहे. (दोघे हसतात.) पण माझ्या मते, त्या अठरा वर्षांमध्ये चढउतार नक्की झालेले आहेत. त्याची कारणमीमांसा करायला पाहिजे. चढउतार कशामुळे झाले? का झाले? सुरुवातीला जो क्रिएटीव्हीटीचा लोंढा आला व

त्यामुळे सृजनाचा जो मोठा प्रवाह निर्माण झाला होता तो कुठे तरी अडून पडला होता. त्या सृजनाला या आधी वाट मिळत नव्हती. तुंबलेल्या पाण्याचा स्रोत जसा एकदम बाहेर यावा त्या पद्धतीने सुरुवात झाली असं मला वाटतं. 'छबिलदास' चळवळ जन्माला आल्यावर रंगकर्मींना पटकन कुठे तरी असं वाटलं की 'हां, सृजन करायला आपल्याला ही संधी मिळाली आहे.' त्या वेळेला नाटकं फक्त कुठे तरी स्पर्धेच्या निमित्तानं वगैरे व्हायची. परंतु 'आता आपल्याला परवडेल, खिशाला परवडेल, आपण करू शकू, सर्व अंगांनी करू शकू असं 'छबिलदास'च्या निमित्ताने इथे काही तरी करून पाहण्यासाठी म्हणून एक व्यासपीठ निर्माण झालेलं आहे'. त्यामुळे सुरुवातीच्या काही वर्षांपर्यंत इथे एक चांगल्या पद्धतीने परफॉर्मन्स होत होता.

तुम्हाला छबिलदासचं अर्थकारण पाहिजे होतं ना, ते थोडं सांगतो. आम्ही हॉलचं भाडं पन्नास रुपये घ्यायचो. फक्त पन्नास रुपये. आम्हाला एक म्युनिसिपालिटीचा टॅक्स द्यावा लागायचा प्रयोग केल्याबद्दल. नंतर मग इलेक्ट्रिसिटी कंझमशन्स. त्याचे चार्जेस आम्ही घ्यायचो २० रुपये. तिथे आम्हाला बॅकस्टेज वर्कर्स लागायचे. दोन मिनिमम. सगळी कामं ते करायचे बॅकस्टेजची. त्यांना ३०-३० रुपये प्रमाणे साठ रुपये द्यावे लागायचे. नाटक करणाऱ्या संस्थेकडनं आम्ही ते घ्यायचो. लाईटसाठी म्हणून दोन इलेक्ट्रिशियन आम्ही ठेवले होते. फार लाइट्स नसतील तर एका इलेक्ट्रिशियनमध्ये भागत असे आणि जास्त असतील तर दोन. प्रत्येकी तीस रुपये प्रमाणे असे आम्ही त्यांना द्यायचो. शिवाय पुन्हा खाली गुरख्याला आम्हाला काही तरी द्यावं लागायचं. दहा रुपये गुरख्याला देऊन टाकायचो. नंतर स्पॉटलाईटचं भाडं आम्ही घ्यायचो. आता एका स्पॉटला ५०-७० रुपये घेतात, शिवाय कंझम्शन चार्ज थिएटर घेतं, म्हणजे एक स्पॉट वापरायला १०० रुपये आम्हाला आज द्यावे लागतात. त्यावेळेला आम्ही पहिल्या स्पॉटचं भाडं प्रत्येकी ७ रुपयांप्रमाणे घ्यायचो. म्हणजे सहा स्पॉट्स वापरले तर त्यांना ४२ रुपये द्यावे लागायचे. नंतर पहिले चार डीमर्स ७ रुपये. आणि ह्याच्याशिवाय जर फ्लड्स लागले तर फ्लड्सचं भाडं ५ रुपये. हे सगळं भाडं बाहेरून येणाऱ्या नाट्यसंस्थांना द्यावं लागायचं. म्हणजे साधारणपणे पावणे तीनशे रुपयांत एक प्रयोग पडायचा आणि ते परवडायचं मग सगळ्यांना. आज थिएटरचं भाडं दहा दहा हजार रुपये झालेलं आहे. त्या वेळेला संपूर्ण प्रयोगच पावणे तीनशे रुपयात पडायचा.

डॉ. प्रभुणे : हे तुम्ही नो प्रॉफिट नो लॉसवर करायचे, असंच ना?

अरूण काकडे : तसंच करायचो आम्ही. हे सगळं जे त्यांना आम्ही उपलब्ध करून दिलं ते, आणि शिवाय आमच्याकडं सेटला लागणारी जी काही प्रॉपर्टी होती, लेव्हल्स होत्या, विंगा होत्या, काही फर्निचर होतं, जे जे काही त्यांच्या प्रयोगात वापरायचं असेल ते त्यांनी सांगायचं, हे हे हे वापरायचंय, त्याचं भाडं आम्ही नॉमिनल ५-५ रुपयांप्रमाणे ठेवलं होतं प्रत्येकाला.

डॉ. प्रभुणे : पैसे कमावणं हा हेतूच नव्हता मुळात.

अरूण काकडे : अजिबात नाही. उलट आम्हाला आमच्या 'आविष्कार' मधनं त्याच्यामध्ये काहीतरी कॉंट्रिब्यूट करावं लागायचं.

डॉ. प्रभुणे : उलट!

अरुण काकडे : हो. उलट आहे ते जरा. पण आम्ही ते करत राह्यचो. कारण आमचा उद्देश सातत्यानं तिथे काही तरी नवीन घडत राहिलं पाहिजे, सृजनकार्य चालू राहिलं पाहिजे हा होता. ते महत्वाचं होतं. म्हणून आम्ही ह्या अर्थकारणाचा असा तक्ता करून ठेवला होता.

डॉ.प्रभुणे : मध्ये तुम्ही असं म्हणलात की 'आविष्कार' गरज पडली तर कॉंट्रिब्यूट करायचं. म्हणजे काय 'आविष्कार' थोडे पैसे द्यायंचं त्यांना?

अरूण काकडे : द्यायचो असं नाही.

डॉ. प्रभुणे : हां. झीज सहन करायचे.

अरूण काकडे : देणं नाही. तुझ्या काही अडचणी असतील तर थांबतो! फक्त भाडं दे. बाकीच्या गोष्टीचा आपण नंतर विचार करूयात. असे त्या त्या क्षणी ते आमचे निर्णय असायचे.

डॉ. प्रभुणे : काका, हे सर्व तपशील तुम्ही कुठे लिहून ठेवले आहेत का? या इतिहासाला तुम्ही शब्दबद्ध करून ठेवलंय का? ते अत्यंत आवश्यक आहे. नाही तर इतकी तपशील असलेली माहिती दुसऱ्या कुणाला असणार आहे?

अरूण काकडे : आमचे श्री. पु. भागवत किती सांगून थकले. ''काकडे, अहो, तुम्ही जरा लिहा हे सगळं. हा इतिहास आहे.

आणि तुमच्या शिवाय कुणीही त्याच्यावर लिहू शकत नाही.'' तेंडुलकरांचं तेच मत असायचं. ''आता बाकीच्या सगळ्या गोष्टी थांबवा. इकडे लक्ष द्या.'' मी श्री. पुं. ना. म्हणायचो, ''माझ्याकडं काही लिखित स्वरूपाचा तपशील नाहीये.'' तर ते म्हणत, ''आठवणीत जेवढं असेल तेवढं लिहा. मग पुढे बघू काय करायचं ते.''

डॉ. प्रभुणे : बरोबर आहे.

अरूण काकडे : आता मी आठवणींनीच सांगतोय ना तुम्हाला सगळ्या गोष्टी. बाकी सगळे लोक मला सांगून सांगून थकले. माझे मित्रही म्हणताहेत. पण काय होतं बघा, मला लिहायचा कंटाळा आहे, खूप खूप कंटाळा आहे. (डोक्याला हात लावून) इथे असतं, पण हे सगळं शब्दात गुंफावं, लिहावं हे काही होत नाही. मला माहीत नाही, पण हा माझा मोठा दोष असेल. काय असेल ते मलाही माहीत नाही. पण बैठक मारून एकटाकी काही लिहिणं हे काही जमत नाही.

डॉ. प्रभुणे : एकदा 'लेखनप्रयोग' केला पाहिजे. (दोघे हसतात)

अरूण काकडे : पण मला जाणीव होते, की हे करायला पाहिजे. (गदगदल्या स्वरात) जाणीव आहे मला! पण आळस कितपत केव्हा झटकला जातोय, माहीत नाही. आळस लवकर जावा असं मला वाटतंय. पण आता काय होतं, कॉन्सेंट्रेशननी लिहायला लागलो ना की तिसरंच काही तरी आठवतं, अरे, याचं काय झालं? त्या आधीचं काय झालं? त्या प्रयोगाचं काय झालं? ह्याला भेटायचं होतं, ॲप्लिकेशन पाठवायचा होता त्याचं काय? हे डोक्यात यायला लागतं. म्हणजे ते कॉन्सेंट्रेशन जातं. अशी गोची होते.

डॉ. प्रभुणे : आज हा जो इथे पुण्याला वेळ मिळाला. हे मुंबईला असतं तर जमलं नसतं मला वाटतं.

अरूण काकडे : पण गोची होते. अशी गोची होते.

डॉ. प्रभुणे : मुंबईला हे जमलं असतं का एव्हढं शांतपणे?

अरूण काकडे : नाही. नाही. शक्यच नाही मला. मी एकदा त्या 'आविष्कार'च्या ऑफिसमध्ये गेलो की गेल्यानंतर सुरू होतं सगळं! आजही मी जर गेलो नाही तर रिहर्सल होऊ शकते, पण बाकी दुसरं काही होऊ शकत नाही.

डॉ. प्रभुणे : पण जेव्हा तुम्हाला अरविंद देशपांडेनी सांगितलं की तू हे बघ आता सगळं. तेव्हा तुम्ही काही पदावर होता का 'आविष्कार'च्या?

अरूण काकडे : मी सेक्रेटरी होतो ना तेव्हा.

डॉ. प्रभुणे : आजही आहात?

अरूण काकडे : आज प्रेसिडेंट आहे. तेंडुलकर गेल्यापासून. तेंडुलकर असे पर्यंत ते आमचे प्रेसिडेंट होते. मला ह्या उपाध्यांमध्ये काही अर्थ वाटत नाही. माझ्या डोक्यामध्ये काहीच नाहीए. त्याही वेळेला नव्हतं. आताही काही नव्हतं. उपाधी उपचारापुरत्या आहेत त्या. बाकी महत्वाचं म्हणजे कार्य घडत राहिलं पाहिजे. करत राहिलं पाहिजे. झालं पाहिजे. मला काय वाटतं, घोड्याची उपमा असते. पेंढी समोर दिसली की चालायला लागतं. ते घोडंय मी.

डॉ. प्रभुणे : आणि नाटक ही पेंढी आहे?

अरूण काकडे : हो. सारखं सारखं पुढे धरायला लागतं. असं होतं माझं.

डॉ. प्रभुणे : बरं, आपण पुन्हा मूळ विषयाकडे येऊ जरा.

अरूण काकडे : म्हणजे आता अर्थकारण संपलं?

डॉ. प्रभुणे : हो. आता आम्हाला पाहिजे तेव्हढं मिळालं. बरं, नाटक करणाऱ्या ह्या ज्या संस्था यायच्या, त्यांना पावणे तीनशे रुपये देऊन काही पैसे राहायचे का शिल्लक?

अरूण काकडे : प्रवेशमूल्य ठेवलं होतं आधी. प्रत्येकाला सांगितलं होतं तुमच्यापैकीच कुणाला तरी खाली बसवा. एवढंभर प्रवेशमूल्य आहे. किती येतं तुम्हीच सांगा. तुमच्याकडंच घेऊन जा. एवढे पैसे आम्हाला द्या. आम्ही त्याच्यावर काही बघणार नाही. उगीच आम्ही तिथे बसलो तर मग एवढेच झाले न् तेवढेच झाले ही कटकट नको.

डॉ. प्रभुणे : हो पण त्याच्यातून फार प्रॉफिट कुणाला झाला नाही ना? कामापुरता व्हायचा ना?

अरूण काकडे : त्यांच्या त्यांच्या पद्धतीनं. जे नाटक तिथे पॉप्युलर झालं, प्रयोग 'हाउसफुल' व्हायला लागले त्या लोकांना पुढच्या प्रयोगाकरता शिल्लक थोडी उरत असे. इतपतच. बाकी काही नाही.आमचं 'चांगुणा' चिकार चाललं, कितीच्या किती प्रयोग झाले तिथे. बाकीच्या नाटकांचे तिथे प्रयोग झाले. दुब्यांच्या नाटकांचे तिथे परफॉरमन्स झाले. माणसं यायला लागली. प्रेक्षक यायला लागले तिथे.

डॉ. प्रभुणे : 'छबिलदास' मध्येच नाटक करणारे तुमच्या आठवणीतले कोण नाटककार होते?

अरूण काकडे : अच्युत वझे, मोहन राकेश, चि. त्र्यं. खानोलकर, गिरीश कर्नाड, बादल सरकार, वृंदावन दंडवते, सतीश

आळेकर. महेश एलकुंचवारची आणि तेंडुलकरांची नाटकं तिथे झाली. गो.पु.देशपांडेचं 'उद्ध्वस्त धर्मशाळा' तिथं झालं. टेनेसी विल्यम्सचं व्यंकटेश माडगूळकरांनी केलेलं रूपांतर 'गौराई' आणि सत्यदेव दुबेंची स्वतःची नाटकं तिथं झाली. 'छबिलदास चळवळी'च्या संबंधातला रत्नाकर मतकरी हा फार महत्वाचा नाटककार. त्याने तर असे प्रयोग केले की दर महिन्यातून दोन दिवस घेऊन नवीन नवीन एकांकिका सातत्याने सादर केल्या. दिलीप प्रभावळकर त्या एकांकिकांमधून पहिल्यांदा पुढे आलेला. त्यांनी आमच्या 'रंगायन' मध्येही नाटकात काम केलं होतं. 'लोभ नसावा ही विनंती' मध्ये चेतन दातारचं 'सावल्या'. मी म्हटलं त्याप्रमाणे. ह्या सगळ्यांचं फौंडेशन तिथे झालेलं आहे सगळं. कलाकारांचं पण.

डॉ. प्रभुणे : 'छबिलदास चळवळ' तुम्ही मराठी नाटकांपुरतीच मर्यादित ठेवलेली नव्हती!

अरूण काकडे : नव्हती ठेवली ! दुबेनी सगळी हिंदी नाटकं केली ना! मराठीत केलीच पण हिंदीतही केलीच ना त्याने. डॉ.शंकर शेषची हिंदी नाटकंही तिथे झाली.

डॉ. प्रभुने : फक्त 'नाटक चळवळ' एवढाच तुमचा केंद्रबिंदू होता.

अरूण काकडे : हो. हो.

डॉ. प्रभुणे : भाषा महत्वाची नव्हती.

अरूण काकडे : नाही नाही नाही. 'आपल्याला सांगायचंय, त्यांना करून दाखवायचंय, त्यांच्यापर्यंत म्हणजे प्रेक्षकांपर्यंत पोहोचवायचंय' हे महत्वाचं. विचार असेल, त्याच्यामधून निघालेली घटना असेल, काऽही असेल. प्रेक्षकाला जे काही त्यांना सांगायचं आहे ते कुठल्याही भाषेत चालेल. आमच्याकडे एकांकिकाही पहिल्यापासूनच आहेत. खांडेकरांच्या काळापासून एकांकिका आहेत. तेंडुलकरांनी एकांकिका केल्या. त्यांच्या एकांकिका आहेत. छबिलदास चळवळीत तीन अंकी नाटकं, दोन अंकी नाटकं, एक अंकी नाटकं, दीर्घांक सगळं सगळं होत असे.

डॉ. प्रभुणे : बरं, काही नाटककार आणि त्यांची नाटकं आठवतात का?

अरूण काकडे : शफाअत खान. सगळे नवीन नाटककार तिथे आले. इतर भाषकांमध्ये कन्नड नाटककार तिथे होऊन गेले. सदाशिव अमरापूरकरनी जी. ए. कुलकर्णींच्या लेखांवरचं एक महत्वाचं 'यात्रिक' हे अतिशय चांगल्या पद्धतीनं केलं होतं. मला आठवतं त्याच्यातलं. चं. प्र. देशपांडे, प्रेमानंद गज्वी, विक्रम भागवत, वसंत कामत, अजित भगत, सदानंद रेगे, श्याम मनोहर, मन्नू भंडारी, राजीव नाईक, प्र.ल.मयेकर, ल.ना.बांदेकर. ल.ना.बांदेकरांचं 'चाणक्य' हे एक महत्वाचं नाटक तिथंच 'आविष्कारनं'च केलं. 'छबिलदास'मध्ये त्याचे शंभरच्यावर प्रयोग झाले. मकरंद साठे, बघा तुम्ही नाटककारांची नावं. किती नाटककारांना हे व्यासपीठ उपयोगी पडलं, त्याच्यातून त्यांच्या नाट्यकृती किती झाल्या तयार त्यांची सगळी नावं दिलीत आम्ही 'रंगनायक' मध्ये. दुसरा नवीन एक प्रयोग तिथे झाला. उत्तम बंडू तुपेची कादंबरी होती. त्या कादंबरीचं आमच्या चेतन दातारनी नाट्यरूपांतर केलं आणि वामन केंद्रेनी त्याचं 'झुलवा' नाटक केलं. एक महत्वाचं नाटक होतं ते त्यावेळेला. देवदासी प्रथेच्या विरुद्धचं नाटक. म्हणजे आशयाच्या दृष्टीनी तुम्ही विचार करा. सर्व दृष्टीनी विचार केला म्हणजे मी काय म्हणतो ते कळेल. तुम्हाला इंग्लिशमध्ये सांगायचं तर प्रॅगमॅटिक (pragmatic), प्रोग्रेसिव्ह (progressive), इनोव्हेटिव्ह (innovative), मीनिंगफुल (meaningful) अशा पद्धतीचे तिथे प्रयोग झालेले आहेत. हे या नाट्य चळवळीचं केवढं मोठ्ठं क्रेडिट आहे. योगदान आहे.

डॉ. प्रभुणे : बरोबर आहे.

अरूण काकडे : अजित दळवी, भारत सासणे, दत्ता भगत. म्हणजे बघा तुम्ही किती नाटककार, किती नाटकं, किती दिग्दर्शक, किती तरूण रक्त. छबिलदास चळवळीचं मूल्यमापन कसं कराल असं विचारलं होतं ना तुम्ही मला? या सगळ्या चळवळीची व्याप्ती आणि चळवळीचं मूल्यपामन करायचं ठरवलं तर ह्या सगळ्या गोष्टी तुम्हाला तुमच्या विचारत घ्यायला हव्या आहेत. म्हणून छबिलदासचं हे योगदान मी तुम्हाला सांगितलं.

डॉ. प्रभुणे : मग ह्यामध्ये 'आविष्कार' चा किती सहभाग होता?

अरूण काकडे : जास्तीत जास्त नाटकं 'आविष्कार'चीच आहेत त्याच्यामध्ये. इतरांची नाटकंही आम्ही केली. पण 'आविष्कार'चं योगदान तर महत्वाचंच आहे. सगळ्यात जास्त नाटकं 'आविष्कार'चीच झाली आहेत. सगळ्यात जास्त नाटकांचे प्रयोग 'आविष्कार'चेच झालेले आहेत तिथे. 'आविष्कार'नं 'दुर्गा झाली गौरी' या सारख्या बालनाट्याचेही पंचवीस प्रयोग तिथे केलेले आहेत. पपेट्री (puppetry) चे

प्रयोग केलेले आहेत. या प्रकारे सर्व तऱ्हेचे प्रयोग तिथे झालेले आहेत.

हे क्रिएटिव्हिटीचं झालं. तिथे एज्युकेशनल आणि ॲकॅडॅमिक ॲक्टिव्हिटी ही सातत्यानं सुरू झालेली आहे. त्याच्यामध्ये बालकलाकारांसाठी आणि तरूण गटासाठी नाट्यप्रशिक्षणाचा 'आविष्कार'ने उपक्रम सुरू केला होता.

आम्ही मुक्त व्यासपीठ निर्माण केलं होतं. तुम्हाला जे काय नवीन करायचं असेल, नवे संगीतातलं असेल, इतर कलांच्या मधलं असेल, ते इथं करा. जसं 'भरतनाट्यम्' ची लेक्चर्स आणि डेमॉन्स्ट्रेशन्स तिथे झाली.

दुसरं म्हणजे अण्णा जोशी त्या वेळचे प्रसिद्ध ऱ्हिदमिस्ट (rhythmist). त्यांनी मराठी पारंपरिक संगीतामधनं पहाटेपासून तो उत्तररात्रीपर्यंतचा एक संबंध आलेख प्रेक्षकांपुढं मांडला होता. म्हणजे आपण जेव्हा म्हणतो की आर अँड डी (R & D) , त्याच्यातला हा प्रकार आहे. संगीतकार यशवंत देव, त्यांनी शब्दापासून ते शब्द उच्चारण्यापर्यंत संगीताची जी सृजनप्रक्रिया आहे ती 'असे गीत जन्मा येते' यातून गीताचा सबंध जन्म उलगडून दाखवला होता.

डॉ. प्रभुणे : आहे आहे, मोठी कॉन्ट्रिब्युशन आहे.

अरूण काकडे : कितीतरी गोष्टी तिथे झाल्यात. नृत्यनाट्याचे प्रयोग तिथे झाले. त्या वेळेला आम्ही 'आविष्कार'ची एक बालनाट्य शाखा म्हणून 'चंद्रशाळा' सुरू केली. सुदैवानं आम्हाला गुरू पार्वतीकुमार लाभले. फार मोठा एका ऋषिसमान असणारा कलाकार. त्यांचा व्यासंग, नृत्यातला त्यांचा सगळा अभ्यास मोठा होता. त्यांनी सांगितलं, ''मला मुलांना शिकवायचंय.'' म्हटलं, ''दर रविवार तुमचा.'' दर रविवारी शास्त्रीय नृत्य शिकवायला यायचे. अक्षरशः श्लोकांपासून श्लोकांचा अर्थ सांगण्यापर्यंत सांगत, समजावत. सगळ्या हस्तमुद्रा, मुद्रा, त्या मुद्रांचा अर्थ सांगून पुढच्या नृत्यनाट्यासाठी कुठे तरी हा बेस त्यांनी निर्माण केला. वर्षभर चालणाऱ्या या वर्कशॉपला आम्ही 'डान्स डिसिप्लीन वर्कशॉप'असे नाव दिले होते. हा अभ्यासक्रम त्यांनीच आखून दिला होता. तोपर्यंत त्यांनी खूप बॅलेज केले होते. 'शिव-पार्वती', 'देख तेरी बंबई', 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' हे सगळं त्यांनी त्यावेळेला केलं होतं. त्यांचं योगदान महत्वाचं आहे. त्यानंतर 'अपना हाथ जगन्नाथ' हे पहिलं नृत्यनाट्य त्यांनी आमच्यासाठी केलं होतं. नंतर आम्ही 'वृक्षवल्ली आम्हा' केलं, 'दुर्गा झाली गौरी' केलं, 'पंचतंत्र' केलं. त्यांनी दिग्दर्शित केलेली मुलांची ही सगळी नृत्यनाट्यं 'छबिलदास' मध्ये झाली.

आम्ही पपेट शो केले. मधुलाल मास्टर ह्यांच्या मार्गदर्शनाखाली पपेटचं शिक्षण देण्याचा आम्ही प्रयत्न केला. आमच्या इथे ज्या पारंपरिक कला आहेत त्या कलांचं शिक्षण लहान मुलांना आम्ही दिलं. समूहगानाच्या उद्देशानं त्यांना शिक्षण दिलं. नंतर वैयक्तिक अभिनय. कीर्तनापासून आपली जी परंपरा आहे त्या परंपरेचं त्यांना शिक्षण दिलं. चित्रकथीसारख्या एका कलेचा आम्ही त्या मुलांना परिचय करून दिला. आपण ज्याला एकपात्री म्हणतो, त्या एकपात्रीचंही आम्ही त्यांना शिक्षण दिलं. ही आमची सर्व मुलांसाठीची एज्युकेशनल ॲक्टिव्हिटी झाली.

डॉ. प्रभुणे : ही एज्युकेशनल ॲक्टिव्हिटी कधी सुरू झाली तुमची?

अरूण काकडे : तशी पहिल्यापासून चालू आहे. १९७४ पासून चालू आहे. जेव्हा जयदेव हट्टंगडी आम्हाला मिळाला, जयदेव आला तेव्हापासून दरवर्षाला आम्ही दोन शिबिरं घ्यायला लागलो. पहिल्यांदा विनामूल्य होती, पण आम्हाला असं वाटलं की, फुकट काही देऊ नाही आणि फुकट काही घेऊ नाही. त्याची किंमत राहत नाही. म्हणून आम्ही नॉमिनल पैसे घ्यायला लागलो. अशा पद्धतीनं आम्ही मग ते सुरू केलं. मुलांच्याकडून आम्ही काहीच घेतल नाही. आजही घेत नाही. आता निदान आम्ही थोडे म्हणजे खर्चापुरते घेतो. पण तेव्हा तर काहीच घेत नव्हतो.

डॉ. प्रभुणे : त्याला प्रतिसादही चांगला होता का?

अरूण काकडे : चांगला प्रतिसाद असायचा. अजूनही प्रतिसाद असतो.

डॉ. प्रभुणे : म्हणजे, 'छबिलदास चळवळी'ची एकाच वेळी दोन दिशांनी कामं सुरू झाली. एक प्रायोगिकतेच्या अंगाने आणि दुसरं प्रशिक्षणाच्या अंगाने. ॲकॅडॅमिकमध्ये कोण सहभागी होतं?

अरूण काकडे : जयदेव हट्टंगडीवर आम्ही तरुणांची जबाबदारी सोपवली होती. तरूण रंगकर्मींना प्रशिक्षण द्यायला नंतर सत्यदेव दुबेजी आले. त्या नंतर चेतन दातार आला. अशी सगळी परंपरा चालू राहिली.

डॉ. प्रभुणे : अजून दोन-तीन नावं सांगाना या शिवाय.

अरूण काकडे : आता अलीकडे दीपक राजाध्यक्ष येतो. हेमंत हजारे येतो. ही अशी परंपरा आहे. तरूण रंगकर्मी आले आहेत ह्याच्यामध्ये. ही ॲकॅडॅमिकची कामं चालूच आहेत अजून. त्याला खंड नाही. क्रिएटिव्हिटीला खंड नाही.

डॉ. प्रभुणे : आणि त्याला तांत्रिक परीक्षाही ठेवलेली नाही तुम्ही. होय ना?

अरूण काकडे : नाही. काही नाही.

डॉ. प्रभुणे : फक्त त्यांनी शिक्षण घ्यावं.

अरूण काकडे : आम्हाला ते विचारतात, आम्हाला सर्टिफिकेट देणार का? नाऽही. आम्हाला ह्याच्यातून काय फायदा आहे? म्हटलं, तुम्ही ठरवायचं. इथं तुम्हाला शिक्षण मिळेल. शिक्षणाचा उपयोग कसा करायचा हे तुम्ही ठरवायचं. तुम्हाला आम्ही एवढंच सांगतो, तुम्हाला पंख आहेत. त्याची तुम्ही जाणीव ठेवा. आकाश तुम्हाला मोकळं आहे. गेलात तर आम्हाला आनंदच आहे. आम्हाला काही अपेक्षा नाही. तुमचं तुम्ही ठरवायचं आहे. मला हे असं सारखं वाटतं.

डॉ. प्रभुणे : प्रायोगिक नाटकाचे केंद्रस्थान मानल्या गेलेल्या छबिलदास चळवळीचे स्वरूप अत्यंत विस्ताराने आपण सांगितल्यामुळे त्याचा अभ्यासकांना निश्चित फायदा होऊ शकेल.

अरूण काकडे : प्रायोगिक नाटकाला वाहून घेतलेल्या आमच्या 'आविष्कार' संस्थेच्या अनेक बाबींची माहिती दिल्यावर शेवटी याचाच अधिक तपशील देण्याबाबत मी आपल्याला एक विनंती करू का? हे सर्व योगदान एका दृष्टिक्षेपात लक्षात येण्याच्या दृष्टीने इंग्रजी भाषेतून मी देत आहे. इंग्रजीत असलेला हा मजकूर परभाषकांना समजण्यास मदत होऊ शकेल असे वाटते. या मुलाखतीच्या शेवटी हा मजकूर जर तुम्ही प्रसिद्ध करू शकलात तर चांगले होईल असे वाटते.

डॉ. प्रभुणे : ठीक आहे.

अरूण काकडे : 'Awishkar' founded in 1971. This is a group of serious theatre minded people formed to give free expression to the ideas and thoughts which are sacred to us in theatre. 'Awishkar' a theatre institution known for its sincere and dedicated approach towards production of many plays has always functioned with various other purposes. 'Awishkar' has time and again proved that stage plays have always been an instrument in reaching different destinations, which has in mind right from its birth. It has always been a platform for performers from all faculties of art (adults and children alike) where their talents can be unraveled and further channeled in a proper direction.

'Awishkar' takes great pleasure while mentioning about the 176 odd plays which it has produced and staged more than 4300 performances. This creative treasure includes 30 children's plays and dance dramas including 3 puppet plays. 'Awishkar' has organized 26 theatre festivals, which offered more than 205 performances to the theatre lovers. This includes two theatre festivals of Tendulkar's plays directed by 15 young directors. And also one festival of Mahesh Elkunchwar's plays.

In addition, more than 50 experimental theatre groups have staged more than 2000 performances at the Chhabildas Experimental Theatre, with the active co-operation of 'Awishkar' from 1974 to 1992.

'Awishkar' is known as the mother theatre institution and remained in the forefront in leading the parallel theatre movement. 'Awishkar's contribution to 'Chhabildas theatre' movement is very well known. After leaving 'Chhabildas' in 1992, 'Awishkar' explored three more spaces in Mumbai suburbs. At present 'Awishkar' continues its theatre mission in a small hall of New Mahim Municipal School with the kind Co operation of Mumbai. 'Awishkar Sanskritik Kendra' organizes 6 performances of its plays in this small hall every month. These performances include plays by other theatre groups also. For the last three years, Documentaries and short films by young and talented directors also are regularly screened in the hall.

Creativity if rightly pampered and moulded can reach its epitome. This particular perception pre-empted 'Awishkar' to organize more than 63 training Workshops for young and talented artists. Further, to divulge the different aspects of Musical plays, puppet shows and group singing it

organized 67 Workshops for children with active participation of all the concerned technical experts. In addition 'Awishkar' has conducted eight group discussions on different topics of the theatrical revelation.

Various personalities from different creative arts are associated with 'Awishkar' such as: Playwright Vijay Tendulkar, Girish Karnad, Mahesh Elkunchwar, C.P. Deshpande, Shyam Manohar, Badal Sarkar, Directors : Arvind Deshpande, Pt. Satyadeo Dubey, Jaydeo Hattangadi, Pradeep Mulye, Chetan Datar, Vijay Kenkre, Chandrakant Kulkarni, Dance Guru Parvatikumar, Actors : Arvind Deshpande, Sulabha Deshpande, Dr. Shreeram Lagoo, Rohini Hattangadi, Nana Patekar, Sayaji Shinde, Amol Palekar, Sachin Khedekar, Music Directors : Bhaskar Chandavarkar, Shank-Neel, Devdatta Sable, Kaushal Inamdar, & thousands of young, talented, dynamic writers, directors, technicians, artists of age group 6 to 60.

'Awishkar' not overlooking the creative relationship between theatre and films, organized 15 children's film festivals and one exclusive festival of films written by Shree Vijay Tendulkar with co-operation of Prabhat Chitra Mandal. It has also taken a very impressive step by publishing two books of importance 'Rang Nayak' and 'Te Ani Amhi' and A souvenir 'Awishkar-Tishi' (Thirty years of Awishkar) and Marathi plays 'Savlya', 'Dhol Taashe', 'Buddhibal ani Zabbu', 'Jagadamba', & 'Bayaa Ughad' in collaboration with Lok Vangmay Gruha.

The bottom-line of all its achievements 'Awishkar ' has left no stone unturned towards attainment of its goal, i.e. promoting art in its creative sense.

(संक्षिप्त)





WITH BEST COMPLIMENTS FROM :
GROUP COMPANIES OF A.K.P.

PHONE : 2440164, 2441530, 2442147
FAX : (0831) 2441275
Email : akpfdy@akpfoundries.com
Website : www@akpfoundries.com

A.K.P. FOUNDRIES PVT. LTD.

689, UDYAMBAG, BELGAUM – 590 008

BELGAUM CNC APPLICATIONS PVT. LTD.

703/1/4, UDYAMBAG, BELGAUM – 590 008
Phone No. : 2440402 Fax No. (0831) 2442674

INTEGRAL ALPHA PVT. LTD.

703/1/4, UDYAMBAG, BELGAUM – 590 008
Phone No. : 2440165 Fax No. (0831) 2441275

BELGAUM SANDS PVT. LTD.

Manufacturer of Resin Coated Sand

R.S. No. 589, Plot No. 4,
MACHHE INDUSTRIAL AREA,
BELGAUM – 590 014
Phone No. : 2411212 Fax No. (0831) 2441275

: Manufacturers of :

Precision and High Quality Casting in Grey & S.G. Iron and
Shell Moulded Intricate Castings With Conventional
& CNC Machining Facility

बेळगावातील मराठी साहित्यिक परंपरा

नवकादंबऱ्यांचे भारतीय संदर्भातून स्त्रीवादी आकलन, या जगण्यातून, जीवननरहची आसामी कविता, लोकसाहित्यातील स्त्री चित्तवेध, भारतीय संदर्भातून स्त्रीवादी समीक्षा आणि उपयोजन, बेगम बर्वे एक दृष्टिक्षेप, देखणी: जगण्याचे ऊर्ध्वपातन, बहिणाबाई चौधरी यांची कविता, व्यर्थ न होता बलिदान, चारूवसंता, यशोधरा झोपली नव्हती, कन्नड संतकवी कनकदास, दुर्गाभागवत मराठी कन्नड सांस्कृतिक सहसंबंध. महाराष्ट्र शासनाचा समीक्षा, संशोधन व सौंदर्यशास्त्रासाठी असलेला प्रतिष्ठेचा श्री. के. पुरस्कार त्यांना लाभला आहे.

प्रा. डॉ. शोभा नाईक

बेळगाव ही खरोखर मोठ्या, नामवंत मराठी लेखक व कवींची पाळेमुळे रुजलेली भूमी आहे. पौराणिक, ऐतिहासिक प्रकारातील साहित्य येथील लेखणीने जन्माला घातलेले आहे. सौंदर्यवादी-कलावादी, रंजनवादी याचबरोबर प्रबोधनवादी, समाजवादी, वास्तववादी अशा विविध प्रकारच्या मराठी साहित्य निर्मितीचे बीज येथे असल्याचे दिसते. ब्रिटिशांनी दक्षिणेतील आपले एक प्रधान केंद्र म्हणून बेळगावची निवड केल्यामुळे या भागाचा आधुनिकतेशी जवळून संपर्क निर्माण झाला. शिवाय या गावात सर्व धर्म, सर्व जाती पंथातील मराठी, कन्नड, उर्दू, कोकणी, गुजराती, फारशी भाषिक एकत्रितपणे वास्तव्यास असल्याने एक आगळा वेगळा सांस्कृतिक सामाजिक संकर या भूमीने अनुभवलेला. एक संपन्न असे मोकळेपण येथील जीवनात अस्तित्वात आलेले. आजचे प्रख्यात संशोधक व कादंबरीकार डॉ.भालचंद्र नेमाडे यांनी ज्या 'यमुना पर्यटन' या बाबा पदमनजी यांच्या कादंबरीचा उल्लेख, मराठी कादंबरीच्या प्रवृत्ती अधोरेखित करताना 'पहिली सामाजिक कादंबरी' असा केला ती बेळगावच्या लेखकाकडून निर्माण झालेली आहे. १८५७ सालामध्ये प्रसिद्ध झालेली 'यमुना पर्यटन' ही केवळ मराठीतील पहिली सामाजिक कादंबरी नव्हे तर ती हिंदुस्थानातील पहिली कादंबरी समजली जाते. (नेमाडे : टीका स्वयंवर, पृ १८८) ह्या म्हणण्याला इयान रेसिड लिखित 'अर्ली प्रोज फिक्शन इन मराठी' ह्या इ.स.१९६७ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'द जर्नल ऑफ एशियन स्टडीज' मधील लेखाचा आधार त्यांनी घेतलेला आहे. भारतीय पातळीवरील त्यावेळच्या पुनरुज्जीवनाच्या काळात इ.स. १८३१ मध्ये बेळगावातील मारूती गल्लीत ते जन्मले. त्यांचे शिक्षणही बेळगाव येथेच झाले. बाबा पदमनजी यांनी तत्कालीन पुनरुज्जीवनाच्या लाटेतील अनेक विषय आपल्या लेखणीला हाताळायला लावले. विविध धार्मिक-सामाजिक विषयांवर साठ ते सत्तर पुस्तिका त्यांच्या नावावर आहेत. धर्मप्रणित काळाला परिवर्तनशील समाजप्रणित अवस्थेला आणताना 'यमुना पर्यटन' या त्यांच्या कांदबरीचे योगदान महत्वपूर्ण आहे. एखाद्या देशाच्या सामाजिक-सांस्कृतिक वास्तवाला विकसनाचा मार्ग दाखवताना तेथील स्त्री जीवनातील आक्षेपनीय घटकांचे उच्चाटन करण्याचे जगाचे सर्वसाधारण वळण. त्यानुसार त्या काळात 'यमुना पर्यटन' या कादंबरीने नव नैतिक भाषिक कृती केली. पुढे तिचा धागा धरून मराठीत ह. ना. आपटे, वा. म. जोशी-सानेगुरुजी - विभावरी-भाऊ पाध्ये-भालचंद्र नेमाडे हा प्रवाह जोरकसपणे अस्तित्वात आला.

पण हा प्रवाह जोरकस जरी असला तरी त्या प्रवाहातील लेखकांची संख्या मात्र कमी आणि 'यमुना पर्यटन' च्या बरोबरीने रंजनशील, ऐतिहासिक रंजनप्रधान-प्रतिकृतीप्रधान अशा निर्माण झालेल्या प्रवाहाचे संख्यात्मक बळ मोठे असे चित्र आहे. यमुना पर्यटन प्रवृत्तीचा मराठी साहित्यातील प्रवाहाचा जसा बेळगावातून प्रारंभ झाला तसाच रा.भि.गुंजीकर यांच्या 'मोचनगड' (१८७१) नामक ऐतिहासिक कादंबरी प्रवाहाचा प्रारंभ बेळगावातूनच झाला. ही घटना एकूण समाजप्रवृत्ती उलगडताना सहाय्यक होणारी आहे. बेळगाव आणि गोवा या सीमेवरील जांबोटी गावात इ.स. १८४३ मध्ये गुंजीकर यांचा जन्म झाला. शालेय शिक्षणही तिथेच झाले. मुंबई ही त्यांची कर्मभूमी झाली. गुंजीकरांनी कादंबऱ्या, नाटके याबरोबरच व्याकरणावरही लेखन केले. 'कन्नड परिज्ञान' नावाचा पहिला कन्नड शिकविणारा मराठी ग्रंथ त्यांनीच लिहिला. गुंजीकरांबरोबरच १८४३ मध्ये येथील गुर्लहोसूर या गावात मराठी रंगभूमी व संगीत नाटकांचा भक्कम पाया घालून देणाऱ्या नाटककार आण्णासाहेब किर्लोस्करांचा जन्म झाला. सं. शाकुंतल, सं. सौभद्र ह्या संगीत नाटकांची जादू याविषयी वेगळे सांगायला नको. त्याबरोबर म. गांधीजींकडे आकर्षित होऊन त्यांच्याबरोबर राहून कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांची फार मोठी प्रभावी फळी बेळगावात अस्तित्वात आली. त्यापैकी बेळगुंदी या गावात बालपणी वास्तव्याला असणाऱ्या काकासाहेब कालेलकर यांनी गुजराथी, मराठी आणि हिंदी या भाषांचा त्रिवेणी संगम आपल्या उदाहरणातून उभा केला. हिंडलग्याचा प्रसाद (१९३४), वनशोभा (१९४४), खेळकर पाने

(१९६४) या मराठी साहित्य कृतींबरोबरच त्यांनी मोठ्या संख्येने गुजराथी ग्रंथ लिहिले. 'जीवन व्यवस्था' हा ग्रंथ १९६६ चा साहित्य अकादमी पुरस्कृत ग्रंथ आहे. सर्वधर्मसमभाव हे तत्त्व रुजवण्यात त्यांनी गांधीजींना त्यांच्या जवळ साबरमती आश्रमात राहून मदत केली.

कालेलकरांना समकालीन असे चळवळीतील लेखक पुंडलिकजी कातगडे. 'पुंडलिक' हे आत्मचरित्र आणि 'कन्नड मराठी शब्दकोश' ही त्यांची महत्वपूर्ण निर्मिती. ह्या मंडळींनी एक ध्येयवादी गांधीवादी पिढी बेळगावात निर्माण केली. गांधी विचारांबरोबर त्यांचे सेवा कार्य, अस्पृश्यता निवारण्याचे कार्य बेळगावात रुजवण्यासाठी सानेगुरूजींबरोबर बेळगावातील अनेक व्यक्ती पुढे सरसावल्या. म. फुले यांच्या चळवळीची व अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचीही धुरा येथील समर्थ खांद्यांनी पेलली. नारायण अतिवाडकर गुरूजी साहित्यातून याची साक्ष पटवतात. अक्षरातून नसेल पण कृतीवाटे परशुरामभाऊ नंदिहळ्ळी यासारख्यांनी बेळगावच्या खेडोपाडी शाळेच्या रूपातले ज्ञानदीप लावण्याचे कार्य केल्यामुळे या भागातून समाजाच्या विविध स्तरातील लेखकांना अक्षर सेवा करणे शक्य झाले. साम्यवादी विचारधाराही इथे मागे पडली नाही. कॉ. कृष्णा मेणसे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक बेळगावातील वैचारिक मराठी साहित्य समृद्ध करतात. परिक्रमा, गोठलेली धरती पेटलेली मने, हो-ची-मिन्ह, क्रांतीसिंह नाना पाटील, बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक व राजकीय चळवळी, संत बसवेश्वर ते संत ज्ञानेश्वर, असा आहे गोवा, कॉ.दादा पुरुव इ. त्यांच्या पुस्तकांची शीर्षके जरी पाहिली तरी थोडी कल्पना येते.

स्वातंत्र्यपूर्व काळात खानापुरात दत्तोपंत सडेकर यांचा धनंजय नावाचा छापखाना होता. तिथून अनेक मराठी पुस्तकांची छपाई होत असे. 'लोकमित्र' नावाचे वर्तमानपत्रही होते. ब्रिटिशांनी अर्थातच ते सर्व बंद पाडले. रामतत्व प्रिंटिंग प्रेस ह्या बेळगावातील जुन्या प्रेसलाही साहित्य निर्मितीसंदर्भातील इतिहास आहे. पौराणिक पुस्तकांच्या छपाईसाठी प्रामुख्याने रामतत्व प्रसिद्ध आहे. या बरोबरच बेळगाव बुक डेपो, इंप्रेशन्स, श्री दिगंबरपंत परुळेकर, काणे मार्ग येथील प्रकाशन, नवसाहित्य प्रकाशन इ. संस्थांनी मराठी पुस्तकांची या भागात प्रकाशने केलेली आहेत.

समर्थ आणि गूढरम्य अशी चेटुक करणारी मराठी भाषा देणारे कथाकार जी. ए. कुलकर्णी बेळगावचे. अनाकलनीय अशा अंतस्थाचा वेध घेण्यात रमणारे. या कथालेखकाने मराठी कथेच्या प्रांगणात आपल्या नावाचा एक आगळाच दरवळ निर्माण केला. सांजशकुन, रमलखुणा, सोनपावले, रक्तचंदन, माणसे अरभाट आणि चिल्लर इ. साहित्यकृतींनी आपला स्वतंत्र ठसा उमटविला.

डॉ. वा. पु. गिंडे हे ज्येष्ठ संशोधक प्रवृत्तीचे लेखक, संत, साहित्याचे गाढे अभ्यासक म्हणून ते सुप्रसिद्ध आहेत. 'कल्लोळ अमृताचे' 'चांगदेव पासष्टी', 'बालकवींची कविता आकलन व आस्वाद' इ. ग्रंथांचे लेखन त्यांनी केले. 'शेक्सपियरचा मराठी नाटकांवरील प्रभाव' हा त्यांचा आगामी ग्रंथही लवकरच प्रसिद्ध होईल. डॉ. गिडे यांचा बरोबरीचे श्री. कृ. बा. मराठे, एल. आर. चौगुले, न. कृ.जोशी, डॉ.मधुकर विश्वनाथ कुलकर्णी यांचा 'गुरूचरित्र सर्वांगीण अभ्यास'- प्रा. व्ही. ए. पाटील (दोन हात), प्रा. राम नांदुरकर (शामराव देसाईवरील ग्रंथ), रं. शा. लोकापूर, मधुकर गुर्जरांच्या कथा इत्यादी साहित्य प्रसिद्ध आहे. व्यं. ल. जोशी, वसंत राजस, गोमेद, मधुसूदन गोखले, राजकुमार, वि. गो. साठे, ग. गो. राजाध्यक्ष इ. अनेक कवी लेखकांनी मराठी भाषेची बहुमूल्य स्वरूपाची सेवा केली आहे. मो. ग. कुंटे यांचे 'अतिप्राचीन भारत' 'पौलस्त्य वधाचा इतिहास' इ. पौराणिक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. 'नाच ग घुमा' या आत्मचरित्रासाठी प्रसिद्ध माधवी देसाई यांनी कथा कादंबरी लेखनही सातत्याने केले. व कठपुतली, सागर, कथा सावलीची, नियती, प्रार्थना इ. अनेक साहित्यकृती त्यांच्या नावावर आहेत.

'राब सारख्या एका खेड्याचा संपूर्ण जीवनपट दर्शविणाऱ्या, 'कापुराच्या वाती'सारख्या प्रबोधन युगाचे चित्रण करणाऱ्या तसेच 'अरण्यकांड' व 'ज्येष्ठ' सारख्या प्रसिद्ध कादंबऱ्यांचे लेखक अनंत मनोहर हे बेळगावमधील साहित्य विश्वातील एक अग्रगण्य लेखक होत. कादंबऱ्यांबरोबर अनेक कथासंग्रह, चरित्र, अनुवादित असे सुमारे पन्नासहून अधिक ग्रंथ त्यांच्या नावावर आहेत. ते महाराष्ट्र शासनाचे राज्य पुरस्कार विजेते लेखक आहेत. प्रा. सुभाष सुंठणकर हे विनोदासारखा साहित्यप्रकार सामर्थ्याने हातळणारे बेळगावचे लेखक. 'नसत्या उचापती' (१९९०), 'झाली एकदाची स्त्री मुक्ती', 'करीन लग्न तर राधाशीच' 'वाचक हा साहित्यचोर नसतो' या बरोबरच त्यांची विनोदी कादंबरीही 'आटपाटनगर साहित्य संमेलन' लोकप्रिय आहे. या कादंबरीचे वैशिष्ट्य म्हणजे ती प्रकाशित झाल्यानंतरच्या वर्षी खरोखरच अ.भा.म.सा. संमेलन अध्यक्षांशिवाय पार पाडण्याची वेळ प्रत्यक्षात आली होती!

निपाणी परिसरातून येणाऱ्या श्रेष्ठ कथाकार महादेव मोरे यांनी झंगाट, झोंबड, एकोणिसावी जात, चकवा, चित्ताक, बत्तीशी, फर्री अशा कथा-कादंबऱ्यांतून इकडच्या भागातील कसदार लेखणीचे दर्शन घडविले. तळागाळातील शोषितांची कथा, व्यथा त्यांच्या हृदयस्पर्शी जीवनानुभूतीसह ही लेखणी अविष्कृत करते. या भागाचे भूषण ठरणारे हे लेखक होत.

डॉ. भीमराव गस्ती यांच्या 'बेरड' या आत्मकथनाने शोषितांचे प्रखर अनुभवविश्व मांडण्याचा प्रयत्न प्रभावीपणाने केला. महाराष्ट्र शासनाच्या राज्य पुरस्काराने हा प्रयत्न सन्मानित झाला.

बेळगावातून कृ.ब.निकुम्ब, शंकर रामाणी आणि इंदिरा संत असे मराठी काव्यात सुप्रसिद्ध झालेले प्रतिभावंत कवी होऊन गेले. यापैकी इंदिरा

संतांच्या 'गभरिशीम' या कविता संग्रहास तर साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झाला. अर्थातच त्यांच्या प्रभावातून येथे मोठ्या संख्येने कवी-कवयित्रींनी आपला आवाज काव्यस्वरूपाच्या माध्यमातून शोधण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये भास्कर जनार्दन फडके, व्यंकटेश वाळवेकर, अविनाश ओगले, दत्ता कार्किर्डे, संजय बरगावकर, तुकाराम अडकुरकर, कवी किनारा (ना. रा. किल्लेकर), शशी संगम पाटील, प्रसाद बसवंत शहापूरकर, सुमन श्रीखंडे, उर्मिला शहा, राजू पोतदार इत्यादी अनेकांची लेखणी बेळगावचा काव्यस्वर आळवते आहे. कवयित्री मीरा ह्या प्रस्थापित कवयित्री असून त्यांचे पुनर्जन्म, वारा आणि कमळ इ. अनेक कविता संग्रह प्रसिद्ध आहेत. बृहन्महाराष्ट्र पुरस्काराने त्या सन्मानित आहेत.

श्री. गोविंद केळकर, प्रा. माधुरी शानभाग, प्रा. डॉ. विनोद गायकवाड, प्रा. वि. गो. वडेर व डॉ. अमृत यार्दी, प्रा. डॉ. चंद्रकांत वाघमारे, त्याचबरोबर प्रा. आनंद मेणसे, प्रा. संध्या देशपांडे, श्री. अनिल आजगांवकर, प्रा. डॉ. मनिषा नेसरकर, श्री. विजयकुमार दळवी (जोगवा), गुणवंत पाटील (भरळ), सलीम शेख (वळवाचा पाऊस) निपाणी, रमा मराठे, मेधा मराठे इ. लेखक बेळगावच्या मराठी साहित्याचा गोफ विणत आहेत. त्यामधील विज्ञान कथा लेखनात भर टाकणाऱ्या माधुरी शानभाग यांनी आपली विशेष ओळख निर्माण केलेली आहे. महाराष्ट्र शासनाकडून त्या सन्मानित झालेल्या लेखिका आहेत.

प्रस्तुत लेखाच्या लेखिका प्रा. डॉ. शोभा नाईक कवयित्री असून स्त्रीवादी समीक्षा पद्धती, लोकसाहित्य, कन्नड-मराठी भाषिक व सांस्कृतिकतेच्या अभ्यासक आहेत. कथालेखिका व समीक्षक म्हणूनही त्या प्रसिद्ध आहेत. तीन वेळा महाराष्ट्र शासनाच्या राज्य पुरस्कारांनी त्या सन्मानित आहेत. त्यामध्ये २०१३-१४ च्या श्री. के. क्षीरसागर पुरस्काराच्या त्या मानकरी होत.

तर या सर्व मराठी लेखक-कवींनी दिलेल्या योगदानाकडे दृष्टिक्षेप टाकता बेळगाव हे धार्मिक, पौराणिक ऐतिहासिक, सामाजिक, रंजनपर, आत्मनिष्ठ, वस्तुनिष्ठ, वैचारिक, प्रबोधनात्मक, विज्ञाननिष्ठ, अनुवादित संशोधनात्मक, समीक्षात्मक लेखणी कौशल्य प्राप्त स्थळ असल्याचे लक्षात येते. 'व्यक्त होणे' ही माणसाची निकड भागविण्याचा बेळगावातील ह्या सर्वांचा प्रयत्न वैशिष्ट्यपूर्ण म्हणावा लागेल. ❑

ESTD 1937

Best Wishes From Institutions

of

Belgaum Jilha Prathamik Shikshan Samiti, Belgaum.

1. M. V. Herwadkar English Medium High School
2. RamkumarJangra Kindergarten
3. Marathi Teachers' Training Institute
4. J. N. Bhandari School of Art
5. Radhabai Ramkrishna Salgaoncar Computer School

KARNATAKA LAW SOCIETY

(Registered under Society Reg.act XXI of 1860 No. 950 of 1939-1940)
(Under the Registration of Bombay Public Trust Act 1950(Bom. XXIX of 1950) No. E-107(BGM) 19 Sept. 1952)

ADMINISTRATIVE OFFICE

Post Box No. 512, Tilakwadi, Belgaum-590 006.
Phone : 0831 - 2405524, 2405533, Fax- 0831- 2485353
Website : www.klsbelgaum.org, Email : klsbelgaum@rediffmail.com

ESTD. 1939

Courses conducted by the following institutions of KLS 75 Years of glorious service in the field of education

RLLC

R. L. Law College

Tilakwadi, Belgaum - 06, Karnataka.
(Affiliated to Karnataka State Law University)
Website : www.rllc.klsbelgaum.org
E-mail : rllawcollege@rediffmail.com

LL.B. Course (3 Years)
B.A., LL.B. Course (5 Years)
B.B.A., LL.B. Course (5 Years)

Recognised by Bar Council of New Delhi.
Approved by Govt. of Karnataka.

GCC

Gogte College of Commerce

Tilakwadi, Belgaum - 06, Karnataka.
(Affiliated to Rani Channamma University, Belgaum)
Website : www.gcc.klsbelgaum.org
E-mail : principal_gcc_belgaum@yahoo.com

* PCU	Commerce & Science
* B.Com	(6 Semester) 3 Years
* BBA	(6 Semester) 3 Years
* BCA	(6 Semester) 3 Years
* M.Com	(6 Semester) 3 Years
* PGDCA	(4 Semester) 1 Year

Co-Opt Coaching for CPT/PCC/ATC Classes.
Career Oriented Programme (COP) of ISTC.
Stated Skill COP of Infosys Ltd., Bangalore.

Register Now to ACC

GIT

Gogte Institute of Technology

Udyambag, Belgaum - 08, Karnataka.
Website : www.git.edu
Affiliated to Vishveshwaraya Technological University, Belgaum.
Approved by AICTE, New Delhi.
Recognised by Govt. of Karnataka.
Accredited by National Board of Accreditation.

U. G. Courses	P. G. Courses
* Civil Engg.	* Structural Engineering
* Mechanical Engg.	* Production Management
* E & E Engg.	* Comp. Integrated Manufg.
* E & C Engg.	* Digital Comm. Engg.
* Comp. Sc. & Engg.	* Comp. Sc. & Engg.
* Architecture	* M.C.A.
* I. Science & Engg.	* M.B.A. (Full 2 Years)

GET Exam Conducted by Govt. of Karnataka & COMEDK

Entrance Exam Conducted by VTU, Belgaum.

IMER

Institute of Management Education & Research

Anandwadi Nagar, Belgaum - 08, Karnataka.
Website : imer.klsbelgaum.org
E-mail : directoredu@klsimer.edu

M.B.A. (P.G. Degree) (4 Semester) 2 Years

Affiliated to Rani Channamma University, Belgaum.
Recognised by A.I.C.T.E., New Delhi.
Approved by Govt. of Karnataka.

VPP

Vasantarao Potdar Polytechnic

G. C. Campus, Tilakwadi, Belgaum - 06.
Affiliated to Directorate of Technical Education, Bangalore - Karnataka.
Website : vpp.klsbelgaum.org

Electronics & Communication	(6 Semester) 3 Years
Architecture	(6 Semester) 3 Years
Computer Science	(6 Semester) 3 Years
Civil Engg.	(6 Semester) 3 Years
Mechanical Engg.	(6 Semester) 3 Years

SCHOOL

KLS English Medium School

G. C. Campus, Tilakwadi, Belgaum - 06.
Recognised by Govt. of Karnataka

Nursery to Std. X

Website : school.klsbelgaum.org
E-mail : klsschool@yahoo.com

VDRIT

Vishwanathrao Deshpande Rural Institute of Technology

Haliyal - 581 329.
Affiliated to VTU, Belgaum.
Approved by AICTE, New Delhi.
Recognised by Govt. of Karnataka.

U. G. Courses	P. G. Courses
* Mechanical Engg.	* Industrial Engg.
* E & C Engg.	* Thermal Power Engg.
* E & E Engg.	* M.C.A.
* Comp. Sc. & Engg.	

Website : www.vdrit.org

At Haliyal

KLS College of BCA

Haliyal - 581 329.

BCA (6 Semesters)

KLS PU Science College

Haliyal - 581 329

Science (Physics, Chemistry, Maths, Biology, Comp. Science)

PUBLIC SCHOOL

KLS Public School

Sy. No. 121, At Post : Peeranwadi, Belgaum - 14.
(Affiliated to CBSE Board, New Delhi)
Website : publicschool.klsbelgaum.org
E-mail : pro@klspublicschool.org

LKG, UKG
Std. I to Std. X

Independent Co-educational Day Boarding School.
Provides excellent & all-round education.

९५ वे अ.भा. मराठी नाट्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ. अशोक साठे यांच्याशी संवाद

डॉ. अशोक साठे

डॉ. अशोक साठे :

व्यवसायाने डॉक्टर असले तरी ज्येष्ठ आणि श्रेष्ठ दिग्दर्शक, अभिनेते, दिल्ली आणि महाराष्ट्राच्या नाट्य स्पर्धांमध्ये अभिनय आणि दिग्दर्शनाचे पुरस्कार. बेळगावात नाट्य विचाराला चालना देणारे श्रेष्ठ विचारवंत. नवीन गायक नटांची पिढी तयार केली.

मेधा मराठे :

कथा लेखन, एकांकिका लेखन, प्रसिद्ध आणि पुरस्कार प्राप्त. अभिनय आणि दिग्दर्शन याची आवड.

मेधा मराठे

मेधा : डॉक्टर, अगदी तरुण वयापासून आतापर्यंत म्हणजे जवळजवळ ५५ वर्षे आपण नाटक करीत आहात. व्यवसायाबरोबरच आपली नाट्याची ओढ वाढत गेली. केव्हापासून याची सुरुवात झाली?

डॉ. साठे : मी पाचवीत असताना बंगालच्या 'दुष्काळ फंडासाठी' केलेला 'साष्टांग नमस्कार' चा प्रयोग लोकांना आवडला. स्टुडंट्स युनियनने तो कार्यक्रम केला होता. जनसंघाच्या जगन्नाथराव जोशींनी त्यांचं कौतुक केलं होतं. हंस टॉकीजच्या स्टेजवर १९४४ साली तो झाला असावा. त्यावेळी आपल्याला नाटक करणं आवडतं हे लक्षात आलं.

मेधा : म्हणजे शाळेपासून सतत नाटक करीत आलात?

डॉ. साठे : नाही. शाळेत पाठ्यपुस्तकातले लहान लहान प्रवेश करत होतो. पण खरी सुरुवात मुंबईला ग्रँट मेडिकल कॉलेजला असताना झाली. १९४८-१९५३ पर्यंत तिथे खूप मोठ्या डायरेक्टरांच्या हाताखाली काम करायला मिळालं. 'संगीत बिचारे सौभद्र' चे दिग्दर्शक पु.ल. होते. देवमाणूस, भावबंधनसाठी भालचंद्र पेंढारकर यायचे. दोन-तीन महिने एका नाटकाच्या तालमी चालायच्या. मी 'भावबंधन' मध्ये धुंडिराज, देवमाणूस मध्ये अनिल ची भूमिका केली. त्या सगळ्यांना आवडल्या.

मेधा : ही सगळी संगीत नाटकं होती. तुमचं संगीताचं शिक्षण त्यापूर्वीच झालं होतं का?

डॉ. साठे : नाही. शास्त्रशुद्ध शिक्षण मी १९५४ नंतर घ्यायला सुरुवात केली. माझे गुरू पाच्छापूरकर जोशीबुवा. पण कॉलेजातील संगीत नाटक करीत असताना गिरगावातील एका तबलजींच्या क्लासमध्ये तालमी होत. त्यामुळे लय, ठेका यांची जाण आली. नाट्य संगीत गाण्याची तयारी तेव्हा झाली. लहानपणी बेळगावला राष्ट्रसेवादलात असताना गाणी म्हणत होतो. राम आपटे, नाथ पै, बळवंतराव दीक्षित हे बरोबर असायचे.

मेधा : बेळगावातील नाट्य प्रवासाची सुरवात कशी काय झाली?

डॉ. साठे : मी १९५४ ला इथे प्रॅक्टिस सुरू केली. मी कॉलेजमध्ये असताना नाटकात काम करीत होतो हे सगळ्यांना माहीत होतं. इथे त्या वेळी 'कलोपासना' नावाची नाटक करणारी संस्था होती. प्रा.गो.म. वाटवे हे संस्थापक होते. मी आपोआपच त्यात ओढला गेलो. 'साष्टांग नमस्कार' हे नाटक तेव्हा केलं. १९५६ साली आर.पी.डी. कॉलेज मध्ये नाट्यसंमेलन भरलं होतं. तेव्हाही ते नाटक झाले. तेव्हा स्वतः अत्र्यांनी त्यात भूमिका केली होती. बाकी पात्रे इथलीच होती.

मेधा : अभिनयाची जडण घडण कशी झाली? विशेष उल्लेख करावासा वाटतो?

डॉ. साठे : कॉलेजमध्ये असताना पु.ल. नाटक बसवायचे तेव्हा ते त्यांच्या मनात असलेल्या व्यक्तीची हुबेहूब नक्कल करून दाखवायचे. कधी ती दामूअण्णा मालवणकरांची असे तर कधी पार्श्वनाथ आळतेकरांची असे. त्यातून नाटकातलं पात्र

चपखलपणे उभं राही. भालचंद्र पेंढारकरांनी रंगभूमीवर हालचाली कशा कराव्या ते शिकवले. सिगरेट ओढून दाखविली की व्हिलन होत नाही असं ते म्हणायचे. स्पष्ट शब्दोच्चार तसेच शब्दातील चढउतार व भाव ते दाखवायचे. तसेच संवाद म्हणतानाच्या हालचाली सुंदर करायचे.

मेधा : बेळगावला राहून तुम्ही नाट्यस्पर्धातही उतरलात.

डॉ. साठे : हो. 'कलोपासना' बंद पडली. पण बाप्पा शिरवईकरांनी 'स्कूल ऑफ कल्चर' तर्फे वैजयंती बसवलं. ते राज्य नाट्य स्पर्धेत कोल्हापूरला पहिलं आलं. तसेच 'राणीचा बाग' मध्ये मनोहर या व्हिलनची भूमिका केली. कोल्हापूरला ते पहिलं येऊन नंतर मुंबईला गेले. ते रांगणेकरांपेक्षा छान होत आहे असा रिपोर्ट नवशक्तीत माझ्या फोटोसकट आला. 'उदयोन्मुख कलाकार डॉ.साठे,' असा हा माझा नाट्य संदर्भातला पहिला फोटो. योगायोगाने त्याच वेळी आचार्य अत्रे आमच्या घरी उतरले होते.

मेधा : पुढे वरेरकर नाट्यसंघातही तुमच्या भूमिका गाजल्या?

डॉ. साठे : हो. ५७/५८ साली शेणोलीकर त्याचे सेक्रेटरी होते. उद्याचा संसार मध्ये खलनायक, तुज आहे तुजपाशी मध्ये आधी काकाजी मग सतीश, झोपी गेलेला जागा झाला, श्रीमंत, पोरखेळ, मग रणजीत देसाईंची कांचनमृग, धन अपुरे, अक्षांश रेखांश अशी नाटकं केली. त्यात माझ्याबरोबर श्री. व सौ दिघवडेकर, श्री व सौ.एम्.हरिहर श्याम जोशी, बेळगावकर पुढे शशीताई भानप, शकुताई याळगी, हिराताई गिंडे, दौलत मुतकेकर अशी मंडळी होती. एक मजेशीर प्रसंग मला आठवतो. माझं लग्न झालं होतं. सासुरवाडी कोल्हापूरला. नाटकाचा प्रयोग तिथे होता. मला हिरॉइनकडून थोबाडीत खायची होती. आणि प्रत्यक्ष प्रयोगाच्या वेळी हिरॉइन दिघवडेकर बाईनी थोबाडीत मारलेल्याचा आवाज थिएटरमध्ये घुमला. प्रसंग रंगला पण सासऱ्यांना फार वाईट वाटलं.

मेधा : वाङ्मय चर्चा मंडळातर्फे तुम्ही नाटकं बसवलीत. अभिनयाकडून दिग्दर्शनाकडे तुम्ही कसं काय वळलात?

डॉ. साठे : वाङ्मय चर्चा मंडळाचे संस्थापक माझे वडील डॉ. केशवराव साठे असल्याने त्याच्याशी माझा संबंध होताच. वाङ्मयचर्चा मंडळात किर्लोस्कर स्मारक मंदिर आहे. तेव्हा अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने संगीत सौभद्र बसवायचं ठरलं. दादासाहेब नाईक ते बसवणार होते. पण आमच्या वेळेचं गणित जमेना. ते म्हणाले, तूच बसव! असा अचानक मी दिग्दर्शनात उतरलो.

मेधा : दिग्दर्शन, विशेषतः संगीत नाटकांचं दिग्दर्शन करताना कोणत्या गोष्टी विशेषत्वाने लक्षात घ्याव्याशा वाटल्या.

डॉ. साठे : माझ्यासमोर मघाशी उल्लेख केलेल्या दिग्दर्शकांचे चांगले आदर्श होते. त्यामुळे संगीत नाटकं ही केवळ संगीत न होता त्यातील नाट्य खुलेल असा अभिनय व हालचाली हव्यात ही काळजी मी घेतली. गाणं म्हणतानाचा त्या पात्राचा अभिनय, त्यावेळी इतर पात्रांचं भावदर्शन हेही महत्वाचं ठरतं. नाट्यगीत नाटकात म्हणताना ते 'ॲक्शन सॉंग'व्हायला हवं.

मेधा : तुम्ही बसवलेलं प्रत्येक संगीत नाटक दिल्लीला जाऊन दिग्दर्शनाचे, अभिनयाचे पुरस्कार घेऊन आलं. ही आम्हा बेळगावकरांना अभिमानाची गोष्ट वाटते. पुढच्या दिग्दर्शनाच्या प्रवासाबद्दल सांगा.

डॉ. साठे : वाङ्मय चर्चा मंडळातर्फे देवलांच्या जन्मशताब्दी निमित्त संशयकल्लोळ, वरेरकरांच्या जन्म शताब्दी निमित्त हाच मुलाचा बाप, अत्र्यांच्या जन्मशताब्दी निमित्त भ्रमाचा भोपळा अशी नाटकं बसविली. सं.सौभद्रचे १४ प्रयोग, संशयकल्लोळचे ३६ प्रयोग झाले. त्याचबरोबर प्रत्येक नाटकात साधू, वैशाखशेठ, कृष्ण अशा भूमिका केल्या.

मेधा : प्रॅक्टिस सांभाळून कसं काय हे कळत नाही. गायन, नाटक, तालमी?

डॉ. साठे : नाटक हे माझ्या जीवनाचं अविभाज्य अंग आहे. कलेची ओढ असेल तर सर्व जमतं.

मेधा : नाट्याच्या संदर्भात काही व्यक्तिविशेषांची आठवण-

डॉ. साठे : चांगले लेखक, दिग्दर्शक यांच्याबरोबर मी काम केले. नाटककार रणजीत देसाई माझ्या डोळ्यासमोर घडले असं म्हणावं लागेल. रणजीत हे कादंबरीकार होते. उत्तम कथा लिहीत. नाटकात साहित्यिक भाषा चालत नाही. त्यामुळे सुरुवातीला 'कांचनमृग' लिहिल्यावर मी, बाप्पा शिरवईकर, राजाभाऊ मराठे कोवाडला जाऊन बसत होतो आणि नाट्याला आवश्यक ते बदल करून घेत होतो. मग त्यांचं धनअपुरे वगैरे नाटकं आली. बंध रेशमाचे तर खूपच गाजले.

मेधा : बाप्पा शिरवईकरांच्या बावतीत काही सांगाल?

डॉ. साठे : दिग्दर्शन करताना बाप्पांना चटकन काही सुचत असे. ॲपसेंट माईंडेड डॉक्टरचं काम करताना मी डॉक्टरची बॅग न्यायच्या ऐवजी गडबडीत साप असलेली बॅग न्यावी ही त्यांची सूचना फारच परिणामकारक ठरायची. बाप्पांचं नेपथ्य उत्कृष्ट असे. 'कांचनमृग' मध्ये भिंतीवर गांधींचा फोटो, खाली टेबलावर लाचेचे पैसे आणि ते घेताना फोटोवरचा हार बरोबर त्यावर पडणे ही कल्पना त्यांनी प्रत्यक्षात दाखविली. दिल्लीचे लोक चकित झाले. हे कसं केलेत असं विचारू लागले. बाप्पानी त्यासाठी लोखंडी बारीक सळ्या फोटोमागून टाकून त्या ऐनवेळी आत ओढल्या होत्या. बाप्पांबरोबर काम करताना मजा यायची.

मेधा : तुम्ही बेळगावात नवीन कलाकारांची पिढी घडविलीत.

डॉ. साठे : प्रभाकर शहापूरकर, संगीता बांदेकर कुलकर्णी, नंदन हेर्लेकर, मुकुंद गोरे, प्रिया काळे, तसंच शारदोत्सावात नाटके बसविली. त्यातील चांगला अभिनय करणाऱ्यांचा एक गट तयार झाला.

मेधा : आमच्यासारखे मार्गदर्शनासाठी येणारेही आपल्याकडे अनेक असतात. मी 'माझा खेळ मांडू दे' मध्ये आपल्या मार्गदर्शनाखाली काम केलंय. आजच्या नाटकाविषयी आपलं काय मत आहे?

डॉ. साठे : रिॲलिस्टिक नाटकं यायला लागली तेव्हा सुरुवातीला वाटलं की प्रेक्षक मनोरंजनासाठी नाटक बघतो. तेव्हा फार वास्तववादी विषय कशाला रंगभूमीवर दाखवावे. 'मला उत्तर हवंय' असं एक नाटक होतं. त्यातील तरूण नायिकेची कौटुंबिक जबाबदारी, त्यातून तिचं ब्रॉथेलमध्ये काम करणं, आत्महत्या हे पाहून मी अस्वस्थ झालो. अशी नाटकं नकोत असं वाटलं. पण हळू हळू अशी नाटकं पचू लागली. बदलत्या सामाजिक परिस्थितीत नाटकांनी काही द्यायलाही हवं हे पटलं. बऱ्याच दिग्दर्शकांना लेखकांनाही हे पटलं. त्यामुळे 'संध्याछाया' सारखी नाटकं गर्दी खेचू लागली. इथे बेळगावात प्रा.संध्या देशपांडे अशी वास्तववादी नाटकं करतात ते मला कौतुकास्पद वाटते.

मेधा : आपण स्वतः सामाजिक विषयावर 'माझा खेळ मांडू दे' बसवलं होतं.

डॉ. साठे : हो. रसिकांना ते खूप आवडलं. तरीसुद्धा नाट्यामध्ये सामाजिक, राजकीय किंवा इतरही काही प्रॉब्लेम मांडताना त्या जोडीला करमणूकही प्रेक्षकांना मिळायला हवी असं मला ठामपणे वाटतं. नाटक हे प्रेक्षकांसाठी असतं, त्याचा आनंद त्यांना मिळाला पाहिजे. सं. संशयकल्लोळ सारखा.

मेधा : आपण नाट्यसंमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी आहात ही बेळगावकरांना अभिमानास्पद गोष्ट आहे. उत्तम अभिनय, दिग्दर्शन याचबरोबर उत्तम व्यक्ती संमेलनाच्या मार्गदर्शनासाठी आहे ही दुर्मिळ घटना आहे. मराठी बेळगावकरांच्या नाट्यविषयक अडचणी आपण धसाला लावाल याविषयी खात्री आहे.

धन्यवाद.

डॉ. साठे यांना मिळालेले पुरस्कार

१९८६ - संगीत सौभद्र (दिग्दर्शन डॉ. साठे) दिल्ली.
उत्कृष्ट गायक नटी - संगिता बांदेकर

१९९२ - संगीत संशयकल्लोळ
उत्कृष्ट नाटक, उत्कृष्ट दिग्दर्शन, उत्कृष्ट गायक नट, उत्कृष्ट गायक नटी - संगीता बांदेकर,
उत्कृष्ट रंगभूषा, उत्कृष्ट ऑरगन साथ,
उत्कृष्ट प्रकाश योजना - पेडणेकर,
उत्कृष्ट सहाय्यक नटी.

१९९४ - हाच मुलाचा बाप
उत्कृष्ट दिग्दर्शन,
उत्कृष्ट गायक नटी - संगीता बांदेकर

१९९९ - भ्रमाचा भोपळा - उत्कृष्ट दिग्दर्शन

महात्मा जोतिबांचे नाट्यलेखन

महात्मा जोतिबा फुले यांनी १८५५ सालात 'तृतीय रत्न' हे नाटक लिहिले. एक चांगला सामाजिक विषय त्यांच्या मनात होता. अत्यंत आटोपशीर संवाद रचनेत त्यांनी तो व्यक्त केला. पण हे नाटक त्याकाळात लेखन व प्रयोग स्वरुपात लोकांपुढे आले नाही.

- डॉ. वि.भा. देशपांडे
(मराठी नाटक-नाटककार-काळ आणि कर्तृत्व)

उभी असते. बायबलमधल्या पौराणिक कथांपासून इतिहासापर्यंत, सामाजिक प्रश्नांपासून आत्मशोधाच्या जाणिवांपर्यंत, तुफान विनोदी करमणुकीपासून भव्यदिव्य मानवतावादी कहाण्यांपर्यंत कुठलाही विषय वर्ज्य नाही. नाटकाचा विषय कोणताही असला तरी सर्व नाटकांमधला समान धागा म्हणजे संगीत! 'संगीत' हाच ब्रॉडवे म्युझिकल्सचा आत्मा!

अमेरिकन संगीत नाटकांची परंपरा अतिशय जुनी आहे. १७५० सालापासूनची! ह्या प्रदीर्घ २६० वर्षांच्या कालावधीत अमेरिकन संगीत नाटकाने किती वळसे-वळणं घेतली, किती बदलांना तोंड देताना स्थित्यंतरं/रूपांतरं केली, आणि काळाच्या गतीशी जुळवून घेत स्वतःचं स्वतंत्र अस्तित्व टिकवून धरण्याची शिकस्त केली. एकेकाळी संगीत नाटकाची सुरुवात संगीतकारापासून व्हायची. नव्या चाली रचणारे हे संगीतकार न्यूयॉर्कच्या एका गल्लीत (West 28th street between 5th and 6th Avenue) पियानो वाजवीत बसलेले असत. सतत ठणठणाट चालू असलेल्या ह्या गल्लीला लोक काहीसं हेटाळणीनं Tin Pan Alley (भांडी बडवणाऱ्यांची गल्ली!) असं म्हणत असत! पण त्या गल्लीतून होतकरू कवी चाली ऐकत फिरत असत. एखादी चाल आवडली तर त्या चालीवर ते शब्दरचना करून गाणी लिहित असत. (हे लिहीत असताना मला एकीकडे पु. ल. देशपांडे आणि गदिमांची आठवण होते आहे. असं म्हणतात की कधी कधी गदिमा पु.लं. ना 'फुलदेस्पांदे! तुम्ही बाजा वाजवीत रहावे!' अशी सूचना करीत. आणि ते पेटीचे सूर ऐकता ऐकता अचानक अप्रतिम गाण्याच्या ओळी गदिमांना सुचत असत. शब्द आणि सुरांचं हे अतूट नातं दैवीच असावं.) गाणी घडत असताना त्या गल्लीत हिंडणारे नवे/जुने दिग्दर्शक ती गाणी नेमकी हेरत असत. अशी काही गाणी जमली की दिग्दर्शक एखाद्या लेखकाला हाताशी धरून एखाद्या प्रयोगाचा साचा बनवून घेत. हा साचा घेऊन मग दिग्दर्शक निर्मात्याच्या शोधात फिरे. आणि हे सगळं जुळून आलं की नवीन संगीत नाटकाची निर्मिती होत असे! १८८० पासून १९२० पर्यंत अशा संहिता नसलेल्या संगीत नाटकांची निर्मिती होत राहिली.

परंतु पहिल्या महायुद्धानंतर परिस्थिती बदलली. नाटकाच्या कथांना महत्व प्राप्त होऊ लागलं. त्यात नर्तक-नर्तिका-नृत्यदिग्दर्शकांची भर पडली. संवाद प्रसंग-गाणी-नृत्य-संगीत याचबरोबर नेपथ्य, वेशभूषा, रंगभूषा इत्यादी सर्व बाबींना महत्व मिळू लागलं. १९२०-१९३० हे दशक संगीत रंगभूमीचा सुवर्णकाळ ठरलं (विशेष म्हणजे मराठी संगीत रंगभूमीचा हाच काळ सुवर्णकाळ ठरला होता. बालगंधर्वांची नाटकं ह्यावेळी गाजत होती.) पण १९३० नंतर जागतिक मंदीचा (The Great Depression) काळ आला आणि Broadway वर उलथापालथ झाली. हजारो लोकांचे job गेले. नाटक कंपन्या बंद पडल्या. त्यातच बोलपटांनी प्रेक्षकांचं मन cinema कडे ओढून घेतलं. ह्या आव्हानात्मक परिस्थितीत संगीत रंगभूमी डगमगली नाही. तेवढ्याच हिरिरीने प्रयत्न करून, नव्या नाटकांची निर्मिती करून परत प्रेक्षकांना रंगभूमीकडे आकृष्ट करण्यात त्यांनी यश मिळवलं. १९८० च्या सुमारास संगणकीय technology, video games वगैरे नव्या करमणुकीच्या साधनांशी समर्थपणे स्पर्धा करून नवी technology आत्मसात करून सध्याची संगीत रंगभूमी समर्थपणे उभी आहे! समाजाची करमणूक करत, कधी समाजाला दिशा दाखवत, पुढे नेत, प्रगती करते आहे. अमेरिकन संगीत नाटकांचे, संगीताच्या दृष्टीने तीन मुख्य प्रकार करता येतील. त्यातला पहिला साचा Revue पद्धतीचं नाटक. ह्या नाटकात संवाद असलेले प्रवेश आणि मुख्यतः गाण्यांचा संच सादर केला जातो. त्याच्या बरोबर उलट साचा आहे त्याला Grand Opera असं म्हटलं जातं. ह्या नाटकात संवाद अजिबातच नसतात- फक्त Classic पद्धतीचं संगीत आणि गाणी यांमार्फत कथानक मांडलं जातं. आणि ह्या दोहोंच्या मधला साचा म्हणजे Broadway Musicals- संगीत नाटक. ह्या नाटकांमधे संगीत व गाण्यांचा आणि त्याचबरोबर नृत्यांचा काळजीपूर्वक वापर केला जातो. ह्या तऱ्हेच्या संगीत नाटकांची खरीखुरी प्रगती रिचर्ड रॉजर्स (लेखक व संगीतकार)आणि ऑस्कर हॅमरस्टाईन (दुसरा)- (लेखक आणि कवी) ह्या जोडगोळीने १९४०-१९६० ह्या वीस वर्षांच्या कालखंडात केली. ह्या दोघांनी एकत्र काम करत अनेक उत्तमोत्तम संगीत नाटकांची निर्मिती करून अमेरिकन संगीत रंगभूमीला दुसऱ्या महायुद्धानंतर सुवर्णकाल प्राप्त करून दिला. ह्या जोडगोळीने लिहिलेलं व संगीतबद्ध केलेलं शेवटचं गाणं 'Edelweiss', त्यांनीच लिहिलेल्या सदाबहार संगीत नाटकातलं "Sound of Music' मधलं गाणं तर इतकं अफाट लोकप्रिय झालं की अनेक लोकांना अजूनही असं वाटतं की हे गाणं एकतर ऑस्ट्रीयाच लोकगीत असावं किंवा त्यांचं राष्ट्रगीत असावं! ह्या लेखक-कवी-संगीतकार जोडीचं पहिलंच संगीत नाटक १९४३ सालचं "Ok lahoma!" ह्या नाटकानं संगीत रंगभूमीवर क्रांती केली. ह्या नाटकात प्रथमच गाण्यांचा अत्यंत प्रभावी उपयोग नाटकाचं कथानक पुढे सरकवण्यात करण्यात आला. गाण्यामुळे पात्रांच्या भाव-भावनांनी वेगळीच उंची गाठली, नाट्यपूर्ण घटनांना जबरदस्त उठाव आला, वातावरण निर्मिती साधत गेली आणि प्रेक्षकांच्या करमणुकीला सर्वांगानी परिपूर्णता लाभली. ह्या नाटकापासून आजतागायत निर्माण होणाऱ्या ब्रॉडवे म्युझिकल्स मधल्या संगीताच्या व गाण्यांच्या प्रयोजनाचा हाच मानदंड ठरलेला आहे. पॉप, जॅझ, क्लासिकल अशा अनेक तऱ्हेच्या संगीताचा वापर अमेरिकन संगीत नाटकातून करण्यात आला. त्यातल्या गाण्यांचे उद्देशही वेगवेगळे होते.

मराठी संगीत नाटकाच्या संदर्भात व. पु. काळेंनी घेतलेली डॉ. वसंतराव देशपांडे यांची मुलाखत लक्षणीय आहे. १९८२ साली झालेल्या ६२ व्या मराठी नाट्य संमेलनाचे वसंतराव अध्यक्ष होते. ही मुलाखत आता CD च्या स्वरूपात उपलब्ध आहे. मराठी संगीत नाटकांमधल्या गाण्यांचा आणि संगीताचा प्रवास वसंतरावांनी गाऊन दाखवलेला आहे. मराठी

संगीत नाटकांमधे अगदी किर्लोस्करांच्या काळापासून अनेक तऱ्हेच्या संगीताचा वापर करण्यात आला आहे. लोकगीतं व घरगुती गाण्यांच्या चाली (माजघरातली गाणी, ओव्या, धावे), हरिदासी पद्धतीची गाणी (भजनं, किर्तनं), इराणी-अफगाणी संगीत (ठुमरी, दादरा, गझल), हिंदुस्थानी संगीत (टप्पे, होरी, रागदारीच्या चीजांवर आधारलेली गाणी) तसंच वृत्त, छंदावर रचलेली गाणी (साकी, दिंडी, कामदा, अंजनी गीत) ह्यांचा सोदाहरण, अप्रतिम आढावा वसंतरावांनी ह्या मुलाखतीत घेतलेला आहे. नाटकात संगीताचं प्रयोजन काय? ह्या मुद्यावर भाष्य करताना वसंतराव म्हणतात की, ''संगीत हा नाटकाचा अविभाज्य घटक असला पाहिजे. एक गाणं जरी गाळलं तरी नाटकाचा प्रवाह कुंठीत झाला पाहिजे. शब्द, सूर आणि नाटकातल्या प्रसंगातल्या भावना एकजीव झाल्या पाहिजेत.'' रॉजर्स-हॅमरस्टाईन ह्या जोडगोळी प्रमाणेच अनेक उत्तम मराठी संगीत नाटकं प्रेक्षकांना देणारी जोडी म्हणजे गोविंदराव टेंबे आणि कृ. प्र. खाडीलकर. त्याच प्रमाणे संगीतकार भास्करबुवा बखले, आणि स्वरराज बालगंधर्व आणि लेखक, गीतकार खाडीलकर किंवा गडकरी असेही गुणवान लोकांचे संच मराठी संगीत नाटकांना लाभलेले आहेत. मराठी आणि अमेरिकन संगीत नाटकांच्या यशामधले असे काही घटक समान आहेत.

सध्या ब्रॉडवे वर Pippin, Matilda, Jersey Boys, Kinky Boo... Wicked, Chicago, Motown, Aladdin, Cabaret यासारखी संगीत नाटकं रंगभूमी गाजवत आहेत. ह्याव्यतिरिक्त सदाहरित असलेल्या नाटकांचे - म्हणजे The Phantom of the Opera, The Lion King, Les Miserables, आणि Mamma Mia ह्या नाटकांचे प्रयोगही चालू असतातच. अनेक कलांचे सतत बदलणारे प्रवाह ब्रॉडवे वर येऊन एकजीव होतात. त्या अनेकपेडी, अनेकरंगी अमेरिकन संगीत नाटकांचा प्रवाह सदैव नव्या जाणिवांकडे, प्रयोगशीलतेकडे आणि जीवनस्पर्शी अनुभवांकडे प्रेक्षकांना खेचून घेतो आहे. आणि हेच Broadway Musicals च्या यशाचं रहस्य आहे. म्हणूनच अमेरिकन रंगकर्मी जे म्हणतात तसंच म्हणावसं वाटतं - there is no business like show business!

❑

रामकृष्णबुवा वझे, नाट्यसंगीतकार
विनम्र अभिवादन

बेळगावातील नाट्यगृहे

- लोकमान्य रंगमंदिर (रिझ)
- गोगटे रंगमंदिर
- कला मंदिर
- वाङ्मय चर्चा मंडळ
- कुमार गंधर्व रंगमंदिर

हौशी रंगभूमी ते व्यावसायिक रंगभूमी किती खरं ..... किती खोटं....!

१९७८ पासून रंगभूमीवर कार्यरत आहेत. त्यानी ५०हून जास्त एकांकिका व २५ हून जास्त नाटकांचे लेखन व दिग्दर्शन केले आहे. त्यांना अखिल भारतीय नाट्य परिषदेचा सर्वोत्कृष्ट लेखक म्हणून बा.म. गोगटे पुरस्कार तसेच राज्य शासनाचे सर्वोत्कृष्ट लेखक, दिग्दर्शक म्हणून पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यांना सर्वोत्कृष्ट मालिका 'पैलतीर' साठी 'रापा' पुरस्कार मिळाला आहे. तसेच आय.एन.टी. उन्मेष, नाट्यदर्पण, आंतर बँक स्पर्धा यामध्ये अनेक लेखन व दिग्दर्शनाचे पुरस्कार मिळाले आहेत. त्यांचा 'झी गौरव' निर्माता संघ दिर्घांक स्पर्धा इत्यादी स्पर्धांमध्ये परिक्षक म्हणून सहभाग असतो.

डॉ. अनिल बांदिवडेकर

'गोष्ट तशी गमतीची' हे मिहिर राजदा लिखित आणि अद्वैत दादरकर दिग्दर्शित नाटक सध्या 'हाऊस फुल्ल' चालत आहे. दोन वर्षापूर्वी 'रिश्ता वही... सोच नई' या एकांकिकेचं हे नाट्य स्वरूप... विविध स्पर्धात गाजलेली ही एकांकिका नाटक स्वरूपात दोन वर्ष एका प्रथितयश निर्मात्याकडे पडून होती. पण आणि पणच ती दुसऱ्या निर्मात्याने धाडस केलं आणि नंतरचा सगळा इतिहास आहे. बऱ्याचदा नाटकाच्या कुंडलीत काय योग असतात ते सांगणं, मराठी व्यावसायिक नाटकासाठी तरी अशक्यच आहे.

प्रत्येक लेखकाला आपले नाटक व्यावसायिक रंगभूमीवर यावे हे एक स्वप्नच असत. ते सत्यात उतरण्यासाठी अनेक घडामोडीतून त्याला जावं लागत.

हौशी समांतर रंगभूमी म्हणजे आपल्या पदराला खार लावून केलेला आणि मित्र मैत्रिणींसाठी असलेला नाट्य प्रयोग आणि तिकीट लावून प्रोसेनियम थिएटर मध्ये ''फ्रि पासेस अजिबात बंद'' अशी तळटिप जाहिरातीत लिहून केलेला व्यावसायिक प्रयोग अशी साधी सोपी व्याख्या केली तर सहज लक्षात येईल कि व्यावसायिक रंगभूमीवरून आजच्या काळात हौशी समांतर रंगभूमीवरून उड्डाण करून जाणाऱ्या नाटकांचं प्रमाण लक्षणीयरीत्या कमी आहे.

हौशी समांतर रंगभूमीमध्ये राज्य नाट्य स्पर्धा, कामगार नाट्य स्पर्धा, महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा, दिर्घांक स्पर्धा, तसेच गॅदरिंगमध्ये होणारी सोसायटी मधली नाटकं, गणेश उत्सवात, सार्वजनिक समारंभात होणारी नाटकं इत्यादी आहेत. तशी यादी बरीच लांबवता येईल पण प्रामुख्याने पुणे, मुंबई प्रायोगिक रंगमंच महाविद्यालयात एकांकिका स्पर्धा यातूनच सध्याच्या व्यावसायिक रंगमंचाला पुरवठा होत आहे.

'माकडाच्या हाती शॅम्पेन' हे डॉ.विवेक बेळे यांचं नाटक म्हणजे एक उदाहरण आहे. पुण्याच्या सुदर्शन रंगमंचावरून अशी बरीच नाटकं आली आहेत. अलिबाबा आणि चाळीशीतले चोर, फायनल ड्रॉफ्ट, प्राईसटॅग, काटकोन त्रिकोण, साठेचं काय करायचे? तसेच शिवाजी अंडर ग्राऊंड इन भिमनगर मोहल्ला, अडगळ (बॉम्बे सतरा) आषाढातील एक दिवस, सत्यशोधक, वाटेवरती काचा गं- कोण म्हणतो टक्का दिला... आयदान झुळवा.. लेझीम खेळणारी पोरे... योनीच्या गुजगोष्टी, उध्वस्त धर्मशाळा वाडा चिरेबंदी इत्यादी. यातील प्रत्येक नाटक आधी समांतर रंगभूमीवर झाले आणि नंतर त्याचे तिकीट लावून प्रयोग झाले. पण या व्यतिरिक्तही अनेक नाटकं व्यावसायिक रंगभूमीवर आली.

जेव्हा संस्था कार्यरत होत्या तेव्हा त्यांचा सहभागही तेथे मोठा होता. थिएटर ॲकडॅमी पुणे यांची घाशीराम कोतवाल, बेगम बर्वे, तीन पैशाचा तमाशा, महानिर्वाण ही नाटकं आधी समांतर रंगभूमीवर तर काही व्यावसायिक रंगभूमीवर चालली...

व्यावसायिक रंगभूमीवर पूर्वी राज्य नाट्य स्पर्धेतून यशस्वी झालेल्या नाटकानी पदार्पण केलेली अनेक नाटके आहेत. वेड्याचं घर उन्हात (वसंत कानेटकर) शिनु (श्री-ना-पेंडसे) घाशीराम कोतवाल (विजय तेंडूलकर) लोककथा ७८ (रत्नाकर मतकरी), महानिर्वाण (सतिश आळेकर), 'संभूसांच्या चाळीत' हे बेस्टने केलेले श्री ना पेंडश्यांचे नाटक अजूनही कधी मधी व्यावसायिक रंगभूमीवर होत असते. मालवणी नटसम्राट मच्छिंद्र कांबळी यांचे गंगाराम गवाणकर लिखित 'वस्त्रहरण' हे पहिल्यांदा कामगार

स्पर्धेत सादर झालेले नाटक... पुढे त्यांने इतिहास घडवला... राज्य नाट्य स्पर्धेत पुरूषोत्तम दारव्हेकरांनी सादर केलेली बरीचशी नाटकं त्यांनी साहित्य संघ किंवा इतर संस्था मार्फत व्यावसायिक रंगभूमीवर आणली.

हौशी रंगभूमीवरून व्यावसायिक रंगभूमीवर नाटक आणण्यात लेखक दिग्दर्शीका बरोबर अनेक संस्थांचाही मोठा वाटा आहे. पी.डी.ए. गोवा हिंदू असोशिएशन, साहित्य संघ, आय.एन.टी या सारख्या .... संस्थानी हौशी तसेच व्यावसायिक रंगभूमीवर खूप मोठं योगदान दिलं आहे. रंगायन ही संस्था तर 'शांतता कोर्ट चालू आहे' यांचे व्यावसायिक प्रयोग करावे की नाही या प्रश्नावरच फुटली आणि त्यातून अविष्कार संस्थेची स्थापना झाली. थोडक्यात हौशी रंगभूमीवर कार्य करावं की त्याचे व्यावसायिक प्रयोगही करावेत या चक्रव्यूहात अनेक संस्था अडकल्या. पीडीएतून थिएटर ॲकॅडमी झाली ती घाशीराम कोतवाल मुळे. राज्य नाट्य स्पर्धेतून यशस्वी होऊन व्यावसायिक पदार्पण करण्याच्या नाटकांचं प्रमाण जवळजवळ नाहीच. राज्य नाट्य स्पर्धेतील पहिल्या दुसऱ्या नाटकांचे प्रयोगही अपवादानेच लागतात. 'लेझिम खेळणारी पोर' चा अपवाद सोडल्यास हे नाटक अजूनही महोत्सवात हजेरी लावत आहे.

व्यावसायिक निर्मात्यांचे लक्ष चांगल्या विषयाकडे तसेच रंगभूमीवर कमी पात्रांचे नाटक निवडण्याकडे असतं, त्यामुळे हुषार निर्माते राज्य नाट्य स्पर्धेपेक्षा आंतर महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेकडे लक्ष देतात. ऑल द बेस्ट, बि पी ही काही उदाहरण. पुरू बेर्डेची टूरटूर ही सुद्धा अशीच कॉलेज गॅदरिंगमध्ये सादर झालेली एकांकिका तीने रंगभूमीवर कलाकारांच्या पिढ्या घडवल्या.

एकांकिकांचा मूळ उद्देश तरूणांचं अनुभवविश्व त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक जाणीवा, त्यांना वाटत असलेली रूखरूख, दृष्टिकोन, बंडखोरी यापासून फारकत घेत आताच्या स्पर्धेतल्या एकांकिका मार्केट डोळ्यापुढे ठेवत, एक पाय व्यावसायिक तर दुसरा पाय मालिका किंवा सिनेमाकडे पहात होऊ लागल्या. त्यामुळे बऱ्याचश्या एकांकिका युक्तीबाज, चटपटीत, चलाख, असण्याचं प्रमाण वाढलं... आताच्या व्यावसायिक रंगभूमीवर लेखकांची वानवा असल्यामुळे अश्या स्पर्धेतील नाटकांना संधी मिळत असावी.

राज्यशासनाने प्रायोगिक हौशी रंगमंचासाठी अनुदान योजना जाहीर केली आहे. परंतु तिचे कार्य अजून तरी कागदावरच आहे. नाट्य निर्माता संघाची दिर्घांक स्पर्धा ही दुसऱ्या वर्षात पदार्पण करत आहे. लाखभर बक्षिस असलेली ही स्पर्धा सध्या तरी बाल्यावस्थेतच आहे. अशा परिस्थितीत लेखक दिग्दर्शकांना आपल्या संहिता/प्रयोग अजमावण्यासाठी सध्या तरी हौशी रंगमंचाचाच आसरा आहे. सोशल नेटवर्कींगने प्रयोगाची जाहिरात करता येईल परंतु अस्सल असेल तेच टिकणार असल्यामुळे सध्या तरी गुणवत्ता असलेल्या नाटकांचेच दिवस आहेत.

हौशी रंगभूमी आणि व्यावसायिक रंगभूमी येथे दोन्ही ठिकाणी प्रेक्षकांची वानवा असून सध्या सगळीकडे स्वस्त आणि मनाला गुंतवणाऱ्या करमणुकीचीच चलती दिसत आहे. रिमोट प्रेक्षकांच्या हाती असल्यामुळे, प्रेक्षकांचे अनुनय करणाऱ्या प्रयोगाची चलती आहे अर्थात यालाही अपवाद आहेतच. जिगीषा सारखी संस्था 'वाडा चिरेबंदी' सारखी कलाकृती आणण्याचे धाडस करते आहेच ना. प्रश्न एवढाच आहे की प्रेक्षकाना रंगमंचाकडे वळवण्याचं धाडस कोण करणार त्यावरच हौशी आणि व्यावसायिक रंगभूमीचे भवितव्य अवलंबून राहिल. मार्केट ड्रिव्हन इकॉनामी मध्ये आपली मुळं घट्ट रोवून सातत्याने कार्यरत असणाऱ्या संस्था वगळता सर्वत्र आनंदच आहे. याचा फटका येणाऱ्या काळात बसून शेवटी रंगभूमीवर नाटकं होतात की नव्या बदलत्या स्वरूपात येतात हे पाहणे अर्थपूर्ण ठरेल मग हौशी रंगभूमीवरील व्यावसायिक नाटकांचे किंवा व्यावसायिक रंगभूमीवरील हौशी नाटकाचे खेळ रंगू लागतील. ❑

With Best Compliments From
SAMARTH
URBAN CO-OP. CREDIT SOCIETY LTD.,
BELGAUM

धारवाडच्या मराठी नाटकांचा इतिहास

कर्नाटक आर्ट्स कॉलेज धारवाड.
मराठीतील कालिदास -साहित्य -तौलनिक अभ्यास
म. - जिहाद बोनसाय - क. जी. ए. ची कथा परिसर यात्रा
सुधा - तूमूल गौतमबुद्धाची आत्मकथा- हिंदी
गांधी बापू - सा. अ. साठी भाषांतरीत
काळाच्या पाऊलखुणा

डॉ. अमृत ए. यार्दी

मराठी नाटकांचा इतिहास धारवाडच्या उल्लेखाशिवाय पूर्ण होतच नाही. कारण मराठी नाटक मंडळींची गंगोत्री म्हणून ज्या 'किर्लोस्कर नाटक मंडळी' चे नाव घेतले जाते, त्या मंडळीचे प्रमुख अण्णासाहेब ऊर्फ बळवंत पांडुरंग किर्लोस्कर यांचा धारवाडशी खूप जवळचा संबंध आहे. बेळगाव जिल्ह्यातल्या गुर्लहोसूर या गावी अण्णासाहेबांचा जन्म झाला. त्यांचे विवाहानंतर मुलकीपर्यंतचे शिक्षण (चार वर्षे) धारवाडलाच झाले. 'नदीचा उगम एका प्रदेशात आणि तिचा नयनविभ्रमकारी प्रवाह दुसऱ्या प्रदेशात', हा निसर्गनियम मराठी नाटकालाही लागू होतो.

धारवाड आणि तिथून पुढे हुबळी आणि गदग या उत्तर कर्नाटकातल्या शहरांमध्ये मराठी नाटके आजही अत्यंत रसिकतेने आस्वादिली जातात. परिस्थिती आणि कालपरत्वे त्यांच्या आस्वादनात संख्यात्मक बदल झाला असेल. पण, गुणवत्ता आजही टिकून आहे.

प्रामुख्याने धारवाडात मराठी नाटकांची चळवळ जिवंत ठेवण्यात ज्या मंडळींनी योगदान दिले त्यांचा अगदी थोडक्यात आलेख उभा करणे हा उद्देश या लेखनामागे आहे. धारवाडच्या कर्नाटक कॉलेजमधला मराठी विभाग १९३५ मध्ये सुरू झाला. त्यानंतर महाराष्ट्रातील अनेक नामवंत साहित्यिक, नट मंडळींचे कार्यक्रम या विभागात होत राहिले. याच काळाच्या आगेमागे धारवाडात 'मराठी मंडळ' नावाची एक संस्था मराठी भाषकांच्या सांस्कृतिक परंपरेचे जतन करण्यासाठी अस्तित्वात आली.

त्या काळात धारवाडात जी मराठी कुटुंबे राहात होती, त्यांची मुळे महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन्ही प्रांतातून वाहणाऱ्या नद्यांच्या संगमासारखीच होती! त्या काळात शंकरराव जोशी, शंभुराव जठार, श्रीपाद भिडींकर, आर. आर. करंदीकर प्रभृती मंडळींनी मराठी मंडळ या संस्थेसाठी खूप कष्ट घेतले. परप्रांतात मराठी संस्था उभी करणे आणि ती टिकवून ठेवणे यासाठी सोसावे लागणारे, झेलावे लागणारे सगळे कष्ट त्यांनी अनुभवले. मराठी माणसाचे नाटकाचे वेड मराठी माणसाला, तो कुठेही गेला तरी गप्प बसू देत नाही.

किर्लोस्कर आणि बालगंधर्व मंडळीची नाटके धारवाड, हुबळी आणि गदग इथपर्यंत सर्रासपणे होत असत. बालगंधर्वांना बोलावून आणणे आणि आपल्या घरात त्यांच्या वास्तव्याची, उत्तम पाहुणचाराची सोय करणे हे त्या काळातील धनिकांना फार प्रतिष्ठेचे वाटत होते. धारवाडमधील जुन्या पुराण्या वाड्यांमधून, बंगल्यांमधून बालगंधर्वांची पाउले निश्चितच उमटून गेली असणार. १९४१-४२ दरम्यान, बालगंधर्वांची तब्येत बरी नव्हती. तशाही अवस्थेत तेव्हाच्या 'अन्नपूर्णा थिएटर' मध्ये (आजच्या विजया टॉकीजमध्ये) त्यांचे नाटक पाहिल्याच्या आठवणी आजही धारवाडातली काही वयोवृद्ध मंडळी अभिमानाने सांगतात. विजय टॉकीजचे मालक मुधोळकर बंधूंकडे त्या आठवणी कुपीत दडवून ठेवलेल्या अत्तरासारख्या आहेत. बालगंधर्वांचा मुक्काम धारवाड हुबळी या भागात सहा-सहा महिने असायचा. बाबूराव पेंढारकर यांनी स्थापन केलेल्या 'ललित कलादर्श' या संस्थेचे नामकरण श्री स्वामी सिद्धारूढ यांनी केले असल्याचे कळले.

धारवाडात 'मराठी मंडळ' या संस्थेतर्फे अनेक मराठी नाटके बसविली जात. मराठी नाटकात काम करणाऱ्या किमान तीन पिढ्या तरी आज आपल्याला पहायला मिळतात. धारवाडातल्या मराठी मंडळाने आणि नंतर मराठी मंडळ व भगिनी समाज या संस्थानी मिळून बसविलेल्या नाटकांत काम केलेली मंडळी आजही त्या आठवणी उत्साहाने रंगवून आणि रंगून सांगतात. त्यांपैकी सुलभाताई गोखले, मंगलताई लेले, कविता देसाई आणि शरद देसाई या व्यक्तींना मी भेटलो. त्यांच्याशी झालेल्या चर्चेतून या भागातल्या मराठी नाटकांचा बराच इतिहास जिवंत झाला.

पी.जी.भागवत, श्रीखंडे मास्तर, दत्ता लेले, उषा खाडिलकर, उषा दातार, वसंत दातार व श्रीपाद भिर्डीकर ही साधारणपणे पहिल्या पिढीतील कसदार अभिनय करणारी मराठी नट मंडळी होती. पी.जी.भागवत मास्तर हे नाटकांचे सेट करण्यासाठी अत्यंत नावाजलेले होते. तर श्रीखंडे मास्तर हे नाटकांचे दिग्दर्शन करण्यासाठी गाजलेले नाव. गजानन महाले- आज ज्यांचे वय ब्याऐंशीच्यापुढे आहे- हे मेकपमन म्हणून अप्रतिम काम करायचे. गजाभाऊंचा हात लागल्याशिवाय मराठी नट रंगमंचावर जातच नसे. प्रामुख्याने मेकपमन म्हणून काम करत असले तरी गजाभाऊ अडचणीच्या वेळी नाटकात संगीत द्यायलाही तयार असत.

१९५० नंतर जी पिढी, मराठी नाटकासाठी धडपडू लागली, त्यात कविता देसाई, शरद देसाई, मंगलताई लेले, दत्ता लेले, उज्ज्वला जतकर, डॉ.प्रमोद बासरकर, संध्या बासरकर, डॉ.सुहास गोखले, डॉ.सुधा गोखले, धनंजय हुनगुंद, रजनीनाथ हुनगुंद, चित्रा हुनगुंद, रमेश जोशी, शरद कित्तूर, रमेश रायडू, मंदा गद्रे, मेधा गद्रे, उल्हास आणि सविता रंगैशेणवी, प्रकाश नाडकर्णी, प्रा.एन्.के.जोशी, अनिता गोखले, अमृत यार्दी, सुनील डंबळ,मुकुंद गोखले या मंडळींचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.

धारवाडच्या मराठी नाट्यरसिकांनी काही नाटके स्पर्धेसाठीही बसविली होती. त्यांपैकी 'नटसम्राट' आणि 'तुझे आहे तुजपाशी' या नाटकांचे बेळगाव, कोल्हापूर, दांडेली, हरिहर आणि गदग येथेही प्रयोग झाले. 'नटसम्राट' मधल्या अप्पासाहेब बेलवलकरांच्या भूमिकेसाठी श्री. दत्ता लेले यांना विशेष पारितोषक मिळाल्याची आठवण मंगलताई लेले सांगत होत्या.

लेकुरे उदंड झाली, प्रेमा तुझा रंग कसा, प्रेमाच्या गावा जावे, रात्र संपली, पण उजाडलं कुठं?, रंभा, सखुबी शेजारीण, बाकी इतिहास, माईची माया, एकटी, तो मी नव्हेच, पाचवा पेशवा ही नाटके मराठी मंडळाच्या सदस्यांनी आणि भगिनी समाज या संस्थेच्या सदस्यांनी मिळून केली. त्या काळात जशी स्थानिक मंडळींची नाटके व्हायची, तशीच कंपनीची नाटकेही आणविली जायची. पण त्यांची संख्या खूप कमी असायची. कारण आर्थिकदृष्ट्या ते परवडत नसे. धारवाड-हुबळी या भागात कंपनीची जी नाटके आणविली गेली ती, 'संगीत एकच प्याला, तो मी नव्हेच, अश्रूंची झाली फुले, आपलं बुवा असं आहे, घार हिंडते आकाशी ही होत.

१९८५ पर्यंत धारवाडच्या मराठी मंडळाचे सदस्य अत्यंत नियमितपणे नाटके बसवीत असत. पण त्यानंतर एकूणच जगताचे, चांगल्या-वाईट बदलांचे वारे वाहू लागले आणि नव्या पिढीत नाटकांची आवड रुजली नाही. तरीही इथल्या कानडी बांधवांची मराठी नाटकांबद्दलची आपुलकी, आवड कमी झाली नाही. कधी नाटकोत्सवाच्या निमित्ताने तर कधी हौस म्हणून काही संस्था मराठी नाटके मागवू लागल्या. त्यात सारस्वत मित्र समाज आणि 'कलामंडळ' या चित्रकलेला वाहून घेतलेल्या कलासंस्थेच्या श्री.मधु देसाई यांचा महत्वाचा सहभाग आहे.

१९८५ नंतर स्थानिक मराठी मंडळींनी नाटके बसविणे बंद केले खरे, पण इथल्या कन्नड रसिकांना एखादे मराठी नाटक उत्तम असल्याचे जाणवले तर इथल्या मराठी आणि कन्नड नाट्यरसिकांसाठी ते मागवू लागले. आज मितीलाही हे नाटकांचे आदानप्रदान चालूच आहे.

हुबळीच्या महाराष्ट्र मंडळाचे श्री शरद शेवडे आणि शरद टेंबे या जोडीने मराठी नाटकांसाठी खूप धडपड केली. नाटकांत कामे केली, नाटके दिग्दर्शित केली, महाराष्ट्रातून नाटके मागविली आणि इथल्या रसिकांना नाट्यसंस्कृतीने समृद्ध केले. 'यूटर्न' आणि 'वाडा चिरेबंदी' ही अलीकडील काळात हुबळीच्या महाराष्ट्र मंडळाने आणविलेली नाटके. त्यांची भेट घेता आली नाही. हुबळीच्या महाराष्ट्र मंडळाने गेल्या ७५ वर्षांहून अधिक काळ मराठी नाट्यक्षेत्रासाठी काम केले आहे.

'कला मंडळ'च्या श्री मधु देसाई यांच्यामुळे 'उणे पुरे एक शहर', 'आषाढातील एक दिवस' आणि 'सत्यशोधक' ही अप्रतिम नाटके अलीकडच्या काळात पहायला मिळाली. सारस्वत मित्र समाज या संस्थेच्या डॉ.सुनंदा कार्नाड यांनी अलीकडेच 'कुलवधू' हे

नाटक आणविले होते. अनेक हौशी मंडळींनी अलीकडच्या काळात कानडी-मराठी असा भेद न बाळगता मराठी नाटकांची धारवाडातली परंपरा जिवंत ठेवलेली आहे.

मराठी नाटके बसवताना कलाकारांना एक फार मोठी, पण मजेशीर अडचण भेडसवायची! नायक-नायिकांची जोडी असेल तर नायकाचे काम करणाऱ्याला आपली नायिका म्हणून आपल्या बायकोचीच निवड करावी लागे! कारण त्या नायकाबरोबर काम करायला दुसरी मुलगी किंवा बाई उपलब्धच होत नसे !! मंगल लेले, दत्ता लेले, उषा दातार, वसंत दातार आणि कविता देसाई, शरद देसाई या जोड्यांनी धारवाडातल्या मराठी नाटकांचा एक कालखंड गाजविला.

धारवाडात मराठी नाटके ज्या ठिकाणी सादर केली जायची, त्यांचा प्रवासही मनोरंजक आहे. अगदी सुरूवातीला बासेल मिशन हायस्कूलच्या आवारात असलेला 'टागोर हॉल' मराठी नाटकांसाठी प्रसिद्ध होता. नंतर हिंदी प्रचार सभेच्या 'पुरुषोत्तम भवन' या हॉलमध्ये मराठी नाटके होऊ लागली. नंतरची नाटके 'कलाभवन' या थिएटरमध्ये होऊ लागली आणि अगदी अलीकडच्या काळात कर्नाटक कॉलेजच्या आवारातील 'सृजना' रंगमंदिर या अद्ययावत ध्वनिसुविधा असलेल्या ठिकाणी मराठी नाटके सादर होऊ लागली. सुरुवातीच्या काळात 'हॉल' लहान असायचे, मराठी प्रेक्षक भरपूर असायचे. एका अर्थाने ते 'हॉल' overflow व्हायचे. आज रंगमंदिरे मोठी आहेत, पण मराठी प्रेक्षकांची संख्या कमी झाली आहे.

यावर्षीचे अखिल भारतीय नाट्यसंमेलन बेळगाव येथे होत आहे ही गोष्ट या भागातल्या मराठी नाट्यसंस्कृतीच्या दृष्टीने उत्साहवर्धक आहे.

धारवाड-हुबळी या भागात मराठी नाटकांसाठी ज्या अनेकांनी आपली ऊर्जा खर्च केली त्यात चार शरदही आहेत. आणि पुढे मागे कधीतरी 'धारवाडातले चौथे नाटकवेडे शरद' म्हणून ओळखले जातील.

आज ऐंशीच्या आसपास असलेल्या, मराठी नाटकाच्या ऊर्जेवर आपल्या जीवनाचे सोने केलेल्या नाट्यरसिकांना भेटलो, त्याचे फलित म्हणजे हा लेख.

❑

१९५६ मध्ये बेळगाव येथे भरलेल्या नाट्य संमेलनाच्या पत्रिकेची दुर्मिळ प्रत

कलोपासना मंडळाच्या विद्यमानें

महाराष्ट्र नाट्य सम्मेलन

अधिवेशन ३८ वें

बेळगांव.

दि. ५,६,७ व ८ जानेवारी १९५६.

डॉ. के. वा. साठे
कार्याध्यक्ष

श्री. वि. अ. नाईक
स्वागताध्यक्ष

हिज हायनेस राजा श्रीमंत चिंतामणराव
आप्पासाहेब पटवर्धन, राजासाहेब ऑफ सांगली

श्रीमंत सौ. मातोश्री सरस्वतीबाई पटवर्धन
राणीसाहेब, सांगली

या उभयतांनी या संमेलनास शुभसंदेश पाठविला असून
आपले शुभाशीर्वाद दिले आहेत.

महाराष्ट्र नाट्य संमेलन

१९०५ साली कै. दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र नाट्य संमेलनाचे पहिले अधिवेशन भरले. त्या काळात मराठी रंगभूमि भरभराटीत होती. महाराष्ट्रातील विद्वान, साहित्यिक व राजकारणी पुढारी या सर्वांनाच रंगभूमीबद्दल नितांत आस्था व प्रेम होते. १९०४ साली कै. अनंत वामन वर्ते यांनी भारत नाट्य समाज या संस्थेची स्थापना केली. या भारत नाट्य समाजानेच नाट्य संमेलनाची प्रथा १९०५ साली सुरू केली. आणि अपोआप पुढे या संमेलनाला वजन व प्रतिष्ठा प्राप्त झाली. नाटक मंडळींनाहि त्यावेळी विद्वत्तेची बूज होती, तसेच व्यवसायाला प्रगतीची दिशा असावी अशी कळकळ होती. संमेलनात, त्यावेळी, चांगल्या चर्चा होत, नाट्य-विषयक प्रबंधांच्या चढाओढी होत. 'रंगभूमि' या नाट्याला वाहिलेल्या मासिकाचा उगमहि अशा चर्चांतूनच झाला.

१९२० च्या सुमारास नाटक मंडळ्यांची या कार्यापरील निष्ठा कमी होऊं लागली होती. विद्वानांचा संमेलनाशीं संबंध तुटला. 'भारत नाट्यसमाज'; 'रंगभूमि मासिक' ही बंद पडली. संमेलनाचें दार टिकविण्याचा अर्थीचा प्रयत्न कै. श्रीरामपंत जोशी यांनी केला, पण आर्थिक अडचणीमुळे तोहि त्यांना सोडून द्यावा लागला. १९२९ साली बेळगांव येथें भरलेल्या साहित्य संमेलनाच्या अधिवेशनांत नाट्यसंमेलन हें साहित्य संमेलनांत समाविष्ट करून घेण्याची एक सूचना आली, परंतु तिचा कोणी विशेष विचार केला नाहीं. १९३० नंतर व्यावसायिक मराठी नाट्यसृष्टि संपुष्टांत आली, आणि नाट्यसंमेलनाची आठवणहि लोकांना राहिली नाहीं. १९४३ साली सांगली येथें नाट्यशताब्दि महोत्सव साजरा झाला व नाट्यसंमेलनाकडे लोकांचें लक्ष पुनश्च वेधलें गेलें. पण पूर्वीची निष्ठा व कार्याची तळमळ त्यांत आली नाहीं. अशा स्थितींत गेलीं १०, १२ वर्षें संमेलनाचें नांव टिकविण्याचा ज्यांनीं प्रयत्न केला त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत.

आतां स्वातंत्र्योत्तर काळांत सरकारचें लक्ष नाट्यकलेच्या विकासाकडे वळलें आहे. गतवर्षी दिल्ली येथें झालेल्या अखिल भारतीय नाट्यसोहळ्यांत सर्वांच मान मिळवून मराठी नाट्यसृष्टीनें आपली परंपरा उजळ केली

आहे. मुंबई सरकारनें सुरू केलेल्या नाट्य स्पर्धांच्या उपक्रमामुळें गावोगांवीं पसरलेल्या कलावंतांत उत्साह निर्माण झाला आहे. अशावेळीं या सर्व उत्साहाला केंद्रित करून रंगभूमीच्या प्रगतीच्या दृष्टीनें प्रबल अशी मध्यवर्ती संघटना निर्माण होणें आवश्यकच नव्हे तर अपरिहार्य आहे. म. ना. संमेलनासारखी संस्था हें कार्य यशस्वी रीतीनें करूं शकेल, परंतु त्यासाठीं तिला अधिक सामर्थ्यशाली केलें पाहिजे. श्री. केशवराव दाते यांनीं म्हटल्याप्रमाणें म. ना. संमेलनाची तलवार सध्यां गंजून गेली आहे. तिला नवें तेज आणि नवी धार प्राप्त करून दिली पाहिजे.

महाराष्ट्रांतील सर्व नाट्य संस्था म. ना. संमेलनाच्या ध्वजाखालीं एकत्र आल्या तर संमेलन संस्था बलशाली होईल, तिला प्रातिनिधिक स्वरूप येऊन रंगभूमीसंबंधींच्या अडचणींना सरकारकडे वाचा फोडण्याचा अधिकार मिळेल, नाट्यकलेसंबंधीं केवढें तरी कार्य तिला करतां येईल !

बेळगांवच्या नाट्यसंमेलनाला येणारे सर्व प्रतिनिधी प्राधान्यानें याच दृष्टीनें विचार व प्रयत्न करतील आणि महाराष्ट्र नाट्य संमेलन या संस्थेस नवें संजीवन देऊन तिला चिरस्थायी बनवतील अशी आपण आशा करूं या !

महाराष्ट्र नाट्य संमेलनातर्फे दिल्लींत 'शारदा' नाट्यप्रयोग

आम्ही केलेले प्रत्येक काम म्हणजे आमची बोलकी जाहिरातच असते. कलोपासना मंडळासारख्या नोंदवळ, रसिक संस्थेची सर्व छपाई आमच्याकडे होते ही एकच गोष्ट आमच्या कामाचा दर्जा ठरविण्याला पुरेशी आहे.

रेणुका मुद्रणालय,
बेळगांव

१९५९ च्या राष्ट्रीय नाट्य महोत्सवांत साहित्य संघानें सादर केलेल्या 'माऊबंदकी' नाटकास पारंपारिक विभागांत मिळालेलें पहिलें पारितोषिक, राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या हस्तें, श्रीमती दुर्गा खोटे यांनीं संघाच्या वतीनें स्वीकारलें.

मुंबई मराठी साहित्य संघ

मुंबई शहर व उपनगर यांतील वाङ्मय संस्थांशीं विचार विनिमय करून त्यांच्या प्रतिनिधींच्या सहकार्यानें, मराठी भाषा व साहित्य यांच्या सर्वांगीण अभिवृद्धीसाठीं एक मध्यवर्ति संस्था स्थापन करावी अशा आशयाचा प्रस्ताव १९३४ सालीं भरलेल्या मुंबई मराठी साहित्य संमेलनाच्या अधिवेशनांत संमत झाला. आणि लागलींच पुढील वर्षी तो अमलांत येऊन २१ जुलै १९३५ सालीं 'मुंबई मराठी साहित्य संघ' ही संस्था अस्तित्वांत आली.

मुंबई व उपनगरांतील साहित्य भक्तांचें सालोसाल संमेलन भरविणें, मराठी भाषा, वाङ्मय यांच्या विकासासाठीं, प्रसारासाठीं दैनिकें अगर प्रकाशनें प्रसिद्ध करणें, मराठी भाषा व साहित्य यांचें शास्त्रीय व कलात्मक शिक्षण देण्यासाठीं वर्ग चालविणें, साहित्य-नाट्य संमेलनें भरविणें, नाटकांची लावणें, प्रचार करणें, प्रदर्शनें भरविणें, वादविवाद व चर्चा घडविणें, ग्रंथालय ठेवणें वगैरे उद्देश डोळ्यासमोर ठेवून 'साहित्य संघ' गेलीं २० वर्षें आपलें कार्य अव्याहतपणें करीत आहे.

मुंबई व उपनगर साहित्य संमेलनाचीं एकूण १३ अधिवेशनें संघातर्फे भरविण्यांत आलीं. याशिवाय कै. वा. म. जोशी स्मारक व्याख्यानमाला, हेमंत व्याख्यानमाला, मासिक व्याख्यानमाला, शारदोत्सव व्याख्यानमाला, मराठी भाषेच्या इतिहासाबद्दलची व्याख्यानमाला, कै. गजेंद्रगडकर संदर्भ ग्रंथालय व वार्षिक नाट्योत्सव हीं संघाच्या कार्याचीं प्रमुख वैशिष्ट्यें म्हणून सांगतां येतील.

मुंबई मराठी साहित्य संघ ही महाराष्ट्रांतील साहित्य नाट्य विषयक चळवळ करणारी आदर्श व अग्रगण्य संस्था आज मुंबई येथें आपले पाय भक्कमपणें रोवून उभी राहली आहे. केळेवाडी येथें तिचें स्वतःचें एक भव्य खुलें नाट्य प्रेक्षागृह आहे.

संघाच्या कार्याचा व्याप सारखा वाढत आहे. आणि त्याला पदतशीर स्वरूप देऊन त्याला यशस्वी करण्यासाठी अनेक कार्यकर्ते तळमळीने झटत आहेत. कै. डॉ. भालेराव यांनी संघासाठी अक्षरशः आपले तन-मन-धन अर्पण करून कार्याला एवढे प्रचंड आणि सुंदर रूप प्राप्त करून दिले. त्यांनीच संघात चैतन्य ओतले. संघ वर्धमान राहाण्यानेच त्यांचे खरे स्मारक उभे केले असे होईल.

केळवाडी येथील संघ मंदिराच्या जागेसाठी संघाला आज जवळजवळ पाऊण लाखाचे कर्ज झालेले आहे. महाराष्ट्रातील एका नामवंत संस्थेला जिवंत ठेवून तिच्याकडून अधिक भरीव सेवा करून घ्यावयाची असेल तर संघाला आर्थिक सहाय्य करणे हे महाराष्ट्रातील सर्व रसिकांचे कर्तव्य आहे.

संघाची उत्तरोत्तर भरभराट होवो असे आम्ही मनःपूर्वक इच्छितो.

भाऊबंदकी

लेखक : कै.कृ.प्र.खाडिलकर

शनिवार ता. ७-१-५५

दिग्दर्शक : केशवराव दाते

प्रमुख भूमिका

राघोबा	: नानासाहेब फाटक
रामशास्त्री	: मा. दत्तोराम
सखारामबापू	: दत्तोपंत आंबे
नाना फडणीस	: त्रिंबक गोखले
नकम शास्त्री	: नाना अन्वेकर
चमक शास्त्री	: अनंत नंतेक
तुळोजी	: दाजी भाटवडेकर
सुमेरसिंग	: राजा पटवर्धन
खरकसिंग	: राजा फडके
नारायणराव	: दत्ता टेंबकर
भिकेभट	: शंकर प्राणिकर
भवानराव	: नाना जोगळेकर
महादजी शिंदे	: शंकर मोरुळे
दुर्गा	: सुधा करमरकर
म्हाळसा	: सुमन मराठे
आनंदीबाई	: दुर्गाबाई खोटे



भाऊबंदकी

'भाऊबंदकी' नाटकास मिळालेल्या यशाबद्दल साहित्य संघानं मुंबईचे राज्यपाल नामदार मंगलदास पकासा यांच्या अध्यक्षतेखाली भाऊबंदकीतील कलावंत व सहकारी यांचा सत्कार केला त्या प्रसंगी राज्यपालांसमवेत कलावंत.

होनाजी-बाळा

लेखक : चिं. य. मराठे

रविवार ता. ८-१-५६ दिग्दर्शक: म. वि. काळे

— भूमिका —

होनाजी	:	सुरेश हळदणकर
बाळा	:	भालचंद्र पेंढारकर
उदाजी	:	मा. दत्ताराम
मोरशेट	:	दत्तोपंत आप्टे
दौलतराव	:	अंबूटकर
निकाजीपंत	:	मनोहर धारपुरे
जान्वा	:	शंकर धाणेकर
काशीराम	:	राम भडसावळे
पांडू	:	राजा पटवर्धन
पोंडी	:	बळवंत पाठारे
भवान्या	:	डेझी चोरडेकर
निरोप्या	:	शंकरराव भोसले
मदनसिंग	:	नंदू गांवस्कर
बिठाई	:	कमल
यमुना	:	सुमन मराठे
गुणवती	:	लीला मेहता

होनाजी बाळा

कवडी चुंबक

लेखक
प्र. के. अत्रे

गुरुवार ता. ५-१-५६

दिग्दर्शक
दादासाहेब नाईक
व्ही. ए. नार्वेकर

भूमिका

पंपशेठ	: आचार्य अत्रे
चंदन	: दादासाहेब नाईक
गुलाब	: सिन्धू कुलकर्णी
केशर	: प्रा. काणेकर
शास्त्रीबुवा	: विष्णू कुलकर्णी
कस्तुरी	: सोनू नाडगौडा
जंगूशेट	: सोमण मास्तर
भिकूशेट	: प्रा. भानप
गणोबा	: शाम जोशी

कवडी चुंबक

गव्हर्नर डॉ. महताब यांच्या भेटीवेळीं मंडळाचे चिटणीस
प्रा. गो. म. वाटवे कैफियत वाचून दाखवीत असतां–

न. ग. कमतनूरकर यांचें निवेदन

आपल्या अभिमानाच्या, आवडत्या रंगभूमीवर दाटलेला दोन तपांचा अंधार आतां झपाट्यानें निवळूं लागलेला आहे. मराठी रंगभूमीकडे पाठ करून आडवी झालेली मराठी रसिकता आपली पेंग झटकूं लागलेली आहे. लौकरच झळाळूं लागणाऱ्या मराठी रंगभूमीच्या उद्यांची उषा उगवतीकडून मनोरम रागरंगांनीं मराठी मनाला पुनः आकर्षूं लागलेली आहे. रंगदेवतेचे नवे सुने सेवेकरी तिच्या कांकड-आरतीच्या सिद्धतेला लागलेले आहेत. अशा अमृतसिद्धिच्या मुहूर्तावर बेळगावांत महाराष्ट्र (मराठी) नाट्य संमेलनाचें अहोतिसावें अधिवेशन भरत आहे. म्हणून मला आपलें वाटतें कीं, बेळगांवचें हें अधिवेशन मराठी रंगभूमीच्या दुसऱ्या शतकाच्या इतिहासांत अत्यंत महत्वाचें असें मानिलें जाईल.

मराठी रंगभूमीची उगवती उद्यां दिवाळीच्या उत्सवाची नसून सर्व मराठी रसिकांनीं आणि मराठी रंगभूमीच्या आस्थेवाइकांनीं एकमतानें व एकजुटीनें, संघटनेनें कामास लागलें पाहिजेच पाहिजे, अशा दसऱ्याची ती उद्यां आहे, हें विसरून चालणार नाहीं. आपल्या रंगभूमीच्या पुनरुत्थानासाठीं सळसळणारी भक्ति आणि उत्साह अमाप असलीं तरी त्यांचें विचारपूर्वक नियोजन आणि शासन झालें पाहिजे. तसें न होईल तर आला पूर वाहून गेला आणि कालसमुद्रांत गडप्प झाला, असें अनुभवाला आल्यावाचून राहाणार नाहीं. ग्रामीण भागांतील हौशी कलावंतांची नाट्यनिष्ठा आणि असिद्ध कला यांची नागरी कलावंत व कला यांशीं जितक्या लौकर नी आस्थेवाईकपणानें सांगळी जुळविता येईल, तितक्या प्रमाणांत आपल्या रंगभूमीच्या पुनर्जीवनाचें कार्य जलद, सबलपणानें साधतां येईल. ग्रामीण भागांतील उत्साह आणि शक्ति कार्यक्रम करण्यानेंच मराठी रंगभूमीची सबळ प्रगति सुसाध्य होणार आहे असा निदान माझा तरी विश्वास आहे. म्हणून महाराष्ट्र (मराठी) नाट्यसंमेलनाच्या कार्यकर्त्यांनीं ग्रामीण नाट्योत्साह व नाट्यकला यांचे नियोजनेनें शासन करण्याचें कार्य प्रथम हातीं घेतलें पाहिजे असें मला वाटतेंच वाटतें.

छावणी आहे, पण सैनिक नाहींत, वाडा आहे पण रहिवासी नाहींत, अशी जी महाराष्ट्र नाट्य संमेलनाची उदासवाणी अवस्था आहे, ती या पुढें दिवसभरही राहतां कामा नये. ती छावणी उभारण्यांत किंवा तो वाडा वस्तीसाठीं साफसूफ करण्यांतच माझ्या कार्यकारी मंडळाचा आणि विशेषतः माझ्या कार्यतत्पर चिटणीसांचा गेल्या पावणेदोन वर्षांचा काळ गेला; त्यामुळें संघटनेच्या प्रत्यक्ष कामाला आम्हाला हात लावतांच आला नाहीं. त्याबद्दल मी दिलगीर आहे. आतां यापुढें बेळगांव अधिवेशनांतून निर्माण होणारें नवें सारें कार्यकारी मंडळ संघटनेच्या कामाला लागेल असा मला भरवंसा वाटतो. 'करावें, संवरावें' असें दूर उभे राहून आशार्थीत म्हणणाऱ्यांचे औपचारिक आशीर्वाद घेऊन 'करतों, करूं लागलों, केलें' असें आत्मविश्वासानें म्हणूं शकणाऱ्या कार्यकर्त्यांच्या जुळणीनें महाराष्ट्र नाट्य संमेलन चाळीसाव्या अधिवेशनापूर्वीच सार्थपणें आपलें शक्तिमत्व आणि मध्यवर्तित्व सिद्ध करील अशी मला आशा आहे.

सर्वांचा नम्र,

सांगली
रविवार ता. १ जानेवारी १९५६

नरहर गणेश कमतनूरकर
अध्यक्ष, म. ना. सं. (३७ वें अधिवेशन)

कलोपासना मंडळाच्या ' जग काय म्हणेल ? ' या नाटकांतील एक प्रवेश–

दुरुस्ती:– 'कवडी चुंबक' या नाटकांत 'मोहन'ची भूमिका श्री. नारायण नाईक यांनी केली आहे.

एक होता म्हातारा

शुक्रवार ता. ६-१-५६

लेखक : मो. ग. रांगणेकर

दिग्दर्शक : व्ही. डी. पंडित

भूमिका

उमा	: कु. सुधा सबनीस
नाना	: श्री. व्ही. डी. पंडित
दीनानाथ	: श्री. माधव देशपांडे
ललिता	: कु. आशा मोडक
यमुनाआत्या	: सौ. शशि भानप
बळिमामा	: श्री. मंगेश मांद्रेकर

एक होता म्हातारा

राष्ट्र-सेवा-दल, बेळगांव सादर करीत आहे.

पुढारी पाहिजे

लेखक व दिग्दर्शक
पु. ल. देशपांडे

गुरुवार ता. ५-१-५६

प्रमुख भूमिका

रोंग्या : यशवंत सिद्दरंजी
कोंडीमामा : शरद पोतनीस
म्हादबा : विष्णू कुलकर्णी
देशमार्तंड : नागनाथ बाडवे
धनमल्लेट : बाबूराव जाधव
कवि : दीपक मुतकेकर
नाना नेने : शंकर बेळगावकर
लीला नेने : सुमन घोंपेश्वरकर
भाई धलरंग : चिंतामणि पोतनीस
सारजा : आशा मोडक

साथ :- महादेव कुलकर्णी (ढोलकी), दिनकर जाधव, रामाभाऊ कुलकर्णी, देसाई वगैरे

पुढारी पाहिजे

कलोपासना मंडळासंबंधीं थोडेसें—

बेळगांवची जनता स्वभावतःच रसिक आणि नाट्यकला वेडी आहे. अनेक नाट्यसंस्थांना तिनें सक्रिय उत्तेजन दिलें आहे. परंतु गेल्या कांहीं वर्षांत येथील नाट्य क्षेत्रांत काम करणाऱ्या हौशी नाट्यसंस्थांत व कलावंतांत एकप्रकारची अनास्था व शिथिलता निर्माण झाल्याचें दिसून येतें. अनेक नामवंत संस्था नाममात्र राहिल्या आणि सर्वत्र दिसून येणाऱ्या उदासीनतेनें बेळगांवांतील नाट्यक्षेत्रालाहि ग्रासून टाकलें. अशावेळीं, नाट्यकलेची आपल्यापरीनें उत्कृष्ट सेवा करावी, जनतेची अभिरुचि परिष्कृत करावी, नाट्य-प्रयोग, दिग्दर्शन वगैरे नाट्यकलेच्या अभ्यासाचें केंद्र निर्माण करावें आणि त्याच बरोबर सामाजिक व सांस्कृतिक कार्य करणाऱ्या संस्थांना होईल तेवढें आर्थिक साहाय्य मिळवून द्यावें अशा हेतूनें प्रेरित होऊन 'कलोपासना मंडळ' या संस्थेची स्थापना येथील कांहीं सुशिक्षित तरुणांनीं ता. २ ऑक्टोबर, १९५२ रोजीं केली.

मंडळाची स्थापना होऊन केवळ तीनच वर्षें झालीं आहेत. तथापि या तीन वर्षांत मंडळानें केलेल्या नाट्य-प्रयोगांची सर्वांकडून मुक्तकंठानें प्रशंसा झाली आणि अल्पावधींतच दक्षिण महाराष्ट्रांतील एक उत्कृष्ट दर्जाची नाट्यसंस्था म्हणून मंडळानें नांव मिळविलें.

स्थापनेपासून मंडळानें पुढील नाट्यप्रयोग सादर केले. श्री. शिरवाडकर कृत 'दूरचे दिवे', कै. वा. ब. पटवर्धन कृत 'नाटिका', श्री. वरेरकर कृत 'सारस्वत', आचार्य अत्रे कृत 'जग काय म्हणेल', डॉ. वर्टी कृत 'राणीचा बाग', वगैरे नाटकांचे मिळून १८ प्रयोग झाले. 'जग काय म्हणेल !' हें नाटक १९५५ सालच्या मुंबई सरकारच्या प्रादेशिक नाट्यस्पर्धेत सांगली व पुणें केंद्रांत पहिलें आलें. व मुंबई येथील अंतिम स्पर्धेत त्याचा प्रयोग झाला. त्यांत नायिकेचें काम करणाऱ्या सौ. शशि भानप यांना वैयक्तिक पारितोषिकहि मिळालें. उगार, किर्लोस्करवाडी येथेंही त्याचे प्रयोग करण्यांत आले. वरील सर्व नाट्यप्रयोगांच्या दर्जाविषयीं नामवंत साहित्यिक व वृत्तपत्रें यांनीं प्रशंसोद्गार काढले आहेत. यांतील

बहुतेक सर्व प्रयोग कोणत्याना कोणत्या सामाजिक संस्थेच्या मदतीसाठीच केले गेले आहेत. या सर्व संस्थांना मिळालेल्या उत्पन्नाची रक्कम सुमारें १२,००० रुपये होईल, 'स्वातंत्र्य-दिन', 'को-ऑपरेटिव्ह ज्युबिली समारंभ' या सारख्या सरकारी समारंभप्रसंगीं मंडळानें त्यांच्या मनोरंजन विभागाचें कामहि चोख सांभाळलें आहे.

ख्यातनाम नाट्यलेखक, साहित्यिक, दिग्दर्शक व कलावंत यांच्या भेटी मंडळानें घडवून आणल्या. या सर्व भेटींत मंडळाच्या सभासदांशीं पाहुण्यांनीं नाट्यकलेबाबत मनमोकळेपणानें चर्चा केल्या. या सर्व थोर पाहुण्यांच्या भेटींतून मंडळाला चांगलेंच मार्गदर्शन झालें आहे. नटवर्य गणपतराव बोडस, आचार्य अत्रे, नानासाहेब फाटक, बाबुराव पेंढारकर, भालचंद्र पेंढारकर, मो. ग. रांगणेकर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, के. नारायण काळे, अनंत काणेकर इत्यादि पाहुण्यांचा या संदर्भात मुद्दाम नामनिर्देश केला पाहिजे. या सर्वांनी मंडळाच्या कार्याबद्दल गौरवोद्गार काढले.

गडकरी स्मृतिदिन व वार्षिक रंगभूमि दिन मंडळातर्फे नियमानें साजरे केले जातात. याशिवाय नवीं जुनीं नाटकें, साहित्य व कला यासंबंधींच्या चर्चा मंडळाकडून घडविल्या जातात. नाटकांच्या पुस्तकांचें आणि नाट्यविषयक अभ्यासाच्या ग्रंथांचें एक अद्यावत् ग्रंथालय बेळगांवांत होणें आवश्यक आहे ही गोष्ट लक्षांत घेऊन एक योजनाहि तयार केलेली आहे. परंतु ती अपेक्षेप्रमाणें मूर्त स्वरूपांत आणावयाची म्हटलें तर बराच पैसा उभा करावा लागणार आहे. बेळगांवच्या रसिकांची सेवा करून मिळणाऱ्या मोबदल्यांतून हें कार्य लवकरच मूर्त स्वरूप धारण करील असा मंडळास आत्मविश्वास वाटत आहे.

मंडळाचें आतापर्यंतचें काम अत्यंत अल्प स्वरूपाचें आहे याची जाणीव मंडळास आहे. तथापि जनतेच्या व येथील वेगवेगळ्या संस्थांच्या सहकार्यानें मंडळ हळुहळू प्रगति करीत आहे. यापुढेहि त्यांच्याकडून अशाच प्रकारचें सहकार्य लाभेल व बेळगांवच्या मराठी परंपरेला ललामभूत होईल असें भरीव कार्य मंडळ करेल अशी आशा आम्ही व्यक्त करतों.

कांहीं अभिप्राय

मिरज येथें भरलेल्या ' चौथ्या दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलना'च्या प्रसंगीं बेळगांवच्या ' कलोपासना मंडळा ' नें करून दाखविलेला ' जग काय म्हणेल ? ' या माझ्या नाटकाचा प्रयोग पाहण्याची संधि मला मिळाली. प्रयोगाच्या दृष्टीने नाटक अवघड आहे. असें असून प्रयोग अत्यंत भावी आणि परिणामकारक वठला. कौशी नटनटींनीं इतका सुंदर नाट्य-प्रयोग केलेला माझ्या स्मरणांत नाहीं. म्हणून ह्या मंडळाच्या कर्तृत्वाबद्दल नि भवितव्याबद्दल आदर वाटल्यावांचून राहात नाहीं.

आज रोजीं बेळगांव येथें आलों असतांना मंडळाला भेट दिली नि सर्व सभासदांची ओळख करून घेतली. ' जग काय म्हणेल ? ' ह्या नाट्यप्रयोगाच्या वेळीं मंडळींनीं आपल्या अभिनयाची जी पातळी राखली, तीच त्यांनीं पुढील आपल्या सर्व नाट्यप्रयोगांत राखावी अशी माझी त्यांना विनंति आहे.

३०-१२-५५ — प्रल्हाद केशव अत्रे

" कलोपासना मंडळा " ची उपासना फलित झालेली मी मिरज येथें भरलेल्या दक्षिण महाराष्ट्र साहित्यसंमेलनांत पाहिली. तेथें " जग काय म्हणेल ? " या अत्रेप्रणीत नाटकाचा प्रयोग उत्कृष्टपणें यशस्वी करून मंडळानें दाखविला. माझ्या शेजारीं श्रीमंत सांगलीचे अधिपति व आचार्य अत्रे हे दोघे नाट्यप्रयोगसमयीं रंगमंदिरांत बसले होते. आम्ही तिघेहि अत्यंत तल्लीन झालों होतों. हजारों प्रेक्षक होते; तरी नितांत स्तब्धता पांच तास होती; व विनोदाच्या लहरी त्या नितांत स्तब्धतेवरून मधून मधून उठत होत्या. अत्यंत अभिनंदनीय यश.

२०-१-५५ — लक्ष्मणशास्त्री जोशी

बेळगांव येथें मी आलो असतांना श्री. वाटवे यांच्या विनंतीवरून मी कलोपासना मंडळांतील सदस्यांना भेटण्यासाठीं आलों होतों. त्यांच्याशीं झालेल्या गप्पागोष्टींत मला बहुतेक सर्व सदस्यांची नाट्याबद्दलची तळमळ पाहून कौतुक वाटलें. व्यावसायिक नटासारखे हौशी नट ' बनचुके ' न ल्यामुळें त्यांना नवीन नवीन गोष्टी शिकण्याची हौस असते. ती हौस मला या मंडळांतील सदस्यांतहि दिसून आली. आतांपर्यंत मंडळानें बसवलेल्या नाटकांबद्दल बेळगांवांतील लोकमत चांगलें असल्याचें ऐकलें आहे. पण प्रत्यक्ष मंडळाचा प्रयोग पाहण्याचें भाग्य मला केव्हां लाभेल, याची मी वाट पहात आहे.

१३-१-५५ — मो. ग. रांगणेकर

कलोपासना मंडळाचे बरेच सदस्य माझे जुने मित्र आहेत. त्यांच्या नाट्यप्रेमाची मला चांगलीच कल्पना आहे. आज सर्व सदस्यांबरोबर बसून गप्पागोष्टी करतांना विशेषच आनंद झाला. नुकत्याच झालेल्या मुंबई राज्यांतल्या नाट्यस्पर्धेत ' कलोपासना मंडळा ' नें जें यश मिळविलें त्यामुळें त्यांचें नांव मराठी रसिकांच्या चांगलेंच परिचयाचें झालें आहे. मंडळाच्या हातून अधिकाधिक भरीव नाट्यसेवा होवो हीच इच्छा.

२१-४-५५ — अनंत काणेकर

कलोपासना मंडळाच्या निमंत्रणावरून रंगभूमिदिनानित्त व्याख्यान देण्यास बेळगांवला आलों असतां दुसऱ्या दिवशीं सकाळीं मंडळाच्या कांहीं सदस्यांबरोबर चर्चा करण्याची संधि मिळाली. अडीच तास अत्यंत आनंदांत व उद्बोधक विचार-संग्रहांत गेले.

कलोपासना मंडळाच्या सदस्यांनीं मजबद्दल जें प्रेम दाखविलें त्याबद्दल मी सदैव ऋणी राहीन व हे दोन दिवस माझ्या नेहमीं स्मरणांत राहातील.

६-११-५५ — के. नारायण काळे

मंडळाचे संकल्प :

" किर्लोस्कर नाट्य-पीठ "

आज बेळगांवांत नाट्यकलेची आपापल्या परीनें सेवा करणाऱ्या अनेक छोट्यामोठ्या संस्था आहेत. परंतु त्यांच्या कार्यांत एकसूत्रीपणा आणण्यासाठीं व कलेची प्रातळी उंचावण्यासाठीं मार्गदर्शन करणाऱ्या मध्यवर्ति संघटनेची आवश्यकता आहे. अशा संघटनेमुळें लहानसहान संस्थांतून वाया जाणारा उत्साह व श्रम सफल होतील.

किर्लोस्कर नाट्य-पीठ येथें निर्माण करण्यामागची भूमिका अशी आहे. तिला अनुसरून या विचारास मूर्त स्वरूप आणण्याचा प्रयत्न बेळगांवांतील इतर नाट्य संस्थांच्या सहकार्यानें 'कलोपासना मंडळाचे' कार्यकर्ते करणार आहेत.

या कार्याची सुरुवात म्हणून येत्या मे महिन्यांत आंबोली या निसर्गरम्य ठिकाणीं नाट्य कलेचें शिक्षण देण्यासाठीं एक पंधरा दिवसांचें 'वासंतिक शिबिर' उघडण्यांत येणार आहे. या कामीं, श्री. के. नारायण काळे प्रभृति अधिकारी व्यक्तींनीं आपलें सहकार्य देण्याचें आश्वासन दिलें आहे.

" आर्ट गॅलरी "

कलोपासना मंडळाच्या स्थापनेपासून नाट्याबरोबरच चित्र-शिल्प कलेचें एक केंद्र बेळगांव येथें निर्माण करण्याची मंडळाची मनीषा आहे. चित्रकलेचें अध्यापन करणाऱ्या स्थानिक संस्थांच्या सहकार्यानें व मुंबई राज्यांतील ख्यातनाम कलावंतांच्या मार्गदर्शनानें येथें आदर्श 'आर्ट गॅलरी' ठेवावी व तींत चित्र-शिल्प कलाकृतींचा सुंदर संग्रह असावा या कल्पनेचें येथील अनेक प्रतिष्ठित कलाप्रेमी नागरिकांनीं व कलावंतांनीं सहर्ष स्वागत केलें असून त्याकामीं सर्व प्रकारचें साहाय्य करण्याचें अभिवचन दिलें आहे.

महाराष्ट्र नाट्य संमेलनप्रसंगीं भरविल्या जाणाऱ्या चित्रकला प्रदर्शनानें या कामाचा प्रारंभ मंडळानें केला असून प्रतिवर्षी असें प्रदर्शन मंडळाकडून भरविलें जाईल.

या सर्वांबद्दल म. ना. संमेलन आपली हार्दिक कृतज्ञता व्यक्त करीत आहे :

* आश्रयदाते, स्वागत सभासद व प्रतिनिधी
* संमेलन यशस्वी-पार पाडण्यास साहाय्यभूत झालेले अनेक सहकारी व स्वयंसेवक
* मुंबई मराठी साहित्य संघ
* राणी पार्वतीदेवी कॉलेज, बेळगांव
* राष्ट्र सेवा दल, बेळगांव
* स्थानिक नाट्य प्रयोगांत भाग घेणारे कलावंत व दिग्दर्शक
* खुलें प्रेक्षागृह उभारण्यांत सहभागी झालेले इंजिनियर्स व त्यासाठीं श्रमदान करणारे स्वयंसेवक
* संमेलन कार्यास प्रसिद्धि देणारीं नियतकालिकें
* जाहिरातदार, चित्रकार, मुद्रक, ब्लॉकमेकर्स व रोषणाई-ध्वनिक्षेपक विभागाचे व्यवस्थापक

महाराष्ट्र नाट्य संमेलन

३८ वें अधिवेशन

कार्यकारी मंडळ

स्वागताध्यक्ष

श्री. वि. आ. नाईक
बी. ए., एल एल. बी.

स्वागतोपाध्यक्ष

श्री. रामकृष्णपंत जोशी
श्री. कृ. म. खन्नुकर
डॉ. य. के. प्रभु
श्री. मधुकरपंत हेरेकर
श्री. चतुरदास शहा
श्री. गंगाधरपंत कलघटगी

कार्याध्यक्ष

डॉ. के. वा. साठे

कार्योपाध्यक्ष

श्री. लिं. भी. नाईक, गळतगेकर
श्री. बा. शि. शिरवईकर
श्री. के.वा.कुलकर्णी (दड्डीकर वकील)

संयुक्त कार्यवाह

प्रा. गो. म. वाटवे
प्रा. ह. श्री. शेणोलीकर

उपकार्यवाह

प्रा. अ. कृ. याळगी
श्री. सीताकांत तिरोडकर
श्री. मधुकर पै
श्री. ना. श्री. कुलकर्णी
श्री. राम आपटे, वकील
डॉ. अशोक के. साठे

सभासद

श्री. कृ. व. निकुंब
श्री. बा. गो. कुलकर्णी, वकील
श्री. आबासाहेब कुलकर्णी
प्रा. के. डी. कडणीस
प्रा. रा. शि. रेगे
श्री. शं. वि. जोगळेकर
श्री. बा. रं. संठणकर
श्री. प्रभाकर पस्लेकर
श्री. ह. ना. मोघे (एम्. हरिहर)
श्री. शरद भ. कणबरकर
श्री. राजा माने, वकील
श्री. मुधोळकर
श्री. प्रभाकर सोमण
श्री. गोविंदराव अमोणकर
डॉ. गो. शां. कोवाडकर
श्री. रा. स्वा. नाईक
श्री. ल. नी. देशपांडे
प्रा. मा. वा. मानप
श्री. भैरूलाल व्यास
श्री. नारायण मोमाणा नाईक
श्री. व्ही. ए. नार्वेकर

विष्णुदास भावे यांच्याआधी तंजावर प्रांतात (तंजावर पूर्वी मद्रास राज्यात, आता, तमीळनाडूमध्ये) मराठी नाटक मोठ्या प्रमाणात लिहिले आणि केले जात होते. छत्रपती शिवाजी राजे यांचे बंधु एकोजीराजे राज्याधिपती म्हणून तंजावरास आले तेव्हा त्यांनी राजकारणी लोकांसमवेत विविध विषयात निष्णात लोकांना बरोबर आणले होते. त्यात नाट्यप्रेमीही होते. राज्यकर्त्या भोंसले घराण्यातील अनेक राजांनी स्वतः नाटकांचे लेखन केले. एकोजीराजांचे पुत्र शहाजीराजे यांनी मराठी भाषेत २२, तेलगू भाषेत २०, तमीळमध्ये १, संस्कृत भाषेत १, हिंदीत ३ व पाच भाषांनी मिळून झालेलं १, अशी ४८ नाटक लिहिली. उपलब्ध नाटके – गणेशजयंती, पार्वती, सीता कल्याण, शचिपुरंदर , गंगा–कावेरी संवाद इत्यादी २२.

– डॉ. वि.भा. देशपांडे
(मराठी नाटक–नाटककार– काळ आणि कर्तृत्व)

प्रा. अनंत मनोहर - मुलाखत

प्रा. अनंत मनोहर

प्रा. अनंत मनोहर :

बेळगांवातील ज्येष्ठ आणि श्रेष्ठ लेखक, कथाकार, कादंबरीकार. महाराष्ट्र शासनाचे पुरस्कार प्राप्त. राब, ज्येष्ठ, अरण्यकांड या गाजलेल्या कादंबऱ्या. ३० कथा संग्रह प्रसिद्ध.

सुनिता पाटणकर :

पत्रकार, अभिनय, लेखन, दिग्दर्शन या तीनही क्षेत्रात कार्य.

सुनीता पाटणकर

९५ वे अ.भा. मराठी नाट्य संमेलन, आपल्या बेळगावनगरीत होत आहे. बेळगांवातील ज्येष्ठ साहित्यिक प्रा. अनंत मनोहर यांच्याशी, या निमित्ताने साधलेला संवाद.

प्रश्न - सर, आपण कथा, कादंबरी, ललित, अनुवाद, भाषांतरे क्रिडा, परिक्षणे असे विविध प्रकारचे लेखन केले आहे. आपण नाटक हा साहित्यप्रकार हाताळला आहे का?

सर - हो, मी 'पानिपत' नावाचे एक नाटक लिहिले. ते माझे प्रकाशित नाटक आहे, मात्र त्याचा एकही प्रयोग झाला नाही. 'दि गोवा हिंदू असोसिएशन' या संस्थेने ऐतिहासिक नाटक करत नसल्याचे सांगितले. तिथे नाटकाचे वाचन झाले. त्यांनी काही बदल सुचवले, त्यानुसार पुनर्लेखनही केले. दुसऱ्या एका संस्थेने 'पानिपत' हा अत्यंत नाजूक विषय असल्याने, अत्यंत उत्तम साहित्यिक व प्रायोगिक मूल्ये असूनही आम्ही हे नाटक करू शकत नाही असे सांगितले. त्यानंतर थोड्याच वर्षांनी विश्वास पाटील यांच्या 'पानिपत' याच विषयावरचे नाटक झाले. माझं आणखीन एक नाटक 'तेरड्याचा रंग', शास्त्री हॉल मुंबई यांनी हे नाटक महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेसाठी केले. माधव आचवल, यांना यातील भूमिकेसाठी रौप्यपदक मिळाले होते.

एखादे नाटक चालेल किंवा नाही, हे नाटककार नट, दिग्दर्शक, निर्माता यापैकी कोणीही सांगू शकत नाही. एकदा 'दि गोवा हिंदू असोसिएशन' ने जयवंत दळवींची दोन नाटके बसवली. त्यापैकी 'सदगृहस्थ हो' हे नाटक खूप चालेल असा अंदाज त्यांनी बांधला होता आणि दुसरे 'संध्याछाया' पहिल्याच २/३ प्रयोगात पडेल असे त्यांना वाटत होते. घडले मात्र उलटेच. सद्गृहस्थ आपटले आणि संध्याछायाने विक्रम घडवला.

नाटक हा एक वेडा व्यवहार आहे. नाटक लिहिणे हा खूप पेशन्सचा प्रकार आहे. नाटक लिहिल्यानंतर त्याचे वाचन करायचे. दहा नट बारा डोक्यानी आणि पंधरा कानांनी ऐकत असतात. अनेक बदल सुचवले जातात. शेवट बदलायला सांगतात. पुनर्लेखन एकदाच नव्हे तर, दोन चार वेळाही करावे लागते. वसंत कानेटकरांनीही अनेकदा पुनर्लेखन केलेले आहे.

मी 'मान हलली, फाशी टळली.' 'जिंकूनी मरणाला' 'अंधेर नगरी' ही बालनाट्ये लिहिली आहेत, त्यांचे प्रयोगही झाले आहेत. खेळाडू, त्यांचे गाजलेले सामने आणि त्यांच्या जीवनात घडलेले काही प्रसंग यावरही नाटके लिहिली आहेत. 'बोरीस बेकर', 'कपिल देव', 'विक्रमादित्य गावसकर' आणि 'युगकर्ता सचिन',

प्रश्न - आपले आवडते नाटककार कोणते? नाटके?

सर - वसंत कानेटकर आणि बाळ कोल्हटकर यांना माझ्या मनात नाटककार म्हणून वेगळं स्थान आहे. कानेटकर हे नुसते लेखक नव्हते, तर बॉर्न नाटककार होते. त्यांना कोणतीहि कल्पना डोक्यात आली की ती तीन अंकातच दिसत असे. नंतर नंतर तर कानेटकर सांगत की ते लेखन तीन तुकड्यात त्यांच्यासमोर साकार होत असे, हेच त्यांच्या नाटकाचे तीन अंक होत. त्यांची नाटकं उत्तम साहित्यिक मूल्यांसह उदंड धंदाही करणारी, प्रयोगशील, वाचनीयही आणि दृक्, श्राव्यही असतात.

तसेच दुसरे बाळ कोल्हाटकर. नाट्यवाचनाआधीच कोल्हटकर हशा, दाद, टाळ्या, वन्समोअर यांचा अचूक अंदाज बांधत असत. कमालीची लेखनशैली, त्यांच्याकडे होती.

या दोघांकडेही नाट्यवाचनाचीही विलक्षण शैली होती. बैठकीचे नाटक आणि प्रयोगाचे नाटक हे दोन्हीही गुण या दोघांच्या नाटकात प्रकर्षाने आढळतात. म्हणूनच त्यांची नाटके वेगळ्या उंचीवर जातात.

त्यानंतर वि.वा. शिरवाडकरांचे 'नटसम्राट'. माणसाच्या जीवनात घडणाऱ्या घटनांचे चित्रण करून, लोकांच्या डोळ्यात अंजन घालते.

पुढ्यातले 'ताट द्यावं,' पण 'बसायचा पाट देऊ नये.' हे वास्तव सांगणारे नाटक. साहित्य म्हणूनही उत्तम आणि प्रयोग म्हणूनही.

किचकवध, बेबंदशाही, आग्र्याहून सुटका, तसेच पु.ल. देशपांडेंची सगळीच नाटके, महेश एलकुंचवार, जयवंत दळवी यांची नाटकेही उंची गाठणारी आहेत. 'डॉ. तुम्ही सुद्धा' सारखी समस्येला थेट भिडणारी नाटकेही आवडतात. सई परांजपे हलक्या फुलक्या नाटकातूनही प्रबोधन करून जातात. आजच्या नाटककारात जयंत पवार, अभिराम भडकमकर हलवून सोडणारी, वास्तववादी नाटके लिहितात.

माझी एकूण ७२ पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. एखादी कल्पना डोक्यात आली की, मला ती कादंबरीच्या रुपातच दिसते, उलगडते. कथा, कादंबरी लिहिणे मला जास्त सहजसोपे वाटते. मात्र नाटक आणि कविता दोन्हीही साहित्यप्रकार अवघड आहेत.

आणखीन एक प्रकार म्हणजे नभोनाट्य. मी अशी चार नभोनाट्ये लिहिली असून मुंबई, पणे, औरंगाबाद, नागपूर अशा विविध आकाशवाणी केंद्रावरून ती प्रसारित झाली आहेत. अ.भा. नभोनाट्य लेखन स्पर्धेत एकूण १२०० नभोनाट्यांमधून माझ्या 'रंग नभाचे,' या नभोनाट्याला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले होते.

❑

बेळगावची मराठी माती

– सुनील आपटे

बेळगावची मराठी माती
अभिन्न नाती, अनेक जाती
पूर्वज वंशज सर्व मराठी
चाल मराठी बोल मराठी

ज्वलंत अस्मिता मराठी बाणा
पूजेस अंबा, शिवाजी राणा
कपिलेश्वराचा आशीष पाठी
मलप्रभेचे निर्मल पाणी

स्वाभिमानी शूर-वीर नर
इतिहासाच्या हर पानावर
गृहदक्ष कुलस्वामिनी नारी
रणरागिणी देशोद्धारी

शौर्य, पराक्रम, तेज मराठी
आस-श्वास अन् ध्यास मराठी
बेळगाव हे गाव मराठी
नाव मराठी – स्वभाव मराठी

मराठी माणूस 'कुंदा' जैसा
मीठा, सात्विक, सुहृद जैसा
संस्कृतिपोषक, नाट्यवेडा
गाणे, खाणे, रागीट थोडा

घराघरातून पूजन-अर्चन
जय जगदंबा – जय रघुनंदन
जय जय विठ्ठल जय बालाजी
जय शिवशंभो, मंगलमूर्ती

वाचन-लेखन, माय मराठी
अर्थ मराठी, भाव मराठी
स्पंदन मराठी, जीवन मराठी
मी, माझे बेळगाव मराठी

मराठी देशा त्रिवार नमन
मराठी भाषा त्रिवार वंदन
मराठी वंशा, शत शत प्रणाम
ज्यातच आहे अमुचा राम

नाट्यस्मृती

ज्येष्ठ नाट्य अभिनेत्री, वरेरकर नाट्य संघातर्फे अनेक भूमिकात काम केले. गाण्याची आवड शास्त्रोक्त शिक्षणही घेतलं. घराबाहेर, सुंदर मी होणार, आशीर्वाद, काचेच घर, श्रीमंत, फुलपाखरू, मी जिंकलो मी हरलो अशा नाटकातून उत्तम भूमिका. व्यवसाय स्त्री रोगतज्ञ.

डॉ. इंदिराबाई जोशी

नाट्य परिषदेच्या निमित्तानें, थोडे अनुभव मी सांगत आहे. मी डॉ. इंदिराबाई जोशी वय ९४. आता जरी काही काम करणे होत नसले तरी तरुणपणी खूपच नाटकांत भूमिका केल्या आहेत. नाटक-संगीत व कला ह्याची मला व माझ्या पतीना (कै. डॉ. जी.डी. जोशी (प्रवीण जोशी) मनापासून आवड.

आम्ही साधारण १९४७ साली बेंगलोरला होतो, तिथे महाराष्ट्र मंडळाशी आमचा खूप संबंध आला. त्यावेळी त्या मंडळाच्या मदतीसाठी त्यांनी मंडळातर्फे मराठी नाटक करण्याचे ठरविले व आम्हाला उभयताना त्यात भूमिका करण्यास भाग पाडले. त्या वर्षी पुण्यामध्ये श्रीयुत आचार्य अत्रे लिखित ''जग काय म्हणेल?' हे नाटक खूप गाजत होते. हे संगीत नाटक होते व ते आम्ही बेंगलोरला केले. दोघानाही संगीताची जाण होती म्हणून ते आमचे नाटक बेंगलोरच्या लोकांनी अगदी उचलून धरले, व तो प्रयोग खूपच छान झाला.

साधारण १९४९ च्या डिसेंबरमध्ये आम्ही बेळगावला आलो व त्या वेळी श्री. कै. जी.डी. जोशी ह्यांचा वाङ्मय चर्चा मंडळाबरोबर खूपच संबंध आला. व त्यावेळी मंडळानी श्री. आचार्य अत्रेंचेच घराबाहेर नाटक बसवले. श्रीयुत बाप्पा शिरवईकर ह्यांनी पण बेळगावला आम्ही आल्यावर खूप वेळा बोलावले व वरेरकर नाट्य संघाचे सभासदत्व दिले व बऱ्याच नाटकात भूमिका करण्याचा चान्स दिला. ह्या 'घराबाहेर' नाटकाचे जवळ जवळ चार-पाच प्रयोग स्पर्धेच्या दृष्टिने झाले. ह्यामधील मुख्य भूमिका निर्मलाची मीच केली होती व ती पण खूपच गाजली - रा. स्वा. नाईक शिरवईकर, याळगी, मुधोळकर, देशपांडे वगैरे लोकांनी खूपच प्रोत्साहन दिले. हे नाटक मुंबईला स्पर्धेसाठी गेले होते. परंतु त्या वेळी काही आम्हाला बक्षीस मिळाले नाही. पण नंतर वरेरकर नाट्य संघाबरोबर दर दोन-एक वर्षानी बरीच नाटके करण्यास मिळाली. 'सुंदर मी होणार' मध्ये मी काम केले. नंतर गो. गं. पारखींची बरीच नाटके बाप्पा शिरवईकरनी बसविली, आम्हाला भूमिका दिल्या व त्या आम्ही जबाबदारीने केल्या व बक्षीसे पण मिळविली. त्यातली मुख्यत्वे करून प्रसिद्ध व गाजलेली नाटके म्हणजे, 'श्रीमंत', 'फुलपांखरू' 'काचेचे घर', 'मी जिंकलो मी हरलो' वगैरे.

त्या नंतर रणजीत देसाई ह्यांनी खास आम्हा बेळगावकरांसाठी - 'कांचनमृग' लिहिलं. ह्या नाटकात पण आम्ही दोघांनी कामे केली. हे नाटक सुद्धा मुंबईला स्पर्धेसाठी जाऊन आले. तिथे पहिले बक्षिस घेतले. स्वतः रणजीत देसाई घरी येऊन त्यानी आमचे अभिनंदन व कौतुक केले.

अजुन एक मुख्य गोष्ट सांगायची म्हणजे श्री. आचार्य अत्रेंचे ''घराबाहेर'' हे नाटक बेळगावला जेव्हा आले तेव्हा कै. श्री. आचार्य अत्रेसाहेब हे नाटक पहायला आले होते व माझी 'निर्मला' ची भूमिका बघून - त्यांनी येऊन माझी पाठ थोपटली व मला जशी पाहिजे होती तशीच तू निर्मला केलीस व तू अगदी राजहंसासारखी दिसतेस (बालगंधर्व) अशी उपमा पण दिली. खरंच मला त्यावेळी खूप आनंद झाला व आपल्या कलेचे सार्थक झाले असे त्यावेळी वाटले. व खरंच ही आयुष्यातील एक मोठी पावती होती.

वरेरकर नाट्य संघाकरिता खूप खूप कष्ट-काम-मदत केली ती बाप्पा शिरवईकरांच्या प्रेमाखातरच व त्यामुळे खूप संधी मिळाली. त्यावेळी आमची वरेरकर नाट्य संस्था म्हणजे एका कुटुंबाप्रमाणे होती. बाप्पा, दौलत, याळगी, प्रभू, रा.स्वा नाईक, भाऊ नाईक वगैरे मंडळीनी खूप खूप प्रेम दिले व कामाचे कौतुक पण केले व अशा ह्या संस्थेचे व सर्व नाट्य परिषदेचे बेळगांवला संमेलन होणार म्हणून खूप आनंद आहे व माझ्या शुभेच्छा पण आहेत.

❑

मैत्र जीवाचे

– सौ. मृदुला दामले

खुबिया हो तो सिफारिश की जरूरत ही नहीं।
साहबसे गुजारिश की जरूरत ही नहीं ।।
उसकी खुशबू ही काफी है शोहरत के लिये।
फूल को अपनी नुमाईश की जरूरत ही नही ।।

खरंच किती तथ्य आहे इस शायराना अंदाज में । अरे, पण मी भाषेची अशी सरमिसळ कां केली? जन्माने मुस्लिम, हिंदू राष्ट्र भूमीत वाढलेल्या, मराठी माध्यमातून शिक्षण घेतलेल्या, वाचनाची अतिशय आवड असलेल्या आणि कै. वसंत कानेटकर, कै. पुरुषोत्तम दारव्हेकर, कै. वि.वा. शिरवाडकर, कै. पु.ल. देशपांडे, कै. जयवंत दळवी इ. दिग्गज साहित्यिकांचा सहवास लाभलेल्या श्रीमती फैय्याज शेख यांच्या ४९ वर्षाच्या चतुरस्त्र कारकीर्दीचा चढता आलेख ऐकताना त्यांच्या अनुभवांची चित्रफितच उभी राहिली. त्यात गझलेची अदा, करुणरसातील आर्तता, भक्तीरसातील समरसता सगळेच अनुभवले. मन सुखावले. डोळे विस्फारले व काही ठिकाणी पाणावलेही.

फैय्याजजी माझ्या आयुष्यात कशा आल्या, माझ्या कधी झाल्या, आमच्यातले मैत्रीचे बंध कसे विणले गेले... हे इतकं सहजगत्या घडलं की माझाच माझ्यावर विश्वास बसत नाही. याचं सगळंच श्रेय फैय्याजताईंनाच जातं. इतकी महनीय कलाकार, इतकी लोकप्रिय, अनेक पुरस्कारांची, सन्मानांची मानकरी पण किती नम्र, किती साधी! अहंपणाचा लवलेशही नसलेल्या फैय्याजताईंचे हे गुण मी जसजशी त्यांच्या सान्निध्यात जास्तीत जास्त राहिले तेव्हा कळले.

अनेकदा वाटायचं 'फैय्याज' या गोड व्यक्तिमत्वाशी ओळख व्हायला हवी. पण कसं शक्य होते ते?.... पण परमेश्वराच्या कृपेनी ते झालं. मला आठवतंय... ''या वर्षीचा विष्णुदास भावे पुरस्कार सुप्रसिद्ध गायिका व अभिनेत्री फैय्याज शेख यांना जाहीर झाला आहे.'' ही बातमी वाचली आणि मनोमन आनंद झाला. त्यांचं अभिनंदन करायला हवं असं प्रकर्षाने जाणवलं. नंबरही मिळाला. मग 'देर किस बात की'। मोबाईलमध्ये 'फैय्याजताई' असं नावही मोठ्या ऐटीत सेव्ह केलं. 'अभिनंदन' चा मेसेज पाठविला आणि खाली मृदुला दामले (मा. अनंत दामले यांची सून) असं मुद्दाम टाईपही केले. जेणेकरून त्या नक्की उत्तर देतील कारण फैय्याजताई माझ्या सासऱ्यांकडे काही नाट्यपदे शिकण्यासाठी येत असत. ४-५ दिवस लोटले. काहीच प्रतिसाद न आल्याने मी हिरमुसले.

एका रविवारी दुपारी २च्या सुमारास मोबाईलची रिंग वाजली. फोनकडे नजर वळली आणि 'फैय्याजताई' ही अक्षरे दिसताच माझा माझ्या डोळ्यांवरच विश्वास बसेना. मी हॅलो म्हटले आणि मग कानावर आले ते फैय्याजताईंचे 'हॅलो'! ज्यात एक नाद होता, एक लय होती. डोळ्यांसमोर 'कट्यार' मध्ये 'लागी कलेजवा कटार' म्हणणारी 'झरीना' उभी राहिली. त्याक्षणी ''फैय्याज'' जिच्या नावातच दातृत्व आहे, मला बरंच काही दान करून गेली. आपुलकी, प्रेम, जिव्हाळा आणि बरंच काही. मी दादांच्या नावाचा उल्लेख नसता केला तरीही त्यांनी नक्कीच फोन केला असता कारण रसिकांची भावुकता, रसिक मनातील त्यांच्यासाठीचा आपलेपणा, आदर, प्रेम त्या जाणतात. रसिकांकडून नुसती दाद घ्यायची नसते तर त्यांचा आदरही करायचा असतो हे कळण्याइतका मनाचा मोठेपणा, निगर्वीपणा त्यांच्यात नक्कीच आहे. त्यानंतर या नाही त्या कारणांनी माझे त्यांना फोन करणे यामुळे आमच्यातील संवाद वाढला. हळूहळू संवादाचा सुसंवाद झाला.

मी जेव्हा त्यांची मुलाखत घेतली तेव्हा खऱ्या अर्थानी फैय्याजजींचं बालपण, त्यांनी घरासाठी केलेला त्याग, भावंडांची वडील बनून स्विकारलेली जबाबदारी आणि ह्या भूमिका बजावत असताना अनेक आव्हानांना त्यांना तोंड द्यावे लागले. अनेक दुःखं पचवत न खचता त्या पुन्हा उभ्या राहिल्या. हे सर्व कथन करताना त्यांचं ते आत्मविश्वासपूर्ण बोलणं, आघात होत असताना धैर्याने झेललेले प्रसंग, आपल्या तत्वांशी, कलेशी प्रामाणिक राहण्याची वृत्ती, नटश्रेष्ठांमधील चांगल्यात चांगले उचलण्याची वृत्ती, सहकलाकारांशी जपलेले मैत्रीचे संबंध आणि कुठलीही भूमिका, उत्कृष्ट वठविता यावी म्हणून घेतलेले अपार परिश्रम इ. गुणवैशिष्ट्यांनी मी भारावून गेले. मुलाखत घेताना मी कुणाच्याही वैयक्तीक आयुष्यात डोकावत नाही. पण तरीही अनेक कलाकारांनी माझ्याकडे निःसंकोचपणे मनाचा चोरकप्पा उघडा केला आहे. फैय्याजताईंनीही साश्रू नयनांनी मनाची सगळी दालनं माझ्यासमोर उघडली. अगदी मित्रत्वाने, विश्वासाने. तेव्हाच आमच्यातले स्नेहबंध दृढावले. फैय्याजताईंमधल्या बाह्यगुणांनी केव्हाच जिंकून घेतले होते पण आंतरिक गोडवा मनाला जास्त भिडला.

फैय्याजजींच्या घरात हिंदू-मुस्लिम धर्म एकोप्याने नांदतात. त्यांच्या घरात गणपती आहे, विठ्ठल-रखुमाईची छानशी तसबीर आहे. शेगावचे गजानन महाराजही विराजमान आहेत. तर दुसरीकडे मशिद व कुराणही पुजले आहेत. भिंतीवर बालगंधर्वांची (स्त्री भूमिकेतील) साजिरी अशी फ्रेम आहे तर समोरच्या भिंतीवर आपल्या मानसकन्येवर प्रेमाची पाखर घालणाऱ्या बेगम अख्तरांचीही तसबीर आहे. दिवाणखान्याचा मध्यभाग पुरस्कारांनी, मानपत्रांनी व सुशोभित पुष्पगुच्छांनी सजला आहे. असं हे घरातील पवित्र वातावरण या महनीय गायिकेचं, अभिनेत्रीचं आयुष्य पावन करतंय. जातीधर्माच्या भेदाभेदीच्या पलिकडचे पाहणारे त्यांचं मन मुस्लिमधर्माप्रमाणेच हिंदुधर्माचा, ऊर्दू भाषेबरोबरच मराठी भाषेचा सार्थ अभिमान बाळगून आहे. आणि या सर्वांचं श्रेय त्या या मुंबईला, या महाराष्ट्राला, त्यांच्या भाषेवर संस्कार करणाऱ्या दिग्गज साहित्यिकांना, संगीताची अतुलनीय सेवा करणाऱ्या सर्व संगीतातील गुरुंना देतात.

रसिक श्रोत्यांशिवाय, रसिक प्रेक्षकांशिवाय कुठलाही कलाकार अधुरा आहे, कलाकारांचा अभिनय खुलविण्याचं, एखादे नाटक उचलून धरण्याचा व पाडण्याचा हक्क, फक्त आणि फक्त रसिकांनाच आहे असं फैय्याजताईंचं ठाम मत आहे. तमाम रसिकांनी त्यांना भरभरून प्रेम दिलं. आजही त्यांची जरिना, जुलेखा, त्यांनी साकारलेली सुनंदा दातार, चन्नक्का, सुमित्रा इ. अनेक भूमिका रसिकांच्या मनांत घर करून आहेत.

'बैठकीतली लावणी' बद्दल काय बोलावे? त्यात फैय्याजजी वेशभूषेसहीत अभिनय करीत गाणे खुलवित असत. नऊवारी साडीतले त्यांचे मराठमोळे देखणे रूप, त्यांची अदाकारी सगळंच खूप आवडायचं. मी त्यांचे 'कट्यार काळजात घुसली' ३ वेळा पाहिले. बावनखणीही पाहिलं पण त्यांनी भूमिका केलेली काही संगीत व गद्य नाटके पाहाण्याचे भाग्य मला मिळालेले नाही याचेच वाईट वाटले.

माझे सासरे मा. अनंत दामले (मराठी संगीत नाट्य रंगभूमीवरील सुप्रसिद्ध गायक-नट) यांचे हे जन्मशताब्दि वर्ष आहे. त्यांचे छायाचित्र यशवंत नाट्य मंदिर, माटुंगा मुंबई या नाट्यगृहात लावावे अशी आम्हा दामले कुटुंबियांची मनापासून इच्छा आहे. ही गोष्ट मी फैय्याजताईंकडे बोलून दाखविली मात्र मी न सांगताही त्याचा पाठपुरावा, त्यासाठीचे प्रयत्न करण्यास त्यांनी सुरुवातही केली. मला त्यांच्या या स्वभावाचं खूप कौतुक वाटतं. माझ्या मैत्रिणीने त्यांच्यावर एक कविता केली. ती त्यांनी अगदी आत्मियतेने वाचली. एवढेच नव्हे तर ती कविता आवडल्याचं सांगण्यासाठी फोनही केला. दुसऱ्यांच्या भावनांची त्यांना कदर आहे.

सुप्रसिद्ध गझल गायिका बेगम अख्तर फैय्याजजींचं दैवत. बेगमजी फैय्याजना मानसकन्या मानत. पण त्यांच्याकडून गाणं शिकणं मात्र त्यांच्या नशिबी नव्हतं.

फैय्याजताईंचं मराठी भाषेवरच प्रभुत्व थक्क करणारे आहे. त्यांचं शुद्ध बोलणं, स्पष्ट उच्चार, अलंकारीक भाषा ऐकली की माझं मराठी त्यांच्याइतके प्रभावी नसल्याची खंत मला वाटते.

नाट्यरंगभूमीवरील त्यांच्या कारकीर्दीला आता ५० वर्षे पूर्ण होत आहेत. त्याबद्दलची माहिती देणारे अनेक लेख त्या नाट्यसंमेलनाध्यक्ष म्हणून घोषित झाल्यापासून प्रसिद्ध होत आहेत. त्यामुळे त्याचा ऊहापोह न करता एक मैत्रीण, एक सुहृदयी व्यक्ती म्हणून फैय्याजताईंचे शाब्दिक चित्रण करण्याचा मी प्रयत्न केला आहे.

त्यांच्या बाबतीत मी एवढंच म्हणेन, ''एकटीने आयुष्याचा रथ हाकताना, शुद्ध चारित्र्याने त्यांचे तेजोमय जगणे मला खूप दैदिप्यमान वाटते. कळत-नकळत त्यांच्याकडून मी बरंच काही शिकले.'' त्यांची आणि माझी झालेली भेट आणि त्यांच्या हृदयात त्यांनी मला देऊ केलेला कोपरा माझ्यासाठी खूप मोलाचा आहे.

''फैय्याजताई, तुमचं यापुढील आयुष्य सर्वार्थाने सुखसमृद्धीने, आनंदाने, मांगल्याने उजळू दे, हीच ईश्वरचरणी प्रार्थना !!

❑

इतिहासाच्या सुवर्णपानातील बेळगाव

डॉ. स्मिता सुरेबानकर

डॉ. संध्या देशपांडे

आर.पी.डी. कॉलेज प्रोफेसर अनेक नाटकं आणि कथा लेखन, उत्तम दिग्दर्शक नाट्यांकुर या संस्थेच्या संस्थापिका या संस्थेतर्फे बालनाट्य शिबिर, नाट्य स्पर्धातून मुलांच्या नाटीका सादर, नागमंडल घाशिराम कोतवाल, सुखांशी भांडतो आम्ही, तेंडुलकरांची अनेक नाटकं दिग्दर्शित. नाट्यावर पी.एच्.डी.

डॉ. स्मिता सुरेबानकर

आर.पी.डी. कॉलेज प्रोफेसर. इतिहास या विषयात डॉक्टरेट. अनेक संशोधनात्मक निबंध वेगवेगळ्या युनिव्हर्सिटीच्या सत्रात सादर. विशेषतः बेळगांव आणि कर्नाटकाचा ऐतिहासिक दृष्टीने सखोल अभ्यास.

डॉ. संध्या देशपांडे

काळ्या तांबड्या मातीचा, पश्चिम घाटाच्या हिरव्यागार वनश्रीनी नटलेला, जंगल संपत्तीने सजलेला, सुजलाम सुफलाम पौराणिक महत्व असलेला, वैविध्यपूर्ण संस्कृती आणि सौरभ असलेला प्रदेश म्हणजे बेळगाव. शातवाहन, कदंब, चालूक्य, राष्ट्रकूट, होयसळा, कलचूरी, विजयनगर, बहमनी, आदिलशाही, रट्ट, गोव्याचे कदंब राजे, इत्यादी पोषकांच्या पाळण्यात झुललेला प्रदेश म्हणजे बेळगाव. टिळकांच्या स्वराज्याच्या सिंह गर्जनेचे प्रतिध्वनी इथे उमटले आणि म. गांधींच्या पदस्पर्शाने बेळगाव कॉंग्रेसच्या अधिवेशनात स्वातंत्र्याची स्वप्नं साकार करण्याचा पण ज्या पुण्य भूमीने सत्यात आणल ती भूमी म्हणजे बेळगाव. कर्नाटकाची दुसरी राजधानी. कुंदानगरी, साखरेचा जिल्हा अशी या शहराची ख्याती आहे. कर्नाटकाच्या राजकीय सांस्कृतिकतेने वलयांकीत पवित्रभूमी, २००० वर्ष पूर्वीपासून घडून गेलेल्या उज्वल भव्य ऐतिहासिक, सांस्कृतिक परंपरेचे व्यासपीठ म्हणजे बेळगाव.

वेणुग्राम, इक्षुग्राम, बेळगुग्राम, मुझाफर नगर, मुस्ताफाबाद, आझमनगर, अशा विविध नावाने या शहराचा विविध शिलालेखातून उल्लेख सापडतो. इतिहासाच्या प्रारंभकाळापासून राजकीय नकाशात असंख्य राजघराण्यांनी या शहराची नोंद केली आहे. येथील संस्थाने आणि विविध राज्ये, साम्राज्ये यांच्या घराण्यांचा उत्कर्ष आणि अपकर्ष या गावाने पाहिला आहे. अत्यंत रोमांचकारी इतिहासाचे साक्षीदार आहे बेळगाव. कर्नाटकातील बहुतेक प्रमुख राजांनी बेळगाव जिल्ह्यातील कोणत्या ना कोणत्या शहरावर राज्य केले आहे. म्हणून या शहराला ऐतिहासिक महत्व प्राप्त झाले आहे. कर्नाटकाच्या वायव्येला आणि महाराष्ट्राच्या सीमेवर वसलेले हे गाव आहे. असंख्य शुगर मिल्स सभोवताली असल्याने या जिल्ह्याला सक्करे जिल्हे असेही म्हणतात. उस, कापूस तंबाखु, तांदुळ ही इथली मुख्य पीके.

पौराणिक महत्वः बेळगाव हा पौराणिकदृष्ट्या महत्वाचा प्रदेश आहे. इथल्या अनेक स्थळांना पौराणिक परंपरा आहे. रामायणाशी संबंधित पाच रामतीर्थे या जिल्ह्यात आहेत. परसगडच्या किल्ल्यात, रामदुर्गजवळ मल्लूर, बेळगावजवळ कणबर्गी, अथणी तालुक्यातील रामतीर्थ गाव, खानापूर तालुक्यातील हलशी येथे ही स्थळे आहेत. पुराणात या स्थळांना रामचंद्राच्या पदस्पर्शाने पावन केल्याच्या कथा आहेत.

प्रभु रामचंद्राने प्रतिष्ठापना केलेली रामलिंगे या प्रदेशात आहेत. रामदुर्गचा किल्ला रामाशी संबधित असून सुरेबानचे शबरी बन भक्त शबरीने रामाला बोरे अर्पण केलेले स्थळ आहे. सोगलमुनीनी तपश्चर्या केलेले ठिकाण म्हणजे सोगल. दक्ष ब्रह्माने यज्ञ केलेली कृष्णा तटावरची यडूर भूमी चिक्कोडी तालुक्यात असून दक्ष ब्रह्मानेच निर्माण केलेले विरभद्र मंदीर तेथे आहे.

ऋशश्रृंग मुनीनी वास्तव्य केलेले शीरसंगी, वडील जमदग्नीच्या आज्ञेने माता रेणुकेचा शिरच्छेद केलेली परशुराम भूमी यल्लमाचा डोंगर, ही बेळगाव तालुक्यातील महत्वाची पुराणस्थळे होत. रेणुकेची सौंदत्ती यल्लम्मा म्हणून उपासना केली जाते. कृष्णाची प्रेयसी आणि जांबूवंताची मुलगी जांबवंती हिचे निवासस्थान म्हणजे बेळगाव जवळचे जांबोटी गाव. सप्तसागर हे सप्तऋषी तपश्चर्या केलेले गाव. तेथे असणारे रक्षापर्वत (रावण पर्वत) ऋषिंच्या यज्ञातून निर्माण झालेल्या राखेचे बनले आहेत असे मानले जाते. कोन्नूर, हुक्केरी निर्वानहट्टी या प्रदेशातील बृहत थडगी पांडवाची निवासस्थाने असल्याचे मानण्यात येते.

इतिहासपूर्व बेळगावः

बेळगाव जिल्ह्यात नदीनाले, डोंगर, दऱ्या, जंगले असल्याने ही सुपीक जमीन लोकवस्तीस अनुकूल होती. घटप्रभा आणि मलप्रभेच्या

नदीतीरावरील प्रदेशात जुन्या शीलायुगातील दगडी आयुधे सापडली आहेत. त्याकाळातील प्राण्यांचे अवशेष गोकाकजवळ सापडले आहेत शबरीबनातील शबरी मंदीरात सूक्ष्म शीलायुग संस्कृतीचे गोलाकार चित्र आहे. कडाली, एक्संबा कुडची, सत्ती, सप्तसागर हा प्रदेश नूतन शीलायुगाचे वसतीस्थान असल्याचाच पुरावा होय.

* **लोहयुग** : बृहतशीलायुगाचे अवशेष बेळगाव जिल्ह्यातील हिडकल, हुण्णूर निर्वाणहट्टी, घोडगेरी, गोडाचिनमलकी, सौंदत्ती, हलशी, हुक्केरी, इत्यादी ठिकाणी सापडले असून बृहत शीलायुगातली अनेक बृहत थडगी या प्रदेशात सापडली आहेत. खानापूर तालुक्यातील हलशी गावाच्या उत्तर व दक्षिण दिशेस सुमारे १५ हून अधिक बृहत थडगी सापडली आहेत. त्याचप्रमाणे मावीनकुरली, निर्वाणहट्टी या प्रदेशात मृतपात्रे सहित सापडली आहेत. उत्कर्ष अवस्था येथे अस्तित्वात असली पाहिजे असे संशोधक म्हणतात.

* **बेळगावची ऐतिहासिक पार्श्वभूमी** – कर्नाटकातील बहुतेक राजघराण्यांनी बेळगाव आपल्या राज्यात सामावून घेतल्याचे त्यांच्या कोरीव लेखातून सूचीत केले आहे. वडगाव भागात सापडलेला शीलालेख ख्रिस्तशके ३ ते १५ या काळात राज्यकारभार केलेल्या शातवाहन राजघराण्यातील शातकर्णी राजाच्या काळातील आहे. येथे रोमन नाणी सापडली त्यावरुन वडगाव माधवपूर यांच्याशी रोमनांचा व्यापार असल्याचे सिद्ध होते. पहिल्या ख्रिस्तशकापासून प्राकृत भाषेतील वडगाव माधवपूर स्तंभलेख सापडले जे बेळगाव जिल्ह्यातले प्राचीन शासन आहे. काश्यप गोत्री ब्राह्मणाने वाजपेय यज्ञ व इतरही अनेक यज्ञ केल्याने वडगाव माधवपूर ही ब्राह्मणी वसाहत असावी असे हा लेख सुचवितो. बेळगाव जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील हलशी ही कदंबाची उपराजधानी होती. अदिकदंबाच्या काळात श्रीविजयपलाशीका असे त्यास म्हणत तर गोवा कदंबाच्या काळात पलशीकापन्नीच्छासीर असा या प्रदेशाचा उल्लेख कोरीव लेखनात सापडतो. हलशी ताम्रपटामधून हे कर्नाटकातील प्राचीन जैन केंद्र आणि यापनीय जैन पंथीयांचे केंद्र असल्याचे दिसून येते. हैहेय भोज घराण्याचा आशांकित वरमास कापाली, ताम्रपटात 'धर्म महाराज' असे संबोधल्याचे दिसते. कदंबशांतीवर्माचा पुत्र मृगेशवर्माने हलशी जैन बस्तीस ३३ निवर्तना जमीन दान दिल्याचे व जैन चैत्रा असा किताब मिळविल्याचे हलशीताम्रपटात नमूद आहे. सौंदत्ती तालुक्यातील यक्केरि येथील शीलालेख आणि मंगळेशाचा हुलीताम्रपट या प्रदेशात बदामी चालुक्याचे राज्य असल्याचे सिद्ध करतात.

राष्ट्रकूटांच्या तिसऱ्या गोविंदराजाचा नेरूर ताम्रपट इक्षु ग्रामाच्या नागभट्टास ८०५ मधे चंदगड भागातील नेसरीगाव भूदानात दिल्याचे सांगतो. बेळगाव जिल्ह्यातील बैलहोंगल तालुक्यातील वक्कुंदास श्रीविजयानी कविराज्य मार्ग ग्रंथात कर्नाटकाचा आत्मा म्हणून संबोधले आहे. बेळगाव प्रदेशातील काही भागावर रट्ट, कर्याड कोल्हापूरचे शिलाहार राष्ट्रकूट, यांनी राज्य केल्याचे संदर्भ काही शीलालेखात सापडतात. गोकाक आणि सोगल येथील देवळे राष्ट्रकुट्च्या वास्तुशैलीचे प्रतिनिधित्व करतात हे लक्षात घ्यायला हवे.

कल्याणीचे चालुक्यराजे, त्यांचे मांडलीक राजे गोवे कदंबराजे सुगंधरतीचे रट्ट राजे, यांनी बेळगाव प्रदेशावर राज्य केले. रट्ट राजानी कुंगुडी-३००० प्रांतावर राज्य केले. गोव्याच्या कदंबराजानी पलाशीक १२००० प्रांतावर आणि कलचुरीचा बिज्जळ राजांनी बेळगाव प्रदेशावर राज्यकारभार केल्याचे त्यांच्या कोरीव लेखातून समजते. ख्रिस्त शके ११६२ हूली येतील कोरी लेण्यात बिज्जळाचा सौर्व भौम असा उल्लेख असल्याचे दिसून येते. बिज्जळाच्या निधनानंतर कल्याणाकृती च्या काळात चन्नबसवला व इतर शरण मंडळी बेळगावहून उळवीस गेल्याची घटना लक्षवेधी आहे. शरण संत दोहर कक्कय्याचे गाव म्हणजे खानापूर तालुक्यातील कक्केरी कलचूरी सैन्याशी लढताना त्याचा मृत्यु झाला होता.

रट्ट कार्तवीर्याराजाने निर्माण केलेली अनेक मंदीरे गोपुरे बेळगाव प्रदेशात आहेत. कार्त वीर्यराजाने कदंबाचा पराभव करुन बेळगाव ताब्यात घेतले. वेणूग्राम ७० ही त्याने आपली राजधानी केली. ख्रिस्त शके १२०४ च्या रट्ट राजांच्या बेळगावातील कोरीव लेखात बेळगाव हे वाणीज्यराजधानीचे शहर असल्याचा उल्लेख आहे. प्रसिद्ध कन्नड कवी पार्श्वपंडीत याने १२२२ मधे चौथ्या कार्तवीर्याचा राजाश्रयी असताना पार्श्वनाथ पुराण हा ग्रंथ लिहिला. एवढंच नव्हे साहित्यमूल्य अनेक कोरीव लेख या काळात लिहिले गेले.

मुनोळी, शिरसंगी, सौंदत्ती, बेळगाव, खब्बूर रायबाग, कोण्णूर नेसरगी, एक्संबा ही रट्ट कालीन व्यापारी केंद्रे होती. कोकण ९०० हलसी १२००० या भागावर गोव्याच्या कदंबराजाचे राज्य होते. त्यांनी गोव्याचे सप्तकोटेश्वर हलशीचे भुवराक नरसिंह यांना आपले आराध्य दैवत म्हणून स्वीकारले. हलशी १२००० त्या प्रांताना बेळगाव, खानापूर उत्तर कन्नडा वगैरे प्रदेश समाविष्ट होता.

बाहेरच्या देशांशी व्यापार करणाऱ्या कदंबाचे नौकादल होते. कदंब शिवचित्ताची राणी कमलादेवीने देगावचे अग्रहार आणि कमल नारायणाचे देवालय देवागावात बांधले. रट्टच्या पतनानंतर कोल्हापूरचे शीलाहार, यादव व त्या नंतर विजयनगर साम्राज्याच्या अधिपत्याखाली बेळगाव आले. मलप्रभेच्या दक्षिण प्रदेशातील संपगाव, परसगड, रामदुर्ग, हुक्केरी तालुक्यावर विजयनगर साम्राज्याचे स्वामित्व आले.

जॉन फेतफुल प्लीट याच्या तोरगल क्रॉनिकल्स मधून तोरगल व बेळगाव प्रदेशातून वीर बुक्कास ज्योतिषी नेमल्याचे सुचविले आहे. फेरिस्थाचे मतही फरकेटा हा विजयनगरचा अधिकारी होता. बेळगावात महमदगवाने त्याचा पराभव केला. कृष्णदेवरायांचा प्रतिनिधी बागील तिम्मप्पा याने सौंदत्ती यल्लम्मा देवालयाचे पश्चिम द्वाराचे गोपूर उभारल्याचे ख्रिस्त शके १५१४, १५१५ चे शासन सांगते.

तालीकोटे युद्धात विजयनगरच्या पराभवानंतर बेळगाव आदिलशाहीचा ताब्यात आले. हसन गंगुबहमनी हा बेळगाव जवळील रायबाग तालुक्यातील कुडचीचा. तेथे त्याची जहागीर होती. १४७२ मध्ये महमदगवाणने गोवा कोंकण बरोबरच बेळगावही जिंकले. देशपांडे आणि देसाई यांना खंड गोळा करणाऱ्या अधिकाराच्या जागा देण्यात आल्या. त्यांच्यावरच सैनिक आणि राज्यकारभाराची जबाबदारी सोपवण्यात आली. बेळगाव प्रांतावर आदिलशाहीचे प्रभावी राज्य असल्याने या प्रदेशाच्या राजकीय, सांस्कृतिक इतिहासावर त्यांची छाप पडली. तोरगल, बेळगाव, हुक्केरी हा भाग अदिलशाहीच्या अधिपत्याखाली होता. बेळगाव, हुक्केरी, रायबाग, कुडची, संपगाव, अथणी, तिगडी येथे अदिलशाही काळातील इंडो इस्लामिक शैलीचे अनेक वास्तुशिल्पाचे नमुने पहावयास मिळतात. अथणीचे सिद्धेश्वर देवालय आणि जुम्मामशीद तसेच हुक्केरी रायबाग येथील घुमट, दर्गा, मशिदी उल्लेखनीय आहेत.

पोर्तुगीज प्रभावातून कागद आणि अगरबत्ती उद्योग तंबाखु पीक, बेळगाव जिल्ह्यात प्रसिद्धी पावले. रायबाग आणि अथणीत इंग्रजांनी सुरू केलेल्या फॅक्टरी कारवार येथील इंग्रजांच्या कारखान्याशी निकटवर्ती संबंध राखून होत्या. गोव्यातील पोर्तुगीज, वेंगुर्ल्यात डच फॅक्टरी त्याचा बेळगावशी व्यापारी संबंध होता.

औरंगजेबाचा पुत्र अझमखान याने बेळगाव जिंकून त्याचे अझम नगर असे नामकरण केले. मुगलसेनानी खासीम खानाच्या हातात तोरगलचा किल्ला होता. त्यानी श्रीमंत शिंदे सरकार यास तोरगलचा किल्लेदार नेमले. श्रीमंत शिंदे हे कोल्हापूर संस्थानचे जावई होते.

कृष्णा नदीच्या उत्तरेचा बेळगाव प्रदेश छत्रपती शिवाजी महाराजांच्या आधीन होता. अथणी, खानापूर जवळील भीमगड, राजहंसगड परसगड, संपगांव संकेश्वर जवळील मबगड, मुरगोड, हुली, रामदुर्ग, तोरगल, वगैर शिवाजी महाराजांच्या अधिपत्याखाली काही काळ होते. त्यांच्या मृत्युनंतर पेशव्यांनी बेळगाववर राज्य केले.

१८ व्या शतकाच्या उत्तरार्धातील बेळगावचा राजकीय इतिहास संकीर्ण होत गेला. पेशवे व त्यांच्या आधीन असणारे सांगलीचे पटवर्धन कोल्हापूरचे छत्रपती, सावनूरचे नवाब, हैदरअली आणि टीपू सुलतान या सर्वांनी बेळगाव स्वतःच्या नियंत्रणाखाली आणण्याचा प्रयत्न केला. त्याचे राजकीय हस्तांतरण होत रहिले. त्यानंतर प्रबल झाले ते देसाई, सरदेसाई, देशपांडे वगैरे संस्थानिक व वतनदार. बलिष्ठ राजांचे पतनावशेष म्हणून कुत्र्यांच्या छत्र्याप्रमाणे वेगवेगळी संस्थाने उदयास आली. त्यांनी या प्रदेशावर राज्यकारभार केला व ते येथे रुळले. बेळगाव जिल्ह्यातील प्रमुख संस्थानिक कित्तूर, निपाणी, नणदी, वंटमूरी, चचडी, तल्लूर शिरसंगी, बेलवडी, वगैर कित्तूर चन्नम्मा, बेलवडी मल्लम्मा, संगोळी रायण्णा या शूरांचा हा प्रदेश. ईशप्रभु देसाई यांची राणी असणारी बेळवडी मल्लम्माने शिवाजीच्या सैन्यात महिला सैन्य बनवून संग्राम केल्याचे समकालीन इंग्रजी फॅक्टरी रेकॉर्डस् मधून दिसून येते. यादवाड येथील शिवाजी, माते प्रमाणे गुडघ्यावर बसून तिला नमस्कार करत असल्याचे शिल्प पुष्टी देणारे ठरते.

राणी कित्तूर चन्नम्मा ही भारतातील एक श्रेष्ठ स्वातंत्र सेनानी. दत्तक पुत्राच्या आपल्या हक्कासाठी ब्रिटिशांविरुद्ध बंड करुन भारताच्या भूपटलावर लहानशा ठिपक्या सारखे असणारे कित्तूर तिने जग प्रसिद्ध केले. कित्तूर स्मारकाचे अवशेष असणारा किल्ला, देवालय, समाधी, देसनूरचा निरंजनी महाल ही प्रमुखस्थळे कित्तूरच्या इतिहासाचे सार सांगतात.

रामदुर्गचे पटवर्धन, निपाणीचे सिद्धोजीराव, चचडीचे सरदार विरभद्रदेसाई, बेळगावच्या सांस्कृतिक इतिहासाच्या समृद्ध खाणीच होत. येथील वाडे बेळगाव प्रदेशाच्या वास्तुशिल्पाचे वैभव दर्शवितात तसेच समकालीन सांस्कृतिक जीवनाचा आरसाच होत. १८५७ च्या बंडात बेळगावने सक्रीय वा प्रत्यक्ष भाग घेतला नसला तरी या प्रदेशातील पाच योध्यानी १८५७ मधे प्राणार्पण केले.

स्वातंत्र चळवळीत बेळगावाचे सक्रीय योगदान आहे. नरगुंदचे भास्करराव भावे, कर्नल माल्कमच्या हातून सुटले. बेळगावात त्याना फाशी दिली गेली. बेळगावच्या मिल्ट्री डेअरी प्रदेशात त्यांच्या मातोश्री, पत्नी व भावे यांची समाधी आहे.

टिळकांनी बेळगाव कर्मभूमी मानून १९१६ मधे होमरूल चळवळीस येथूनच चालना दिली. कर्नाटकातील राष्ट्रीय काँग्रेस अधिवेशन १९२४ मध्ये बेळगावात झाले. वास्तुंचे वीरसौध, काँग्रेसविहीर, काँग्रेसरस्ता असे नामाभिदान करण्यात आले. काँग्रेसविहीर अधिवेशनास आलेल्या प्रतिनिधींना पाणी पुरवण्यासाठी निर्माण केली होती. त्यास पंपा सरोवर व बेळगावच्या अधिवेशनास विजयनगर अधिवेशन अशी प्रसिद्धी मिळाली. कर्नाटक एकीकरणाचे बिजारोपण येथेच झाले. हुईलगोळ नारायणराव यानी उदयवागली नम्म चलुव कन्नडनाडु हे गीत आधिवेशना आरंभी सादर केले. एकीकरणाची पहिली सभा लिंगराज महाविद्यालयात झाली. गंगाधरराव

देशपांडे, श्रीरंग कामत, अण्णु गुरुजी, व्यंकटप्पा हूली, जयदेव कुलकर्णी गांधींच्या विचाराने मोहित होऊन स्वातंत्र्य संग्रामात उतरले.

ब्रिटिशांनी येथे कॅन्टोन्मेंटची स्थापना केली कारण नैसर्गिकदृष्ट्या अत्यंत सुरक्षित स्थळ होते. क्रेडल ऑफ इन्फंट्री अशी ख्याती असलेल्या बेळगावात एम.एल.आय.आर.सी. ची स्थापना झाली. शौर्य सौध हॉल ऑफवेलर, नावाचे वस्तुसंग्रहालय येथे आहे. इंग्रजांच्या स्थापत्यशास्त्राचे नमुनेही चर्च व इतर गोष्टीतून आजही बेळगावात दिसतात.

बेळगावच्या वास्तुशिल्प परंपरेला इंग्रजांच्या वसाहतशाही राजवटीने महत्वपूर्ण झळाळी दिली. सरकारी कचेऱ्यांचे बांधकाम, वसती गृहे, ट्रेनिंग सेंटर्स, वगैर वास्तू त्यांच्या शिल्पाचे नमुने होत.

*** परदेशी प्रवाशांच्या नजरेतून बेळगाव:** बेळगाव जिल्ह्याला अनेक परकीय प्रवाशांनी भेटी दिल्या त्याना हा प्रदेश पाहताना आनंद आणि आश्चर्य वाटले जे त्यानी लिहून ठेवले आहे. ग्रीसचा प्रवासी टॉलेमी याने बेळगाव जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील हलसी गावाला भेट दिली 'हलसी' चा उल्लेख त्याने 'पसगे' असा केला आहे. कर्नाटकातील पाच प्रमुख ख्यात आंतरराष्ट्रीय व्यापार केंद्रापैकी ते होते असे तो म्हणतो. १७२० मध्ये कॅप्टन मूर याने बेळगाव हे विशाल नगर असून तेथे सुसज्ज बाजार पेठ असल्याचा उल्लेख केला आहे. १६८० मध्ये गोवामार्गे बेळगावला आलेल्या इंग्रजी भूगोलशास्त्रज्ञ ओग्लीबी याने बेळगावच्या नगरयोजनेविषयी प्रशंसोद्गार काढले आहेत. १८२१ मधे कॅप्टन क्लूनने चिकोडी प्रदेशास 'चिकोरी' असे संबोधले असून त्याचे कोल्हापूरास लागलेले शहर असा उल्लेख त्याने केला आहे.

जर्मन प्रवासी मॉण्डल्स याने १६३९ मधे अथणीला भेट दिली. विजापूर गोवा प्रदेशा मधील व्यापारी शहर असा अथणीचा उल्लेख त्यांनी केला आहे. ओग्लीनी यानेही 'अथणीस' व्यापारी केंद्र असे म्हंटले आहे. १६७५ मधे आलेल्या ब्रिटीश प्रवाशाने अथणीच्या राजकीय स्थिती विषयीही लेखन केले आहे. अथणीत ब्रिटिशांनी व्यवसायाची सुरवात केली असा उल्लेख खिन्नेल करतो. १७८८ मधे त्यांने अथणीस भेट दिली तेव्हा तेथे व्यवसायाचे व्यवस्थापन झाले होते.

१५८३ मधे बेळगाव नगरास भेट दिल्याचा संदर्भ रॉफल फील्च देतो. बेळगाव हे विजापूर आणि गोव्याच्या मधील मोठे व्यापारी केंद्र असल्याचा उल्लेख फील्च करतो. ओग्लीबी बेळगांव, च्यापोर (शाहापूर) चार प्रमुख टाउनशीप मधील एक सुनियोजित टाउनशीप असल्याचा उल्लेख करतो. १६९५ मधे आलेला इटलीचा कारेरी हा प्रवासी बेळगाव बहुसंख्य लोकसंख्येचे शहर होते प्रचंड मोठ्याबाजार पेठेचे केंद्र असल्याचा उल्लेख करतो. म्हणजे १४, १५व्या शतका पासूनच देश विदेशी प्रवाशांमध्ये बेळगाव एक मोठे व्यापारी केंद्र म्हणून प्रसिद्ध पावलेले दिसते. मिश्रसंस्कृतीचे हे आगर आहे. ऐतिहासिक धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक दृष्ट्या श्रीमंत असे शहर आहे.

❑

रेणुकादेवी मंदिर, सौंदत्ती-बेळगाव

ग्रिप्स - बालरंगभूमी

महाराष्ट्र कल्चरल सेंटर, पुणे. (सुदर्शन रंगमंच) ग्रिप्स या संस्थामध्ये प्रामुख्याने सहभाग. मराठी नाटक, सिनेमा, जाहिराती यामध्ये समर्थ अभिनय

शुभांगी दामले

दि. १९ सप्टेंबर २०१४ ची सकाळ. बर्लिन विमानतळावर उतरल्यावर बस-ट्रेननी मजल-दरमजल करत करत बर्लिनचं सौंदर्य न्याहळत असताना Hansplatz नावाच्या Station वर कधी आलो ते कळलंच नाही. ट्रेनमधून उतरल्या उतरल्या समोरच 'Towards GRIPS Theatre' अशी पाटी वाचल्यावर आम्हा सर्वांची पावलं वेगानं त्या दिशेने पडू लागली आणि एक भला-थोरला जिना चढून गेल्यावर 'GRIPS Theatre' च्या भारलेल्या परिसरात आम्ही दाखल झालो. GRIPS चे जनक फोल्कर लुडविग, समन्वयक पीट गिल्बर्ट, सुप्रसिद्ध जर्मन लेखक लुट्झ ह्युब्नर आणि त्यांची संपूर्ण team आमच्या स्वागतासाठी तिथे असल्याचे पाहून आम्ही क्षणभर स्तब्धच झालो. गेली २५ वर्षे ज्या चळवळीसाठी अनेकांनी स्वतःला वाहून घेतलं त्या चळवळीचे उगमस्थान याची देही याची डोळा पाहून अंगावर काटा आला.

निमित्त होतं GRIPS चळवळीला जर्मनीमध्ये ४० वर्षे आणि GRIPS चळवळीच्या भारतातील आगमनाला ३० वर्षे पूर्ण झाल्याचं! याच सुवर्णयोगाचं औचित्य साधून GRIPS Theatre, Berlin नी सातत्याने 'ग्रिप्स' पद्धतीची नवी नाटकं प्रेक्षकांपर्यंत पोहोचवणाऱ्या 'महाराष्ट्र कल्चरल सेंटर'ला आमच्या पहिल्या वहिल्या Youth GRIPS नाटकाचा प्रयोग करण्यासाठीआमंत्रित केलं होतं. या नाटकाची गंमत अशी की हे नाटक पुण्याचे सुप्रसिद्ध लेखक-दिग्दर्शक श्रीरंग गोडबोले आणि विभावरी देशपांडे तर बर्लिनचे सुप्रसिद्ध लेखक-दिग्दर्शक लुट्झह्युब्नर यांनी एकत्रितपणे लिहिलं आणि हेच नाटक भारतात 'Du & मी'या नावाने तर जर्मनी मध्ये 'Der Gast ist Gott'(अर्थात अतिथी देवो भव) या नावाने सादर केलं जात आहे. पुणे आणि बर्लिनच्या अनेक वर्षांच्या अनोख्या सांस्कृतिक संबंधांना लक्षात घेऊन 'Max Muller Bhavan, Pune'यांनी पुढाकार घेतला आणि 'Authors Project'च्या संकल्पनेअंतर्गत या अनोख्या सांस्कृतिक देवाण-घेवाणीची सुरूवात झाली.

आमचा प्रयोग संपल्यानंतर प्रेक्षागृहात जर्मन प्रेक्षकांनी उभं राहून टाळ्यांचा कडकडाट केला. भाषेची अडचण असूनदेखील त्यांनी प्रयोग पूर्णपणे enjoy केला याचीच ती पावती होती. ५ वेळा 'curtain call'घेऊन सुद्धा टाळ्यांचा कडकडाट जेव्हा थांबेना तेव्हा मात्र रंगमंचावरील आम्ही सर्वजण अक्षरशः निःशब्द झालो. पुण्यातील इतक्या वर्षांच्या 'ग्रिप्स' चळवळीला आपापल्या परीने पुढे नेणाऱ्या प्रत्येक कलाकार, तंत्रज्ञांचं 'त्यांनी' केलेलं हे कौतुक अविस्मरणीय होतं!

पण 'ग्रिप्स' म्हणजे नक्की काय? या प्रश्नाचं उत्तर आपल्याला थेट ६० च्या

दशकात घेऊन जातं. जर्मनीमधील सामाजिक आणि राजकीय अशांततेचा अतिशय क्लिष्ट असा हा कालखंड. तत्कालीन राजकीय घडामोडींविषयी साधं भाष्य करणंही मुश्कील होऊन बसलं होतं. त्यातच रंगभूमीची अवस्थाही दयनीय झाली असल्याने सकस आणि प्रबोधनपर कलाकृती जणू हद्दपार होऊन बसल्या होत्या. मोडकळीस आलेली बालरंगभूमी तर अजूनही परी, भुते-खेते, जादू-टोणा यामध्येच अडकली होती. पण या सगळ्या प्रतिकूल परिस्थितीतही काही मंडळी नव्याचा शोध घ्यायच्या प्रयत्नात होती. फोल्कर लुडविग हा त्यातलाच एक तरुण रंगकर्मी. आजूबाजूला घडणाऱ्या घटना आणि अनुषंगानी रोजच्या आयुष्यावर होत असलेले चांगले वाईट परिणाम जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोचवून प्रबोधन करण्यासाठी रंगभूमी हेच एकमेव प्रभावी माध्यम आहे हे या तरुणांनी ताडलं. आणि याच स्वयंप्रेरणेतून 'ग्रिप्स' या क्रांतिकारी बालरंगभूमीचा उदय झाला.

'क्रांतिकारी बालरंगभूमी' हे समीकरण ऐकायला जेवढं मजेशीर वाटेल तेवढंच त्यातून झालेलं प्रबोधन अधिक व्यापक होतं. तत्कालीन सामाजिक घटनांवर भाष्य करण्यासाठी, वाद-प्रतिवाद करण्यासाठी, प्रसंगी ताशेरे ओढण्यासाठी बाल-रंगभूमीचा समर्पक वापर या तरुणानी जाणतेपणानी केला. लहान मुलांच्या दृष्टिकोनातून आजूबाजूच्या जगाकडे पाहिल्यानं त्यातली विफलता, दाहकता जास्त परिणामकारकपणे प्रेक्षकांसमोर येऊ लागली आणि बघता बघता ही चळवळ जोम धरू लागली. आबालवृद्ध प्रेक्षक रंगभूमीच्या या नव्या-कोऱ्या अध्यायाकडे आशेने पाहू लागले.

८० च्या दशकात मराठी बालरंगभूमी देखील थंडावत चालली होती. भालबा केळकर, सुधाताई करमरकर, सई परांजपे, रत्नाकर मतकरी या सर्वांनी एकेकाळी बालरंगभूमी जरी गाजवलेली असली तरी आता त्यांच्या बालनाटकांची प्रयोगसंख्या रोडावत चालली होती. सादरीकरणातला भपकेबाजपणा, संहितेतील तोचतोचपणा, बालकलाकारांचा प्रौढ अभिनय या सर्व घटकांमुळे नव्या नाटकांनाही तग धरणे अवघड होऊन बसले. राजा-राणी, भुते-खेते, राक्षस यापलीकडे नाटकांचे विषय जात नव्हते. अशा कठीण परिस्थितीमध्ये मुलांच्या मनोरंजनासाठी काहीतरी वेगळं करण्याची गरज होती.

१९८४ साली डॉ. मोहन आगाशे जर्मनीला गेले असताना त्यांची भेट फोल्करशी झाली आणि बालरंगभूमीचं एका वेगळ्याच विश्वाचं दर्शन डॉ. आगाश्यांना झालं. लहान मुलांच्या भाव विश्वातील विषय, साधी-सोपी भाषा, कुठलाही बडेजाव नाही, नेपथ्य, वेशभूषा, प्रकाशयोजना यांच्यातला साधेपणा परंतु आशयघन आणि प्रयोगक्षम असणारी अशी नाटकं त्यांनी तिथे पहिली. बालप्रेक्षकांबरोबरच मोठ्यांचीही मिळणारी उत्स्फूर्त दाद आणि प्रयोगाची रंगत या गोष्टी त्यांच्या मनात इतक्या रुजल्या कि अशा पद्धतीची चळवळ भारतातही यावी यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले.

थिएटर अकादमी आणि Max Muller Bhavan यांच्या सहयोगाने 'छान छोटे वाईट मोठ्ठे' या नाटकाची निर्मिती १९८६ साली झाली. श्रीरंग गोडबोलेसारख्या सर्जनशील लेखकाने मूळ Max Und Milli या नाटकाचं मराठीत रूपांतर केले. Wolfgang Kolneder या जर्मन दिग्दर्शकाने हे नाटक पुण्यात येऊन बसवलं आणि एका नवीन चळवळीला सुरूवात झाली आणि मनोरंजनाचं एक वेगळंच दालन बाल-प्रेक्षकांसाठी खुलं झालं. बालप्रेक्षक आणि पालक यांनी या नाटकाला अक्षरशः डोक्यावर घेतलं. बालसुलभ भाषा, सुटसुटीत नेपथ्य व प्रकाश योजना, लक्षात राहतील अशी गोड गाणी आणि सहज-सुंदर अभिनय यांनी हे नाटक एका वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवलं. या नाटकाचे शेकड्याने प्रयोग झाले आणि आज सत्तावीस वर्षानंतरही हे नाटक आपला टवटवीतपणा टिकवून आहे.

'ग्रिप्स' बालरंगभूमी अजून एका अर्थानी विशेष ठरली ती सादरीकरणामुळे! साधारणपणे बालरंगभूमी म्हटली कि डोळ्यासमोर येतात ते चिमुकले कलाकार. पण 'ग्रिप्स' पद्धतीच्या नाटकांनी ही देखील

व्याख्या बदलून टाकत वयानी मोठे असलेले परंतु लहान मुलांची भूमिका करणारे कलाकार प्रेक्षकांसमोर आणले. बालिश अभिनय न करता बालसुलभ अभिनय करण्याचा नवा पायंडा या निमित्ताने पडला. हा विशिष्ट अभिनय अवगत करण्यासाठी खास कार्यशाळेचं आयोजन दर वर्षी करण्यात येतं. 'लहान मुलांचा अभिनय न करता स्वतःच लहान मूल व्हा' ही महत्वाची शिकवण या कार्यशाळेतून दिली जाते. सगळ्यात गमतीची गोष्ट अशी की बालप्रेक्षक नाटकातल्या या छोट्या(?) कलाकारांना चटकन आपल्या वयाची समजू लागतात. आणि त्यामुळेच हे प्रयोग कधीही हास्यास्पद होत नाहीत. हे नाटक 'एरिना थिएटर' अर्थात चहू बाजूनी प्रेक्षक आणि मध्ये नाटक अशा पद्धतीने सादर केले जाते. कलाकार आणि प्रेक्षक यांच्यातील अंतर अगदी कमी असल्यामुळे संवेदनांची देवाण-घेवाण कित्येक पटीने वाढते. बघता बघता बालनाट्यांच्या सादरीकरणातल्या या नव्या बदलाला बालरंगभूमीच्या परखड आणि चाणाक्ष समीक्षकांनी अर्थात बालप्रेक्षकांनी लागलीच पसंतीची पावती देऊ केली आणि या चळवळीचं क्षितीज आता विस्तारू लागलं होतं.

स्त्रीच्या सामाजिक स्थानावर भाष्य करणारं आणि मुलांच्या आयुष्यातल्या 'बाबा'चं महत्व सांगणारं 'नको रे बाबा' हे नाटक श्रीरंग गोडबोले यांनी लिहिलं आणि दिग्दर्शितही केलं. 'ग्रिप्स'च्या नाटकांची नस त्यांना पक्की उमजली होती आणि त्यामुळेच 'पहिलं पान' हे पर्यावरणाशी निगडीत असलेलं नाटक त्यांनी लिहिलं. त्यानंतर मुंबईतल्या ९२ साली झालेल्या बॉम्बस्फोटांचे मुलांच्या भावविश्वावर होणारे परिणाम दाखवणारं 'पण आम्हाला खेळायचंय' हे नाटक त्यांनी लिहिलं आणि दिग्दर्शितही केलं. पहिलं भारतीय 'ग्रिप्स' नाटक म्हणून या नाटकाला खूप महत्व आहे. या चारही नाटकांचे महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर हजारोंनी प्रयोग झाले. याच सुमारास ही चळवळ महाराष्ट्राबाहेर बंगलोर, कलकत्ता, दिल्ली, कराची, मुंबई आणि श्रीलंका इथेही सुरू केली गेली. यानंतर शोभा भागवत यांनी 'आम्ही घरचे राजे' आणि चेतन दातार यांच 'Stronger than Superman' ही नाटकेही गाजली. याच सुमारास 'ग्रिप्स' पद्धतीची नाटकं लिहीण्यासाठीची एक खास कार्यशाळा ही घेण्यात आली. त्यालाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. 'ग्रिप्स'ची नाटकं बघत बघतच लहानाची मोठी झालेल्या विभावरी देशपांडेनी या नाटकांतून काम करायला सुरूवात केली. या नाटकांचे तिच्यावर एवढे खोल संस्कार झाले की तिनेही स्वतःच नाटक लिहिण्याचा निर्णय घेतला आणि 'हाश हुश्श! ठाळ ठूश्श!' आणि 'सापडली युक्ती सापडली' ही मूळ जर्मन नाटकावरून प्रेरित असलेली नाटकं तिनं मराठीत केली. आणि याच सुमारास Max Muller Bhavan ची शिष्यवृत्ती मिळवून विभावरी 'ग्रिप्स' पद्धतीचा अभ्यास करण्यासाठी जर्मनीला रवाना झाली. या अभ्यासपूर्ण दौऱ्याचा परिपाक म्हणजे तिची पुढची नाटकं- 'आई पण! बाबा पण!' आणि 'प्रोजेक्ट अदिती'! तिची ही दोन्ही नाटकं प्रचंड गाजली आणि 'ग्रिप्स' ला नव्या पिढीची लेखिका मिळाली.

दरम्यानच्या काळात प्रमोद काळे आणि सचिन कुंडलकर यांनीही 'ग्रिप्स' पद्धतीच्या नाटकांसाठी लेखन केलं. सलग वीस वर्षं चालू असलेल्या या चळवळीला स्थैर्य प्राप्त झालं होतं. दरवर्षी होणारे या नाटकांचे महोत्सवही प्रेक्षकांची भरभरून दाद मिळवत होते. प्रत्येक पिढीबरोबर बदलत जाणाऱ्या लहान मुलांच्या संवेदना या सर्व महोत्सवांतून समोर येऊ लागल्या आणि केवळ बाल-प्रेक्षकांपुरतेच मर्यादित राहिलेले विषय आता पौगंडावस्थेतील मुलांपर्यंत येऊन पोचले आणि विभावरीच्या 'गायब गीत' या नाटकाची निर्मिती झाली. 'गायब गीत' च्या विषयाबरोबरच त्याच्या सादरीकरणातला वेगळेपणाही प्रेक्षकांना भावला.

या सगळ्या पंचवीस वर्षांच्या 'ग्रिप्स'च्या प्रवासानंतर पुढे काय असं प्रश्नचिन्ह जेव्हा उपस्थित झाले तेव्हा 'Authors Project' ही संकल्पना पुढे आली. दोन वेगळ्या देशातील लेखकांनी एकत्र येऊन एका सामाईक विषयावर नाटक लिहून पहावं अशी अभिनव कल्पना या 'प्रोजेक्ट'च्या निमित्तानं मांडली गेली आणि त्यातूनच 'Du & मी' ची निर्मिती झाली. जर्मनी मधील सुप्रसिद्ध लेखक लुट्झ ह्युब्नर आणि श्रीरंग गोडबोले-विभावरी देशपांडे यांनी एकत्रित लिहून बसवलेलं हे नाटक सध्या गाजत आहे.

या नवनवीन प्रयोगांसोबतच 'ग्रिप्स'ची ही चळवळ उत्तरोत्तर अधिक बळकट होत जाईल आणि नव्या पिढीला भुरळ घालत राहील यात शंका नाही!

❑

दिवंगत नाट्यकर्मींना श्रद्धांजली

कै. स्मिता तळवलकर, कै. सदाशिव अमरापूरकर,
कै. कुलदीप पवार, कै. सुधीर मोघे

– बेळगावकर रसिक

अभिजात संगीत नाटकाची दक्षिणकाशी-बेळगाव

संस्कारभवन, कोल्हापूर येथे नाट्य प्रशिक्षण वर्गात प्रथम क्रमांक. १५ नाटकात कामे. महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत अभिनयाचे पारितोषिक. अनेक एकांकिकात अभिनय. 'नृत्यवेध' ही कथ्थक नृत्य शिकवणारी संस्था स्थापन. कथ्थक विषारद.

आसावरी भोकरे

बेळगावच्या रंगभूमीचा इतिहास फार फार जुना आहे. मराठीतील पहिले साप्ताहिक 'बेळगाव समाचार' हे ऐतिहासकि पुरावा देण्यास पुरेसे आहे. काही दाखलेच द्यायचे झाले तर,

१८६०-६१ साली कवठेकर नाटक मंडळी आली. सांगलीकर नाटककार आले आणि त्यांचे खेळ मारूतीच्या देवळात झाल्याचे समजते. १२-३-६६ च्या अंकात 'सुमारे तेरा चौदा वर्षापूर्वी साधारण लोकांस नाटक हा शब्द माहित नव्हता.रामावतारातील व पांडवप्रतापातील खेळ करण्याची चाल या प्रांती व कोकणात पुष्कळ वर्षापासून आहे. विशेषकरून गोकर्णकडील ब्राह्मण लोक व कोकणातील गुरव हे या व्यवसायात आहेत. '१४-११-७० च्या अंकात' आमच्या देशात जी नाटके होतात त्यांस 'रामावतार' म्हणतात. बहुतेक खेळ रामायणातून घेतलेल्या कथेवर असतात. मुख्य प्रयोगानंतर एखादा हलकाफुलका प्रयोग अभिनीत होत असे. पारशी नाटक मंडळी देखिल बेळगावात मराठी खेळ करून दाखवीत. 'कृष्णपारिजात' या एका कर्नाटकी नाटक कंपनीचा अपवाद वगळता इतर सर्व कर्नाटकी नाटक कंपन्या सुद्धा मराठी नाटकेच करतात, त्यामुळे १-१-१८६६ च्या अंकात लिहीले आहे. 'बेळगांवचे कृत्य आटोपल्यावर धारवाड, हुबळी ही कानडी शहरे समजून त्यांनी परत जाणेचे करू नये. हा निखालस कानडा प्रांत समजू नये!

विलासतरंगिणी, न्यायविजय, यादवगर्व, परिहार, विक्रमशशिकला अशांसारखे नव्या नाटकांचे प्रथम प्रयोग बेळगावच्या रंगभूमीवर झाले.

बेळगांवचे प्रसिद्ध नाटककार रसिक, टीकाकार कवी किरात यांचे द्यूतविनोद हे नाटक वाईकर नाटक मंडळींनी पुढे आणले. बेळगांवच्या रंगभूमीवर नंदगडकर बाल नाटक मंडळीही आपले खेळ करीत. पुरुषांच्या बरोबरीने स्त्रिया नाटकात काम करीत.

नारायणस्वामींच्या कारखान्याचे थिएटर, काळे यांचे प्रेक्षागृह, खडेबाजारचे नाट्यगृह, मारूतीचे देऊळ, जमखंडीकरांचा वाडा (सध्याची 'बेळगाव समाचार' इमारत' सुंठणकरवाडा, निळोबाचे थिएटर म्हणजेच शिवानंद थिएटर येथे प्रयोग चालत.

अशा नाट्यविषयक मशागत झालेल्या लालमातीत चैत्र शुद्ध १ शके १७६५ (३१-३-१८४३) रोजी आण्णासाहेब किर्लोस्करांचा जन्म बेळगाव जिल्ह्यातील गुर्लहोसूर गावी झाला. कानडी मराठीचा अभ्यास गावीच झाला. बाराव्या वर्षापर्यंतचे शिक्षण कोल्हापूर, धारवाड, पुणे येथे झाले. अण्णांना कविता करण्याचा छंद १४ व्या वर्षापासूनच होता. एकदा दिक्षित प्राईझ कमिटीने 'शिवाजी' काव्यास बक्षिस लावले. त्यांना बक्षिस मिळाले नाही. पण कमिटीचा अभिप्राय मिळाला. १८६३ साली पुण्यास विद्यार्जनार्थ गेले असता त्यांनी विक्रमचरित्र आणि एल्फिस्टन व बाजीरावाचा फार्स हे भाग वसविले. नाटकाचा छंद लागल्याने त्यांना बेळगावास बोलाविले. त्यांनी अँग्लो व्हर्नाक्युलर स्कूलमध्ये नोकरी पत्करली. काही काळाने पोलिस खात्यात नोकरी धरली. ते जमादार झाले. पुढे त्यांना बेळगावच्या कमिशनर ऑफिसात जागा मिळाली. ते ऑफीस पुण्यास जाईपर्यंत आण्णासाहेबांच्या नाट्य विषयक चळवळी बेळगावात सारख्या चालू असत. ते सहजस्फूर्तीने पदे करीत. आण्णांनी रचलेली विडंबनात्मक पदे त्याकाळी अबालवृद्धांच्या तोंडी असत. बेळगाव जवळच्या शहापूर गावी मुरलीधराच्या देवळासमोरील कृष्णाशास्त्री धोपेश्वरकर यांच्या घरात अनंत आचमनींसह बैठका चालत.

१८६० च्या सुमारास 'पारिजात' नाटक करणारी एक कर्नाटक नाटक मंडळी बेळगावी आली होती. त्या धर्तीवर आपणही मराठीत नाटक लिहावे असे अण्णांनी मनात घेतले. त्यानुसार 'श्रीकृष्ण पारिजातक, रासक्रीडा, हरिश्चंद्र, शुकरंभासंवाद, वगैरे आख्याने संगीत पद्धतीवर लिहीली. श्रीकृष्ण पारिजातक ही संगीत नाट्यमालिका सांगलीकर नाटक मंडळीस अण्णांनी प्रयोग सुलभ करण्यासाठी स्वतः बसवून दिली.

गोव्याचे कृष्णभट जगन्नाथभट बांदकर हे लहान मुलांकडून पौराणिक कथांवर नाटके बसवत. त्या नाटकांचा परिणामही अण्णांच्या मनावर झाला. पुढे कृष्णशास्त्री धोपेश्वरकर, अनंत आचमनी, बन्याबापू केळकर, रामभाऊ गिंडे, आर्देसर पारशी, सडेकर, अप्पाण्णा मजलीकर यांना हाताशी धरून भरतशास्त्रोत्तेजक मंडळी स्थापन करून विक्रमचरित्र, श्रीरामजन्म, हरिश्चंद्र वगैरे पद्यमय आख्याने जनतेसमोर ठेवली. १८७३ला शंकराचार्यांच्या जीवनावर शांकरदिग्विजय नाटक लिहिले. कोल्हापूरकर चित्तचक्षुचमत्कारिक नाटकवाले यांनी ते बसविले. त्याचा प्रयोग बेळगाव येथे २ जाने १८७५ ला झाला. तसेच अल्लाउद्दीनची चितोडवर स्वारी ही नाटकेही लिहिली.

भावे पद्धतीची जुनी नाटके किंवा कीर्तनेकृत ऐतिहासिक नाटके पुढे पुढे कोणी पाहिनासे झाले. 'माधवराव पेशवे' यांचे नाटक सांगलीकर फार चांगले करीत. पण त्यात गाणे नव्हते. विष्णुपंती नाटके पाहणारा प्रेक्षक संगीत श्रवणाने किती भारावलेला आहे हे ओळखूनच किर्लोस्करांनी संगीत नाटक तयार केले.

खरं तर १८६७ ऑक्टोबर १९ ता. ला ग्रँटरोड येथील रंगभूमीवर 'कालिदास एल्फिन्स्टन सोसायटी' नावाच्या मंडळाने अभिज्ञान शाकुंतल हे नाटक इंग्रजी भाषेत केले. तर १८७१ साली ग्रँटरोड येथेच एल्फिन्स्टन कॉलेजच्या विद्यार्थीनीनी शाकुंतल मूळ संस्कृत भाषेत केले.

पण या नाटकाचा इजा बिजा नि तिजा या न्यायाने मराठी भाषेतील पहिला प्रयोग अजून व्हायचा होता. तो बेळगावात झाला, आणि तोही खुद्द लेखकाच्या भरतशास्त्रोत्तेजक मंडळीने ४-९-१८७५ रोजी केला. याचा उल्लेख 'बेळगाव समाचार' मधे आहे.

भरतशास्त्रोत्तेजक बेळगावकर मंडळी

आम्ही सर्व बेळगावकर रसिकजनांस या जाहिरातीने असे कळवितो की वर दिलेल्या नावाची मंडळी स्थापन करून आम्ही पूर्वी कालिदास प्रभृति महान महान कवींनी केलेल्या नाटकांचे खेळ मराठीत तयार करून प्रत्येक इंग्रजी महिन्यातील पहिल्या शनिवारी खेळ करायचे ठरविले आहे. या प्रमाणे पुढिल महिन्यात म्हणजे ४ सप्टेंबर १८७५ शनिवार रोजी रात्री कालिदास कवीने केलेल्या अभिज्ञान शाकुंतल चे चार अंक व कचदेवयानी (पूर्वभाग) अशी दोन प्रकरणे करणार आहोत. हल्ली मंडळींनी जी नाटकाची पद्धती चालू केली आहे, त्यातील फाजील प्रकार सोडून विशेष सुधारणुकीचे प्रकार अमलात आणले आहेत व दिवसें दिवस मोठमोठ्या विद्वानांच्या सहाय्याने खरा नाटकाचा मूळ हेतू सिद्धीस न्यावा असे ठरविले आहे. तर आमच्या पहिल्याच प्रयत्नास सर्वांनी उत्तेजन द्यावे अशी प्रार्थना-मॅनेजर २२-८-१८७५.

४ सप्टेंबरला सं. शाकुंतल झाले. बेळगाव समाचार मधे ६-९-१८७५ रोजी अभिप्राय दिला आहे. 'भरतशास्त्रोत्तेजक बेळगावकर नाटक मंडळींचे शाकुंतल भर्तृगृही प्रस्थान येथपर्यंत, प्रसिद्ध शाकुंतल नाटकातील भाग व कचोपाख्यान हे खेळ झाले. नाटकाची व्यवस्था फार चांगली होती. पडदे वगैरे सामान नवीन तयार करवले होते. नाटकगृहात मनस्वी गर्दी झाली होती. सुमारे शे-दोनशे लोक जागा नसल्यामुळे परतून गेले. नाटककाराचा हा पहिलाच प्रयत्न म्हणून त्याजबद्दल आमच्याने त्यास दोष देववत नाही. एकंदरीत या नाटककार मंडळींची भरभराट होऊन लोकांस सुधारलेल्या तऱ्हेची नवीन नाटके पाहण्यास मिळतील अशी आम्ही आशा करतो.

भरतशास्त्रोत्तेजक बेळगावकर मंडळीकडून २७-९-१८७५ च्या बेळगाव समाचारात पुन्हा जाहिरात आली.

आम्ही गेल्या महिन्याचे चौथे तारखेस सांगितल्या प्रमाणे आक्टोबर महिन्याचे दुसरे तारखेस 'शाकुंतल'चे पुढचे तीन अंक व विक्रमचरित्र व शनिमहात्म्य हे खेळ करू. या खेळात उत्तम प्रकारच्या चार सिनऱ्याही दाखवू. शिवाय जादूचा खेळ फारच उत्तम प्रकारचा करू. तर मेहेरबानी करून सर्व लोकांनी त्यास उदार आश्रय द्यावा अशी आम्ही सर्वास विनंती करतो- मॅनेजर

या प्रयोगानंतर बेळगाव समाचार ने नाटक या विषयावर अग्रलेखच लिहीला. इतर मंडळींनी सुधारणा केली नाही अशा आशयानंतर लिहितात 'परंतु ती सुधारणा करण्याचे काम प्रथमतः आमच्या बेळगावातच चालू झाले. येथे भरतशास्त्रोत्तेजक नाटककार मंडळी स्थापन झाल्याचे व त्याचा पहिला खेळ मागील महिन्यात झाल्याचे आम्ही लिहीले होते. त्याचा दुसरा खेळ परवाचे रोजी झाला. नाटकात ज्या ज्या सुधारणा आवश्यमेव केल्या पाहिजेत असे म्हणतात त्या करण्याचा या मंडळींचा मुख्य हेतू आहे. व त्याप्रमाणे झालेल्या दोन्ही नाटकात बऱ्याच दिसून आल्या.

शय्यां हि नाट्यस्य वदन्ति गीतम! गीताला नाटकाची शय्या म्हणतात. नाटकांमधून गद्य संवाद असतात. व एक विसाव्याचे ठिकाण (शय्या) म्हणून नाटककार गीतांचा उपयोग करतो. शाकुंतलात मुळातील संवादाला पोषक होईल असे पदरचे संगीत उपयोजिले. त्यामुळे नाटकाचे मुल्य वाढले. लोकांना करमणूक मिळाली आणि गायनासाठी कलावंतिणीच्या घराची पायरी चढणारा मध्यमवर्गीय रसिक नाटकाकडे वळला आणि आपली संगीत नाटकाची कल्पना आण्णांनी झटक्यात लोकप्रिय केली.

सोकर बापूजी त्रिलोकेकर यांनी नलदमयंती हरिश्चंद्र या नाटकांचे प्रयोग शाकुंतलचे आधी केले. या कारणाने या प्रथेस सुरवात करण्याचे श्रेय

त्रिलोकेकरांना द्यावे लागेल. पण त्यांच्या दोन्ही नाटकात शाकुंतलच्या मानाने पदे कमी होती. बहुतेक पदे ही काव्य कृतीच्या चालींवर. शाकुंतलात इतर गेय पदे होती व त्यात जी विविधता, आकर्षकता होती तशी त्रिलोकेकरांच्या नाटकात नव्हती, त्यामुळे त्यांची नाटके व संगीत पडले. त्यांची नाटके शाकुंतल सारखी संगीत परंपरा निर्माण करू शकली नाहीत. या करिता पद्धतशीरपणे, पूर्णस्वरुपी संगीत नाटकांची परंपरा सुरू करण्याचा अग्रपूजेचा मान किर्लोस्करांना देण्यात येतो.

१८७५ साली किर्लोस्करांनी संगीत शाकुंतल बेळगावातच रंगभूमीवर आणले. तेच संगीत शाकुंतल १८८० साली नव्या नाट्यसंघाच्या सहाय्याने पुन्हा रंगभूमीवर आणल्यामुळे आणि तिकडील पात्रांनी त्याचा खूप गाजवाजा केल्यामुळे 'भरतशास्त्रोत्तेजक बेळगांवकर नाटक मंडळींचे शाकुंतल विस्मरणात गेले असावे. यातच आण्णा १८७८ साली पुण्यास गेल्याने त्यांची भरतशास्त्रोत्तेजक मंडळी बंद पडली, व आण्णांनी पुण्यास किर्लोस्कर नाटक मंडळी नावांची नवीन संस्था स्थापन केली. ती चांगलीच नावारूपाला आल्यामुळे या बेळगांवसारख्या आडवळणाच्या गावचा 'संगीत शाकुंतल' चा प्रयोग लोकांच्या स्मरणातून गेलेला असावा.

आण्णांचे मराठी संगीत शाकुंतल पाहताच पुण्यातील सभ्यासभ्यांनी, वर्तमानपत्रकारांनी आणि थोरामोठ्यांनी जसा उदो उदो केला, तसा बेळगावकडील रसिकांनी, वृत्तपत्रांनी केला नाही हे खरे.

बेळगांवच्या शाकुंतलचे दाखले 'बेळगाव समाचार' बरोबरच इतर मान्यवरांनीही दिले आहेत.

'किर्लोस्कर, धोपेश्वरकर नि अनंत आचमनी या तिघांनी मिळून शहापूरच्या कोरेगल्लीत मंटप घालून (पुण्यात १८८० च्या ऑक्टोबर महिन्यात किर्लोस्कर मंडळी स्थापन होण्यापूर्वी) यात शाकुंतल नाटकाचा पहिला गर्भावस्थेतला प्रयोग घडवून आणला. सारांश आण्णासाहेब किर्लोस्कर हे पुढे पुण्यात प्रसिद्धीस येण्यापूर्वी नाट्यचळवळी करून बेळगाव जिल्ह्यातील जनतेत रंगभूमी विषयी उत्साह निर्माण करत होते.

किर्लोस्करांच्या संगीत शाकुंतलचा प्रथम प्रयोग श्रीमंत सांगलीकरांच्या शहापूर गावी झाला. ही आठवण कृष्णराव बडसकर सांगत. हे नाटक शहापूर येथे कोरे गल्लीतील मोकळ्या बखळीत झालेले आपण पाहिले होते. असे सांगत.

दे.भ. गंगाधरराव देशपांडे यांचे सहकारी हणमंतराव देशपांडेही ही आठवण सांगत.

सं. शाकुंतल पाहण्यास आमच्या वडिलांनी मला मुद्दाम हुदलीहून बेळगावास पाठविल्याचे मला स्मरते. तो खेळ या भरतशास्त्रोत्तेजक मंडळीचा असावा.

म्हणूनच आद्यनाटककार देणाऱ्या सांगलीस नाट्यक्षेत्रातील काशी म्हटले तर आद्य अभिजात संगीत नाटककार देणाऱ्या बेळगावला दक्षिणकाशी खासच म्हणता येईल. म्हणूनच किर्लोस्करांसारखा थोर नाटककार व महाराष्ट्र नाट्यपरंपरेतील हा तन्मणी बेळगावचा आहे याचा सानंद अभिमान वाटतो.

मनस्वी हौस, रंगेलस्वभाव, कष्ट घेण्याची कृती, कलादृष्टी या गुणांमुळेच आधुनिक मराठी रंगभूमीची प्राणप्रतिष्ठा त्यांच्या हातून बेळगावातच झाली.

या ९५ व्या नाट्यसंमेलनाच्या निमित्ताने या इतिहासाची नोंद घेतली जाईल हीच अपेक्षा.

संदर्भ - १) कृ.बा मराठे यांचे 'मराठी रंगभूमीचा पूर्वरंग
२) आप्पाजी विष्णु कुलकर्णी - 'मराठी रंगभूमी'
३) बाबूराव जोशी - 'संगीताने गाजलेली रंगभूमी'
४) नटश्रेष्ठ दत्तोपंत हल्याळकर स्मारक ग्रंथ
५) दे. भ. गंगाधरराव देशपांडे - माझी जीवनगाथा

❑



वरेरकर नाट्यसंघाच्या कार्याचा ओझरता आलेख

वरेरकर नाट्य संघाचे कार्याध्यक्ष ज्येष्ठ अभिनेते, वरेरकर नाट्य संघाची दैनंदिन व्यवस्था अत्यंत समर्थपणे पाहतात. लोकमान्य आणि इतर संस्थांशी कार्यसंबंध. सामाजिक कार्याची आवड.

अजित इंगळे

मराठी रंगभूमीचे एकनिष्ठ व कळकळीचे पाईक असे ज्यांचे सार्थ वर्णन करतां येईल अशापैकी कै. भार्गव विठ्ठल उर्फ मामा वरेरकर यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. बेळगाव हे मराठी रंगभूमीचे माहेरघर असल्याने या भागांतील लोकांना प्रसिद्धिस पावलेल्या थोर नाटककारांविषयीं नेहमीच अभिमान व आदरभाव वाटत आला आहे. या आदर भावनेतूनच १९४४ च्या मे महिन्यांत बेळगांव परिसरांतील नाट्यरसिक व कै. मामांचे चाहाते व मित्रस्वकीय यांच्या मनांत त्यांच्या षष्ठ्यब्दीपूर्ती निमित्तानें त्यांचा सत्कार करण्याची कल्पना निघाली आणि या सत्कार समारंभाची कायम स्मृति रहावी व रंगभूमिची सेवा घडावी या हेतुनें सत्कार समारंभाच्या वेळींच एक नाट्यसंघही स्थापन करावा असे ठरले. ही दोन्ही कार्ये पार पाडण्याकरितां स्थापन करण्यांत आलेल्या कमिटीनें 'वरेरकर सत्कार नाट्य संघ' असें नांव धारण करुन कामास सुरुवात केली.

कै. मामांच्या सत्कार समारंभाचा इच्छित हेतु सफल झाल्यानंतर 'वरेरकर सत्कार नाट्यसंघाच्या' नावांत वरेरकर नाट्य संघ असा उचित बदल करणेंत आला.

या नाट्यसंघानें केवळ नाट्यप्रयोग सादर करण्यांतच समाधान मानले नाहीं. त्याबरोबरच रंगभूमी दिन साजरा करणें, दिवंगत सुप्रसिद्ध नाटककार व नट यांचे स्मृतिदिन पार पाडणें, नाट्यसंगीत, नकला या सारखे सांस्कृतिक कार्यक्रम घडवून आणणें इ. कार्येही वेळोवेळीं संघाकडून होत असतात. मुंबई येथें चालणाऱ्या नाट्यशिक्षण शिबिराला संघातर्फे होतकरु कलाकार पाठविले जात.

कै. मामां वरेरकरांच्या समारंभाच्या वेळीं कै. सदाशिवराव सुंठणकर, श्री. बा. रं. सुंठणकर, कै. डॉ. गो. वा. हेरेकर, कै. रामकृष्णपंत जोशी, कै. गोविंदराव सराफ, कै. दत्तोपंत वझे, कै. बाळकृष्ण शिरवईकर या मंडळींनीं विशेष परिश्रम घेतले व पुढें कांही वर्षे संघाचे कार्य नेटानें चालविले; कालांतरानें यांतील कांहीं कार्यकर्ते कालवश झाले, कांही परगांवीं निघून गेले आणि संघाच्या कार्याला शिथिलता आली. तळमळीच्या कार्यकर्त्यांना ही शिथिलता जाणवली; १९५६-५७च्या सुमाराला प्रा. शेणोलीकर, श्री. दत्तोपंत वझे, श्री. बाळ धोपेश्वरकर, श्री. बाळकृष्ण शिरवईकर व त्यावेळचे संघाचे अध्यक्ष उद्योगपती कै. बाबूराव पुसाळकर इ. मंडळींनीं संघाला पुन्हा चालना देण्याचें ठरविले.

दरवर्षी स्पर्धेकरितां म्हणून नाटके बसविण्यांत येऊं लागली. स्पर्धेच्या पहिल्या फेरीत संघानें सादर केलेल्या नाटकांना यश मिळूं लागले व त्यांनी स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठीं मुंबईच्या रंगभूमीपर्यंत मजल मारली. संघाच्या कलाकारांना उत्कृष्ट अभिनयाची वैयक्तिक पारितोषिकें मिळूं लागली. शिरवईकरांचे दिग्दर्शन नाट्यरसिकांच्या व स्पर्धा परिक्षकांच्या कसोटीस उतरले आणि संघ निःसंशय प्रगतीपर वाटचालीवर असल्याचे समाधान सर्वांना लाभले; त्या उत्साहाच्या भरांतच संघाचा रजत महोत्सव साजरा झाला.

संघाच्या या यशांत सुप्रसिद्ध 'स्वामी' कार श्री. रणजीत देसाई यांचा फार मोठा भाग आहे. दिग्दर्शक शिरवईकरांशीं ते नाटकाविषयीं चर्चा करुं लागलें; शिरवईकरांनी त्यांना संघाकरितां नाटक लिहून देण्याची प्रेरणा दिली.

स्थानिक नाट्यलेखकांना उत्तेजन देण्याच्या हेतूने त्यांचीं नाटकेंही कांही वेळां बसवून त्यांचे प्रयोग सादर केले आहेत. कांही वर्षापूर्वी कै. मो. ग. कुंटे यांचे 'कादंबिनी' हे नाटक संघानें रंगभूमीवर आणले होतें. तसेच कै. बाबूराव देसाई यांचे 'पराधीन' हें नाटक संघाने स्पर्धेत सादर केलें होतें त्यांतही पहिल्या फेरीत संघाला यश मिळालें होते.

संघाने वरेरकर सत्कार समारंभाच्या वेळी कै. मामांचेच 'सारस्वत' हें नाटक बसवून त्याचा प्रयोग त्याच समारंभाच्या वेळी अतिशय उठावदार रितीनें सादर केला होता. त्यांत स्वतः बाळकृष्ण शिरवईकर, कै. अनंतराव देशपांडे, कै. ना. म. संत, सुप्रसिद्ध कवयित्री सौ. संजीवनी मराठे यांनी प्रमुख भूमिका केल्या होत्या. संघानें सादर केलेले हेच पहिलें नाटक होय.

त्यानंतर संघाने ''उद्याचा संसार, घराबाहेर, माझें घर, अंमलदार, पुण्यप्रभाव, संन्यशाचें लग्न, संशयकल्लोळ, तुझें आहे तुजपाशी, झोपी गेलेला जागा झाला, कादंबिनी, अक्षांश रेखांश, मी जिंकलो मी हरलों, भारती, जिद्द, कांचनमृग, वारसा, धन अपुरें व पराधीन'', अशा अठरा वीस नाटकांचे अनेक प्रयोग सुविहीतपणें सादर केलें.

कार्याध्यक्ष हा कोणत्याही संस्थेचा एक महत्वाचा आधारस्तंभ असतो. या जागी कार्याची आंतरिक तळमळ असलेली व कार्यकुशल अशी व्यक्ति असली तरच संस्थेचे कार्य सुरळीतपणें चालते. बाळकृष्ण शिरवईकर हे आपल्या प्रेमळ, निगर्वी, समतावादी आणि निष्कपटी स्वभावानें कुणावरही सहज छाप पाडूं शकत. हातीं घेतलेले कार्य ते निष्ठेनें पार पाडत; त्यांचे संघटना चातुर्य हेवा करण्यासारखें होते. असा बहुरुपी बहुगुणी कार्याध्यक्ष संघाला सतत लाभल्यानें संघ प्रगतीच्या वाटचालीप्रत पोंचला नसता तरच नवल !

स्थानिक व बाहेरील अनेक व्यक्ती व संस्था यांचे संघाला वेळोवेळीं अमोलिक सहाय्य झालें आहे; त्या सर्वांचा येथें सविस्तर उल्लेख करणें अशक्य आहे. तरीही 'गोवा हिंदू असोसिएशन कला विभाग', नाट्यसंपदा व चंद्रलेखा या मुंबईतील संस्थांचा उल्लेख केल्याशिवाय राहावत नाहीं.

संघाचा रौप्यमहोत्सवी सोहळा –

संघाने २५ वर्ष पूर्ण केल्यानें रौप्यमहोत्सवी सोहळा डिसेंबर १९७० मध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या समारंभाचे अध्यक्ष श्री. वि. वा शिरवाडकर अर्थात कुसुमाग्रज, उदघाटक उद्योगपती श्री. मदन लोहीया, प्रमुख पाहुणे नामवंत नाटककार श्री. वसंत कानेटकर व श्री. पु.ल. देशपांडे तर स्वागताध्यक्ष स्वामीकार रणजित देसाई होते. 'बटाट्याची चाळ', 'व्यक्ती आणि वल्ली' या पुलंच्या एकपात्री प्रयोगाना बेळगांवकरानी उदंड प्रतिसाद दिला. या प्रसंगी प्रसिद्ध केलेल्या स्मरणिकेचे संपादक तत्कालिक संघाचे कार्यवाह श्री. अशोक याळगी तर अध्यक्षपदाची धुरा कै. गोविंदराव सराफ यांच्याकडे होती. न भूतो न भविष्यती असा हा सोहळा झाला.

संघाच्या उद्याचा संसार, वारसा, सारस्वत, अंमलदार, पांगुळगाडा. तुझे आहे तुजपाशी, मी जिंकलो मी हरलो, श्रीमंत, वाळूत मारील्या रेघा, कांचनमृग, धन अपुरे, लोक नायक, पराधीन, अक्षांश रेखांश, झोपी गेलेला जागा झाला, ब्रम्हहत्या, तळहातीच्या नाजूक रेषा, राहू-केतू, कन्यादान, रण दोघांचे अशा अनेक नाटकातून श्रीमती शशी भानप, विमल प्रभूदेसाई, सोना नाडगौडा, शकुंतला याळगी, आशा रतनजी, वृषाली मराठे, मेघा आपटे, ललीता मुतकेकर, नीता याळगी, शंकर कुलकर्णी, श्रीरंग मराठे, आबा मांद्रेकर अशा कलाकराना तर कै. ॲड. दौलत मुतकेकर, डॉ. अशोक साठे सारख्या कुशल दिग्दर्शकाना नावारुपास आणले.

सांस्कृतिक भवन उभारणी –

हे सर्व करीत असतानां संघाची स्वतःची वास्तू नसल्याची खंत कै. बाप्पाना होती. अनेकांच्या सहकार्याने वरेरकर नाट्यसंघाच्या सांस्कृतिक भवनाच्या वास्तूला मूर्त स्वरुप मिळाले. ३१ जाने. १९९४ ला ॲड. दौलत व सौ. ललित मुतकेकर या उभयतांच्या हस्ते वास्तूशांती झाली.

सध्या दै. तरुण भारतचे संपादक श्री किरण ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी मंडळ कार्यरत असून भवनाची दुरूस्ती व रंगरंगोटीचे काम लोकमान्य सोसायटीच्या सहकार्याने करण्यांत आले आहे.

गेल्या बऱ्याच वर्षापासून महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेतील संघाचा सहभाग खंडीत झाला होता. तरुण कलाकाराना प्रोत्साहन देण्याचा मानस संघाने केला. यंदा नाट्य चळवळीशी संलग्न पुण्याच्या ''एक्सप्रेशन लॅब''चे नामवंत रंगकर्मी श्री. प्रदीप वैद्य व नाट्यसूत्र बेळगांवच्या श्रीमती स्वाती कुलकर्णी यांच्या सहयोगाने श्री. गिरीश कर्नाड यांच्या मूळ इंग्रजी नाटकाचा मराठी अनुवाद 'वेडींग अल्बम' ४ डिसेंबरला २०१४ला कोल्हापूर केंद्रात सादर करण्यांत आले. नाट्यक्षेत्राला प्रेरणा देण्याचा संघाचा हा प्रयत्न कौतुकास्पद ठरला. या ५४व्या राज्य नाट्य स्पर्धेत नाटकाला केंद्रात द्वितीय तर उत्कृष्ट स्त्री अभिनेत्रीचे रौप्य पदक श्रीमती वृषाली मराठे यांना मिळाले. संघाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला.

नाट्य चळवळीशी बांधिलकी ठेवून संघ वाटचाल करीत आहे. अ.भा.मराठी नाट्य संमेलन आमच्या बेळगांव नगरीत होत आहे याचा सार्थ अभिमान संघ सदस्यांना आहे.

संमेलनास हार्दीक शुभेच्छा–

❑

बेळगावची नाट्यसंपदा

नीता कुलकर्णी

नियती क्रिएशन्सच्या संचालिका. अभिनय, लेखन, दिग्दर्शन यासाठी अनेक पुरस्कार प्राप्त. नवोदित कलाकारांना घेऊन वेगवेगळे सांस्कृतिक कार्यक्रम बसवत असतात.

बेळगाव रंगभूमीच्या क्षेत्रातील कार्य अगदी ऐतिहासिक आहे, संपन्न आहे. कारण, पहिले श्रेष्ठ संगीत नाटककार अण्णासाहेब किर्लोस्कर बेळगावचेच. ३१ मार्च १८४३ साली सौंदत्ती तालुक्यातील गुर्लहोसूर येथे त्यांचा जन्म झाला. १८७३ मध्ये 'शंकर दिग्विजय' हे गद्य नाटक त्यांनी लिहिले. त्यानंतर कालिदासाच्या 'अभिज्ञान शाकुंतल'चे भाषांतर करून १८८० साली ते नाटक रंगभूमीवर आणले. संगीत शाकुंतलचा पहिला प्रयोग शहापूर, बेळगाव येथील आत्ताच्या सरस्वती वाचनालयाच्या जागेत झाला होता. हा प्रयोग कृष्णशास्त्री धोपेश्वरकर व अनंत आचमनी यांच्या सहकार्याने झाला होता. त्याआधी १८७८ च्या दरम्यान अण्णासाहेब किर्लोस्कर व अण्णा मार्तंड यांनी 'भरत शास्त्रोत्तेजक मंडळी'ची स्थापना करून अनेक संगीत नाटके केली होती. संगीत शाकुंतलच्या यशानंतर 'किर्लोस्कर नाटक मंडळी, बेळगाव'ची स्थापना झाली. १८८२ साली त्यांनी 'संगीत सौभद्र' लिहिले. त्यांचे 'रामराज्य वियोग' हे नाटक १८८८ साली रंगभूमीवर आले. अण्णासाहेबांचे गुर्लहोसूर येथेच निधन झाले.

बेळगावजवळील कोवाड या गावी ८ एप्रिल १९२८ रोजी स्वामीकार रणजित देसाईंचा जन्म झाला. रणजित देसाईंचा आणि बेळगावचा अगदी जिव्हाळ्याचा संबंध होता. त्यांची बरीचशी नाटके बेळगावच्या वरेरकर नाट्यसंघाने सादर केलेली आहेत. 'कांचनमृग', 'वारसा', 'धन अपुरे', 'हे बंध रेशमाचे', 'पंख झाले वैरी', 'पांगुळगाडा', 'श्रीमान योगी', 'स्वामी', 'लोकनायक', 'तानसेन', 'रामशास्त्री', 'तुझी वाट वेगळी' ही त्यांची नाटके. तसेच 'गरुडझेप' हे नाटक प्रा. वसंत कानेटकर यांच्या सहाय्याने त्यांनी रंगभूमीवर आणले.

कै. मो. ग. कुंटे हे एक सेवानिवृत्त शिक्षक. नाटककार, दिग्दर्शक, अभिनेते, इतिहासकार, प्रवचनकार मो. ग. कुंटे हे बेळगावचेच. 'क्रांती' आणि 'अस्तनींतील अंगार' या त्यांच्या ऐतिहासिक नाटकांना लेखनाची पारितोषिके मिळाली. 'कादंबिनी' या सामाजिक नाटकाला केंद्र सरकारच्या सांस्कृतिक खात्यांतर्फे अनुदान मिळाले. क्रांतीवीर बाबासाहेब भावे, नरगुंदकर यांच्या जीवनावरील 'ज्वाला' या नाटकाला आचार्य अत्रे यांचे प्रशस्तीपत्र लाभले.

१९४० च्या सुमारास बेळगावात नाटक मंडळे स्थापन झाली. 'मित्रमंडळ' ही संस्था स्त्री-पुरुष मिश्रनाटके करू लागली. परंतु घरंदाज स्त्रिया नाटकात कामे करण्यास तयार नसायच्या. याचवेळी दादासाहेब गळतगेकर नाईकांनी ५ वर्षांच्या छोट्या सुमन चंद्रगिरीकडून 'हाच मुलाचा बाप' मधील चिलयाचं काम सुरेखरीत्या करून घेतलं. आणि मग हळुहळू त्यांचं सुसंस्कृत वागणं बघून स्त्रिया मिश्रनाटकामध्ये कामे करू लागल्या. १९४५ साली 'वाङ्मय चर्चा मंडळ, बेळगाव' तर्फे अतिभव्य नाट्य महोत्सव बेळगावमध्ये साजरा केला गेला. त्याचे श्रेय दादासाहेबांनाच जाते. त्या निमित्ताने बेळगावकरांना नाटकाची खरी ओळख झाली.

१९५२ मध्ये प्रा. गो.म. वाटवे यांनी 'कलोपासना मंडळ' या नाट्यसंस्थेची स्थापना केली. १९५६ मध्ये कलोपासनातर्फे बेळगावात नाट्यसंमेलन भरवले गेले. प्रसिद्ध नट, दिग्दर्शक, नाटककार यांच्याशी चर्चा घडवून आणण्यात आल्या. कलोपासना मंडळाने १९५३ मध्ये मुंबईच्या प्रादेशिक नाट्यस्पर्धेत भाग घेऊन सांगली व पुणे केंद्रात प्रथम क्रमांक मिळविला.

मूळचे गोव्याचे, परंतु आपली संपूर्ण हयात बेळगावात घालवलेले एक थोर नाट्य दिग्दर्शक म्हणजे बाप्पा शिरवईकर. संयमित अभिनय, आवाज, चेहरा,

शारीरिक हालचालींनी अभिनयाला उठाव कसा आणावा, रंगमंचावरील तंत्राचा सखोल अभ्यास यामुळे ते एक उत्तम दिग्दर्शक बनले. त्यांच्या दिग्दर्शनाखालील अनेक नाटकांनी राज्य नाट्य स्पर्धेत पारितोषिके मिळविलेली आहेत. तसेच बेळगावातील अनेक कलाकारांना हेरून त्यांच्यातील अभिनयकलेला पैलू पाडण्याचे काम त्यांनी केलेले आहे.

बाप्पांच्या हाताखाली तयार झालेले पण स्वतःची अशी एक वेगळी नाट्यशैली असणारे दिग्दर्शक म्हणजे प्रा. अरविंद याळगी. त्यांनी स्पर्धेसाठी, कॉलेजसाठी अनेक नाटकं बसविली. विषयाचा सखोल अभ्यास, चिकित्सक वृत्ती आणि नाटक शिकवण्याची उत्तम शैली यामुळे ते उत्कृष्ट दिग्दर्शक बनले.

शिक्षकी पेशातून निवृत्त झालेले नारायण अतिवाडकर हे आपल्या नाटकातून अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य करीत आहेत. सामाजिक जागृती निर्माण करणाऱ्या त्यांच्या नाटकांनी अनेक पारितोषिके मिळविली आहेत.

बाप्पा शिरवईकरांच्या हाताखाली तयार झालेले डॉ. अशोक साठे हे एक उत्तम नट व दिग्दर्शक आहेत. दिल्ली येथील नाट्य स्पर्धेत त्यांच्या 'संगीत सौभद्र' या नाटकाला सात पारितोषिके मिळाली आहेत. 'बिचारे सौभद्र' या त्यांच्या एकपात्री प्रयोगाचे १५० वर प्रयोग झालेले आहेत. आज देखील वयाची ८० वर्षे उलटून गेली असली तरी त्यांची नाट्यसाधना चालू आहे.

मकरंद माणगांवकर हे बेळगावातील प्रायोगिक रंगभूमीचे दिग्दर्शक होते.त्यांच्याही अनेक नाटकांना पारितोषिके मिळालेली आहेत. परंतु त्यांच्या अकाली निधनाने बेळगावातील प्रायोगिक रंगभूमी थंडावलेली आहे.

बाप्पांच्या हाताखाली तयार झालेला आणखी एक नट आणि दिग्दर्शक म्हणजे कै. अँड. दौलत मुतकेकर. 'तळहातीच्या नाजूक रेषा'च्या वेळी सहदिग्दर्शक म्हणून त्यांनी बाप्पांना साथ दिली. (बरेरकर नाट्यसंघाविषयी स्वतंत्र लेख स्मरणिकेत आहेच.)

बेळगावात 'घाशीराम कोतवाल' या नाटकात नाना फडणवीसांची भूमिका अतिशय उत्तमरीत्या वठवून प्रसाद पंडित बेळगावकर नाट्य रसिकांच्या गळ्यातले ताईत बनले. शिरवईकरांच्या 'तळहातीच्या नाजूक रेषा' मध्ये देखील त्यांनी भूमिका केली होती. मराठी मालिका 'राजा शिवछत्रपती' मध्ये बाजीप्रभूदेशपांडेंची भूमिका त्यांनी उत्तम वठवली. कुंकू, जन्मगाठ इ. अनेक मालिकांमधून ते सध्या अभिनय करीत आहेत.

बेळगावातील काही नाट्य संस्था-

मित्रमंडळ संस्था- १९४० च्या सुमारास दादासाहेब गळतगेकर नाईक यांनी स्थापन केली.

बेळगावकर स्त्री संगीत नाटक मंडळी : ही स्त्रियांची पहली नाटक कंपनी रंगुबाई व वेंकम्मा यांनी सुरू केली होती. त्यानंतर 'लक्ष्मी वेंकटेश प्रासादिक' ही बेळगावातील स्त्रियांची दुसरी नाटक कंपनी होती.

वाङ्मय चर्चा मंडळ नाट्यशाखा : (याविषयी स्मरणिकेत सविस्तर लेख आहे.)

कलोपासना : गो. म. वाटवे यांनी १९५२ मध्ये या संस्थेची स्थापना केली. १९५६ मध्ये या संस्थेतर्फे नाट्यसंमेलन आयोजित करण्यात आले होते. मिरज नाट्यसंमेलनात 'जग काय म्हणेल' या नाटकाचा प्रयोग करून आचार्य अत्रेंची शाबासकी मिळविली होती. याच नाटकाला १९५३ मध्ये मुंबई सरकारच्या प्रादेशिक नाट्य स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाला.

जगदीश नाटक मंडळी: यल्लप्पा पाटील यांनी सुरू केलेली ही संस्था पुढे नारायणराव नाईक यांनी चालविली. या संस्थेतर्फे ऐतिहासिक नाटकांची परंपरा जोपासली गेली. 'भांगेतील तुळस' या नाटकातील भूमिकेसाठी तारा रेडकर यांना प्रथम पारितोषिक मिळाले. तारा रेडकर यांनी पुढे 'एक गांव बारा भानगडी' या चित्रपटात अभिनय केला.

नेहरू मंडळ: या मंडळाचे सदस्य गणेशोत्सव, नेहरू जयंती या निमित्ताने नाटके बसवीत असत. पेडणेकर हे स्वतः रंगभूषा, वेशभूषा, सांभाळत असत. अँड. दौलत मुतकेकरांनी प्रथम याच मंडळातून अभिनयाला सुरुवात केली होती.

कलाविकास मंडळ : कै. पुंडलीक कुलकर्णी यांनी या मंडळाची स्थापना केली होती. महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत त्यांनी अभिनयाचे प्रथम पारितोषिक मिळविले होते.

ओरसा : या ग्रुपतर्फे अरविंद याळगी यांनी अनेक नाटकं, खास करून कॉलेज विद्यार्थ्यांसाठी बसवलेली होती.

लेडीज क्लब : या संस्थेतर्फे दादासाहेब गळतगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली 'वहिनी' या नाटकाचा प्रयोग केला गेला. तसेच या संस्थेच्या सदस्या इतर बऱ्याच नाटकात नियमितपणे भाग घेत असत.

फुलोरा : (या विषयी स्मरणिकेत स्वतंत्र माहिती आहे.)

नाट्यांकुर : प्रा. संध्या देशपांडे यांनी 'नाट्यांकुर' संस्थेची स्थापना केली. (या विषयी स्मरणिकेत स्वतंत्र माहिती आहे.)

नियती क्रिएशन्स : प्रत्येकातील सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी २००९ मध्ये सौ. नीता कुलकर्णी, विठ्ठल याळगी, यानी संस्था स्थापन केली. बेळगावातील रिझ थिएटरचे नूतनीकरण करून लोकमान्य रंगमंदिर उदयाला आली. तेव्हा लोकमान्य रंगमंदिरात पहिले नाटक सादर करण्याचा मान नियती क्रिएशन्सला मिळाला. २०१० मध्ये नियतीने पु.ल. देशपांडे लिखित 'पुढारी पाहिजे' चा प्रयोग केला व यावेळी जवळ जवळ १५ नवोदित कलाकारांना संधी दिली. आजही 'नियती' अनेक कलाकारांना संधी देत आहे.

बेळगाव नाट्यक्षेत्रातील इतर मंडळी : लेखन, दिग्दर्शन, अभिनय इत्यादी नंदन हेर्लेकर, संगीता बांदेकर कुलकर्णी, उल्हास निंबाळकर, मीरा आजगांवकर, एन.डी.जोशी, प्रभाकर शहापूरकर, वैभव लोकूर, मेधा मराठे, सुनिता पाटणकर, नीता कुलकर्णी, अनिल चौधरी, आसावरी भोकरे असे अनेक.

नाट्यक्षेत्राशी संबधित व्यक्ति :

रंगभूषाकार: १९४२ पासून वसंतराव बेळगावकर हे उत्कृष्ट रंगभूषाकार होते. नाटकांची त्यांना उत्तम जाण होती. त्यांचा हात अगदी कौशल्याने नटांच्या चेहऱ्यावरून फिरायचा. त्यांच्या निधनानंतर त्यांची जागा मनोहर बिरजे यांनी घेतली. काही प्रमाणात नाना पेडणेकर व रतन हेही रंगभूषा करतात.

प्रकाश व ध्वनी योजना : बेळगावात एके काळी नाटक म्हटलं की विठ्ठल याळगी यांची ध्वनी व प्रकाश योजना असायची. वरेरकर नाट्य संघाची तर बरीचशी नाटके विठ्ठल याळगी यांच्याच प्रकाश योजनेने नटलेली असायची. 'वारसा' या नाटकात तर त्यांनी प्रकाश योजनेद्वारे चंदनाचा वाडा जळालेला दाखवला. संपूर्ण प्रेक्षागृह धूर व चंदनाच्या वासाने व्यापून गेले होते. 'वारसा'साठी विठ्ठल याळगींना प्रकाश योजनेचे प्रथम पारितोषिक मिळाले होते. आता सध्या नाटकाचे नेपथ्य, ध्वनी व प्रकाश योजना या तिहेरी भूमिका गुरू पेडणेकर अत्यंत कौशल्याने पार पाडीत असतात.

❑

– भारती कित्तूर (शिरवईकर)

कै. बाप्पा शिरवईकर

नाट्यकलेची जपणूक करणारे, बेळगावात नाट्य कलेचा आविष्कार घडवणारे, अनेकांच्या नाट्यगुणांना प्रोत्साहन देऊन त्यांना प्रकाशात आणण्यासाठी धडपडणारे वरेरकर नाट्य संघाचे चैतन्य म्हणजेच श्री बाप्पा शिरवईकर. कै. बाप्पा मूळचे गोव्याचे, उद्योगधंध्याच्या निमित्ताने ते गोव्याहून १९३२ मध्ये मुंबईस गेले, स्थायिक झाले. मुळांतच नाट्य कलेचा हा वेडा तरुण, मुंबईतील मुक्कामांत कलाकारांच्या भेटीगाठी घेऊ लागला. ज्ञानेश्वर नाडकर्णी, कै. मामा वरेरकर ह्या अश्या मंडळींशी त्यांनी जवळीक साधली. त्यातून त्यांच्या नाट्यछंदास प्रोत्साहन मिळत गेले. तेथे गोमांतक हिंदू विद्यार्थी मंडळ ह्या संस्थेची त्यांनी स्थापना केली. कै.बाप्पांनी नाटकात पहिले काम केलं ते कै. मामा वरेरकर यांच्या 'करीन ती पूर्व ह्या नाटकात. ह्या नाटकाचे दिग्दर्शन त्यांनीच केलं होतं. त्यांची कोणतीही भूमिका रसिकांची दाद मिळवून जात असे. वयाच्या अठराव्या वर्षी आचार्य अत्रे यांच्या 'घराबाहेर' ह्या नाटकात खलनायकाची भूमिका केली. पु.ल.देशपांडे ह्यांच्या 'तुझे आहे तुझपाशी' ह्या नाटकातील काकाजींचे भूमिका देखील त्यांनी अशीच गाजवली. कै. बाबुराव पेंढारकरांना त्यांची भूमिका एवढी आवडली की त्यांनी प्रयोग संपताच बाप्पांना मिठी मारून त्यांचे कौतुक केले. गोव्यामध्ये श्री. दाजी भाटवडेकर यांच्या अनुपस्थित, त्यांनी काकाजीची भूमिका सिनेकलावंत शरद तळवळकर, रमेश देव, सीमा, राजा गोसावी व उषाकिरण ह्यांच्याबरोबर सादर केली. व त्यांचे गोव्यात अनेक प्रयोग झाले. बेळगावात त्यांनी कै. मामा वरेरकर ह्यांच्या नावाने १९४४ ला वरेरकर नाट्य संघाची स्थापना केली. ह्या संस्थेतर्फे अनेक नवीन कलाकारांना जीव ओतून परिश्रम करून पुढे आणले. नवीन लेखकांकडून नाटके लिहून घ्यायची, ती स्वत: करून, त्या नाटककारांना पुढे आणण्याचा प्रयत्न केला. स्वामीकार कै. रणजीत देसाई श्री. मो. ग. कुंटे, ॲड बाबुराव देसाई, श्री रविंद्र प्रथमशेट्टी इत्यादींकडून बाप्पांनी नाटके लिहून घेतली व रंगभूमीवर आणली. त्यांनी लिहिलेले 'कुणासाठी?' ह्या नाटकाचे मुंबईच्या ऑपेरा हाऊसमध्ये प्रयोग झाले. महाराष्ट्र नाट्य महोत्सवात, वरेरकर नाट्य संघातर्फे बसवलेले 'कांचनमृग' ह्या नाटकाला स्पर्धेत तिसरे पारितोषिक मिळाले. श्री. रणजित देसाई यांना लेखनाचे, बाप्पांना दिग्दर्शनाचे पारितोषिक मिळाले. वरेरकर नाट्य संघाची, स्वत:ची वास्तू उभारावी, हे त्यांचे स्वप्न होते. त्यांनी स्वत: पायाभरणी केलेली वरेरकर नाट्य संघाची वास्तु त्यांच्या पश्चात पूर्ण झाली. ह्या नाट्यवेड्या कलाकाराला नाट्यप्रेमी बेळगावकरांची श्रद्धांजली ठरावी.

वाङ्मय चर्चा मंडळ

– प्रा. इनास फर्नांडिस

गेली ८१ वर्षे वाङ्मयीन आणि सांस्कृतिक कार्य अविरत करणारी 'वाङ्मय चर्चा मंडळ' ही बेळगावातील ज्येष्ठ संस्था आहे. मराठी भाषा, मराठी संस्कृती यांना परिपोषक होणारी अभिरुची निर्माण करणे, मराठीच्या अभिवृद्धीसाठी भाषिक, वाङ्मयीन आणि सांस्कृतिक स्वरुपाचे विविध कार्यक्रम करणे आणि महाराष्ट्रीयांसाठी एक साहित्य-सांस्कृतिक केंद्र सुरू करणे ही या ' वाङ्मय चर्चा मंडळा' ने प्राणभूत मानलेली तत्त्वे होत. ग्रंथवाचन आणि साहित्यचर्चा करण्यासाठी डॉ. केशवराव साठे यांच्या पुढाकाराने एकत्र आलेल्या मित्रमंडळाने इ.स. १९२७ साली वाङ्मय चर्चा मंडळाची स्थापना केली. वि.स. खांडेकरांबरोबर विचारविमर्ष करुन १९२९ साली १४ वे साहित्य संमेलन बेळगावात भरवण्याची तयारी सुरु केली, आणि बेळगावातील पहिले महाराष्ट्र साहित्य संमेलन 'काळ' कर्ते शि. म. परांजपे यांच्या अध्यक्षतेखाली यशस्वी केले. दरवर्षी वक्तृत्व स्पर्धा ठेवण्याचा ऊपक्रम मंडळाने केला. अखिल महाराष्ट्रातून या वक्तृत्वस्पर्धेसाठी स्पर्धक येऊ लागले. इ.स.१९३३ मध्ये शारदीय व्याख्यानमाला घेण्यात आली. इ. स. १९३४ पासून वसंत व्याख्यानमाला सुरु करण्यात आली. त्याच वर्षी लोकप्रियतेचा उच्चांक गाठलेले नटसम्राट बालगंधर्व यांचा मंडळाने मानपत्र देऊन सत्कार केला.

कै. अण्णासाहेब किर्लोस्करांचा पन्नासावा स्मृतिदिन इ. स. १९३५ मध्ये त्यांच्या गुर्लहोसूर या जन्मगावी जाऊन साजरा करण्याचे औचित्य साधले. तसेच बेळगाव येथे सुप्रसिद्ध नाटककार भा. वि. वरेरकर यांच्या अध्यक्षतेखाली तीन दिवसांचा सोहळा आयोजित केला. नाट्य आणि काव्य, संगीत आणि वक्तृत्व यांचा हा मिलाफ हृदयंगम झाला. इ. स. १९३६ मध्ये बेळगावातील नाटककार श्री. अण्णाभाऊ सोमण तथा 'किरात' व श्री. कृ. ह. दीक्षित आणि अखिल भारतीय कीर्तीचे गायक श्री. रामकृष्णबुवा वझे यांचा सत्कार करण्यात आला.

४ जून १९४१ ला 'किर्लोस्कर स्मारकमंदिर' या मंडळाच्या वास्तूचे, श्रीमंत नारायणराव नानासाहेब घोरपडे यांच्या हस्ते उद्घाटन झाले आणि मंडळाला स्थिर घर लाभले. ही वास्तु उभी करण्यात डॉ. के. वा. साठे, मंडळाचे प्रारंभापासूनचे आधारस्तंभ आणि सहकारी, यांचे प्रयत्न कारणीभूत आहेत.

इ. स. १९४५ मध्ये मंडळाने नाट्यशताब्दीमहोत्सव साजरा केला. सतत आठ दिवस चालू असलेल्या या महोत्सवात बेळगावातील संस्थांनी व बाहेरील प्रसिद्ध नाटकमंडळींनी आठ नाटके सादर केली. या नाट्यसत्राला नामवंत नटवर्गाचे नाट्यप्रवेशदर्शन, नाट्यसंगीत विषयक व्याख्याने, नाट्य निबंध स्पर्धा अशा नाट्याभ्यासकांना उपयोग होतील अशा कार्यक्रमांची जोड देण्यात आली होती. तसेच नृत्य गायन-वादन असेही कार्यक्रम आयोजित केले होते. या महोत्सवात स्वागताध्यक्ष रावबहादूर वामनराव तथा आबासाहेब देसाई, उद्घाटक नटसम्राट बालगंधर्व, अध्यक्ष सांगलीचे राजेसाहेब श्रीमंत चिंतामणराव पटवर्धन अशा मान्यवरांचा त्रिवेणी संगम घडला होता. या महोत्सवाचे चिटणीस श्री. रा. स्वा. नाईक व द. कृ. वझे होते.

इ. स. १९४६ मध्ये बेळगावातील दुसरे महाराष्ट्र साहित्य संमेलन मंडळाने भरविले. म. सा. प. चे त्यावेळचे अध्यक्ष म.म. दत्तो वामन पोतदार आणि संमेलनाचे अध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या समर्थ नेतृत्त्वाने हे संमेलन यशस्वी झाले. संयुक्त महाराष्ट्राचा पहिला ठराव या संमेलनात मंजूर झाला. यामुळे हे संमेलन गाजले. या संमेलनाचे कार्याध्यक्ष श्री. वि. अ. गळतगेकर नाईक होते. त्यांच्या बरोबरीने चिटणीस प्रा. द. ल. मांजरेकर, प्रा. स. रा. भट, कै. खेमाजीराव गोडसे. कै. बा.म.गोगटे, कै यशवंतराव लेले, कै. गो.शां. कोवाडकर, श्री. वि.गो.साठे, श्री.वा. लिमये, कै. आ. सावंत, कै. दादासाहेब नाईक अशा बऱ्याच कार्यकर्त्यांनी एकमेकांना सहकार्य देऊन हे संमेलन बेळगावकरांच्या चिरकाल स्मरणात राहील असे यशस्वी केले. उद्योगपती कै. शंकरराव किर्लोस्कर यांच्या हस्ते मंडळाच्या सभागृहाचा उद्घाटन समारंभ १९५३ मध्ये झाला.

१९५४ मध्ये मंडळाचा रौप्यमहोत्सव याच नव्या सभागृहात साजरा झाला. या. महोत्सवाचे प्रमुख पाहुणे आचार्य प्र.के.अत्रे होते. यावेळी कै. मामा वरेरकरांचे 'सारस्वत' नाटक स्थानिक कलाकारांनी सादर केले. १९६८ मध्ये गोगटे ढालीचा रौप्यमहोत्सव साजरा करण्यात आला. या समारंभाचे उद्घाटक प्रसिद्ध कादंबरीकार वि.स.खांडेकर होते. तीन दिवसांच्या या समारंभात वक्त्यांची व्याख्याने झाली. या प्रसंगी 'प्रेमा तुझा रंग कसा' हा नाट्य प्रयोग मंडळाने सादर केला.

मंडळ साहित्यिकांचे जन्मशताब्दि महोत्सव ज्या त्या वेळी साजरे करीत असते. या निमित्ताने सुप्रसिद्ध साहित्यिकांची व्याख्याने आयोजित केली जातात.

१९७६ साली मंडळाने आपला सुवर्ण महोत्सव थाटात साजरा केला. तसेच १९७८ मध्ये रमाबाई जोशी सभागृहाचा विस्तार करण्यात आला. याच सभागृहात अनुकूल असा रंगमंच उभा करण्यात आला. मंडळाच्या नाट्य शाखेने विविध समारंभ प्रसंगी वेगवेगळ्या नाटकांचे प्रयोग सादर करून बेळगावकर रसिकांची दाद मिळविली आहे. १९५५ पासून महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत भाग घेऊन गाजलेल्या नाटकांचे व बेळगाव मधील नाटककारांच्या नाटकांचे प्रयोग सादर केले. स्पर्धेतील कित्येक नाट्य प्रयोग कोल्हापूर केंद्रात पहिल्या तीन क्रमांकात आले आहेत. दिल्ली येथील शैक्षणिक व सांस्कृतिक केंद्राच्या नाट्य स्पर्धेत 'संगीत संशयकल्लोळ' या नाटकाचा प्रयोग सादर करून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळविले.

वाङ्मय चर्चा मंडळाचे कार्य ग्रंथालय व वाचनालय, वक्तृत्व, काव्य गायन, नाट्य, निबंध, गीता पठण अशा स्पर्धा, साहित्यिकांची विविध विषयांवरील व्याख्याने, साहित्य पुरस्कार आणि प्रसिद्ध साहित्यिकांचा गौरव असे साहित्यिक आणि सांस्कृतिक स्तरावर चालू आहे.

❑

बेळगावचे नाट्यलेखक आणि नाटके

१) अण्णासाहेब किर्लोस्कर - संगीत शाकुंतल, संगीत सौभद्र, अल्लाऊद्दीनची चित्तूर गडावरील स्वारी, रामराज्यवियोग, शांकर दिग्वीजय.

२) भा. वि. वरेरकर - भूमिकन्या सीता, जिवाशिवाची भेट, करेन ती पूर्व, शिपायाची बायको, उडती पाखरे, करग्रहण, संन्याशाचे लग्न, माझ्या कलेसाठी, नवा खेळ, न मागतां, तुरुंगाच्या दारात, दौलतजादा, सारस्वत, सोन्याचा कळस, सत्तेचे गुलाम, चला लढाईवर, संजीवनी, स्वयंसेवक, हाच मुलाचा बाप, खेळघर, कुंजविहारी, सद्य बंदीवास, पापी-पुण्य (लघु नाट्य), संसार, नामानिराळं, अपूर्व बंगाल.

३) रणजीत देसाई - हे बंध रेशमाचे, श्रीमान योगी, पांगुळगाडा, वारसा, गरूडझेप, स्वामी, रामशास्त्री, धन अपुरे, लोकनायक, तानसेन, कांचनमृग, पंख जाहले वैरी.

४) मो. ग. कुंटे - कादंबिनी, क्रांती, ज्वाला, शल्य माझे अंतरीचे, राज्यश्री, अस्तनीतील अंगारे, बांध, संगीत शापीत मणी. संगीत ताटी उघडा ज्ञानेश्वरा, जगज्जेता संन्यासी, सौभाग्यवान, अझिजान, संन्यासिनी, तोतयाचे बंड, संगीत शाकुंतल. सुदाम्याचे पोहे, हास्य चिंतामणी, राजश्री भीष्म. यापैकी अनेक नाटकांना महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत उत्कृष्ट प्रयोगासाठी, उत्कृष्ट दिग्दर्शनासाठी पारितोषिके मिळाली आहेत.

५) नारायण अतिवाडकर - नमस्तुभ्यम, आले देवाजीच्या मना, हे आंधळेपण डोळसांचे, प्रतिष्ठा, देवदासी, हे असं घडायला हवं. संघर्ष, जीवन जगण्याची जादू, चोरावर मोर, माझीच लेक माझी सवत, अशी एक अहिल्या, वास्तवता.

६) सुभाष सुंठणकर - एकांकिका : रंग जरा ओला आहे, दंगा थांबविण्याचे औषध, इनकम टॅक्स भरणारा चोर आणि हास्य मंच

७) संध्या देशपांडे - पक्षीतीर्थ आणि इतर एकांकिका, पाच एकांकिका, छोट्यांसाठी तीन एकांकिका, जीना इसीका नाम है, चाफा (अनुवादीत)

८) मेधा मराठे - एक शून्य सीमारेषा - दोन अंकी नाटक. मर्द, चिरंजीव, चेला, अश्वत्थामा, ना तलाकशुदा... ना शादीशुदा (मराठी साहित्य परिषदेचा श्रेष्ठता पुरस्कार)

संमेलनातील सत्कारमूर्ती

श्री विठ्ठलराव याळगी

वय वर्षे ८९ चे चिरतरूण, स्वातंत्र्य सैनिक असणारे, नाटकावर जिवापाड प्रेम करणारे बेळगावातील एक सर्वांचे आवडते, प्रसन्न हसतमुख व्यक्तिमत्व, म्हणजे विठूकाका याळगी.

नाट्यक्षेत्राची अतिशय आवड असल्यामुळे प्रकाश योजना, अभिनय, नेपथ्य, दिग्दर्शन आणि निर्मिती अशा सर्व क्षेत्रात काम केले आहे.

वाङ्मय चर्चा मंडळ, बेळगावतर्फे, १९४५ साली मराठी नाट्यसंमेलन झाले होते. 'बालगंधर्व' त्या संमेलनाचे उद्‌घाटक होते. १९५६ साली 'कलोपासक' मंडळातर्फे संमेलन झाले होते. त्यातही त्यांचा सक्रिय सहभाग होता.

१९८४ पासून वाङ्मय चर्चा मंडळाचे नाट्य विभागाचे प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. प्रत्येकवर्षी बालगंधर्व पुण्यतिथी आणि रंगभूमिदिन साजरा करण्यात त्यांचा पुढाकार असतो. संशयकल्लोळ नाटकाचे ३४ प्रयोग त्यांनी केले आहेत. २०१४ साली गणेश फेस्टिवलतर्फे 'नाट्यभूषण' पुरस्कार मिळाला.

एखादे विशिष्ट बक्षीस कधीही मिळाले नाही. मात्र लोकांची कौतुकाची थाप नेहमीच मिळाली. त्यातच मी अत्यंत समाधानी आहे, असे ते म्हणाले.

श्रीमती इंदिराबाई जोशी

व्यवसायाने डॉक्टर असणाऱ्या बेळगावातील पहिला स्त्रियांसाठी दवाखाना काढणाऱ्या, मृदुभाषी, प्रेमळ अत्यंत स्मार्ट व्यक्तिमत्वाच्या डॉ.इंदिराबाई जोशी.

नाटक आणि गाणं याचं अत्यंत वेडच. यजमान संगीत शिक्षक. बेळगावमध्ये १९४९ साली येण्यापूर्वी बेंगलोर इथे महाराष्ट्र मंडळामधून आचार्य अत्रेंचे 'जग काय म्हणेल' या संगीत नाटकात उभयतांनी उत्तम भूमिका केल्या आणि इंदूताईंचा नाट्यप्रवास सुरू झाला.

बेळगावला आल्यानंतर वाङ्मय चर्चा मंडळातून 'घराबाहेर' हे नाटक केले. आचार्य अत्रेंनी स्वतः याचा प्रयोग पाहून, ''मी जी निर्मला मनात धरून हे नाटक लिहिले आहे, ती निर्मला मला तुझ्यात दिसली.'' असे गौरवोद्गार काढले. याहून मोठे पारितोषिक कोणते? असे त्या म्हणतात.ह्यापुढे जाऊन अत्रे जाहीरपणे म्हणाले की, ''तू बालगंधर्वांसारखी दिसतेस.'' याचा इंदूताईंना खूप अभिमान वाटतो.

त्यानंतर सुंदर मी होणार, आशीर्वाद, काचेचे घर, श्रीमंत, फुलपाखरू, मी जिंकलो मी हरलो, अशा अनेक नाटकातून त्यांनी भूमिका केल्या. आज ९५ च्या उंबरठ्यावर उभ्या असणाऱ्या मनाने अत्यंत तरूण अशा इंदूताई अनेक कार्यक्रमांना उत्साहाने हजर असतात.

श्री. मनोहर बिरजे

बिरजेमामा या नावाने बेळगावातील कलाकारांमधे प्रसिद्ध असणारे मनोहर यल्लाप्पा बिरजे. आपले काका लक्ष्मण बिरजे मास्तर यांच्याकडून प्रेरणा घेऊन १९५४ पासून रंगभूषेच्या कामाला सुरूवात. १९५८ मध्ये स्वतःचे एक नाट्यमंडळ काढून खेड्यापाड्यातून जाऊन रंगभूषा करण्यास सुरूवात. गुरूस्थानी विठ्ठलराव याळगी, त्यामुळे सहाजिकच पैशांच्यामागे धावणे नाही. निरपेक्षपणे आपले काम करतात.

सगळ्या खेळांची आवड आहे. स्वयंपाकाची आवड असून ५००-५०० माणसांचा उत्तम स्वयंपाक बनवतात. दिल्ली अधिवेशन, कॅपिटल वन, लोकमान्य सामाजिक, सांस्कृतिक केंद्र यांच्याकडून पुरस्कार प्राप्त. गणेश फेस्टिवलचा 'नाट्यभूषण' पुरस्कार.

पुंडलिकजी कातगडे

स्वातंत्र्य चळवळीत सक्रीय भाग घेतलेले, गांधीवादी विचारांचे पुरस्कर्ते श्री. पुंडलिकजी कातगडे यांनी 'पुंडलिक' हे आत्मचरित्र लिहिले. तत्कालीन समाजजीवनाचे चित्रण त्यामध्ये आहे. त्यांनी इतरही अठराहून अधिक काही पुस्तके लिहिली. त्यांनी कानडी-मराठी शब्दकोश प्रसिद्ध केला.

बा.रं. सुंठणकर

मराठी संतमंडळांचे ऐतिहासिक कार्य हे पुस्तक चर्चेचा विषय ठरले. त्यांनी अन्य अनेक पुस्तकेही लिहिली.

कृ. बा. मराठे

हे एक अभ्यासू, संशोधक लेखक होते. त्यांच्या 'बालकवी' या चरित्रपर आणि समिक्षणात्मक ग्रंथाला महाराष्ट्र सरकारचे पारितोषिक मिळाले होते. 'मराठी रंगभूमी' या त्यांच्या गाजलेल्या ग्रंथात त्यांनी मराठी नाटकाची सुरुवात बेळगावहून झाली असे लिहिले आहे.

पंत बाळेकुंद्री

अवधूत संप्रदायाचे उपासक श्री पंतमहाराज बाळेकुंद्री यांनी अध्यात्मातील संकल्पना व परमार्थ विचार सांगण्याच्या उद्देशाने वाङ्मय निर्मिती केली. 'भक्तालाप', 'अनुभववल्ली व ब्रम्होपदेश', 'बालबोधामृतसार' 'बोधानंद गुटीका', प्रेमतरंग, श्री दत्त प्रेमलहरी, गीतासार, भक्तोद्धार प्रेमभेट, श्रींची पत्रे, परमाणुभव प्रकाश, श्रीपंतांचे स्फुटलेख भाग १ व २ अशी त्यांची साहित्य संपदा आहे.

प्रा. व्यं. ल. जोशी

संस्कृत, मराठी, कन्नड, हिंदी आणि इंग्रजी या भाषांवर विलक्षण प्रभुत्व. ललित निबंध, व्यक्तिचित्रे तसेच इतर भाषातील साहित्याचे भाषांतर असे महत्वपूर्ण कार्य. महाकवी द. रा. बेंद्रे यांच्या ज्ञानपीठ पारितोषिक विजेत्या 'नाकु तंती' या कन्नड काव्य संग्रहाचा अनुवाद 'चार तंतु' म्हणून प्रकाशित झाला. अनेक कन्नड लघुकथांचे मराठी अनुवाद प्रसिद्ध केले आहेत. स्वामी विष्णुतीर्थांच्या 'भागवत सारोद्धार' या संस्कृत काव्यग्रंथाचा मराठीत समश्लोकी अनुवाद केला आहे. गिरीश कर्नाड, एन. के. कुलकर्णी यांच्या कन्नड नाटकांचा पण त्यांनी मराठी अनुवाद केला आहे. धूलीदर्शन हा त्यांचा मराठी काव्यसंग्रह प्रकाशित आहे. १९९९ मध्ये मुंबई येथील मुंबई - कर्नाटक संघाचा 'वरदराज आद्य पुरस्कार' त्यांना प्राप्त झाला आहे.

नारायण अतिवाडकर

प्राथमिक शिक्षक म्हणून सेवा बजावताना अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य करत त्यांनी शेकडो कार्यकर्ते तयार केले. विज्ञाननिष्ठ कथाकथनाचे भरपूर कार्यक्रम केले. त्यांचे 'हे आंधळेपण डोळसांचे' हे नाटक व 'संघर्ष' ही एकांकिका पारितोषिक प्राप्त ठरली. 'माझीच लेक माझी सवत' ही एकांकिका १९८९ मध्ये दूरदर्शनवरून प्रसारीत झाली. 'चोरावर मोर', 'वास्तवता', 'पावसाची सर', 'अपहरण', 'बाहुल्या', 'आग्या वेताळ' हे त्यांचे कथासंग्रह. तसेच 'राजुच्या विज्ञान कथा' भाग-१ व २ असे त्यांचे बाल साहित्य पण आहे.

कॉ. कृष्णा मेणसे

एक व्यासंगी लेखक, पत्रकार, प्रभावी वक्ते व आशयसमृद्ध लेखन करणारे साहित्यिक म्हणून सर्वांना परिचित. १९५९ मध्ये 'हेमंत' हे मासिक व १९६९ मध्ये 'साम्यवादी' हे साप्ताहिक सुरू केले. अनेक देशांचे दौरे करून सुंदर प्रवास वर्णने त्यांनी लिहिली आहेत. त्यांचे रशियन भाषेवर पण प्रभुत्व होते. विविध आंदोलनात ते सहभागी असत. कन्नड लेखक निरंजन यांच्या 'चिरस्मरण' कादंबरीचा त्यांनी मराठीत अनुवाद केला. 'परिक्रमा', 'अशा तोडल्या बेड्या', 'क्रांतीसिंह नाना पाटील (कन्नड)', 'असा आहे गोवा' अशी अनेक पुस्तके त्यांनी लिहिली. 'हो-चि-मिन्ह' या पुस्तकांना वाङ्मय चर्चा मंडळाचा तर 'बसवेश्वर ते ज्ञानेश्वर' या पुस्तकाला पुणे विद्यापीठाचा स्वामी स्वरूपानंद पुरस्कार तसेच कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषदेचा पुरस्कार लाभला आहे.

गोविंद केळकर

कथा, कादंबरी, कविता, बालसाहित्य अशा सर्व प्रकारचे विपुल व सातत्याने लेखन करणारे साहित्यिक म्हणजे गोविंद केळकर. 'आतुरले मन', 'वादळ', 'जीवन यात्रा', 'आधार', 'जीवनात ही घडी', 'जान्हवी', 'दुभंग' या त्यांच्या कादंबऱ्या तर 'हसले मधु चांदणे', 'प्रीत फुले चांदण्यात', 'दूर कुठे तरी' हे कथा संग्रह प्रसिद्ध झाले आहेत. 'पंढरी', 'बकुल गंध', 'सांज', 'गंधाली' इत्यादी ९ काव्य संग्रह व 'अभयकुमार', 'मोत्याचा कंठा', 'देवदूत', 'सती रेणुका', 'राजा सतीश व इतर कथा' हे किशोर साहित्य त्यांच्या नावावर आहे. त्यांची एकूण २७ पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. त्यांच्या 'जीवन यात्रा' पुस्तकास दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलन पुरस्कार, 'तेजस्विता' कविता संग्रहास महाराष्ट्र राज्य मुद्रण परिषद पुरस्कार, 'अकुली बकुली' या पुस्तकास वाङ्मय चर्चा मंडळ विशेष साहित्य पुरस्कार प्राप्त झाली आहेत. अनेक पुरस्कारांबरोबर कर्नाटक राज्य शिक्षण खाते, लायन्स व रोटरी क्लब, वृत्तपत्र लेखक संघ यांनी त्यांच्या साहित्य सेवेचा गौरव केला आहे.

वा. पु. गिंडे

हे एक बेळगावचे नामवंत प्राध्यापक व व्यासंगी लेखक आहेत. संत वाङ्मयाचा त्यांनी अभ्यास केला आहे. ज्ञानेश्वरीच्या काही अध्यायांचे विद्यापीठीय अभ्यासक्रमात मार्गदर्शक ठरेल असे संपादन प्रकाशित केले आहे. 'बालकवि - एक रसग्रहण' हा त्यांचा बालकवींच्या कवितांचा विवेचक रसग्रहणांचा ग्रंथ प्रकाशित झाला आहे.

श्रीमती माधवी देसाई

- बेळगावच्या साहित्यिक आणि सांस्कृतिक चळवळीत सतत कार्यरत व एक मार्गदर्शक साहित्यिका. त्यांच्या 'नाच ग घुमा' या आत्मकथनाने एक इतिहास रचला. कन्नड व हिंदी भाषेत त्याचे भाषांतर झाले आहे. सोलापूरचा प्रतिष्ठेचा दमाणी साहित्य पुरस्कार त्यांना मिळाला आहे. 'सायली', 'चकवा', 'घर माणसांचे' हे त्यांचे कवितासंग्रह. 'कठपुतली', 'असं म्हणू नकोस', 'सागर', 'कथा सावलीची' हे कथा संग्रह व 'मंजिरी', 'नियती', 'हरवलेल्या वाटा', 'प्रार्थना' या कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या आहेत. 'प्रार्थना' कादंबरीला गोव्याच्या कला अकादमीचा तसेच गोमंतक मराठी अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे.

अनंत मनोहर

३५ कादंबऱ्या आणि २२ कथासंग्रह प्रसिद्ध, १६ कुमार साहित्य प्रसिद्ध, १ नाटक, ४ बाल नाट्य, ४ नभोनाट्य, इम्रान व सचिन स्पोर्टस्‌वरील साहित्य प्रसिद्ध.

राब - म.सा.प. राज्य पुरस्कार., अरण्यकांड - दमाणी पुरस्कार, राज्य पुरस्कार, ज्येष्ठ - मृत्युंजय पुरस्कार, ना.सी. फडके पुरस्कार, अ.भा.न. लेखन स्पर्धेत प्रथम क्रमांक. वृत्तपत्रात नियमित सदरे, जॅकपॉट - बनहट्टी पुरस्कार.

बेळगावचा शैक्षणिक प्रवास

बेळगावच्या शैक्षणिक विकासाचे कार्य तळमळीने करणाऱ्या कै. बाबुराव ठाकूर यांनी बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समिती १९३७ साली स्थापन केली आणि खेडोपाडी शिक्षण केंद्रे सुरू केली. वडगावला मराठी टीचर्स ट्रेनिंग कॉलेज सुरू केले. कवयित्री श्रीमती इंदिरा संत या कॉलेजच्या बरेच वर्ष प्राचार्या होत्या. या समितीचे वतीने एम. व्ही. हेरवाडकर इंग्लीश स्कूल, रामकुमार जांगरा किंडर गार्टन, जे.एन. भंडारी स्कूल ऑफ आर्ट या नामवंत शिक्षण संस्था नावारूपाला आल्या आहेत. चंदगड तालुक्यात शिनोळी इथे यशवंतराव मुक्त विद्यापीठाचे केंद्र उघडले आहे. श्री किरण ठाकूर, श्री रमाकांत शानभाग, श्री अभय खोत सध्या या सोसायटीचे व्यवस्थापन पहात आहेत.

महर्षि धोंडो केशव कर्वे यांच्या शिष्या बनुबाई अहो व सुमित्राबाई सोहनी यांनी १९२३ साली महिला विद्यालयाची स्थापना केली. कै.बंडोपंत कुलकर्णी, कै. सबनीस, कै. चतुरदास शहा, कै.भूपाल देसाई, कै. गुंडकर, डॉ. वाय. के. प्रभु, बी. डी. बेळवी, यांनी त्या संस्थेचा पाया भक्कम केला. ते म्हणजे महिला विद्यालय मंडळ.

टिळकवाडी फिमेल एज्युकेशन सोसायटी व त्याच्या मार्फत १९३७ मध्ये टिळकवाडीत सुमित्राबाई सोहनी यांच्या प्रयत्नाने 'बालिका आदर्श विद्यालय' सुरू झाले. कै. एन. एस. फडके, कै. चतुरदास शहा, डॉ. छत्रे व कमलाबाई छत्रे यांचे या शाळेला योगदान मिळाले. सध्या श्री. गोविंद फडके, श्री. सेवंतीलाल शहा, डॉ. शरयू हंजी इत्यादी सोसायटीचे व्यवस्थापन पहात आहेत.

उषाताई गोगटे गर्लस हायस्कूल, हिंदमाता हायस्कूल, रंगूबाई भोसले गर्लस हायस्कूल, वनिता विद्यालय, न्यू गर्लस हायस्कूल, चंपाबाई भोगले स्कूल अशा अनेक संस्था स्त्री शिक्षणाचे कार्य करीत आहेत.

कै. भु. के. दळवी, कै. सप्ले बंधु, कै. व्ही. आर. चव्हाण, कै. व्ही. ए. नार्वेकर, एस. एन. आणि बी. आर. पवार आदि समाजसेवकांनी १९३१ मध्ये मराठा मंडळाची स्थापना केली. मराठा मंडळ हायस्कूल, सेंट्रल हायस्कूल सुरू झाले. नाथाजीराव हलगेकर यांनी तांत्रिक पदविका विद्यालय, दंत महाविद्यालय, स्थापत्य, वैद्यकिय, आयुर्वेदिक, होमियोपथिक, सर्व शाखा एका आवारात सुरु केल्या. भुतरामहट्टी येथे कृषी महाविद्यालयाचा संकल्प आहे. आर्ट्स, होमसायन्स, शास्त्र, वाणिज्य शाखांचे महिला महाविद्यालय सुरू केले आहे.

कै. डॉ. हेरेकर, कै. एम. व्ही. हेरवाडकर, कै. बाबुराव ठाकूर, कै. चतुरदास शहा, कै. अण्णासाहेब लठ्ठे यांनी साऊथ कोंकण एज्युकेशन सोसायटी सावंतवाडीहून बेळगावला आणली. राणी पार्वतीदेवी कॉलेज टिळकवाडीला १९४५ मध्ये सुरू झाले. पुढे १९६६ मध्ये शास्त्र विभाग मुंबईचे उद्योगपती गोविंदराम सक्सेरीया यांच्या नावाने सुरू झाले. नंतर वाणिज्य शाखा व मराठी व कानडी माध्यमाच्या शाळा पण सुरू झाल्या. बारावी नंतरचे व्यावसायिक शिक्षणासाठी बाबुराव ठाकूर मेमोरियल स्वतंत्र

शाखा सुरू झाली. इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठ स्थापन झाले. टिळकवाडी हायस्कूल, स्वाध्याय विद्यामंदिर या शाळा एस. के. ई. सोसायटीने आपल्या ताब्यात घेऊन त्यांचा चांगला विकास केला. कै. डॉ. वाय. के. प्रभु, कै. श्री. एस. बी. नाडकर्णी, श्री. आर. डी. शानभाग, श्री. बी.एस. कलघटगी इत्यादींचे या संस्थेला योगदान मिळत आहे.

कै. दाजीबा देसाई यांच्या कल्पनेतून दक्षिण महाराष्ट्र शिक्षण मंडळ स्थापन होऊन बेळगाव व खानापूर तालुक्यात ४६ माध्यमिक शाळा, ४ ज्युनिअर कॉलेजिस व ज्योती कॉलेज परिसरात ६ हून अधिक वेगवेगळी कॉलेजीस आहेत.

कर्नाटक लिंगायत (के.एल.ई) एज्युकेशन सोसायटी संस्थेने लिंगराज कॉलेजची (कला व वाणिज्य) स्थापना तर केलीच शिवाय जवाहरलाल नेहरू वैद्यकीय महाविद्यालय, मेडिकल रिसर्च सेंटर व भव्य असे इस्पितळ सुरू केले आहे.

आमदार परशुराम नंदिहळ्ळी यांनी बहुजन समाजासाठी विश्वभारत सेवा समितीची स्थापना केली.

जनकल्याण ट्रस्टच्या वतीने संत मीरा हायस्कूल चालविले जाते.

कर्नाटक लॉ सोसायटीचे गोगटे कॉलेज ऑफ कॉमर्स आहे. तिथे लॉ, एमबीए, डिबीएम, बीबीए हे अभ्यास क्रम सुरू झाले आहेत. तसेच जी. आय. टी, आय. एम. ई. आर व एक इंग्रजी माध्यम शाळा या संस्था सोसायटीने सुरू केल्या आहेत.

बेळगाव हे दर्जेदार शिक्षणाचे केंद्र बनले आहे.

स्वातंत्र्योत्तर काळातील बेळगावातील हौशी नाटक मंडळी

–अर्जुनराव गौंडाडकर

त्यावेळी बेळगाव शहर आणि आजूबाजूला छोटी छोटी नाट्य मंडळं होती. गणेशोत्सवामध्ये किंवा इतर धार्मिक उत्सवामध्ये ही मंडळं नाटकं करीत असत. प्रेक्षक त्याला गर्दी करत असत. या नाटकातील कलाकार पूर्ण वेळ कलाकार नसून आपापला व्यवसाय करून रात्रीच्या वेळी तालमी करत असत. यामध्ये कै. नारायणराव नाईक यांच्या नेतृत्वाखाली 'महाराष्ट्र नाट्य मंडळ' स्थापन झालं होतं. सावळ्या तांडेल, मराठ्यांचा मनसबदार इत्यादी नाटकं त्यांनी सादर केली होती. कंग्राळ गल्लीतील 'शिवाजी व्यायाम मंडळ' यांनी रणकंकण, सरदार भगतसिंग, कंसवध इत्यादी नाटकं म.रा. नाट्य स्पर्धेत सादर केली होती. कै. भरमा निर्मळकर व उदयभानूची भूमिका करणारे गुंडू दरवंदर यांच्या भूमिका गाजल्या होत्या. कै. भीमराव तिळवे यांच्या मार्गदर्शनाखाली 'लग्नाला चला' तसेच 'मुंबईची माणसं' हे कै. रघुनाथ लाटूकर यांच्या दिग्दर्शनाखाली बसवलेल्या नाटकांना स्पर्धेत बक्षिस मिळाले होते. चव्हाट गल्लीतील कै. नारायणराव धुराजी यांच्या भूमिकेने 'करीन ती पूर्व' हे नाटक प्रेक्षकांच्या लक्षात राहिलं. कुस्ती वस्ताद व फुलांचे व्यापारी कै. गणपतराव पाटील यांनी 'करीन ती पूर्व' या नाटकात बाजी प्रभू देशपांडे यांची भूमिका गाजविली होती.

या सर्व नाटक मंडळींमध्ये काम करणारे कलाकार हे संवाद, अभिनय उत्कृष्टपणे सादर करत. परंतु योग्य मार्गदर्शन, पैशाची कमतरता आणि संधी कमी असल्यामुळे या मंडळींना पुढे नाटकं करणं अशक्य झालं. परंतु त्यांची आठवणही कलाकारांना स्फूर्तीदायक ठरेल. अशा नाट्य मंडळांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत.

माझे ऐश्वर्य

–मंदाकिनी दप्तरदार

माझे माहेर सांगली. लहानपण सगळे सांगलीत गेले. त्यावेळी नावाजलेले, आपल्या नाट्य कला कृतीने अजरामर झालेले आद्य नाटककार भावे, खाडिलकर, देवल व नाट्य क्षेत्रात अजरामर झालेले गणपतराव बोडस यांच्या कुटुंबियांशी, त्यांच्या मुलींशी माझी फक्त ओळख नव्हे तर जवळीक झाली होती. जवळ रहात असल्यामुळे त्यांच्या घरी जाणे येणे होत असे. त्याच प्रमाणे लता मंगेशकर यांचे सांगलीमध्ये वास्तव्य असताना सुद्धा माझे त्यांच्याशी आपुलकीचे नाते जुळले होते हे मी माझे भाग्य समजते. त्याच काळात मा. दिनानाथ यांनी 'कृष्ण अर्जुन' हा सिनेमा काढला. त्या वेळी नाटकाचे तिकीट ५० पैसे असायचे. बालगंधर्वांना सुद्धा मी त्या काळात पाहिले आहे. काही दिवस आम्ही मिरजेला होतो तेव्हा दर गुरुवारी ते रात्री ८ वाजता भजन करीत. सर्व मंडळी पण त्यांच्या बरोबर तल्लीन होत. गालाला हात लावून 'प्रभु तेरा महिमा' अभंग गाताना त्यांचे देहभान हरपत असे. भजन झाल्यानंतर तिथे जेवण असे. प्रसाद घेऊन जिना उतरत असताना अंबेमोहोर तांदळाच्या भाताचा सुवास व खमंग मसाल्यांचा पण वास येत असे. तो बालगंधर्वांचा पडता काळ होता पण राजहंस मोत्याचाच चारा खाणार ना? नाटक हेच त्यावेळी मनोरंजनाचे साधन होते. रेडिओ पण नव्हता मग टिव्ही कुठून येणार? त्यावेळी गणेश चतुर्थीच्या मेळ्यांमध्ये नाटके होत असत. एकदा सांगलीला प्रमुख पाहुणे म्हणून सर्वपल्ली राधाकृष्णन आले होते. असे हे कलेचे ऐश्वर्य लाभलेले माझे माहेर सांगली. आज ही आठवण आली कारण माझ्या सासरी बेळगावला नाट्य संमेलन संपन्न होत आहे. त्या निमित्ताने जुन्या स्मृतींना उजाळा मिळाला म्हणून हा शब्दप्रपंच!

बेळगावच्या कार्यरत नाट्यसंस्था

''कलारंगभूमी'' बेळगाव

१९८१ चा काळ होता. बेळगावमधील काही कलाकारांना आपली नाट्यकला दाखवावी , या ऊर्मीने ज्येष्ठ कलाकार कै.भीमराव तिळवे यांच्या मार्गदर्शनाखाली आक्टोबर १९८१ मध्ये ''कलारंगभूमी'' या संस्थेची स्थापना करण्यात आली. रामचंद्र काकतकर, निळू नार्वेकर, रश्मी राऊत, मदन पाटील, चंद्रकांत गायकवाड, खाचू मन्नोळकर, प्रकाश धोपेश्वरकर, अनुपमा कुंद्री असा संच तयार झाला. राज्य नाट्यस्पर्धेत भाग घ्यावा, त्याचे प्रयोग बेळगाव पंचक्रोशीत सादर करायचे, अपंगांच्या संस्थेला मदत करायची असा हेतु धरून या संस्थेने सुमारे चार पाच वर्षे संस्था चालवली गेली. लग्नाआधी वरात, रात्र जागते, चंद्रासाठी, काका मला वाचवा, देवाची दया, फक्त तीन महिने, सासरा मागतो आसरा अशी नाटके सादर करण्यात आली.

श्रीमती परांजपे यांच्या अपंग संस्थेला व माहेश्वरी अंध शाळेलाही काही मदत करण्यात आली. पुढे तालमी करायला जागा उपलब्ध न झाल्यामुळे आणि प्रबळ आर्थिक पाठबळ नसल्यामुळे ही संस्था इतिहासाच्या पानावर आपल्या हजेरीच्या रूपात शिल्लक राहिली. याच संस्थेचे प्रमुख रामचंद्र काकतकर यानी नाना पाटेकर, रंजना, जयश्री गडकर अभिनीत ''आव्हान'' या चित्रपटात काम केले. त्यावेळी या चित्रपटाचे चित्रीकरण बेळगाव भागात झाल्याने डॉ. अशोक साठे, कै.बाप्पा शिरवईकर, कै.दौलतराव मुतकेकर यांनी काम केलेला हा चित्रपट हंस टॉकीजमध्ये पोचला, आठवडा भर चालला.

शारदोत्सव महिला सोसायटी

शारदोत्सव महिला सोसायटी ही बेळगावच्या सांस्कृतिक क्षेत्रात काम करणारी ही एक महत्वाची संस्था आहे. महिलांची महिलांनी महिलांसाठी चालविलेली ही संस्था असून हजारो स्त्रियांना या संस्थेने व्यासपीठ मिळवून दिले आहे. दर वर्षी पाच दिवसांचा नवरात्रोत्सव व एक दिवसाचा चैत्रोत्सव सोहळा ही संस्था करते. भालबा केळकर, गिरिश ओक, रोहिणी हट्टंगडी, बाबुराव जोशी, मृणाल देव, स्मिता तळवलकर, नीलम प्रभु, मोहन आगाशे, अमोल पालेकर, नितिन देसाई, भारती आचरेकर, रोहिणी भाटे, माणिक वर्मा, वंदना गुप्ते, दीपा कार्लेकर या कलाकारांचा अनुभवाची समृद्धी शारदोत्सवानेही अनुभविली आहे. श्रीमती अनुताई कित्तूर, श्रीमती लता साठे, प्रा. विजया धोपेश्वरकर, डॉ. देवयानी देशपांडे, श्रीमती मंगल गोगटे, प्रा. कुंदा बेळगावकर, श्रीमती आशा कुलकर्णी, श्रीमती मंदाकिनी देसाई या संचालकांनी शारदोत्सवास एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. प्रा. संध्या देशपांडे या शारदोत्सवाच्या विद्यमान अध्यक्षा आहेत.

१९७१ मध्ये शारदोत्सव महिला सोसाईटीचे स्थापना झाली. समितीने दर तीन वर्षानी एक तीन अंकी नाटक सादर करण्याचे ठरविले. या नाटकांचे वैशिष्ट्य असे की पुरुष भूमिका ही स्त्रियाच करतात. १९७३ ते २०१४ या काळात १४ नाटके शारदोत्सव महिला समितीने केली. महाराष्ट्र सरकार ने समितीच्या या कार्याचा गौरव करीत ४ लाख रुपयाचे अनुदान समितीला दिले. बाप्पा शिरवईकर, शकुंतला याळगी, डॉ. अशोक साठे, गौतम करंदीकर, ॲड्व्होकेट दौलत मुतकेकर, सौ मेधा मराठे, प्रा. संध्या देशपांडे यांनी शारदोत्सवाच्या नाटकांचे दिग्दर्शन केले. पद्मश्री धुंडीराज, भातुकली, आशीर्वाद, लेकुरे उदंड जाहली, प्रेमा तुझा रंग कसा, वाजे पाऊल आपुले, माझ्या खेळ मांडुदे, शांतता कोर्ट चालू आहे, रायगडाला जेंव्हा जाग येते, सूर्यास्त, राहिले दूर घर माझे, पति गेलेग काठेवाडी, घर तिघांच हवं, देहभान अशी नाटके शारदोत्सवाने केली. या शिवाय रंगमंचीय स्पर्धेच्या निमित्ताने ऐतिहासिक, पौराणिक, सामाजिक विषय घेऊन नाट्यछटा, एकांक, पथनाट्य यांच्या स्पर्धांचे आयोजन केले. शारदोत्सवाने बेळगावातील महिलांच्या कलागुणांची जोपासना करुन त्यांना खऱ्या अर्थाने समृद्ध व सक्षम बनविले आहे.

नाट्यांकुर थिएटर्स बेळगाव

प्रा. संध्या देशपांडे यांनी १९८५ मध्ये या संस्थेची संस्थापना केली. १९८५ नंतर बेळगावच्या नाट्यसृष्टीत महत्वाची कामगिरी 'नाट्यांकुर' या संस्थेने केली. श्री व्यंकटेश देशपांडे, प्रा. अरुणा नाईक, प्रा. आनंद गाडगीळ, प्रा. आनंद मेणसे, प्रज्ञा बोकील, आनंद जोशी, अमीत कुलकर्णी, तेजराज किंकर, सविनय कुलकर्णी यांच्या सहकार्यामुळे संस्थेने महाराष्ट्र व कर्नाटक दोन्ही प्रांतात नाव लौकिक मिळवला. मराठी प्रमाणे हिंदी व कानडी रंगभूमीवरही संस्थेने कार्य केले. एकांकिका, पथनाट्ये, दोन अंकी, तीन अंकी नाटके विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले.

१९८५ मध्ये रत्नाकर मतकरींची एकाच मातीची खेळणी ही एकांकिका इंडालच्या स्पर्धेत सादर करून संस्थेने सांघिक तृतीय, स्त्री अभिनय द्वितीय, दिग्दर्शन द्वितिय, इत्यादी पुरस्कार मिळवले. त्यानंतर

संस्थेने इचलकरंजी, सोलापूर, कणकवली, कुडाळ, रत्नागिरी, तुळजापूर, गोवा, बेंगळूर, मुंबई येथील स्पर्धातून संध्या देशपांडे लिखित व दिग्दर्शित अजन्मा, अक्रित, नागमंडल, अकल्पित, ब्लॅक वुमन, अतर्क्य इत्यादी एकांकिका सादर केल्या. त्या सर्व स्पर्धातून सांघिक विजेते पद मिळविणाऱ्या ठरल्या.

१९९० मध्ये बालनाट्याची चळवळ सुरू केली. पुढील तीन वर्षे संस्थेने एकेक महिन्याचे बाल नाट्य शिबिर घेतले. सलग तीन वर्ष नाट्यांकुर संस्थेने कणकवलीच्या नाथ पै एकांकिका स्पर्धेत सांघिक प्रथम पुरस्कार पटकाविले. १९९०, मध्ये रंगरंगीले छैलछबिले, १९९१ मध्ये अबकडई, १९९२ मध्ये पक्षी तीर्थ, या त्या बाल नाटिका होत्या. सावंतवाडी येथील बालनाट्य स्पर्धेसाठी १९९५, १९९६ साठी संस्थेने 'पंडोराने उघडला बॉक्स', 'गोष्ट ऐकणारी मुलगी', या एकांकिका सादर केल्या. त्यानाही सांघिक विजेते पद व इतरही अनेक पुरस्कार लाभले. २००८ मध्ये संस्थेने पुन्हा बालनाट्य शिबिराचे आयोजन केले. तांत्रिक अंगे अरुणा नाईक व सविनय शिमनगौडर यांनी सांभाळली. १९९८ आणि १९९९ मध्ये संस्थेने बेळगावातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना घेऊन मनाली येथील विंटर कार्निव्हल युवा महोत्सवात सहभाग नोंदविला. प्रथम वर्षी २६ पुरस्कारांसह रनर्सप तर दुसरे वर्षी संस्थेचे २८ पुरस्कारांसह सांघिक विजेते पद मिळविले. दोन्ही वर्षी एकांकिका आणि पथनाट्यांना प्रथम पुरस्कार मिळाले. बेळगावातील विविध महाविद्यायातील विद्यार्थ्यांना घेऊन संस्थेने विंटर कार्निव्हल मध्ये सांघिक विजेतेपद मिळविले.

१९९९ मध्ये संस्थेने एस. के. ई सोसायटी आणि रोटरी क्लब ऑफ बेळगाव साऊथ यांच्या सहकार्याने एड्स विरोधी रेल चली है या पथ नाट्याचे जाहीर प्रयोग करण्यास सुरुवात केली. कर्नाटक, गोवा, महाराष्ट्र आणि कोकण या भागात ५०० प्रयोग संस्थेने केले आहेत.

२००० मध्ये ७३ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनात संस्थेने बालनाट्य एकांकिका, मृगावर्त या निकुंबांच्या खंडकाव्याचा नाट्याविष्कार सादर केला.

२०००मध्येच नागमंडलम च्या हिंदी प्रयोगास राष्ट्रीय महोत्सवात प्रथम पुरस्कार प्राप्त झाला. आंतराष्ट्रीय महोत्सवासाठी त्याची निवड झाली. २००१ मध्ये आक्रित हिंदीत सादर करुन राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार मिळवला.

२००३ मध्ये संस्थेने ४० कलाकारांना घेऊन घाशीराम कोतवाल हे नाटक केले. त्याचे ७ प्रयोग झाले. दिल्ली येथील स्पर्धेत या नाटकास सांघिक प्रथम, दिग्दर्शन फेस्टीवल मध्ये २००४ ते २००६ या काळात संस्थेने गंधित झाली माती, रंग अनेक, हे गीत नृत्य नाट्य कार्यक्रम केले, मेघबंधनम हे नाटक सादर केले. २००६ मध्ये सार्वजनिक वाचनालय व नाट्यांकुर या दोन्ही संस्थांनी मिळून तेंडुलकर महोत्सवाचे आयोजन केले. त्यात लालन सारंग यांचे व्याख्यान, सखाराम बाईंडर आणि शांतता कोर्ट चालू आहे या नाटकांचे प्रयोग असा ३ दिवस हा महोत्सव झाला. २०११ मध्ये संस्थेने 'कहाणी गोवा मुक्तीची' हा ७० कलाकारांचा सहभाग असलेला दृकश्राव्य कार्यक्रम सादर केला. जो पहाण्यास गोव्याचे मुख्यमंत्रीही हजर होते.

२०१४ सुखांशी भांडतो आम्ही या नाटकाची निर्मिती संस्थेने केली. जानेवारी २०१५ ला झालेल्या कॉपिटलवनच्या स्पर्धेत नाट्यांकुरच्या 'पाऊले चालती' या एकांकिकेला सांघिक प्रथम व अभिनय, दिग्दर्शन असे ५ पुरस्कार मिळविले. नाट्यांकुरने अनेक कलाकार व तंत्रज्ञ घडवले.

कॉपिटल वन

ही 'सर्वांसाठी सर्वकाही' हे ब्रीद घेऊन बेळगावच्या प्रामुख्याने अर्थकारण व सांस्कृतिक क्षेत्रात काम करणारी संस्था आहे. श्री. शिवाजी हंडे हे या संस्थेचे धुरावाहक. नाटक व संगीत याची आवड असणाऱ्या या तरुणाने कॉपिटलवन तर्फे २०११ पासून राज्यस्तरीय भव्य एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यास सुरुवात केली. त्यांनी प्रा. संध्या देशपांडे यांना आपल्या सांस्कृतिक कला दालनाचे प्रमुख नेमले. प्रा. सुंठणकर, प्रा. अरुणा नाईक, आशा रतनजी या ना रंगकर्मींना हाताशी घेऊन, संस्थेचे चेअरमन शिवाजी हंडे व त्यांच्या सदानंद पाटील, याम सुतार, हरिभाऊ जोशी, रामकुमार जोसी, शिवाजी अतिवाडकर या सहकाऱ्यांनी स्पर्धेचे अत्यंत यशस्वी आयोजन केले. कणकवली, कुडाळ, सावंतवाडी, इचलकरंजी, सोलापूर, मुंबई, पुणे अशा विविध ठिकाणाहून स्पर्धक संघांनी या स्पर्धेस प्रतिसाद दिला. तो सतत वाढतच आहे. पाचव्या वर्षी २७ एकांकिका स्पर्धेत सादर झाल्या. बेळगावच्या कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी बालनाट्यांच्या स्पर्धांचे आयोजन केले. पहिला वर्षी ८ बालनाट्ये दुसऱ्या वर्षी ७ बालनाट्ये सादर झाली. दरवर्षी संस्थेने ५० हजाराहून अधिक रुपयांची बक्षिसे दिली. मुंबई, पुणे, सावंतवाडी येथून परीक्षक आणले. शिवाजी साटम, अतुल कुलकर्णी, प्रसाद पंडित, ईला भाटे या कलाकारांच्या मुलाखती, मार्गदर्शन, अनुभव कथनाचे कार्यक्रम स्पर्धांच्या माध्यमातून झाले.

रंगभूमी ग्रुप, बेळगाव

कोवळ्या वयात मुलांवर नाट्यसंस्कार व्हावे, त्यांनी नाटक करावं, पहावं यासाठी ही संस्था स्थापन झाली आहे. ८ ते १५ वयोगटातील

मुलांना मुख्यतः वाचिक अभिनयावर जोर देत, रंगभूमीवरील हालचाली शिकविण्यासाठी सुटीत १५ दिवसांचा वर्ग घेतला जातो. त्यात व्यायाम, वाचाशुद्धीसाठी स्तोत्र तसेच नाटके बसविली जातात. या संस्थेने 'पति गेले ग काठेवाडी' या मूळ शारदोत्सवासाठी बसविलेल्या नाटकाचे कला अकादमी व वाळपई (गोवा) तसेच लोकमान्य (रिझ) येथे प्रयोग केले. ग्रिप्स या बालनाट्य चळवळीशी संबंधित 'पहिले पान' हे नाटक सादर, चाळीसगाव येथे वाचिक अभिनय स्पर्धेत 'चेला' ही एकांकिका, तसेच जी.ए.ची 'ऑर्फियस' ही कथा बेळगाव व पुणे येथे सादर. बेळगावच्या नाट्यमहोत्सवात मुलांचे 'संगीत सौभद्र' सादर. कीर्ती टेंबे, गीता कित्तूर, प्राजक्ता बेडेकर, कीर्ती दोड्डणावर, अर्चना ताम्हणकर, मेधा मराठे, आरती आपटे, लतिका बिडीकर, अंकिता आपटे, सायली शेंडे या सर्वांचा संस्थेच्या नियोजनात सहभाग असतो.

लोकमान्य सांस्कृतिक केंद्र

मराठीच्या उत्कर्षासाठी सतत लोकमान्य रंगमंदिर येथे कार्यक्रम करून मराठी मने एकत्र आणण्याचे कार्य लोकमान्य सांस्कृतिक केंद्र करीत आहे. संगीत, नाट्य, नृत्य या सर्व अंगाच्या विविध दर्जेदार कार्यक्रमांची मेजवानी मराठी रसिकांना या केंद्रामुळे मिळाली आहे. २०११ साली 'आसक्त' पुणे निर्मित जोस सायमागोंच्या 'दि इलेफंट जर्नी' या नोबल पारितोषिक विजेत्या कथेवर आधारीत 'गजब काहणी' हे नाटक सादर करण्यात आले. तसेच लोकमान्य सोसायटी व तरुण भारत ट्रस्टच्या पुढाकाराने 'महाराष्ट्र कल्चरल सेंटर' पुणे यांची ग्रिप्स चळवळ व रंगभूमी बेळगाव तर्फे मुलांच्या भावविश्व संदर्भातील प्रोजेक्ट 'आदिती', 'माझ्या मित्र' व 'पहिलं पान' ही नाटके सादर करण्यात आली.

२०१२ मध्ये कै. ॲड. दौलत मुतकेकर यांच्या जन्मदिनानिमित्त विविध नाट्यप्रयोग करून त्यांना आदरांजली वाहण्यात आली. राष्ट्रीय एकात्मतेचे महत्व विषद करणारे 'ये दंगे क्यों हो रहे हैं' हे पथनाट्य विविध ठिकाणी सादर करण्यात आले. तसेच २०१३-१४ मधे कट्यार काळजात घुसली, कस्तुरीमृग, संगीत मानापमानचे प्रयोग झाले.

उस्ताद शाकीर खान, आरती अंकलीकर टिकेकर, पं. उपेंद्र भट, आरती व सुयोग कुंडलकर, सावनी शेंडे, पं. श्रीनिवास जोशी, पं. मोहन दरेकर, देवकी पंडीत, पं. सतिश व्यास, पं. मिलींद तुळणकर, पं. भुवनेश्वर, सुभाषिनी वसंत अशा दिग्गज कलाकारांचे गायन-वादन-नृत्याचे कार्यक्रम झाले आहेत.

नाट्यसूत्र

नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा दिल्ली व आर्ट्सर्कल बेळगाव यांच्या मदतीने सर्व प्रथम घेतलेल्या 'अभिनय शिबिराने' 'नाट्यसूत्र'च्या चळवळीला प्रारंभ झाला. ही संस्था नसून अभिनयासंबंधीत चळवळ आहे. समविचारी व नाट्याभिनयात रुची असणारे कोणीही ह्या चळवळीचा हिस्सा बनू शकतात. नाट्यसूत्र तर्फे श्री चिन्मय केळकर व गीतांजली कुलकर्णी यांची दोन शिबीरे तसेच जेष्ठ रंगकर्मी श्री प्रदीप वैद्य यांच्या बरोबर ४ शिबिरे तसेच २ नाटके आतापर्यंत करण्यात आली. नाट्यसूत्र निर्मित श्री गिरीश कर्नाड लिखित व श्री प्रदीप वैद्य अनुवादित व दिग्दर्शित 'वेडिंग अल्बम' या नाटकाला या वर्षी कोल्हापूर येथे दुसरे पारितोषिक मिळाले. नाटकांसंबंधी, नाट्याभिनयासंबंधी तसेच नाटकांच्या तांत्रिक बाबतीतली सजगता निर्माण करणे हाच नाट्यसूत्रचा प्रमुख उद्देश! सौ. स्वाती कुलकर्णी नाट्यसूत्रच्या संचालिका आहेत.

आर्ट्स् सर्कल

१९४० साली स्थापन. संगीताला व ललित कलांना वाहिलेली संस्था आहे. ॲड. विनायकराव मुजुमदार, ॲड. व्ही.पी. कित्तुर, श्री. वाली, श्री. एन.एस. गुर्टू इ. संस्थेचे संस्थापक आहेत.

रावसाहेब कृष्णराव हरिहर, श्री. पु.ल. देशपांडे, श्री. दादासाहेब नाईक गळतगेकर या सर्वांनी गाण्यांच्या मैफिलींबरोबर नाटके ही सादर केली. स्वतः पु.ल. नी १९५२ साली दोन नाटके बसविली होती. १९५० मध्ये आर्ट्स् सर्कलने 'नाट्यमाला' आयोजित करून दोन महिने विविध नाटकांचे प्रयोग केले होते.

श्री. रामकृष्णपंत जोशी, डॉ. एन.आर. कुलकर्णी, श्री. रा.स्वा. नाईक, डॉ. अशोक साठे, सौ. मंगल गोगटे यांनी संस्थेला महत्वाचे योगदान दिले आहे.

आर्ट्स् सर्कलने 'नाट्यसूत्र' संस्थेच्या सहकार्याने नाट्यावर कार्यशाळा घेतली होती. तसेच नाट्य संगीताची कार्यशाळा पण घेतली आहे. त्याचप्रमाणे 'कुलवधू', 'बया दार उघड', 'ययाती देवयानी', 'कट्यार काळजात घुसली', 'होनाजी बाळा', 'यक्षगान' व 'जांभुळ आख्यान' यासारखे प्रयोग इतर राज्यातून आणून केलेले आहेत.

१०, ११ व १२ जानेवारी २०१५ रोजी आर्ट्स् सर्कलचा अमृत महोत्सवी सोहळा दिमाखाने साजरा झाला.

बेळगावातील जुन्या नाट्य संस्था वाङ्मय चर्चा मंडळ आणि वरेरकर नाट्य संघ याविषयी स्वतंत्र लेख या स्मरणिकेत आहेत.

बसलेले : रा.स्वा. नाईक, रा.वि.नातू, पी.एस्. बडकचे, बी.बी. गुडी, रामकृष्णपंत जोशी, कृष्णराव हरीहर, गं.वा. कलघटगी, एस.पी.राव
उभे : मृत्युंजयबुवा पुराणिकमठ, एम. वसंतराव, यशवंतराव कित्तूर, पु.ल. ओगले, व्यंकटराव मुधोळकर, बी.व्ही. केळकर, श्री गोकाककर, श्याम जोशी

डॉ. अशोक साठे, ॲड. कै. दौलत मुतकेकर

डॉ. अशोक साठे

इ.स. १९८१
जयवंत लाड, विठ्ठल वाळगी
बळकवाडीतील काँग्रेस विहीरीचे निरिक्षण करताना

१९२४ काँग्रेस अधिवेशनाच्या वेळी महात्मा गांधी


डॉ. अशोक साठे, दिल्लीला पुरस्कार स्वीकारताना

डॉ. अशोक साठे आणि सहकारी

"आव्हान" चित्रपटात नाना पाटेकरसह कलारंगभूमीचे रामचंद्र काकतकर

वरेरकर नाट्य संघ - संस्थापक सभासद व कै. मामा वरेरकर १९४४

९५व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन पदाधिकारी व कार्यकारिणी मंडळ

सुकाणु समिती :

१. नितीन खोत
२. विणा लोकूर
३. उदय कालकुंद्रीकर
४. डॉ. नीता देशपांडे
५. राज बेळगावकर
६. डॉ. राजेंद्र भांडणकर
७. विजय मोरे
८. बिंबा नाडकर्णी
९. राम भंडारे
१०. विनय जठार
११. अनंत जांगळे

निधी संकलन समिती :

१. राम भंडारे
२. सुबोध टेंबे
३. नीता देशपांडे
४. डॉ. राजेंद्र भांडणकर
५. डॉ. श्रावगे
६. अप्पासाहेब गुरव
७. नितीन खोत

निवास व्यवस्था समिती :

१. मोहन कारेकर
२. महादेव पाटील
३. मेधा कानगो
४. दिपा देशपांडे
५. नीता देशपांडे
६. प्रदीप पुराणिक
७. संजू नाईक
८. शिरडीश पाटील
९. राधिका तेंडूलकर

भोजन समिती :

१. व्यंकटेश शिंदे
२. प्राजक्ता बेडेकर
३. सागर दळवी
४. प्राजक्ता शहापूरकर
५. संदिप भिडे
६. पल्लवी कऱ्हाडकर

कायदा सल्ला समिती :

१. विकास कलगटगी
२. सुनिल नाईक
३. सुधीर चव्हाण
४. जयराम मुतगेकर

परिवहन व्यवस्था समिती :

१. अजित लोकूर
२. सुबोध टेंबे
३. हेमंत कित्तूर
४. सुधीर जठार
५. सुरज शिंदे
६. सचिन घोरपडे
७. शेखर

कार्यालयीन कामकाज समिती :

१. डि.पी. शिंदे
२. शलाका पाटील
३. सुरेखा हेरेकर
४. रिटा गुप्ते
५. उषाताई कुलकर्णी

दक श्राव्य समिती :

१. दिनकर गवस
२. श्रीकांत प्रभू
३. सुभाष ओऊळकर
४. सौ. व श्री. दीपक ओऊळकर

परिसर सुविधा समिती :

१. स्मिता दळवी
२. हेमांगी प्रभू
३. दिनकर गवस

रजिस्ट्रेशन समिती :

१. डि.पी. शिंदे
२. मंथन ग्रुप
३. रोटरॅक्ट ग्रुप

स्थानिक कार्यक्रम समिती :

१. स्वाती कुलकर्णी
२. नीता कुलकर्णी
३. एकनाथ पाटील
४. संध्या देशपांडे
५. आसावरी भोकरे

स्मरणिका समिती :

१. मेधा मराठे
२. लता कित्तूर
३. अशोक याळगी
४. शोभा लोकूर

कार्यक्रम पत्रिका

उद्घाटन सोहळा
श्री. अशोक साठे स्वागताध्यक्ष

आपणांस निमंत्रित करीत आहोत
अध्यक्ष मा.श्री. अरूण काकडे यांच्या उपस्थितीत
आणि
नियोजित अध्यक्षा मा.श्रीमती फैय्याज शेख यांच्या अध्यक्षतेखाली
अ.भा.मराठी नाट्यपरिषदेचे ९५ अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन.

उद्घाटन सोहळा
शनिवार, दिनांक ७ फेब्रुवारी २०१५ स. १०.०० वाजता
सी.पी. एड. ग्राऊंड

बाळासाहेब ठाकरे नाट्य नगरी
स्मिता तळवलकर रंगमंच (मुख्यमंच)

उद्घाटक

मा.ना.श्री. शरदचंद्र पवारसाहेब

मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

सन्मानीय प्रमुख पाहुणे

मा.ना.श्री. विनोद तावडे
शालेय शिक्षण, क्रिडा
आणि सांस्कृतिक कार्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य.

सन्मानीय उपस्थिती

मा.आ.श्री. उदय सामंत

मा.श्री. किरण ठाकूर

.....

समारोप
सन्मानीय प्रमुख पाहुणे
मा.श्री. उद्धव ठाकरे

सन्मानिय उपस्थिती
मा.आ.श्री. उदय सामंत
मा.आ.श्री. हेमंत पाटील
मा.श्री. किरण ठाकुर

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद
९५ वे नाट्य संमेलन,
बाळासाहेब ठाकरे नाट्यनगरी

४ फेब्रुवारी २०१५

सदाशिव अमरापूरकर रंगमंच (लोकमान्य रंगमंच)

वेळ	कार्यक्रम
सायं. ५:००	पोवाडा सादरकर्ते:- श्री. देवगेकर
सायं. ५:३०	व्हिल चेअर डान्स सादरकर्ते:- शकुंताई परांजपे
सायं. ६:००	बाल संगीत सौभद्र सादरकर्ते:- मेघा मराठे
सायं. ७:००	तुम्हा तो शंकर सुखकर हो'! सादरकर्ते:- आसावरी भोकरे (फैय्याजजी रंगतरंग)
रात्रौ. ८:३०	'अकीत' सादरकर्ते:- संध्या देशपांडे

५ फेब्रुवारी २०१५

कुलदीप पवार रंगमंच (जिरगे नाट्यगृह)

वेळ	कार्यक्रम
सायं. ६.०० वा	स्मिता तुझ्याचसाठी सहभाग:- रीमा लागू, मोहन जोशी, लता नार्वेकर, दीपक करंजीकर, आरती तळवलकर, सुलेखा तळवलकर

६ फेब्रुवारी २०१५

स्मिता तळवलकर रंगमंच (मुख्य रंगमंच)

वेळ	कार्यक्रम
सायं. ४.३० वा	'गानरंग' अंध विद्यार्थ्यांचा कार्यक्रम सादरकर्ते:- माहेश्वरी अंधशाळा
सायं. ५.०० वा	भारुड सादरकर्ते:- पद्मजा कुलकर्णी आणि ग्रुप
सायं. ५.३० वा	'नृत्य रंग सादरकर्ते:- 'शिवम्' डान्स
सायं. ७.०० वा	बालिका आदर्श विद्यालय प्रस्तुत 'गीत रामायण' सादरकर्ते:- एकनाथ पाटील
सायं. ८.३० वा	सौ. आरती अंकलीकर-टिकेकर यांचे गायन

७ फेब्रुवारी २०१५

कुलदीप पवार रंगमंच (जिरगे नाट्यगृह)

वेळ	कार्यक्रम
दु. २.०० वा	एकांकिका:- 'सायलेंट झोन', मायमाऊली, मुंबई
दु. ३.०० वा	एकांकिका:- 'चारु, आरो इत्यादी', नवी मुंबई म्युझिक अँड ड्रामा सर्कल.
दु. ४.०० वा	एकांकिका:- 'फॅमिली बिझनेस', अनुभूती कल्याण.
सायं.५.०० वा	एकांकिका:- 'जेवणावळ', नाट्य परिषद, मध्यवर्ती.
सायं. ६.०० वा	एकांकिका:- 'साकव', नाट्य परिषद, पुणे शाखा.
सायं. ७.०० वा	'सॉक्रेटिस ते दाभोळकर व्हाया- तुकाराम' 'रिंगण नाट्य' - अतुल पेठे

७ फेब्रुवारी २०१५

नयनतारा रंगमंच (जिरगे नाट्यगृह)

वेळ	कार्यक्रम
सायं. ७.३० वा	'आविष्कार आणि अंजोर निर्मित, 'आयदान' लेखक: उर्मिला पवार संकल्पना: रामू रामनाथन दिग्दर्शन/रंगावृत्ती: सुषमा देशपांडे नेपथ्य / प्रकाश: रवि – रसिक पार्श्वसंगीत: जितीन कापरकर कलाकार: नंदिता धुरी, शुभांगी सावरकर, शिल्पा साने. निर्मिती सूत्रधार: अरुण काकडे

७ फेब्रुवारी २०१५

सदाशिव अमरापूरकर रंगमंच (लोकमान्य रंगमंच)

वेळ	कार्यक्रम
दु. २.०० वा	एकांकिका:- 'नादखुळ्या', ABG प्रोडक्शन
दु. ३.०० वा	नाट्य संमेलनाध्यक्ष श्रीमती फैय्याज यांची प्रकट मुलाखत आणि गप्पा मुलाखतकर्ते:- जयंत पवार सहभाग:- अरुण काकडे, आशालता वाबगावकर, मोहन जोशी, लता नार्वेकर, दीपक करंजीकर, अशोक देशपांडे, आसावरी भोकरे
सायं. ५.०० वा	एकांकिका:- 'ग्रेटेस्ट सॉव्हरीन', नाट्य परिषद डोंबिवली शाखा.
सायं.६.०० वा	एकांकिका:- 'ॲक्ट', नाट्य परिषद पुणे उपनगरीय शाखा.
सायं. ७.००वा	एकांकिका:- "उंच माझा झोका गं', नाट्य परिषद सोलापूर शाखा.
रात्रौ८.०० वा	एकांकिका:- "कसला भारत बसला चरत', नाट्य परिषद लातूर शाखा.

७ फेब्रुवारी २०१५

स्मिता तळवलकर रंगमंच (मुख्य रंगमंच)

वेळ	कार्यक्रम
स.९.५० वा	ईशस्तवन, नांदी दिग्द: डॉ. स्नेहा राजुरीकर (K.L.E. युनिव्हर्सिटी, स्कूल ऑफ म्युझिक) आणि श्रीधर कुलकर्णी नाट्य परिषद बेळगांव शाखा.
स.१०.०० वा	उद्घाटन सोहळा
सायं. ४.०० वा	'भुवैकुंठ पंढरी तशीच जेजुरी' लेखक / संकल्पना: प्रा.डॉ. प्रकाश खांडगे दिग्दर्शक:- प्रा.डॉ.गणेश चंदनशिवे
सायं. ५.०० वा	'संगीत मैफिल' निर्मलाताई गोगटे, मधुवंती दांडेकर, सहभाग:- रजनी जोशी, नारायण बोडस, आशालता वाबगांवकर, रामदास कामत, फैय्याज़ आणि अरिमता चिंचाळकर, स्वानंद भुसारी, प्राजक्ता मराठे, श्रीरंग भावे संवाद:- शेखर खांबेटे संगीतसाथ:- तबला- धनंजय पुराणिक हार्मोनियम:- मकरंद कुंडले
सायं. ६.३० वा	"नृत्यंती' सहभाग:- सोनिया परचुरे आणि सावनी तळवलकर
रात्रौ. ७.०० वा	'विच्छा माझी पुरी करा' (वगनाट्य) आणि कलावंत रजनी दिग्दर्शक:- विजय कदम सहभाग:- नामवंत कलावंत निवेदन:-सिया पाटील आणि अशोक शिंदे संगीतसंयोजक :- सुधीर सिन्हा आणि सहकारी

७ फेब्रुवारी २०१५

सुधीर मोघे मुक्तमंच

वेळ	कार्यक्रम
दु. २.०० ते दु.४.००	कोणीही यावे सादर करावे
४.०० ते ४.१५	एकपात्री - नकला -डॉ. दिलीप अलोणे
४.१५ ते ४.३०	एकपात्री - अष्टपैलू विवेकानंद - श्रीमती मीना देशपांडे
४.३० ते ४.४५	एकपात्री - स्टँडअप कॉमेडी - श्री. दिलीप खन्ना
४.४५ ते ५.००	एकपात्री - कीर्तन -श्रीमती वीणा खाडिलकर
५.०० ते ५.१५	एकपात्री - हास्यशाही -श्री. संजय मिस्त्री
५.१५ ते ५.३०	एकपात्री - वाचाल तर वाचाल - श्री. अशोक बोंडे
५.३० ते ५.४५	एकपात्री - वास्तुशास्त्र -श्रीमती गायत्री पाटोळे
५.४५ ते ६.००	एकपात्री - हास्ययात्रा -श्री. शरद जाधव
६.०० ते ६.१५	एकपात्री - प्राणी, पक्षी आवाज- श्री. राजदीप कदम
६.१५ ते ६.३०	एकपात्री - कोवळी उन्हे - श्रीमती मेघना साने
६.३० ते ६.४५	एकपात्री - हास्यगडगडाट -डॉ. प्रवीण जोग
६.४५ ते ७.००	एकपात्री - बरवानुभव -डॉ. जयश्री पेलवान
७.०० ते ७.१५	एकपात्री - भावनात्मक बदल - श्रीमती सुषमा देसाई
७.१५ ते ७.३०	एकपात्री - गम्मत गप्पा -श्री. अभय देवरे
७.३० ते ७.४५	एकपात्री - खेळ सावल्यांचा - श्री. माधव धागणकर
७.४५ ते ८.००	एकपात्री - हसवा हसवी - श्री. संतोष वोरडिया
८.०० ते ८.१५	एकपात्री - हास्यतुषार -श्री. जितेश कोळी
८.१५ ते ८.३०	एकपात्री – जिजाऊ - सौ. गीताबाली उजवणे
८.३० ते ८.४५	एकपात्री - श्री. अनिल कोष्टी
८.४५ ते ९.००	एकपात्री – कथाकथन - श्रीमती रेखा गुंदडा
९.०० ते ९.१५	एकपात्री – गप्पागोष्टी - श्री. जयंत ओक
९.१५ ते ९.३०	एकपात्री – हास्य दिंडी - श्रीपाद काळे

८ फेब्रुवारी २०१५

कुलदीप पवार रंगमंच (जिरगे नाट्यगृह)

दु. १२.०० वा	एकांकिका:- 'सायलेंट स्क्रीन', 'नाट्य परिषद मालवण शाखा.
दु. १.०० वा	एकांकिका:- "पुन्हा नाही येणे', 'नाट्य परिषद सांगली शाखा.

८ फेब्रुवारी २०१५

सदाशिव अमरापूरकर रंगमंच (लोकमान्य रंगमंच)

स. १०.०० वा	'छू मंतर' 'नाट्य परिषद, गिरज शाखा.
स. ११.३० वा	'कोल्हापुरी साज''नाट्य परिषद, कोल्हापूर शाखा.
दु. १२.०० वा	'बहिणीची पितळी' (नाटीका) 'नाट्य परिषद, पंढरपूर शाखा.
दु. १२.३० वा	'विनोदी स्किट' ' नाट्य परिषद, नाशिक शाखा.
दु. १.०० वा	'गझल''नाट्य परिषद, मानोरा शाखा.
दु. २.०० वा	बालनाट्य:- शिबीर डॉ.अनिल बांदिवडेकर आणि संकेत ओक (प्रवेश फक्त शिबिरार्थींसाठी)
दु. ३.०० वा	बालनाट्य:- 'भेट''नाट्य परिषद, बीड शाखा.
दु. ३.३० वा	बालनाट्य:- 'जभी उमटे इंद्रधनू'' नाट्य परिषद, डोंबिवली शाखा.
दु. ४.०० वा	बालनाट्य:- 'जय हो फॅन्टसी''महाराष्ट्र राज्य जवाहर बाल भवन
दु. ४.३० वा	बालनाट्य:- 'अरेरया कमाल आहे'नाट्य परिषद, डोंबिवली शाखा.

८ फेब्रुवारी २०१५

रिमता तळवलकर रंगमंच (मुख्य रंगमंच)

स. १०.३० वा	'गुणी गोविंद' सादरकर्ते: सुधीर पोटे
दु. १२.०० वा	नाट्य संगीत सादरकर्ते: 'नाट्य परिषद, मालवण शाखा.
दु. १२.३० वा	गायन कार्यक्रम सौ. सुमन प्रभुमिराशी
सायं. ५.०० वा	खुले अधिवेशन आणि समारोप
सायं. ७.०० वा	"ग्रँड फिनाले' संकल्पना / दिग्दर्शन / लेखन:- श्रीरंग गोडबोले आणि गिरीष जोशी सहभाग:- व्यावसायिक रंगभूमीवरील मान्यवर कलावंत

विषय नियामक समिती सभा
दिनांक ८ फेब्रुवारी २०१५

वेळ स. १० वाजता,
स्थळ:-J.N.M.C मिनी नाट्यगृह

---

७ फेब्रुवारी २०१५ - स. ७.०० वा
नाट्यदिंडी मार्ग:- भांधुर गल्ली येथील मरगाई मंदिर येथून सुरुवात- कपिलेश्वर रोड मार्गे तहसीलदार गल्ली – हेमू कलानी चौक – रामलिंग खिंड गल्ली मार्गे – किर्लोस्कर रोड – धर्मवीर संभाजी चौक – कॉलेज रोड मार्गे – बाळासाहेब ठाकरे नाट्य नगरीतील क्लब रोडने दौलतराव मुतकेकर प्रवेशद्वारातून स्मिता तळवलकर रंगमंचावर पालखीचे आगमन
सहभाग- समस्त बेळगाव नगरी आणि कलावंत
दिंडी प्रमुख:- अनिल चौधरी

सत्कारमूर्ती :
डॉ. अनिल बांदिवडेकर (मुंबई), ज्योत्स्ना इनामदार (पुणे), सुभाष नाटेकर (गोवा), श्रीधर सोनू खापरे (रत्नागिरी), जया चिटणीस (सावंतवाडी), प्रभाकर पार्सेकर (मालवण) डॉ. इंदिरा जोशी(बेळगांव), विठ्ठलराव याळगी(बेळगांव), गुरुदत्त पेडणेकर(बेळगांव), मनोहर बिर्जे(बेळगांव), गजानन शंकर रतन (बेळगांव),

निवेदक:- सुधीर गाडगीळ, ज्योती आंबेकर, राजेश दामले, मैथिली जावकर

१९०५ पासून २०१५ पर्यंत झालेल्या अ.भा. मराठी नाट्य संमेलनासंबंधी सविस्तर माहिती प्रथमच प्रकाशित

नाट्य संमेलन क्र. : १
अध्यक्ष : श्री. गणेश श्रीकृष्ण तथा दादासाहेब खापर्डे (अमरावतीचे वकील)
स्वागताध्यक्ष : –
स्थळ : मुंबई (बॉम्बे थिएटर येथे संपन्न झाले)
दिनांक : २८ ऑगस्ट १९०५
निमंत्रक संस्था : राजापूरकर नाटक मंडळी

नाट्य संमेलन क्र. : २
अध्यक्ष : श्री. नरसिंह चिंतामण केळकर
स्वागताध्यक्ष : –
स्थळ : नाशिक
दिनांक : १४ व १५ मे १९०६
निमंत्रक संस्था : पाटणकर संगीत नाटक मंडळी

नाट्य संमेलन क्र. : ३
अध्यक्ष : श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर
स्वागताध्यक्ष : –
स्थळ : किर्लोस्कर नाट्यगृह, पुणे
दिनांक : २० व २१ मे १९०७
निमंत्रक संस्था : किर्लोस्कर संगीत मंडळी

नाट्य संमेलन क्र. : ४
अध्यक्ष : श्री. रावसाहेब निळकंठ विनायक तथा कोंडोपंत छत्रे
स्वागताध्यक्ष : –
स्थळ : विजयानंद नाट्यगृह, नाशिक
दिनांक : २२ ते २४ मे १९०८
निमंत्रक संस्था : नाट्यकला प्रवर्तक संगीत नाटक मंडळी

नाट्य संमेलन क्र. : ५
अध्यक्ष : डॉ. गणेश कृष्ण गर्दे
स्वागताध्यक्ष : श्री. दत्तात्रय आत्माराम फाटक
स्थळ : नूतन आर्यभूषण थिएटर, पुणे
दिनांक : २४ ते २५ मे १९०९
निमंत्रक संस्था : सोशल क्लब, पुणे (हौशी कलावंतांची संस्था)

नाट्य संमेलन क्र. : ६
अध्यक्ष : श्री. चिंतामण गंगाधर भानू
स्वागताध्यक्ष : श्री. त्र्यंबक सिताराम कारखानीस
स्थळ : किर्लोस्कर नाट्यगृह, पुणे
दिनांक : २३ ते २४ मे १९१०
निमंत्रक संस्था : महाराष्ट्र नाटक मंडळी

नाट्य संमेलन क्र. : ७
अध्यक्ष : श्री. पंडीत विष्णु दिगंबर पलुसकर
स्वागताध्यक्ष : –
स्थळ : एलफिस्टन नाट्यगृह, मुंबई
दिनांक : २२ ते २३ मे १९११
निमंत्रक संस्था : कोल्हापूर संगीत मंडळी
(प्रथमच या संमेलनाला प्रवेश मूल्य ठेवण्यात आले होते)

नाट्य संमेलन क्र. : ८
अध्यक्ष : श्री. मोरो विश्वनाथ ऊर्फ अण्णासाहेब जोशी (विदर्भातील विद्वान वकील)
स्वागताध्यक्ष : –
स्थळ : अमरावती येथे
दिनांक : १९१२ (मध्ये ईस्टरच्या सुट्टीत)
निमंत्रक संस्था : श्री महालाक्ष्मी प्रासादीक संगीत नाटक मंडळी

नाट्य संमेलन क्र. : ९
अध्यक्ष : श्री. केशव रामचंद्र छापखाने (वकील)
स्वागताध्यक्ष : श्री. रामभाऊ गोखले
स्थळ : किर्लोस्कर नाट्यगृह, पुणे
दिनांक : १९ ते २० मे १९१३
निमंत्रक संस्था : चित्ताकर्षक नाटक मंडळी

नाट्य संमेलन क्र. : १०
अध्यक्ष : श्री. शिवराम महादेव परांजपे (काळकर्ते)
स्वागताध्यक्ष : –
स्थळ : आर्यभूषण नाट्यगृह, पुणे
दिनांक : २१ व २२ मे १९१४
निमंत्रक संस्था : सोशल क्लब, पुणे

नाट्य संमेलन क्र. : ११
अध्यक्ष : श्री. रेव्हरंड नारायण वा. टिळक (मराठी कवि)
स्वागताध्यक्ष : –
स्थळ : गांधर्व महाविद्यालय, मुंबई
दिनांक : २० ते २१ मे १९१५
निमंत्रक संस्था : भारत नाटक मंडळी

नाट्य संमेलन क्र. : १२
अध्यक्ष : श्री. शंकरराव मुजुमदार (किर्लोस्कर नाटक मंडळीतील प्रमुख नट व कुशल व्यवस्थापक)
स्वागताध्यक्ष : –
स्थळ : किर्लोस्कर नाट्य गृह, पुणे
दिनांक : २९ ते ३० मे १९१६
निमंत्रक संस्था : राजापूर नाटक मंडळी
(संमेलनाच्या अध्यक्षपदाचा बहुमान नाट्य व्यावसायिकाला मिळण्याचा हा पहिलाच प्रसंग)

नाट्य संमेलन क्र. : १३
अध्यक्ष : श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर (नाट्य शिक्षक)
स्वागताध्यक्ष : –
स्थळ : किर्लोस्कर नाट्यगृह, पुणे
दिनांक : ४ ते ५ जून १९१७
निमंत्रक संस्था : गंधर्व नाटक मंडळी

नाट्य संमेलन क्र. : १४
अध्यक्ष : श्री. बॅरिस्टर मुकुंद रामराव जयकर उर्फ बाबासाहेब जयकर
स्वागताध्यक्ष : त्र्यंबक सीताराम कारखानीस
स्थळ : नूतन आर्यभूषण नाट्यगृह, पुणे
दिनांक : २७ ते २८ मे १९१८
निमंत्रक संस्था : महाराष्ट्र नाटक मंडळी

नाट्य संमेलन क्र. : १५
अध्यक्ष : श्री. भारताचार्य चिंतामण विनायक वैद्य
स्वागताध्यक्ष : श्री. अनंत वामन बर्वे
स्थळ : नूतन आर्यभूषण नाट्यगृह, पुणे
दिनांक : १२ ते १३ मे १९१९
निमंत्रक संस्था : राष्ट्रीय नाट्य शाळा, पुणे

नाट्य संमेलन क्र. : १६
अध्यक्ष : श्री. वामन गोपाळ जोशी (राक्षसी महत्वाकांक्षा व रणदुंदुभी या नाटकांचे लेखक)
स्वागताध्यक्ष : –
स्थळ : नूतन आर्यभूषण नाट्यगृह, पुणे
दिनांक : २४ ते २५ मे १९२०
निमंत्रक संस्था : सिद्धराज प्रासादिक संगीत नाटक मंडळी

नाट्य संमेलन क्र. : १७
अध्यक्ष : श्री.यशवंत नारायण टिपणीस
स्वागताध्यक्ष : श्री. शिवराम महादेव परांजपे
स्थळ : किर्लोस्कर नाट्यगृह, पुणे
दिनांक : २३ ते २४ मे १९२१
निमंत्रक संस्था : दक्षिणी सुबोध नाटक मंडळी

नाट्य संमेलन क्र. : १८
अध्यक्ष : श्री. केशवराव कोरटकर (हैद्राबाद येथील वकील)
स्वागताध्यक्ष : –
स्थळ : नूतन आर्यभूषण नाट्यगृह, पुणे
दिनांक : ४ ते ६ मे १९२२
निमंत्रक संस्था : भारत नाट्य समाज (मध्यवर्ती संस्था)
('अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषद' हे नाव रूढ होण्यापूर्वी 'भारत नाट्य समाज' या नावाने संस्थेचा कारभार चालत असे.)

नाट्य संमेलन क्र. : १९
अध्यक्ष : श्री. प्रा. श्रीकृष्ण निळकंठ चाफेकर
स्वागताध्यक्ष : श्री. नानासाहेब हर्डीकर
स्थळ : किर्लोस्कर नाट्यगृह, पुणे
दिनांक : २५ ते २६ मे १९२३
निमंत्रक संस्था : यशवंत संगीत नाटक मंडळी

नाट्य संमेलन क्र. : २०
अध्यक्ष : श्री. बाबासाहेब घोरपडे (इचलकरंजी संस्थानचे दानशूर व कलाप्रिय अधिपती)
स्वागताध्यक्ष : नटवर्य श्री. गणपतराव बोडस
स्थळ : सदासुख नाट्यगृह, सांगली
दिनांक : १२ ते १३ मे १९२४
निमंत्रक संस्था : महाराष्ट्र नाटक मंडळी

नाट्य संमेलन क्र. : २१
अध्यक्ष : श्री. धुंडीराज गोविंद फाळके (मराठी चित्रपटसृष्टीचे जनक)
स्वागताध्यक्ष : –
स्थळ : पॅलेस थिएटर, कोल्हापूर (आताचे केशवराव भोसले नाट्यगृह)
दिनांक : १८ जुलै १९२६
निमंत्रक संस्था : मनोहर स्त्री संगीत नाटक मंडळी

नाट्य संमेलन क्र. : २२
अध्यक्ष : श्री. प्रा. श्रीकृष्ण निळकंठ चाफेकर
स्वागताध्यक्ष : –
स्थळ : पुणे
दिनांक : १० ते ११ जुलै १९२७
निमंत्रक संस्था : बालनटांची संस्था-आनंद संगीत नाटक मंडळी

नाट्य संमेलन क्र. : २३
अध्यक्ष : श्री. सौ गिरीजाबाई केळकर (पहिल्या स्त्री अध्यक्षा)
स्वागताध्यक्ष : –
स्थळ : मुंबई
दिनांक : २८ मे १९२८
निमंत्रक संस्था : रघुवीर सावकार यांच्या 'रंगबोधेच्छु' समाजाच्या वतीने

(ज्या काळी बायकानी नाटक लिहिणे ही एक अघटीत घटना मानली जात होती. त्या काळात म्हणजे १९१३ च्या सुमारास 'पुरुषाचे बंड' सारख्या विवाद्य विषयावर सौ. गिरीजाबाई केळकर यांनी नाटक लिहिले. निर्भिड, सभाधीटपणा, बुद्धिचे चापल्य हे त्यांचे विशेष गुण होते.)

नाट्य संमेलन क्र. : २४
अध्यक्ष : श्री. नारायण श्रीपाद राजहंस (बालगंधर्व)
स्वागताध्यक्ष : श्री. जगन्नाथ महाराज
स्थळ : विजयानंद नाट्यगृह, पुणे
दिनांक : २१ जून १९२९
निमंत्रक संस्था : बालमोहन नाट्य मंडळी

(प्रथमच या संमेलनात खुर्च्याऐवजी गादी लोडांची बैठक मांडण्यात आली होती. या वर्षापासून संमेलनाचे 'भारत नाट्य संमेलन' हे नाव जाऊन 'महाराष्ट्र नाट्य संमेलन' हे नाव रूढ झाले.)

नाट्य संमेलन क्र. : २५
अध्यक्ष : श्री. अनंत हरी गर्दे (नाटिकाकार)
स्वागताध्यक्ष : अच्युतराव कोल्हटकर
स्थळ : बॉंबे थिएटर, मुंबई
दिनांक : ५ सप्टेंबर १९३०
निमंत्रक संस्था : बालमोहन नाट्य मंडळी

(संमेलनाचा सारा कारभार अवघ्या ३ तासात उरकण्यात आला.)

नाट्य संमेलन क्र. : २६
अध्यक्ष : श्री. नारायण रामलिंग बामणगावकर
स्वागताध्यक्ष : –
स्थळ : बॉंबे थिएटर, मुंबई
दिनांक : १६ जून १९३३
निमंत्रक संस्था : आनंद संगीत नाटक मंडळी

नाट्य संमेलन क्र. : २७
अध्यक्ष : श्री. गोविंदराव टेंबे
स्वागताध्यक्ष : –
स्थळ : पुणे
दिनांक : २५ ते २७ मे १९३५
निमंत्रक संस्था : नाट्यनिकेतन मुंबई व सोशल क्लब, पुणे

नाट्य संमेलन क्र. : २८
अध्यक्ष : श्री. शंकर परशुराम जोशी (विचित्रलिला व खडाष्टक नाटकाचे लेखक)
स्वागताध्यक्ष : प्रल्हाद केशव अत्रे
स्थळ : विजयानंद नाट्यगृह, पुणे
दिनांक : ८ ते ९ ऑगस्ट १९३६
निमंत्रक संस्था : सोशल क्लब, पुणे व बालमोहन नाटक मंडळी

नाट्य संमेलन क्र. : २९
अध्यक्ष : श्री. भार्गव विठ्ठल तथा मामा वरेरकर
स्वागताध्यक्ष : श्रीमती शंकुतला परांजपे
स्थळ : सोशल क्लब, पुणे
दिनांक : १४ ते १५ मे १९३८
निमंत्रक संस्था : सोशल क्लब, पुणे व अभिनव नाट्यमंडळ

नाट्य संमेलन क्र. : ३०
अध्यक्ष : श्री. त्र्यंबक सिताराम कारखानीस
स्वागताध्यक्ष : ॲड. तु. ज. केदार
स्थळ : नागपूर
दिनांक : १४ ते १५ जानेवार १९३९
निमंत्रक संस्था : अभिनव नाट्यमंदिर, नागपूर

नाट्य संमेलन क्र. : ३१
अध्यक्ष : नटवर्य श्री. गणपतराव बोडस
स्वागताध्यक्ष : श्री. वा. श्री. पुरोहित
स्थळ : न्यू इंग्लिश स्कूल, नाशिक
दिनांक : २३ ते २४ मार्च १९४०
निमंत्रक संस्था : महाराष्ट्र नाट्यमंदिर, नाशिक

नाट्य संमेलन क्र. : ३२
अध्यक्ष : श्री. आचार्य प्रल्हाद केशव अत्रे
स्वागताध्यक्ष : श्री. वर्तक
स्थळ : विल्सन हायस्कूल, मुंबई
दिनांक : २८ ते ३१ डिसेंबर १९४१
निमंत्रक संस्था : मुंबई मराठी साहित्य संघ

नाट्य संमेलन क्र. : ३३
अध्यक्ष : श्री. ना.वि. कुलकर्णी
स्वागताध्यक्ष : श्री. रा.सा.वा.गो. भावे, न.ग. कमतनूरकर
स्थळ : सांगली
दिनांक : ६ नोव्हेंबर १९४३
निमंत्रक संस्था : –
(मराठी रंगभूमी शतसांवत्सरीक महोत्सव अध्यक्ष स्वा.वि.दा. सावरकर)

नाट्य संमेलन क्र. : ३४
अध्यक्ष : श्री. वीर माधवराव जोशी
स्वागताध्यक्ष : श्री. बालगंधर्व
स्थळ : नटवर नाट्यगृह, जळगांव
दिनांक : २८ ते ३० डिसेंबर १९४४
निमंत्रक संस्था : स्थानिक नाट्य समिती, जळगांव

नाट्य संमेलन क्र. : ३५
अध्यक्ष : श्री. चिंतामणराव कोल्हटकर
स्वागताध्यक्ष : श्री. रावसाहेब पटवर्धन
स्थळ : मॉडर्न हायस्कूल, राजविलास नाट्यमंदिर नगर
दिनांक : ४ ते ६ मे १९४६
निमंत्रक संस्था : नाट्योत्तेजक मंडळ

नाट्य संमेलन क्र. : ३६
अध्यक्ष : श्री. चिंतामणराव कोल्हटकर
स्वागताध्यक्ष : श्री. भालजी पेंढारकर
स्थळ : पॅलेस नाट्यगृह, केशवराव भोसले ना., कोल्हापूर
दिनांक : १४ जानेवारी १९४९
निमंत्रक संस्था : करवीर नाट्यमंडळ, कोल्हापूर

नाट्य संमेलन क्र. : ३७
अध्यक्ष : श्री. नरहर गणेश कमतनूरकर
स्वागताध्यक्ष : प्रा. बनहट्टी
स्थळ : पुणे
दिनांक : १७ ते १८ एप्रिल १९५४
निमंत्रक संस्था : सोशल क्लब, पुणे

नाट्य संमेलन क्र. : ३८
अध्यक्ष : श्री. आचार्य प्रल्हाद केशव अत्रे
स्वागताध्यक्ष : श्री. वि.आ. नाईक
स्थळ : राणी पार्वतीदेवी महाविद्यालय, बेळगाव
दिनांक : ५ ते ८ जानेवारी १९५६
निमंत्रक संस्था : कलोपासक मंडळ, बेळगाव

नाट्य संमेलन क्र. : ३९
अध्यक्ष : श्री. पार्श्वनाथ आळतेकर
स्वागताध्यक्ष : श्री. रतनचंद हिराचंद जोशी
स्थळ : सोलापूर
दिनांक : २२ ते २३ डिसेंबर १९५७
निमंत्रक संस्था : अभिनय साधना मंदिर, सोलापूर

नाट्य संमेलन क्र. : ४०
अध्यक्ष : श्री. विष्णु सखाराम खांडेकर
स्वागताध्यक्ष : श्री. चिंतामणराव कोल्हटकर
स्थळ : नागरपालिकेने उभारलेले खुले नाट्यगृह, सातारा
दिनांक : २८ डिसेंबर १९५८
निमंत्रक संस्था : कलामंदिर, सातारा

नाट्य संमेलन क्र. : ४१
अध्यक्ष : श्री. नानासाहेब फाटक
स्वागताध्यक्ष : श्री. वासुदेव नाईक
स्थळ : महाराष्ट्र सभागृह हैद्राबाद
दिनांक : ३० ते ३१ डिसेंबर १९५८ व १ जानेवारी १९५९
निमंत्रक संस्था : –

नाट्य संमेलन क्र. : ४२
अध्यक्ष : श्री. वसंत शामराव देसाई
स्वागताध्यक्ष : डॉ. आंबेगावकर
स्थळ : महात्मा गांधी नाट्यगृह, बडोदे
दिनांक : २६ ते २८ फेब्रुवारी १९६०
निमंत्रक संस्था : बडोदा ॲमॅच्युअर्स ड्रॅमॅटिक क्लब

नाट्य संमेलन क्र. : ४३
अध्यक्ष : श्रीमती दुर्गाबाई खोटे
स्वागताध्यक्ष : –
स्थळ : दिल्ली
दिनांक : १९६१
निमंत्रक संस्था : –

नाट्य संमेलन क्र. : ४४
अध्यक्ष : श्री. शं. नी. चाफेकर
स्वागताध्यक्ष : –
स्थळ : नागपूर
दिनांक : १९६२
निमंत्रक संस्था : –

नाट्य संमेलन क्र. : ४५
अध्यक्ष : श्री. अनंत काणेकर
स्वागताध्यक्ष : –
स्थळ : मुंबई
दिनांक : २२ ते २४ फेब्रुवारी १९६३
निमंत्रक संस्था : नाट्यकलोपासक मंडळ, दादर

नाट्य संमेलन क्र. : ४६
अध्यक्ष : श्री. पु. भा. भावे
स्वागताध्यक्ष : –
स्थळ : अहमदनगर
दिनांक : १९६४
निमंत्रक संस्था : –

नाट्य संमेलन क्र. : ४७
अध्यक्ष : श्री. पु. ल. देशपांडे
स्वागताध्यक्ष : –
स्थळ : नांदेड
दिनांक : १९६५
निमंत्रक संस्था : –

नाट्य संमेलन क्र. : ४८
अध्यक्ष : श्री. सदाशिव अनंत शुक्ल
स्वागताध्यक्ष : –
स्थळ : पुणे
दिनांक : २२ एप्रिल १९६७
निमंत्रक संस्था : –

नाट्य संमेलन क्र. : ४९
अध्यक्ष : श्री. मोतीराम गजानन रांगणेकर
स्वागताध्यक्ष : -
स्थळ : म्हापसे-गोवा
दिनांक : १० फेब्रुवारी १९६८
निमंत्रक संस्था : -

नाट्य संमेलन क्र. : ५०
अध्यक्ष : श्री. ग. दि. माडगुळकर
स्वागताध्यक्ष : -
स्थळ : ग्वाल्हेर
दिनांक : १९६९
निमंत्रक संस्था : -

नाट्य संमेलन क्र. : ५१
अध्यक्ष : श्री. विनायक वामन शिरवाडकर
स्वागताध्यक्ष : -
स्थळ : कोल्हापूर
दिनांक : १३ फेब्रुवारी १९७०
निमंत्रक संस्था : करवीर नाट्य मंडळ, कोल्हापूर

नाट्य संमेलन क्र. : ५२
अध्यक्ष : श्री. वसंत गिरीश कानेटकर
स्वागताध्यक्ष : -
स्थळ : कुर्ला
दिनांक : १२ फेब्रुवारी १९७१
निमंत्रक संस्था : राजहंस कला सेवा मंडळ, कुर्ला-मुंबई

नाट्य संमेलन क्र. : ५३
अध्यक्ष : श्री. मामा पेंडसे
स्वागताध्यक्ष : -
स्थळ : कल्याण
दिनांक : १९७२
निमंत्रक संस्था : -

नाट्य संमेलन क्र. : ५४
अध्यक्ष : श्री. वसंत देसाई
स्वागताध्यक्ष : श्री. बा. म. गोगटे
स्थळ : मुंबई
दिनांक : ३० मार्च १९७३
निमंत्रक संस्था : -

नाट्य संमेलन क्र. : ५५
अध्यक्ष : श्री. विद्याधर गोखले
स्वागताध्यक्ष : -
स्थळ : बडोदे
दिनांक : १५ एप्रिल १९७४
निमंत्रक संस्था : बरोडा ॲमॅच्युअर्स ड्रॅमॅटिक क्लब, बडोदे

नाट्य संमेलन क्र. : ५६
अध्यक्ष : श्री. भालचंद्र पेंढारकर
स्वागताध्यक्ष : -
स्थळ : यवतमाळ
दिनांक : १४ नोव्हेंबर १९७५
निमंत्रक संस्था : नाट्यरंजन, यवतमाळ

नाट्य संमेलन क्र. : ५७
अध्यक्ष : श्री. दाजी भाटवडेकर
स्वागताध्यक्ष : -
स्थळ : नवी दिल्ली
दिनांक : १९७६
निमंत्रक संस्था : -

नाट्य संमेलन क्र. : ५८
अध्यक्ष : श्री. पुरुषोत्तम वेंकटेश दारव्हेकर
स्वागताध्यक्ष : -
स्थळ : पुणे
दिनांक : २४ डिसेंबर १९७७
निमंत्रक संस्था : -

नाट्य संमेलन क्र. : ५९
अध्यक्ष : श्री. भालबा केळकर
स्वागताध्यक्ष : -
स्थळ : सावंतवाडी
दिनांक : २३ ते २५ डिसेंबर १९७८
निमंत्रक संस्था : -

नाट्य संमेलन क्र. : ६०
अध्यक्ष : श्री. स्वरराज छोटा गंधर्व
स्वागताध्यक्ष : -
स्थळ : रूपारेल कॉलेज, माहिम-मुंबई (डॉ. अमृत नारायण भालेराव नगर)
दिनांक : २३ फेब्रुवारी १९८०
निमंत्रक संस्था : -

नाट्य संमेलन क्र. : ६१
अध्यक्ष : श्री. आत्माराम भेंडे
स्वागताध्यक्ष : -
स्थळ : नाशिक
दिनांक : १९८१
निमंत्रक संस्था : -

नाट्य संमेलन क्र. : ६२
अध्यक्ष : श्री. वसंतराव देशपांडे
स्वागताध्यक्ष : -
स्थळ : वीर वामनराव जोशी, नाट्यनगरी, आगरकर विद्यालय, अकोला
दिनांक : १३ ते १५ फेब्रुवारी १९८२
निमंत्रक संस्था : रसिकाश्रय, अकोला

नाट्य संमेलन क्र. : ६३
अध्यक्ष : श्री. रणजीत देसाई
स्वागताध्यक्ष : -
स्थळ : कोल्हापूर
दिनांक : १९८३
निमंत्रक संस्था : -

नाट्य संमेलन क्र. : ६४
अध्यक्ष : श्रीमती जोत्स्ना भोळे
स्वागताध्यक्ष : -
स्थळ : पणजी-गोवा
दिनांक : ४ ते ६ फेब्रुवारी १९८४
निमंत्रक संस्था : -

नाट्य संमेलन क्र. : ६५
अध्यक्ष : श्री. प्रभाकर पणशीकर
स्वागताध्यक्ष : -
स्थळ : नागपूर
दिनांक : ११ ते १३ जानेवारी १९८५
निमंत्रक संस्था : -

नाट्य संमेलन क्र. : ६६
अध्यक्ष : श्री. प्रभाकर पणशीकर
स्वागताध्यक्ष : -
स्थळ : पुसद (जि. यवतमाळ)
दिनांक : ७ ते ९ एप्रिल १९८६
निमंत्रक संस्था : जनता शिक्षण प्रसारक मंडळ, पुसद

नाट्य संमेलन क्र. : ६७
अध्यक्ष : श्रीमती विजया मेहता
स्वागताध्यक्ष : -
स्थळ : इचलकरंजी
दिनांक : २६ ते २८ डिसेंबर १९८६
निमंत्रक संस्था : अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषद, शाखा इचलकरंजी

नाट्य संमेलन क्र. : ६८
अध्यक्ष : श्री. चित्तरंजन कोल्हटकर
स्वागताध्यक्ष : श्री. बाबा डिके
स्थळ : इंदोर
दिनांक : २५,२६,२७ डिसेंबर १९८७
निमंत्रक संस्था : अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषद, शाखा इंदोर

नाट्य संमेलन क्र. : ६९
अध्यक्ष : श्री. राजाराम केशव शिंदे
स्वागताध्यक्ष : श्री. वसंतदादा पाटील
स्थळ : नाट्य पंढरी, सांगली (कै. विष्णुदास भावे नगर, राजावाडा परिसर)
दिनांक : २३,२४,२५ डिसेंबर १९८८
निमंत्रक संस्था : अ.भा.म. नाट्यविद्या मंदिर समिती, सांगली
अ.भा.म. नाट्यपरिषद, सांगली शाखा

नाट्य संमेलन क्र. : ७०
अध्यक्ष : श्री. शाहीर कृष्णराव साबळे
स्वागताध्यक्ष : श्री. दामू केंकरे
स्थळ : संगीतसूर्य केशवराव भोसले नगर, रविंद्र नाट्यमंदिर, मुंबई
दिनांक : ३ ते ४ फेब्रुवारी १९९०
निमंत्रक संस्था : अ.भा.म. नाट्यपरिषद, मध्यवर्ती शाखा, मुंबई

नाट्य संमेलन क्र. : ७१
अध्यक्ष : श्री. माधव मनोहर
स्वागताध्यक्ष : श्री. प्रतापराव भोसले
स्थळ : यशवंतराव चव्हाण नगर, सातारा
दिनांक : २८ ते ३० डिसेंबर १९९०
निमंत्रक संस्था : अ.भा.म. नाट्यपरिषद, सातारा शाखा

नाट्य संमेलन क्र. : ७२
अध्यक्ष : श्री. शरद तळवलकर
स्वागताध्यक्ष : श्री. प्रभाकर शिंदे
स्थळ : वसंतराव नाईक नगर, वाशी, नवी मुंबई
दिनांक : २७ ते २९ डिसेंबर १९९१
निमंत्रक संस्था : अ.भा.म. नाट्यपरिषद, वाशी शाखा

नाट्य संमेलन क्र. : ७३
अध्यक्ष : श्री. वसंत सबनीस
स्वागताध्यक्ष : श्री. जयंत साळगावकर
स्थळ : यशवंतराव चव्हाण सेंटर, नरीमन पॉईंट, मुंबई
दिनांक : १० ते ११ एप्रिल १९९३
निमंत्रक संस्था : अ.भा.म. नाट्यपरिषद, मुंबई

नाट्य संमेलन क्र. : ७४
अध्यक्ष : श्री. आत्माराम सावंत
स्वागताध्यक्ष : श्री. लिलाधर हडकर
स्थळ : मालवण, जि. सिंधुदुर्ग
दिनांक : १ ते ३ एप्रिल १९९४
निमंत्रक संस्था : अ.भा.म. नाट्यपरिषद, मालवण शाखा

नाट्य संमेलन क्र. : ७५
अध्यक्ष : श्री. राजा गोसावी
स्वागताध्यक्ष : श्री. शरद पवार
स्थळ : बारामती, जिल्हा, पुणे
दिनांक : १२ ते १४ मे १९९५
निमंत्रक संस्था : अ.भा.म. नाट्यपरिषद, बारामती शाखा

नाट्य संमेलन क्र. : ७६
अध्यक्ष : श्री. जितेंद्र अभिषेकी
स्वागताध्यक्ष : श्री. रमेश कदम
स्थळ : चिपळूण, जि. रत्नागिरी
दिनांक : २३ ते २४ डिसेंबर १९९५
निमंत्रक संस्था : अ.भा.म. नाट्यपरिषद, चिपळूण शाखा

नाट्य संमेलन क्र. : ७७
अध्यक्ष : श्री. नाना पाटेकर
स्वागताध्यक्ष : डॉ. दौलतराव आहेर
स्थळ : स्वातंत्र्यवीर सावरकर नगर, नाशिक
दिनांक : १८ ते १९ जानेवारी १९९७
निमंत्रक संस्था : अ.भा.म. नाट्यपरिषद, नाशिक शाखा

नाट्य संमेलन क्र. : ७८
अध्यक्ष : श्रीमती भक्ती बर्वे इनामदार
स्वागताध्यक्ष : मा. श्री. नारायण राणे
स्थळ : जयवंत दळवी नाट्य नगरी, कणकवली. जि. सिंदुधुर्ग
दिनांक : २ ते ३ मे १९९८
निमंत्रक संस्था : वसंतराव आचरेकर सांस्कृतिक प्रतिष्ठान, कणकवली

नाट्य संमेलन क्र. : ७९
अध्यक्ष : डॉ. राजाराम अमृत तथा बाळ भालेराव
स्वागताध्यक्ष : श्री. हनुमंतजी भोसले (महापौर)
स्थळ : मोरया नाट्य नगरी, पिंपरी-चिंचवड, पुणे
दिनांक : १५ ते १७ फेब्रुवारी १९९९
निमंत्रक संस्था : अ.भा.म. नाट्यपरिषद, पिंपरी-चिंचवड शाखा

नाट्य संमेलन क्र. : ८०
अध्यक्ष : डॉ. लक्ष्मणराव देशपांडे
स्वागताध्यक्ष : श्री. रावसाहेब जामकर
स्थळ : परभणी
दिनांक : ८ ते ९ जानेवारी २०००
निमंत्रक संस्था : अ.भा.म. नाट्यपरिषद, परभणी शाखा

नाट्य संमेलन क्र. : ८१
अध्यक्ष : श्री. रमेश चौधरी
स्वागताध्यक्ष : श्री. सुनील तटकरे
स्थळ : श्री धावीर नगरी, रोहा, जि. रायगड
दिनांक : २४ ते २५ फेब्रुवारी २००१
निमंत्रक संस्था : अ.भा.म. नाट्यपरिषद, रायगड शाखा

नाट्य संमेलन क्र. : ८२
अध्यक्ष : श्री. मोहन तोंडवळकर
स्वागताध्यक्ष : श्री. संजय राऊत
स्थळ : रणवीर चिमाजी अप्पा मैदान, वसई
दिनांक : ६ व ७ एप्रिल २००२
निमंत्रक संस्था : अ.भा.म. नाट्यपरिषद, वसई शाखा

नाट्य संमेलन क्र. : ८३
अध्यक्ष : श्रीमती जयमालाबाई शिलेदार
स्वागताध्यक्ष : श्री. ना. दिलीप गांधी
स्थळ : बालगंधर्व नगरी, अहमदनगर
दिनांक : ३ ते ४ मे २००३
निमंत्रक संस्था : अ.भा.म. नाट्यपरिषद, अहमदनगर शाखा

नाट्य संमेलन क्र. : ८४
अध्यक्ष : श्री. शं. ना. नवरे
स्वागताध्यक्ष : श्री. जयसिंग चव्हाण
स्थळ : यशवंतराव चव्हाण नगर, कऱ्हाड
दिनांक : ३१ जानेवारी, १ फेब्रुवारी २००४
निमंत्रक संस्था : अ.भा.म. नाट्यपरिषद, कऱ्हाड शाखा

नाट्य संमेलन क्र. : ८५
अध्यक्ष : श्री. सुरेश खरे
स्वागताध्यक्ष : श्री. हरीशचंद्र पाटील (महापौर, आमदार)
स्थळ : डोंबिवली
दिनांक : २९ ते ३० जानेवारी २००५
निमंत्रक संस्था : अ.भा.म. नाट्यपरिषद, कल्याण-डोंबिवली शाखा

नाट्य संमेलन क्र. : ८६
अध्यक्ष : श्री. प्रा. दत्ता भगत
स्वागताध्यक्ष : श्री. ना. अशोकराव चव्हाण (सांस्कृतिक मंत्री)
स्थळ : नांदेड
दिनांक : २८ ते २९ जानेवारी २००६
निमंत्रक संस्था : अ.भा.म. नाट्यपरिषद, नांदेड शाखा

नाट्य संमेलन क्र. : ८७
अध्यक्ष : श्रीमती लालन सारंग
स्वागताध्यक्ष : ना. श्री. नारायणराव राणे (महसूल मंत्री)
स्थळ : कणकवली
दिनांक : २८ ते २९ एप्रिल २००७
निमंत्रक संस्था : अ.भा.म. नाट्यपरिषद, मालवण शाखा

नाट्य संमेलन क्र. : ८८
अध्यक्ष : श्री. रमेश देव
स्वागताध्यक्ष : मा.ना.श्री. सुशिलकुमार शिंदे (केंद्रिय उर्जा मंत्री)
स्थळ : सोलापूर
दिनांक : १९ ते २० जानेवारी २००८
निमंत्रक संस्था : अ.भा.म. नाट्यपरिषद, सोलापूर शाखा

नाट्य संमेलन क्र. : ८९
अध्यक्ष : श्री. रामदास कामत
स्वागताध्यक्ष : श्री. जयदत्त क्षीरसागर
स्थळ : बीड
दिनांक : १४ ते १५ फेब्रुवारी २००९
निमंत्रक संस्था : अ.भा.म. नाट्यपरिषद, बीड शाखा

नाट्य संमेलन क्र. : ९० (पहिले विश्व मराठी नाट्य संमेलन)
अध्यक्ष : श्री. रामदास कामत
स्वागताध्यक्ष : –
स्थळ : न्यू जर्सी, अमेरिका
दिनांक : २०१०
निमंत्रक संस्था : अ.भा.म. नाट्यपरिषद, न्यू जर्सी शाखा

नाट्य संमेलन क्र. : ९१
अध्यक्ष : श्री. राम जाधव, अकोला
स्वागताध्यक्ष : आ. श्री. उदय सामंत
स्थळ : रत्नागिरी
दिनांक : २८ ते ३० जानेवारी २०११
निमंत्रक संस्था : अ.भा.म. नाट्यपरिषद, रत्नागिरी शाखा

नाट्य संमेलन क्र. : ९२
अध्यक्ष : श्री. श्रीकांत मोघे, पुणे
स्वागताध्यक्ष : –
स्थळ : सांगली
दिनांक : २० ते २२ जानेवारी २०१२
निमंत्रक संस्था : –

नाट्य संमेलन क्र. : ९३
अध्यक्ष : डॉ. मोहन आगाशे
स्वागताध्यक्ष : मा.ना. श्री. अजितदादा पवार
स्थळ : बारामती
दिनांक : २२ ते २३ डिसेंबर २०१२
निमंत्रक संस्था : अ.भा.म. नाट्यपरिषद, बारामती शाखा

नाट्य संमेलन क्र. : ९४
अध्यक्ष : श्री. अरुण काकडे
स्वागताध्यक्ष : मा. श्री. भारत भालके
स्थळ : पंढरपूर
दिनांक : ३१ जानेवारी, १ ते २ फेब्रुवारी २०१४
निमंत्रक संस्था : अ.भा.म. नाट्यपरिषद, पंढरपूर शाखा

नाट्य संमेलन क्र. : ९५
अध्यक्ष : श्रीमती फैय्याज शेख
स्वागताध्यक्ष : श्री. अशोक साठे
स्थळ : बेळगाव
दिनांक : ६ ते ८ फेब्रुवारी २०१५
निमंत्रक संस्था : अ.भा.म. नाट्यपरिषद, बेळगाव शाखा

A 5 Star Awarded Project by

CRISIL RATINGS

Available :
1/2/3/4 BHK Flats | Penthouses
|Villas | Private Apartments

Lotus County

Belgaum's Finest Housing Community
Tilakwadi

Contact : 9480828800 / 01/02/11

www.llipl.com

PNG®
Since 1832

मे. पुरुषोत्तम नारायण गाडगीळ

सराफ आणि ज्युवेलर्स

सांगली : सराफ बझार - विश्रामबाग | कोल्हापूर | चिपळूण